
# झुंडशाहीचे बंड

ओ.वाय. गॅसेट यांच्या
Revolt of the Masses
या पुस्तकाचे भाषांतर



अनुवादक
बा.रं.सुंठणकर

महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमाणिका

# झुंडशाहीचे बंड

(ओ. वाय. गॅसेट यांच्या Revolt of the Masses या ग्रंथाचे मराठी भाषांतर)

भाषांतरकार

**बा. रं. सुंठणकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि आणि संस्कृती मंडळ,
मुंबई

अनुक्रमाणिका

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८८

**प्रकाशक :**
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई-४०००३२

© प्रकाशकाधीन

**मुद्रक :**
स्नेहेश प्रिंटर्स,
३२० ए, शाह-नाहर इंडस्ट्रियल इस्टेट, ए १,
धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-४०० ०१३.

**किंमत २० रुपये**

अनुक्रमाणिका

# निवेदन

श्री. ओ. वाय. गॅसेट यांनी लिहिलेल्या “रिव्होल्ट ऑफ दि मासेस” या पुस्तकाचा श्री. बा. रं. सुंठणकर यांनी केलेला हा अनुवाद “झुंडशाहीचे बंड”

श्री. सुंठणकर यांच्यासारख्या ज्येष्ठ विचारवंताच्या लेखणीतून हा अनुवाद उतरलेला आहे. एवढेच सांगितले की पुरे, या ग्रंथाचे वाचक स्वागत करतील.

**सुरेंद्र बारलिंगे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ

४२, यशोधन,
मुंबई-४०० ०२०.
दिनांक २६ जानेवारी, १९८८.

अनुक्रमाणिका

# भाषांतरकर्त्याचे निवेदन

प्रसिद्ध स्पॅनिश तत्वज्ञ ओ. वाय. गॅसेट यांच्या Revolt of the Masses या पुस्तकाचे शक्य तो मूळास धरून केलेले हे भाषांतर आहे. गॅसेट हा विसाव्या शतकातील स्पेनचा मौलिक विचारवंत असून तो फ्रँकोच्या पूर्वकाळातील स्पेनच्या बौद्धिक क्षेत्रातील एक धुरीण होता. स्पेनच्या यादवी युद्धाच्या काळात त्याला स्पेन सोडून वनवासात जावे लागले. १९३० साली प्रसिद्ध झालेले प्रस्तुत पुस्तक हे युरोपीय वाङ्मयातील महत्वपूर्ण पुस्तक समजले जाते. गॅसेटची लिहिण्याची शैली विशिष्ट असून ती क्लिष्ट असली तरी अर्थगर्भ आहे. विचाराना चालना देण्याचे मोठे सामर्थ्य तीमध्ये आहे. विवेचन करण्याची त्याची एक विशिष्ट एक विशिष्ट मर्मग्राही धर्ती असून कोणत्याही घटनेकडे तो व्यापक दृष्टीकोणातून पहातो. या पुस्तकात आधुनिक काळात युरोपातच नव्हे तर साऱ्या जगभर जनसमुदायांचे जे उत्थान झाले आहे आणि त्यातून जी झुंडशाही निर्माण झाली आहे तिची मीमांसा आणि विश्लेषण गॅसेटने विविध अंगांनी केले आहे. झुंडशाहीची त्याने केलेली मीमांसा सध्याच्या भारताच्या परिस्थितीला यथार्थाने लागू पडते. मधुनमधून आपल्याकडे जे झुंडीच्या उठावाचे प्रकार घडत आहेत त्यांचा उलगडा व्हायला हे पुस्तक उपयुक्त ठरेल यात शंका नाही. म्हणून या पुस्तकाचे महत्व. मात्र हे पुस्तक वाचताना १९३० सालामधले जागतिक संदर्भ लक्षात घेणे अवश्य आहे.

कै. प्रा. गोवर्धन पारीख यांनी भाषांतराचे हस्तलिखित तपासून बहुमोल सूचना केल्या होत्या, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने हे भाषांतर प्रकाशित केल्याबद्दल मी मंडळाचा आभारी आहे.

**—बा. रं. सुंठणकर**

अनुक्रमाणिका

# अणुक्रमणिका


निवेदन ........ ४
भाषांतरकर्त्याचे निवेदन ........ ५
प्रकरण १ ले ........ ७
झुंड अवतरली ........ ७
प्रकरण २ रे ........ १२
इतिहासाची पातळी चढली ........ १२
प्रकरण ३ रे ........ १७
काळाची उंची ........ १७
प्रकरण ४ थे ........ २३
जीवनाची वाढ ........ २३
प्रकरण ५ वे ........ २८
लोकसंख्येची वाढ ........ २८
प्रकरण ६ वे ........ ३२
जनसमुदायमानवाचे विच्छेदन ........ ३२
प्रकरण ७ वे ........ ३६
अमीरी जीवन आणि सामान्य जीवन किंवा यत्नशीलता आणि जडता ........ ३६
प्रकरण ८ वे ........ ४१
झुंडशाही—रानटीपणाची सनद ........ ४१
प्रकरण ९ वे ........ ४७
झुंडीचा रानटीपणा आणि तांत्रिकज्ञान ........ ४७
प्रकरण १० वे ........ ५३
आदिम अवस्था आणि इतिहास ........ ५३
प्रकरण ११ वे ........ ५९
आत्मसंतुष्ट युग ........ ५९
प्रकरण १२ वे ........ ६५
विशेषज्ञता आणि रानटीपणा* ........ ६५
प्रकरण १३ वे ........ ७०
राज्यसंस्था—महत्तम संकट ........ ७०
प्रकरण १४ वे ........ ७६
जगावर कोण राज्य करतो ? ........ ७६
प्रकरण १५ वे ........ ११४
प्रश्नाचे खरे स्वरूप ........ ११४
शब्दसूची ........ ११७

# प्रकरण १ ले

## झुंड अवतरली

सध्या युरोपच्या समाजजीवनात एक अतिशय महत्वाची घटना दृष्टोत्पत्तीस येते—मग ती बरी असो वा वाईट असो. ही घटना म्हणजे संपूर्ण सामजिक बलस्थानावर जनसमुदाय आरुढ होत आहे ही होय. हे जनसमुदाय झुंडीच्या स्वरुपात आहेत. झुंड या संज्ञेनुसार ती स्वतःच्या वेगळ्या अस्तित्वाचे मार्गदर्शन करू शकत नाही आणि तिने तसे करूही नये. इतकेच नव्हे तर समाजावर तिचे अधिराज्यही चालू नये. युरोप आज समाज, राष्ट्रे आणि संस्कृती याना ग्रासणाऱ्या महान संकटात सापडला आहे. इतिहासात अशी संकटावस्था अनेकदा येऊन गेली आहे. तिची लक्षणे आणि परिणाम ही सर्वांच्या माहितीची आहेत; तसेच तिचे नावही. तिला जनसमुदायाचे, झुंडीचे बंड म्हणतात. ही भयानक घटना समजून घेण्यासाठी प्रारंभीच बंड, झुंड आणि सामाजिक बलस्थान या शब्दाना सर्वथा किंवा प्रामुख्याने राजकीय अर्थ देता कामा नये. राजकीय जीवन हे सर्वस्वी राजकीय नसते. तर तितक्याच प्रमाणात आणि प्राथम्याने ते बौद्धिक, नैतिक, आर्थिक, धार्मिक असते. त्यात आमच्या सामुदायिक सवयी, तशाच आमच्या वेषभूषा आणि करमणुकी यांच्या चालीचे प्रकारही समाविष्ट असतात. किंबहुना ही ऐतिहासिक घटना समजून घेण्याकरिता प्रत्यक्षात येणाऱ्या अनुभवाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यामुळेच दृष्टीगोचर अशी एक बाजू स्पष्ट होईल. ही घटना उच्चारण्याला सोपी असली, तरी विश्लेषणाला ती कठीण आहे. मी या घटनेला गर्दी, 'परिपूर्णता' म्हणेन. शहरे माणसांनी गजबलेली आहेत, घरे भाडेकरूंनी भरून गेली आहेत, अतिथीगृहे अतिथींनी व्यापलेली आहेत, गाड्यामधून प्रवाशांची तुंडुब गर्दी आहे, प्रसिद्ध डॉक्टरांची चिकित्सालये रोग्यानी भरलेली आहेत, नाट्यगृहे प्रेक्षकाना अपुरी पडत आहेत, आणि चौपाट्या स्नानार्थींनी भरून गेल्या आहेत. पूर्वी सामान्यपणे जो प्रश्न वाटत नव्हता ती आज हरघडीची विवंचना झाली आहे. ती म्हणजे जागा मिळविणे.

बस्स इतकेच. यापेक्षा प्रत्यक्ष जीवनात अधिक साधी, अधिक ठराविक आणि अधिक स्थिर अशी घटना असू शकेल का? या निरीक्षणाच्या थोडे खोलात शिरले म्हणजे आमच्या प्रत्यक्ष जीवनाचा धवल प्रकाश समृद्ध बहुरंगी आशयात कसा प्रकट होतो आणि त्याचा अपेक्षित प्रकाशझोत कसा उफाळून वर येतो, हे पाहून आम्ही थक्क होऊन जातो. आम्हाला त्यात काय बरे दिसते? आणि त्या दृश्याने आम्ही आश्चर्यचकित तरी का होतो? आम्हाला जमाव दिसतो, जमाव या नात्याने तो संस्कृतीने निर्माण केलेली साधने आणि स्थाने हस्तगत करतो. थोड्याशा विचारांती आम्हाला वाटणाऱ्या आश्चर्यानेच आम्ही चकित होऊन जातो. असे का व्हावे? ही वस्तुस्थिती आदर्श नाही का? रंगमंदिरात बसण्याकरता जागा असतात—दुसऱ्या शब्दात ते मंदिर पूर्णपणे भरायला हवे—आणि आता ती मंदिरे तुडुंब भरली आहेत. आज जाऊ इच्छिणारे बाहेर ताटकळत उभे रहातात. ही घटना जरी अगदी तर्कसंगत आणि स्वाभाविक वाटली, तरी पूर्वी असे घडत नव्हते; आणि आता ते घडत आहे, हे मान्य करण्याखेरीज गत्यंतर नाही. परिणामतः बदल झाले आहेत, नाविन्य झाले आहे; म्हणून निदान प्रथमक्षणी तरी आमचे आश्चर्य समर्थनीय ठरते.

अनुक्रमाणिका

आश्चर्यचकित होणे, स्तिमित होणे, हा समजून घेण्याचा आरंभ होय. बुद्धिमान माणसाची खास अशी ती क्रीडा आहे, त्याचा तो विलास आहे. जगाकडे डोळे उघडून विस्मयाने पाहणे हा बुद्धिमतांच्या जातीचा वैशिष्ट्यपूर्ण आविष्कार आहे. जो आपले डोळे सताड उघडे ठेवतो, त्याला जगातील प्रत्येक गोष्ट विलक्षण आणि आश्चर्यकारक वाटते. विस्मयाच्या या प्रवृत्तीत फुटबॉलच्या शौकिनांनाही न मिळणारा आनंद सामावलेला असतो. दुसऱ्या परीने या प्रवृत्तीने बुद्धिमंतांना, आपल्या जीवनात कल्पनासृष्टीत रममाण होणाऱ्या माणसाला मिळणारा शाश्वत परमानंद मिळूत असतो. डोळ्यात दिसणारे नवल हे त्याचे विशेष लक्षण होय. म्हणून प्राचीननांनी मिनर्व्हा देवतेला सदैव दिपलेल्या डोळ्यांचा घुबडपक्षी बहाल केला.

झुंड, अमाप गर्दी हे पूर्वी नित्याचे नव्हते, मग आताच ते का उद्‌भवले ? आमच्या भोवतालच्या जमावाचे घटक हे काही शून्यातून निर्माण झाले नाहीत. पंधरा वर्षांपूर्वी लोकांची संख्या जवळजवळ आताइतकीच होती. खरे पहाता, एकोणीसशे चौदा ते अठराच्या महायुद्धानंतर त्या संख्येत घट होणे स्वाभाविक होते. इतके असूनही इथे पहिला महत्वाचा मुद्दा उपस्थित होतो. जमाव बनवणाऱ्या व्यक्ति अस्तित्वात होत्या, पण त्या झुंड या स्वरुपात नव्हत्या. लहान गटात किंवा एकाकी त्या जगात विखुरल्या होत्या. सकृत्‌दर्शनी विभिन्न, विस्कळित आणि पृथक असे जीवन त्या जगत होत्या. प्रत्येक व्यक्ति किंवा लहान गट आपल्या प्रदेशात, खेड्यात, नगरात किंवा उपनगरात स्वतःच्या जागी राहात असे. आता अकस्मात झुंड म्हणून त्या दृश्यमान होतात आणि कोणत्याही दिशेने पाहिले तरी जमावच जमाव दृष्टीस पडतात. कोणत्याही दिशेने एवढेच नव्हे, तर नेमक्या सर्वात चांगल्या जागी, मानवी संस्कृतीच्या अधिक सुंदर निर्मितीच्या जागी त्या आढळतात. पूर्वी त्या जागा लहानसहान गटाकरता, एका शब्दात अल्पसंख्याकरता राखल्या गेल्या होत्या. जमाव हे आता अकस्मात दृश्यमान होत आहेत. समाजातील अधिक चांगल्या स्थानावर ते अधिष्ठित झाले आहेत. पूर्वी जमाव होते, पण ते लक्ष वेधून घेत नसत. ते सामाजिक रंगमंचाच्या पार्श्वभागी वावरत असत. आता ते रंगमंचाच्या अग्रभागी आले असून मुख्य भूमिका सजवीत आहेत. रंगमंचावर आता मुख्य पात्रे नाहीत; तेथे आता केवळ समूहगान आहे.

समूह ही संकल्पना संख्यावाचक आणि दृग्गोचर आहे. तिचे मूळ स्वरूप न बदलता समाजशास्त्राच्या परिभाषेत तिचा अन्वयार्थ लावू या. असे केल्याने आम्ही 'सामाजिक समुदाय' या कल्पनेकडे येतो. समाज म्हणजे सदैव या दोन घटकांचे गतिमान ऐक्य होय : अल्प जन आणि बहुजनसमाज. अल्पजन म्हणजे विशेष गुणांनी युक्त अशा व्यक्ति किंवा व्यक्तींचे गट. बहुजनसमाज म्हणजे विशेष गुणांनी युक्त नसलेल्या माणसांचा समुच्चय. बहुजनसमाज याचा अर्थ पूर्णतः किंवा मुख्यतः 'कामगार जनसमुदाय' असा समजावयाचा नाही. बहुजनसमाज या शब्दाने सर्वसामान्य माणूस सूचित होतो. अशाप्रकारे पूर्वी जे निव्वळ संख्यावाचक—समुदाय— होते. त्यांचे रुपांतर आता गुणवाचक निश्चित गोष्टीत झाले आहे. त्याचेच आता एक सामाजिक लक्षण बनले आहे. माणूस हा इतरांपासून वेगळा राहिला नसून तो एक जातिवाचक नमुन्याची प्रतीती देत आहे. संख्येचे असे गुणात रुपांतर झाल्याने आम्हाला काय मिळाले? इतकेच की, गुणाच्या योगाने आम्हाला संख्येची उत्पत्ति समजते. समुदायाच्या स्वाभाविक घडणीत तो घडविणाऱ्या व्यक्तींच्या इच्छा, विचार आणि जीवनमार्ग यांचा संयोग गर्भित असतो, हे सांगणे म्हणजे शिळ्या कढीला उत आणण्यासारखे आहे. प्रत्येक सामाजिक गटाच्या बाबतीत, मग तो गट स्वतःला निवडक जन म्हणवून घेण्यासाठी कितीही धडपड करो, अगदी असेच घडते आहे असा आक्षेप घेण्यात येईल. हे तर खरेच; पण त्यात मूलतः फरक आहे. जमाव आणि जनसमुदाय म्हणून गणना करता येणार नाही अशा गटातील व्यक्तींचे प्रत्यक्ष एकत्र येणे हे विशिष्ट इच्छा, विचार किंवा ध्येय यावर

अनुक्रमाणिका

आधारलेले असते आणि त्यातून बहुसंख्य वगळले जातात. कोणत्याही प्रकाराने अल्पसंख्य गणले जाण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आधीच स्वतः खास, सापेक्षतया वैयक्तिक कारणाकरता जमावापासून वेगळे होणे आवश्यक असते. इतर अल्पजनाशी होणारा तिचा संयोग गौण स्वरुपाचा असतो आणि तो त्यांच्या पैकी प्रत्येकाने विशेष वृत्ती धारण केल्यामुळे मागाहून घडून येणारा असतो. परिणामतः बऱ्याच मोठ्या प्रमाणात संयोंग न होण्याचा तो योगायोग असतो. गटाचे हे विशेष प्रकारचे स्वरूप स्पष्टपणे उघड करून दाखविणारी उदाहरणे आहेत : स्वतःला 'अनाग्रहवादी' म्हणविणाऱ्या इंग्रजांचे गट आहेत, आणि ते एकत्र येतात याचे कारण समुदायासंबंधी त्यांचे एकमत असते. बहुजनापासून स्वतःला नेमके वेगळे काढण्यासाठी अल्पजनांचे एकत्र येणे, हा प्रत्येक अल्पजनांच्या घडणीचा एक आवश्यक घटक आहे. अभिजात गायकाचे गाणे ऐकणाऱ्या मर्यादित श्रोत्यांसंबंधी बोलताना मालार्मे विनोदाने म्हणतो की, श्रोतृवृन्द अल्पसंख्येने उपस्थित असल्यामुळे बहुजनाची अनुपस्थिती ठळकपणे उठून दिसते.

काटेकोरपणे सांगावयाचे तर मानसशास्त्रीय घटना या दृष्टीने बहुजनसमाज या शब्दाची व्याख्या करण्यासाठी बहुजन तयार होऊन ते ठळकपणे दिसू लागेपर्यंत थांबण्याचे कारण नाही. व्यक्ति एकच असली तरी ती 'समुदाय' आहे की नाही हे आम्ही ठरवू शकतो. समुदाय म्हणजे विशिष्ट भूमिकेवर आधारलेले स्वतःचे—बरे वा वाईट—मूल्य जो प्रस्थापित करीत नाही, पण आपण 'दुसऱ्या प्रत्येकासारखेच' आहो असे ज्याला वाटते आणि तरीही त्याचे त्याला काही वाटत नाही, खरोखरीच दुसऱ्या प्रत्येकाबरोबर आपण आहोत असे वाटण्यात जो सुख मानतो, तो होय. अशा एका साध्या माणसाची कल्पना करा की जो विशिष्ट कारणामुळे स्वतःचे मूल्य ठरविण्याचा प्रयत्न करतो आणि नंतर या वा त्या गोष्टीत आपली विशेष बुद्धि चालते का, अथवा कोणत्यातरी एका बाबतीत आपण इतरापेक्षा वरचढ आहो का, याविषयी स्वतःशी विचार केल्यानंतर आपल्यापाशी कोणताही गुण प्रकर्षाने नाही हे जाणतो अशा माणसाला आपण सुमार आणि सामान्य प्रतीचे आहो, आपल्याला निसर्गाचे देणे लाभले नाही, असे वाटेल. परंतु आपण स्वतः बहुजनसमाज आहो, असे त्याला वाटणार नाही.

ज्यावेळी 'निवडक अल्पजन' असे आपण म्हणतो त्यावेळी तिढ्या बुद्धीची माणसे या शब्दाचा वेडावाकडा अर्थ करतात, हे नित्याचे आहे. निवडक माणूस हा स्वतःला श्रेष्ठ समजण्याइतका उद्धट नसतो आणि त्याच्या अंगी उच्चतर अत्यावश्यक गुण जरी नसले, तरी इतरापेक्षा आपणात काही विशेष असावे, अशी तो अपेक्षा करतो. हे माहीत नसल्याचा ती तिढ्या बुद्धीची माणसे आव आणतात. कारण मानवजातीची सर्वात मूलग्राही अशी जी विभागणी करता येणे शक्य आहे, तीप्रमाणे मनुष्य प्राण्याचे दोन वर्ग पडतात यात शंका नाही. पहिला वर्ग अडचणी आणि कर्तव्ये यांची आपल्यासमोर रास उभी करून स्वतःबद्दल मोठ्या अपेक्षा बाळगत असतो. आणि दुसरा वर्ग स्वतःबद्दल विशेष अपेक्षा बाळगत नाही; पण तो पूर्ण जीवनाकडे पोचण्यासाठी स्वतः होऊन कोणत्याही प्रकारचे श्रम न करता जगत असतो; म्हणजेच आपण जसे आहो तसेच पुढेही रहाणे म्हणजेच जगणे असे तो मानीत असतो. हा दुसरा वर्ग लाटावर तरंगणाऱ्या केवळ तराफ्यासारख्या असतो. यावरून सनातनी बौद्ध धर्म दोन वेगळ्या धर्माचा बनलेला आहे याची मला आठवण होते : एक अधिक कडक आणि कठीण तर दुसरा अधिक सोपा आणि कमी दर्जाचा. पहिल्याला 'महायान' म्हणजे 'मोठे वाहन' किंवा 'मोठा मार्ग' आणि दुसऱ्याला 'हीनयान' म्हणजे, 'लहान वाहन' किंवा 'लहान मार्ग' असे म्हणतात. येथे निर्णायक गोष्ट म्हणजे कोणत्याही यानाशी आमचे जीवन निगडित करणे, कोणत्या कमाल किंवा किमान अपेक्षा स्वतःविषयी बाळगणे ही होय.

अनुक्रमाणिका

तेव्हा बहुजन आणि निवडक अल्पजन अशी विभागणी ही सामाजिक वर्गवारी नसून माणसांची वर्गवारी आहे. ती 'वरिष्ट' आणि 'कनिष्ट' वर्ग अशा श्रेणीच्या वर्गवारीशी जुळणारी नाही. अर्थात हे वरिष्ट वर्ग जोपर्यंत खरोखरीच वरिष्ट असतात, तोपर्यंत 'महायाना'चा स्वीकार करणारी माणसे आढळण्याचा संभव अधिक आहे, हे स्पष्ट आहे. तसेच 'कनिष्ट' वर्ग साधारणतः उणे गुण असणाऱ्या व्यक्तींचे बनलेले असतात. परंतु काटेकोरपणे सांगावयाचे तर या दोन्ही सामाजिक वर्गात बहुजन आणि खरेखुरे अल्पजन हो दोन्ही आढळतात. पारंपरिकदृष्ट्या निवडक गटातसुद्धा बहुजन आणि सामान्यजन यांचे प्राबल्य असते, हे आजच्या काळाचे वैशिष्ट्य पुढे दिसून येईलच. अशाप्रकारे ज्या बौद्धिक जीवनाला विशेष गुणांची मूलतः गरज असते आणि तसे पूर्वग्रहीत धरले जाते, त्यात खोट्या बुद्धिवंताची वाढती सरशी झालेली दिसून येते. या खोट्या बुद्धिवंतात विशेष गुणांचा अभाव असतो, विशेष गुण असण्याची क्षमताही नसते आणि मूळ मनोरचनेनेच ते अपात्र असतात. तीच गोष्ट 'सरदार वर्गातील' अद्याप टिकून राहिलेल्या गटातील स्त्री-पुरुषांची आहे. दुसऱ्या पक्षी ज्याना आज आम्ही बहुजनसमाज म्हणत आहोत त्यांचे उत्तम उदाहरण म्हणून ज्यांना पूर्वी मानता आले असते, त्या श्रमिक जनात सरदारी बाण्याची शिस्तबद्ध माणसे सापडणे दुर्मिळ नाही.

समाजामध्ये अत्यंत विविध प्रकारचे व्यापार, हालचाली आणि क्रिया चालू असतात. त्या सर्व स्वभावतःच विशेष प्रकारच्या असतात आणि परिणामेकरून गुणांची विशेष देणगी असल्याशिवाय ती योग्यरितीने पार पाडता येत नाहीत. उदाहरणार्थ, कलात्मक आणि उच्च स्वरुपाची विशिष्ट सुखे किंवा सार्वजनिक व्यवहारातील शासकीय आणि राजकीय निर्णयाची कामे. पूर्वी अशी कामे पात्रता असलेले अल्पजन किंवा निदान तशी पात्रता असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्ती पार पाडीत असत. त्यात हस्तक्षेप करण्याचा हक्क बहुजनांनी कधीही प्रस्थापित केला नव्हता. त्याना हस्तक्षेप करण्याची इच्छा झालीच, तर ती पात्रता अंगी असणे आवश्यक होते आणि मग स्वतःला केवळ बहुजन म्हणून राहता येणार नाही, याची जाणीव त्यांना असे. ते निकोप, गतिमान अशा सामाजिक जीवनातील स्वतःचे स्थान जाणून असत.

प्रारंभी दर्शविलेल्या गोष्टीकडे पुन्हा मागे वळले म्हणजे त्या गोष्टी बहुजन समाजाच्या बदललेल्या प्रवृत्तीची पूर्वचिन्हे आहेत, हे स्पष्टपणे दिसून येईल. या सर्व गोष्टी हेच दर्शवितात की, जनसमुदायाने सामाजिक जीवनाच्या आघाडीवर येण्याचे, आतापर्यंत थोड्या लोकाकरताच राखून ठेवलेल्या जागा व्यापण्याचे, त्यांची साधने उपभोगण्याचे ठरवले आहे. यापैकी फक्त स्थळांचेच उदाहरण घेतले, तरी ती स्थळे पूर्वी समुदायाकरता कधीही नव्हती हे उघड आहे. कारण त्यांचा आकार अतिशय मर्यादित असतो आणि गर्दी तर सतत ओसंडून चालली आहे. अशाप्रकारे अत्यंत स्पष्टरीतीने एक नवी घटना आमच्या डोळ्यासमोर प्रकट होत आहे; बहुजन बहुजन हे म्हणून राहूनच अल्पजनांना हुसकून लावून त्यांची जागा घेत आहेत.

आज पूर्वीपेक्षा लोक अधिक संख्येने आणि अधिक प्रमाणात स्वतः सुखे भोगीत आहेत, याबद्दल मला वाटते कोणालाही खेद होणार नाही. त्यांच्यापाशी आता इच्छा आणि ती पूर्ण करण्याची साधने ही दोन्हीही आहेत. यात वाईट एवढेच की, खास अल्पजनांच्या कार्याचा अंगिकार करण्याचा बहुजनांचा निर्णय सुखाच्या प्रांतातच तेवढा प्रकट होत आहे आणि होऊ शकतो; इतकेच नव्हे तर आजच्या काळाचे ते सामान्य लक्षण आहे. म्हणून मला असे वाटते की—पुढे जे सांगावयाचे आहे त्याची पूर्वसूचना येथे मी देत आहे—अलिकडच्या

काळातील राजकीय नाविन्य बहुजन समाजाच्या राजकीय वर्चस्वाशिवाय अन्य काहीही सूचित करीत नाही. जुन्या लोकशाहीवर उदारमतवाद आणि कायद्याविषयीची आस्था यांचे मोठ्या प्रमाणात संस्कार झाले होते. या तत्वांच्या अनुसरणाने व्यक्ति स्वतःला कडक शिस्तीत बांधून घेत असे. अल्पजन हे उदार तत्वे आणि कायद्याचे राज्य यांच्या आश्रयाला राहून कार्य करू शकत असत. लोकशाही आणि कायदा-कायद्याला अनुसरून लोकांचे सामायिक जीवन—ही समानार्थी होती. आता बहुजनसमाज प्रत्यक्षपणे कायदाबाह्य वर्तन करतो आणि प्रत्यक्ष दडपण आणून स्वतःच्या आशाआकांक्षा समाजावर लादतो. अशा अतिरेकी लोकशाहीच्या विजयची दृश्ये आज आम्ही पहात आहोत. जनसमुदाय राजकारणाला कंटाळलेले आहेत आणि ते चालविण्याचे काम त्यांनी तज्ञ माणसाकडे सोपविलेले आहे असे म्हणणे म्हणजे नव्या परिस्थितीचा चुकीचा अन्वयार्थ लावणे होय. वस्तुस्थिती याच्या अगदी उलट आहे. पूर्वी मात्र तसे घडत नसे आणि ती लोकशाही होती. त्यावेळी बहुजन असे गृहीत धरून चालत असत की, एकंदरीत अल्पजनांना, त्यांचे दोष आणि उणीवा लक्षात घेऊनही, सार्वजनिक प्रश्नाविषयी अधिक ज्ञान असते. उलटपक्षी, आता उपहारगृहात जन्मलेल्या कल्पनांना कायद्याचे सामर्थ्य देऊन त्या दुसऱ्यावर लादण्याचा आपल्याला हक्क आहे असा विश्वास बहुजनसमाज बाळगत असतो. आजच्या काळापेक्षा अधिक प्रत्यक्षपणे बहुजनांचे राज्य असलेले कालखंड इतिहासात होऊन गेले की नाही, याबद्दल मी साशंक आहे. म्हणूनच अतिरेकी लोकशाहीबद्दल मला बोलावे लागत आहे.

दुसऱ्या क्षेत्रात, विशेषतः बौद्धिक क्षेत्रात, हीच गोष्ट घडत आहे. मी चुकत असेनही, पण आजचा लेखक ज्यावेळी आपल्या गाढ व्यासंगाच्या विषयावर लिहिण्यासाठी लेखणी हाती घेतो, त्यावेळी त्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की, सामान्य वाचकाला त्या विषयासंबंधी काहीही आस्था नसते. ज्यावेळी हा वाचक वाचत असतो त्यावेळी त्याचा हेतू लेखकाकडून काही तरी शिकण्याचा नसतो, तर आपल्या डोक्यात बसलेल्या ढोबळ गोष्टींशी लेखक जेव्हा सहमत नसतो, तेव्हा त्यासंबंधी निर्णय ठोकून देणे हाच असतो. ज्या व्यक्तींचा समुदाय बनलेला असतो, त्यांना आपण विशेष योग्यतेचे आहो असे वाटले, तरी ती केवळ एक व्यक्तिगत प्रमादाची बाब होईल. ती काही समाजशास्त्रीय घडामोड होणार नाही. आजच्या घटकेचे वैशिष्ट्य हे की सामान्य प्रतीच्या मानवाला, स्वतः सामान्य असल्याची जाणीव असूनही, सामान्यांचे हक्क घोषित करण्याची आणि मन मानेल तसे ते दुसऱ्यावर लादण्याची खात्री वाटत असते. अमेरिकेत म्हणतात त्याप्रमाणे 'इतराहून वेगळे असणे ही असभ्यता आहे.' जे वेगळे असेल, उत्तम, वैयक्तिक, विशेष गुणानी युक्त आणि निवडक असेल ते सर्व जनसमुदाय आपल्या दबावाखाली चिरडून टाकतो. जो कोणी दुसऱ्या प्रत्येकासारखा नसतो आणि दुसऱ्या प्रत्येकासारखा विचार करीत नाही, त्याला वगळले जाण्याचा धोका पत्करावा लागतो. अर्थात आजचा 'प्रत्येकजण' हा पूर्वीचा 'प्रत्येकजण' राहिला नाही हे स्पष्ट समजावे. पूर्वी 'प्रत्येकजणा'त सामान्यपणे बहुजन आणि त्यापासून भिन्न असे वैशिष्ट्यपूर्ण अल्पजन यांचे संयुक्त ऐक्य होते. सध्या 'प्रत्येकजण' हा केवळ समुदाय आहे हे आजच्या काळाचे दारूण तथ्य आहे आणि त्याच्या वैशिष्ट्याचा पाशवीपणा मुळीच न लपवता मी त्याचे वर्णन केले आहे.

✶ ✶

# प्रकरण २ रे

# इतिहासाची पातळी चढली

सद्यःकालीन भयानक घटनेचे, तिच्या वैशिष्ट्यांच्या पाशवीपणाविषयीचा कोणताही आडपडदा न ठेवता केलेले वर्णन हे असे आहे. शिवाय, आमच्या आधुनिक संस्कृतीच्या इतिहासात सर्वस्वी नवीन अशी ही घटना आहे. या संस्कृतीच्या विकासक्रमात असे पूर्वी कधीही घडले नव्हते. तत्सदृश दुसरे काही शोधावयाचे झाल्यास, आधुनिक इतिहासाच्या मागे धाव घ्यावी लागेल आणि आमच्यापासून पूर्णतः भिन्न अशा एका जगात, एका मूलभूत घटकात, बुडी मारावी लागेल; प्राचीन जगाचा भेद घेऊन त्याच्या ऱ्हासकालापर्यंत आम्हाला पोहोचावे लागेल. रोमन साम्राज्याचा इतिहास हा सुद्धा समुदायांच्या साम्राज्याच्या उठावाचा इतिहास आहे. हे समुदाय मार्गदर्शन करू न शकणाऱ्या अल्पजनांना स्वतःमध्ये विलीन करून घेऊन त्यांना नष्ट करतात आणि त्यांच्याजागी स्वतःची स्थापना करतात. झुंडीचे, अमाप गर्दीचे दृश्य त्यावेळीसुद्धा निर्माण झाले होते. या कारणास्तव, स्पेंग्लरने उत्तम वर्णन केल्याप्रमाणे त्याकाळी आजच्याप्रमाणेच प्रचंड वास्तु बांधणे आवश्यक होते. जनसमुदायांचे युग हे अवाढव्यतेचे युग असते [या प्रक्रियेची शोकांतिका ही की, ही झुंड ज्यावेळी निर्माण होत होती, त्यावेळी ग्रामीण भाग ओस पडू लागले होते. त्याचा परिणाम साम्राज्याच्या लोकसंख्येत पूर्णपणे घट होण्यात झाला.]आम्ही आता जनसमुदायांच्या पाशवी साम्राज्यात राहात आहोत. होय, मी यापूर्वी दोन वेळा या साम्राज्याला 'पाशवी' म्हटले आहे. सामान्यत्वाच्या देवतेला अशाप्रकारे मी अर्ध्य दिले आहेत. आता तीर्थप्रसाद हाती घेऊन माझ्या विषयात प्रसन्न चित्ताने मला प्रवेश करता येईल आणि आतील देखाव्याचे निरीक्षण करता येईल. किंबहुना या प्रचंड घटनेचे शक्य तर तंतोतंत पण अगदी बाह्यात्कारी वर्णन करून केवळ त्यांच्या वैशिष्ट्यांचे, भूतकालाच्या दृष्टीकोनातून पाहिलेल्या अंगांचे तेवढेच वर्णन करून माझे समाधान होणार आहे, असे तर वाटत नाही ना? हा विषय येथेच सोडून अधिक अवडंबर न माजवता प्रस्तुत निबंध जर आटोपता घेतला तर वाचकाला असे वाटेल की—आणि तेही योग्यच होय—इतिहासाच्या पृष्ठभागावरील समुदायांच्या या कल्पनातीत उठावामुळे काही चिडाचिडीचे आणि तुच्छतेचे उद्गार, काहीसा द्वेष, काहीसा उबग व्यक्त करण्याला मी प्रेरित झालो आहे. माझ्याबाबतीत असे होणे अगदी शक्य आहे. कारण इतिहासाची मूलगामी उमरावशाही मीमांसा मी उलचून धरतो, हे सर्वश्रुत आहे. मूलगामी म्हणण्याचे कारण असे की मानवी समाज हा उमरावशाही स्वरुपाचा असला पाहिजे असे मी कधीही म्हटले नाही, तर त्यापेक्षा त्याच्यामध्ये कितीतरी अधिक असले पाहिजे. मी जे म्हटले आहे आणि अद्यापही सतत वाढत्या निष्ठेने मला जे वाटते, ते हे की, मानवी समाज हा सदैव त्याची इच्छा असो वा नसो, मूलतः उमरावशाही स्वरुपाचा आहे त्याची मर्यादा ही की, जितक्या प्रमाणात समाजाचे स्वरुप उमरावशाही असते, तितक्या प्रमाणातच तो खऱ्या अर्थाने समाज असतो आणि ज्यावेळी त्याचे उमरावशाही स्वरुप विराम पावते. त्यावेळी तो समाज म्हणूनही विराम पावतो. अर्थात मी आता समाजाबद्दल बोलत आहे, राज्याबद्दल नाही. जनसमुदाय अशाप्रकारे अफाट रीतीने उफाळून वर येत असताना वेर्सायच्या सभ्य गृहस्थाप्रमाणे माकडचेष्टा करण्यात समाधान मानणे ही उमरावशाही वृत्ति आहे अशी कल्पना मात्र कोणी करून घेऊ नये. वेर्साय— तुच्छतेने भृकुटीभंग करणारे वेर्साय—हे उमरावशाहीचे प्रतीक नव्हे. म्हणूनच गिलोटीनखाली प्रतिष्ठितपणाच्या ऐटीने मान सारणे एवढाच काय तो अशा प्राण्यात उमरावशाहीचा अवशेष राहिला होता. एखाद्या ग्रंथीवरसर्जनचे शस्त्र सहजपणे फिरावे तितक्या सहजपणे त्यानी गिलोटीनचा स्वीकार केला होता. नव्हे; उमरावशाहीच्या खऱ्या कार्याचा ज्याला अर्थ समजला आहे, तो झुंडीच्या दृश्याने प्रक्षोभित होतो, जसा एखादा

अनुक्रमाणिका

शिल्पकार संगमरवर पाहिल्यावर उद्दिपित होतो तसा. सामाजिक उमरावशाहीचे स्वतःला उच्चभ्रू समाज म्हणवून घेणाऱ्या मूठभर गटाशी कोणतेही साम्य नाही. जगातील प्रत्येक गोष्टीला तिचे मूल्य आणि कार्य असते. त्याप्रमाणेच या विराट जगात या छोट्याशा देखण्या जगाचे स्वतःचे कार्य असते; पण ते अगदी गौण असते. अस्सल उमरावशाहीच्या प्रचंड कार्याशी त्याची तुलना होऊ शकत नाही. या देखण्या जगाला जो अर्थ आहे त्याविषयी चर्चा करायला माझी हरकत नाही. सकृदर्शनी त्या जगाला अर्थ नाही. पण आमचा विषय हा फार व्यापक आहे. अर्थात हा स्वतःसिद्ध, ठळकपणे ओळखू येणारा समाज काळाबरोबरच चालत असतो. देखण्या माद्रिदच्या तारांगणातील तारुण्योत्फुल्लित, आधुनिक, अव्वल दर्जाच्या चित्रतारकेने माझ्या विचाराला बरेच खाद्य पुरविले. ती म्हणाली, '८०० लोकांपेक्षा कमी जनसमुदायासमोर मी नाचू शकत नाही.' तिच्या या उद्‌गारावरून मला जाणवले ते हे की आधुनिक जीवनाच्या सगळ्या क्षेत्रावर झुंडीची शैली मिरवीत आहे. आणि मोजक्या सुखी लोकांच्या सुरक्षित जागावर ती आधिपत्य गाजवीत आहे.

म्हणून समुदायांच्या प्रत्यक्ष राज्यामागे दडलेल्या खास अर्थाचा उलगडा जे आजच्या काळाचे भाष्य करीत नाही ते मी नाकारतो. कारण हे भाष्य झुंडीचे वर्चस्व मोठ्या आनंदाने मान्य करते आणि तेही कोणतीही भीती न बाळगता. प्रत्येक नियती ही नाट्यपूर्ण असते, तिच्या खोल गाभ्यात ती शोकात्म असते. आजच्या काळाचा धोका जाणून ज्याचे अंतःकरण धडधडत नाही, नियतीच्या गाभ्यात ज्याला खरोखरीच डोकावता येत नाही, तो केवळ पृष्ठभागच चाचपडत रहातो. आजच्या काळाच्या नियतीतील भयानकतेचा भाग झुंडीमुळे उद्‌भवलेल्या नैतिक उलथापालथीत प्रत्ययास येतो. प्रत्येक नियती भारावून टाकणारी अजिंक्य आणि दगाबाज असते. आम्हाला ती कोठे नेणार आहे? तिच्यातून निव्वळ अनिष्टच निघणार आहे का चांगले निघण्याची शक्यता आहे? ती समोर उभी आहे, अवाढव्य, आजच्या काळाच्या बरोबरीने एखाद्या राक्षसारखी वैश्विक प्रश्नचिन्ह मांडून उभी आहे. सदैव ती अनिश्चित रुपाची असून तिच्यामध्ये काहीतरी गिलोटनसारखे किंवा वधस्तंभासारखे आहे. पण त्याबरोबरच विजयाच्या चढत्या कमानीसारखीही ती आहे.

आम्हाला या सर्व गोष्टींची तपासणी दोन प्रकारानी करता येईल. एक बहुजनसमाज सामाजिक जीवनात जी कार्ये आज करीत आहे, ती आतापर्यंत अल्पसंख्याकरिता राखून ठेवण्यात येत होती, आणि दुसरे, त्याबरोबरच हा बहुजनसमाज अल्पसंख्यांशी उद्धटपणे वागतो, त्यांचे ऐकत नाही, त्यांचे अनुकरण करत नाही किंवा त्यांचा आदरही राखत नाही. उलट तो त्याना बाजूला सारतो आणि त्यांचे उच्चाटन करू पहातो.

यापैकी पहिल्या प्रकाराचे आपण विश्लेषण करू. या प्रकाराबद्दल मला म्हणावयाचे आहे ते हे की जनसमुदाय निवडक गटांनी शोधून काढलेली साधने वापरतात आणि सुखांचा उपभोग घेतात. आतापर्यंत ही साधने निवडक गटांच्याच कामी येत असत. पूर्वी जे सुसंस्कार म्हणून मानण्यात येत असत, ते काही थोड्यांचेच पितृदाय असत. पण आता तिच्या गरजा आणि भुका जनसमुदायाला जाणवू लागल्या आहेत. एक साधे उदाहरण घ्या. इ. स. १८२० साली पॅरिसमधील एखाद्या खाजगी निवासात दहा स्नानगृहे असणे शक्य नव्हते. (काँतेस द बॉइन्य यांच्या आठवणी पहा) तसेच पूर्वी जी तांत्रिक साधने विशिष्ट माणसापुरतीच मर्यादित होती, त्यापैकी कित्येक आता समुदायांच्या परिचयाची झाली असून ते ती बऱ्याच कुशलतेने वापरू लागले आहेत. हे केवळ भौतिक वस्तूंच्या तंत्रालाच लागू आहे असे नव्हे, तर कायदे आणि समाज यांच्या तंत्रालाही ते लागू पडते हे विशेष महत्वाचे आहे. १८ व्या शतकातील विशिष्ट अल्पजनांच्या गटांनी असा शोध लावला होता की, प्रत्येक

अनुक्रमाणिका

मानव प्राण्याला कोणतेही विशेष गुण अंगी नसता केवळ जन्मतःच विशिष्ट मूलभूत राजकीय हक्क, मानवी आणि नागरिकत्वाचे तथाकथित हक्क प्राप्त होतात; तसेच आणखी काटेकोरपणे सांगावयाचे झाल्यास हे हक्क सर्वांना समान असून तेच तेवढे अस्तित्वात असतात.

मानवाच्या अंगी असणाऱ्या विशेष देणग्यांना चिकटलेला दुसरा कोणताही हक्क विशेषाधिकारी म्हणून धिक्कारला जात होता. प्रथम ही केवळ एक उपपत्ति, काही थोड्या लोकांची कल्पना होती. पुढे त्या थोड्या लोकांनी ही कल्पना आचरणात आणण्याला, दुसऱ्यावर लादण्याला आणि त्याचा आग्रह धरण्याला सुरुवात केली. तरीही सबंध १९व्या शतकात ध्येय या नात्याने हक्काविषयी समुदायात हळुहळू उत्साह निर्माण होऊ लागला होता. तरीसुद्धा हक्क म्हणून त्यांना त्यांची जाणीव झाली नव्हती. हे हक्क ते बजावीत नसत किंवा ते प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्नही करीत नसत. वस्तुतः लोकशाही कायद्याचा अंमल असूनही आपण जुन्या राजवटीत वावरत आहोत असेच त्यांना वाटत होते. त्याकाळी ज्यांना 'प्रजा' ही संज्ञा होती, ती 'प्रजा' आपण स्वतः सर्वभौम आहो एवढेच शिकली होती, पण त्यावर तिची श्रद्धा अशी नव्हती. आज ते ध्येय प्रत्यक्षात उतरले आहे. सार्वजनिक जीवनाची केवळ चौकट अशा कायद्यातच नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीच्या हृदयात ते उतरले आहे. मग त्या व्यक्तीचे विचार काहीही असोत, आणि विचाराने ती कितीही प्रतिगामी असो. म्हणजेच ज्या संस्थानी या हक्काना अधिष्ठान मिळवून दिले, त्यांच्यावरच ती कितीही कडाडून हल्ला चढवो. माझ्या मते जनसमुदायाच्या या चमत्कारिक नैतिक अवस्थेची ज्याला जाणीव होत नाही, त्याला जगात आज काय घडत आहे हे मुळी समजणारच नाही. विशेष गुणांचा अभाव असणाऱ्या व्यक्तीचे, मानवप्राणी म्हणून मानवाचे सार्वभौमत्व हे सामान्यतः आज कायदेशीर कल्पनेची किंवा ध्येयाची अवस्था ओलांडून सर्वसामान्य माणसाची अंगभूत अशी ती एक मानसिक अवस्था असते असे समजले जात आहे. येथे हे लक्षात ठेवावे की, पूर्वीचे ध्येय ज्यावेळी आजच्या वास्तवाचा एक घटक भाग बनते, त्यावेळी ते अटळपणे प्रतिष्ठेचे ध्येय म्हणून रहात नाही. त्या ध्येयाभोवतीचे जादूचे आणि प्रतिष्ठेचे वलय विरून जाते. समपातळी निर्माण करणाऱ्या उदार लोकशाही स्फुरणाच्या मागण्या या पूर्वी आकांक्षा आणि ध्येये या स्वरूपात होत्या. त्यांचे आता भुका आणि अजाण गृहीतके यात रूपांतर झाले आहे.

मानवी हक्कांच्या या उद्घोषाचा अर्थ मानवी आत्म्याना त्यांच्या आंतरिक दास्यातून बाहेर काढणे आणि त्यांच्यात धनीपणाच्या आणि प्रतिष्ठेच्या विशिष्ठ जाणीवेचे आरो पण करणे याशिवाय दुसरा कोणताही नव्हता. सर्वसामान्य मानवाचा आपण स्वतःचे धनी, अधिपती आहो, स्वतःचे व स्वतःच्या जीवनाचे शास्ते आहो, असे वाटावे हीच आशा त्यात होती, असेच नव्हे काय? बरे हे आता साध्य झाले आहे. मग ३० वर्षापूर्वीच्या उदारमतवाद्यांच्या, लोकशाहीवाद्यांच्या किंवा पुरोगाम्यांच्या तक्रारी आता काय म्हणून? किंबहुना असे तर नसेल ना की लहान मुलांप्रमाणे त्यांना काहीतरी हवे असते, पण त्या काहीतरीचे परिणाम मात्र नको असतात? सामान्य माणसाने स्वतःचे धनी व्हावे, हे तुम्हाला हवे आहे. तर मग, तो स्वतःकरताच काम करतो, सर्वप्रकारच्या उपभोगाची मागणी करतो. स्वतःची इच्छा खंबीरपणे प्रस्थापित करतो, सर्वप्रकारची सेवा करण्याचे नाकारतो, कोणालाही तो जुमानत नाही, स्वतः आणि स्वतःचे स्वास्थ यांचाच विचार करतो, स्वतःच्या पोषाखाला जपतो, याबद्दल आश्चर्य वाटू देऊ नका. धनीपणाच्या जाणीवेला कायमच्या चिकटलेल्या या काही उपाधी आहेत. आज त्याच सामान्य माणसात, जनसमुदाय ठाण मांडून बसलेल्या आम्हाला आढळतात.

अनुक्रमाणिका

आता स्थिती आहे ती अशी : पूर्वी केवळ श्रेष्ठ अल्पजनांच्याच वैशिष्ट्याचा जो ‘भरीव ठेवा’ होता, त्यानेच आज सामान्य माणसाचे जीवन बनले आहे. आता सर्वसामान्य मानव हा प्रत्येक कालखंडाच्या इतिहासाच्या कार्यक्षेत्राचा प्रतिनिधी झाला आहे. भूगोलात समुद्रपातळीचे जे स्थान तेच स्थान इतिहासात मानवाला प्राप्त झाले आहे. म्हणून पूर्वी ज्या मर्यादेपर्यंत उमरावशाही पोहचत होती, तीच आताची जर मध्यम पातळी असेल, तर त्याचा अर्थ हा की, इतिहासाची पातळी अकस्मात वर चढली आहे. मात्र हे खरे की, दीर्घकालीन अंतर्गत पूर्वतयारी झाल्यानंतरच ती चढली आहे. परंतु ती अकस्मात एका झेपेत, एका पिढीतच स्पष्टपणे दृग्गोचर होत आहे. मानवी जीवन हे साकल्याने वरच्या पातळीवर चढले आहे. आजच्या सैनिकात बऱ्याच प्रमाणात त्याच्यावरचा अधिकारी वसत असतो. असे म्हणता येईल. मानवी सेनाच आता सेनापतीनी भरली आहे. प्रत्येक व्यक्ती ज्या उत्साहाने, निर्धाराने आणि सहजतेने जीवनात आज वावरते, धावत्या सुखावर झडप घालते आणि स्वतःची वैयक्तिक इच्छा दुसऱ्यावर लादते त्याचेच जरी निरीक्षण केले तरी पुरेसे आहे.

वर्तमानात आणि नजीकच्या भविष्यात जे काही बरेवाईट असेल, त्याचे कारण आणि मूळ ऐतिहासिक पातळीच्या या सर्वसाधारण उत्थानात आहे. परंतु पूर्वी लक्षात न आलेला विचार येथे पुढे येतो. आजच्या जीवनाची सर्वसाधारण पातळी ही पूर्वीच्या अल्पजनाची पातळी आहे, ही वस्तुस्थिती युरोपात नवीन आहे. परंतु अमेरिकेत ती नैसर्गिक आणि ‘घटनेला धरून’ आहे. माझा मुद्दा पटविण्यासाठी वाचकांनी कायद्यापुढे सगळे समान असतात, या जाणिवेचा विचार करावा. आपण स्वतःचे धनी आणि सर्वाधिपति आहो, तसेच इतर कोणाशीहि समान आहो, या जाणीवेची मानसिक अवस्था प्राप्त करून घेण्यात युरोपमधील प्रमुख गटांनीच तेवढे यश मिळवले होते. पण अमेरिकेत मात्र १८ व्या शतकापासून (आणि म्हणून जवळ जवळ नेहमीच) ती स्वाभाविक वस्तुस्थिती होती. या पुढचा अधिक चमत्कारिक योगायोग असा की ज्यावेळी युरोपमध्ये सामान्य मानवाची ही मानसिक स्थिती प्रकट होऊ लागली, आणि त्याच्या अस्तित्वाची पातळी उंचावू लागली, तेव्हा युरोपीय जीवनाचा नूर आणि शैली यांनी सर्व क्षेत्रात अकस्मात नवे स्वरुप धारण केले. त्यामुळे युरोपचे अमेरिकीकरण होत आहे असे अनेकजण म्हणू लागले. असे म्हणणाऱ्यांनी त्या गोष्टीकडे अधिक लक्ष दिले नाही. त्यांना असे वाटले की, जीवनाच्या शैलीमध्ये झालेल्या थोड्याश्या बदलाचा, एक टूम म्हणूनच हा प्रश्न आहे. वरवर दिसणाऱ्या गोष्टीवरून त्यांची दिशाभूल झाली आणि त्यांनी युरोपवर पडणाऱ्या अमेरिकेच्या ह्या ना त्या प्रभावामुळे हे घडते अशी उपपत्ती लावली. माझ्या मते असे करणे म्हणजे अतिशय सूक्ष्म आणि आश्चर्यकारक प्रश्नाला केवळ क्षुल्लक स्वरूप देणे होय. येथे शूरत्वाचा आव आणून सागरापलीकडील आमच्या बांधवांना असे सांगण्याचा मोह मला पडतो की युरोपचे अमेरिकीकरण झाले आहे आणि याचे कारण अमेरिकेचा युरोपवर पडलेला प्रभाव आहे. पण छे : येथे सत्य शूरपणाच्या आड येते आणि सत्याचाच जय झाला पाहिजे. युरोपचे अमेरिकीकरण झाले नाही; युरोपवर अमेरिकेचा फारसा मोठा प्रभाव पडला नाही. नुकतेच असे घडू लागल्याचा संभव मात्र आहे. पण नजीकच्या भूतकाळात हे घडले नाही आणि वर्तमान हा नजीकच्या भूतकाळाचा फुलोरा होय. खोट्या कल्पनांचे भांबावून सोडणारे पुंजके सभोवार धुमाकूळ घालीत आहेत आणि त्यानी अमेरिकन आणि युरोपीय हो दोन्ही पक्ष आंधळे बनले आहेत. जनसमुदायांचा विजय आणि त्याचा परिणाम म्हणून घडून आलेले मूळच्या पातळीचे प्रचंड उत्थान ही अंतर्गत कारणानी घडून आली. हे घडून आले ते गेल्या दोन शतकात प्रगतीच्या दिशेने जनसमुदायांना जे शिक्षण मिळाले आणि त्याला समांतर अशी आर्थिक उन्नती झाली त्यामुळे होय. पण घडते ते असे की, हा परिणाम अमेरिकी जीवनाच्या सर्वात ठळक अशा बाजूशी जुळून येतो आणि युरोप व अमेरिकेतील सामान्य माणसांच्या नैतिक अवस्थेत हा योगायोग जमून आल्यामुळे युरोपीय

अनुक्रमाणिका

मानवाला यापूर्वी कोड्यासारखे आणि गूढ वाटणारे अमेरिकी जीवन प्रथमच समजू लागले आहे. तेव्हा येथे प्रभाव पडण्याचा प्रश्नच येत नाही. खरोखरीच हे काहीसे चमत्कारिक वाटेल. पण प्रत्यक्षात येथे परावर्तन सुरू झाले आहे आणि हे परावर्तन समपातळीत येण्याचे आहे. याची पुसटशीही शंका लोकांना येत नाही. जुन्या जगाच्या पातळीपेक्षा अमेरिकी जीवनाची पातळी वरची आहे हे युरोपीयांना नेहमीच अंधुकपणे जाणवत आले आहे. तीव्रपणे जाणवणारी ही अंतःप्रेरणा होती; आणि तिचे विश्लेषण केल्यावर असे दिसून येते की या अंतःप्रेरणेतूनच भविष्यकाळ अमेरिकेचा आहे ही कल्पना जन्माला आली आणि ती नेहमी स्वीकारण्यात येत होती. तिला कधीही आव्हान देण्यात आले नाही. आर्चिडचे झाड हवेत मुळाशिवाय वाढते असे म्हणतात, त्याप्रमाणे दूरवर फैलावलेली आणि खोलवर रुजलेली अशी एखादी कल्पना नुसती हवेवरून तरंगत येत नाही हे समजले पाहिजे. या कल्पनेचा पाया अमेरिकी सरासरी जीवनाची पातळी अधिक उंच असून युरोपीयाशी तुलना करता अमेरिकेतील अल्पसंख्यांची पातळी खालची आहे या जाणीवेत आहे. शेतीप्रमाणेच इतिहासाचे पोषण डोंगर माथ्यावर न होता खोऱ्यात होत असते, प्रतिष्ठित व्यक्तीकडून न होता सरासरी सामाजिक पातळीकडून होत असते.

आम्ही समपातळी आणणाऱ्या कालखंडात रहात आहोत. संपत्ति, विविध सामाजिक वर्गांची संस्कृति, स्त्रीपुरुष हे सर्व एका पातळीत येत आहेत. अशा रितीने सर्व खंडही समपातळीत येत आहेत. पूर्वी युरोपीय हा जीवनावश्यक मूलभूत दृष्टीकोनातून पहाता खालच्या पातळीवर आल्याने त्याचा फायदाच झाला आहे. परिणामी, या भूमिकेवरून पाहिले म्हणजे जनसमुदायाच्यांच्या उत्थानात जी वनावश्यक संभाव्यतांची कल्पनातीत वाढ सूचित होते. युरोपचा ऱ्हास होत आहे असे जे वारंवार आम्ही ऐकतो त्याच्या हे अगदी उलट आहे. ऱ्हासाची ही भाषा न शोभणारी आणि गोंधळ निर्माण करणारी आहे. आणि त्यात कशाचा उल्लेख येतो, ऱ्हास कशाचा होत आहे, युरोपीय राज्यसंस्थेचा का युरोपीय संस्कृतीचा, का यासर्वांच्या बुडाशी असलेली कितीतरी असीम महत्वाची गोष्ट जी युरोपची रसरशीत क्रियाशीलता तिचा, हे स्पष्ट होत नाही.

युरोपीय राज्ये आणि संस्कृति यांच्या विषयी वर जे सांगितले आहे ते पुरेसे असले तरी पुढे अधिक सांगावे लागेलच; पण जीवनाच्या चैतन्यशक्ती विषयी बोलावयाचे झाल्यास आरंभीच एक ढोबळ चूक आमच्या पुढे उभी रहाते हे स्पष्ट करणे उचित होय. कदाचित याला थोडी मुरड घालून सांगितले म्हणजे माझे विधान अधिक पटेल, निदान कमी असंभवनीय वाटेल. तेव्हा मी असे म्हणतो की, चैतन्यशील प्रवृत्तीच्या बाबतीत आज इटाली, स्पेन किंवा जर्मनी येथील र्वससामान्य माणूस आणि उत्तर अमेरिकेतील किंवा अर्जेन्टिनातील सर्वसामान्य माणूस यांच्यामधे तीस वर्षापूर्वीपेक्षा आज कमी फरक आढळून येत आहे आणि ही गोष्ट अमेरिकेच्या लोकांनी विसरता कामा नये.

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण ३ रे

## काळाची उंची

तर मग जितक्या प्रमाणात बहुजनसमाजाच्या राज्यात ऐतिहासिक पातळी सर्व बाजूंनी चढल्याचे दिसून येते आणि सरासरी जीवन कालच्यापेक्षा आज अधिक उंचीवर सरकल्याचे स्पष्ट होते, तितक्या प्रमाणात समुदायाच्या राज्याला काही अनुकूल बाजू असल्याचे स्पष्ट व्हावे. यावरून जीवनाला निरनिराळ्या उंची वा पातळी असू शकतात आणि आजच्या काळाच्या उंचीसंबंधी बोलताना लोक ज्या शब्दांचा निरर्थकपणे वारंवार पुनरुच्चार करतात, त्यात खोल अर्थ भरलेला आहे, ही गोष्ट प्रत्ययास येते. येथे थोडे थांबून विचार करणे उचित होईल. कारण या मुद्याच्या योगाने आजच्या युगाचे सर्वात आश्चर्यकारक असे एक वैशिष्ट्य प्रस्थापित करण्याचे साधन प्राप्त होते.

उदाहरणार्थ, असे सांगतात की, ही किंवा ती बाब एखाद्या विशिष्ट काळाच्या उंचीला योग्य नाही. वस्तुतः काल म्हणजे कालगणनेचा , सगळ्या कालदर्शक सपाटीचा अमूर्त असा काल नव्हे, तर जीवनाचा गाभा दर्शविणारा काल होय. या कालाला प्रत्येक पिढी ‘आमचा काल’ म्हणते आणि त्याला नेहमी एक ठराविक उंची असते. तो कालच्यापेक्षा आज अधिक उंचीवर किंवा समपातळीत असतो. किंवा त्याहीपेक्षा खाली जातो. ऱ्हास या शब्दात खाली पडण्याची जी कल्पना अंतर्भूत आहे, तिचा उमग ‘आमचा काल’ या जाणीवेत आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला ज्या काळातून ती जाते, त्या काळाच्या उंचीशी तिच्या स्वतःच्या जीवनाशी जडणारे नाते कमीअधिक स्पष्टपणे जाणवत असते. अशीही काही माणसे असतात की ज्यांना बुडत्या नौकेत आपले डोके पाण्यावर धरू न शकणाऱ्या माणसाला जसे वाटते, तसेच प्रत्यक्ष जीवनाच्या अविष्कारात वाटत असते. ज्या आवेगाने आज गोष्टी पुढे सरकत आहेत, ज्या शक्तीने आणि जोमाने प्रत्येक गोष्ट करण्यात येत आहे, त्याने जुन्या वळणाच्या माणसाला वेदना होतात आणि या वेदना म्हणजे त्याच्या स्वतःच्या नाडीचे ठोके आणि काळाच्या नाडीचे ठोके यांच्यातील फरक मोजण्याचे माप होय. उलटपक्षी जो माणूस प्रत्यक्ष चालीरीतीशी जुळवून घेऊन पूर्णतः आणि सुखाने जगतो, त्याला आजच्या काळाची पातळी आणि विविध गतकालांच्या पातळ्या यांच्यातील संबंधाची जाणीव असते. हा संबंध कोणता?

कोणत्याही विशिष्ट कालातील माणूस नेहमीच गतकालाकडे तो आपल्यापेक्षा खालच्या पातळीचे म्हणून पहात असतो असे समजणे चुकीचे होईल. येथे ‘कोणताही गतकाल अधिक चांगला होता’ या जॉर्ज मानरिकच्या म्हणण्याची आठवण ठेवली तरी पुरेसे आहे. पण हेही खरे नाही. प्रत्येक युगाने कोणत्याही गतकालापेक्षा आपण कमी आहोत, असे मानले नाही; किंवा सर्व युगानी पूर्वीच्या युगापेक्षा आपण श्रेष्ठ आहो असेही मानले नाही. प्रत्येक ऐतिहासिक कालखंड मूलभूत उंचीच्या या घटनेसंबंधी निराळी जाण दर्शवितो; आणि अशा उघड आणि महत्वाच्या गोष्टीची दखल विचारवंत आणि इतिहासकार घेत नाहीत याचे मला आश्चर्य वाटते. ढोबळ मानाने जॉर्ज मानरिकने व्यक्त केलेले मत हे खचितच सर्वसामान्यपणे मानले जाते. बहुतेक ऐतिहासिक कालखंडानी पूर्वीच्या कालखंडापेक्षा आपण श्रेष्ठ आहोत या दृष्टीने पाहिलेले दिसत नाही. उलटपक्षी, प्राचीन अंधुक काळात अधिक पूर्ण अस्तित्वाचे, ग्रीक आणि रोम यानी सांगितल्याप्रमाणे एका ‘सुवर्णयुगाचे’, ऑस्ट्रेलियातील बुशमनच्या कल्पनेप्रमाणे एका नंदनवनाचे, मागचा काळ अधिक चांगला

असल्याने स्वप्न रंगविणे हे माणसांच्या अंगवळणी पडले आहे. यावरून दिसून येते की, अशा माणसाना त्यांच्या स्वतःच्या जीवनाची नाडी कमजोर झाली आहे, त्यांच्या रक्तवाहिन्या भरून वाहण्याला असमर्थ आहेत असे वाटत असते. याच कारणाकरिता ते गतकालाकडे, 'अभिजात' युगाकडे आदराने पहातात. कारण ते त्या युगाना पूर्णतर, अधिक संपन्न, सर्वोत्तम आणि सामर्थ्यशाली अस्तित्व होते, या दृष्टीने पहात होते. जसे मागे वळून पाहिल्यावर अधिक मूल्यावान अशा त्या युगांचे जे कल्पनाचित्र त्यानी उभे केले होते, त्यावरून त्याना आपण त्यांच्यापेक्षा वरचढ आहोत असेच वाटत होते. जर आपल्या युगाला जीव असता तर तपमानाच्या एका अंशाने आपण खाली आहोत, वरच्या अंशांपर्यंत आपण पोचू शकत नाही आणि आपल्यापेक्षा मागच्या अभिजात युगात अधिक उष्मांक होते असेच त्याला वाटत राहील. इ. स. १५० नंतरच्या काळात रोमन साम्राज्यात जोमगारपणाचा संकोच झाल्याची, स्थानावरून खाली घसरल्याची, नाडीचा ऱ्हास होत असल्याची भावना वाढत्या प्रमाणात दिसून येते. होरेसने सांगितले नव्हते का की, 'आमचे पिताजी आमच्या महापिताजीपेक्षा वाईट होते. त्यानीच आम्हाला जन्म दिला आणि आम्ही त्यांच्यापेक्षाही वाईट आहोत आणि पुढे आमची प्रजाही अधिक अधःपतित होईल ?'

दोन शतकानंतर तर असे घडले की साऱ्या साम्राज्यात शतसेनानींच्या जागा भरुन काढणारी त्यांच्या तोडीची जन्माने इटालियन अशी धाडसी माणसेच सापडत नव्हती. म्हणून मग त्या जागावर प्रथम दालमेशियन आणि नंतर दान्यूब आणि ऱ्हाईन यांच्या प्रदेशातून भाडोत्री माणसे आणणे भाग पडले होते.

येथून आपण एका दुसऱ्या प्रकारच्या युगाकडे वळूया. हे युग सकृत्‌दर्शनी वरच्या युगाच्या अगदी विरुद्ध असून जोमदार भावनेने रसरसलेले आहे. येथे एक अतिशय चमत्कारिक घटना दृष्टीस पडते. ती अत्यंत महत्वाची असून तिची लक्षणे सांगितली पाहिजेत. सुमारे तीस वर्षापूर्वी राजकारणी माणसे लोकांच्या जमावापुढे व्याख्याने झोडताना विशिष्ट सरकारी उपायांचा, सरकारच्या हातून घडलेल्या या ना त्या अतिरेकी कृत्यांचा निषेध करीत असत आणि सुधारलेल्या काळाला अशा गोष्टी शोभत नाहीत असे तावातावाने सांगत असत. जणू त्याना ती सवयच पडून गेली होती. त्राजनने प्लिनीला लिहिलेल्या पत्रात निनावी आरोपांच्या आधारावर ख्रिस्त धर्मीयांचा छळ करू नका असा सल्ला दिला, त्यावेळी 'ते आमच्या शतकाचे नव्हेत' असे शब्द वापरले होते. त्यांची येथे आठवण व्हावी हे विचित्र नव्हे काय ? इतिहासात असे विविध कालखंड होऊन गेले आहेत की त्यांना आपण पूर्ण उंची गाठली आहे असे निश्चितपणे वाटत होते या कालखंडांना त्यांनी आपल्या प्रवासाचे अंतिम उद्दिष्ट गाठले आहे, एका दीर्घकालीन कामनेची पूर्ती झाली आहे, उराशी बाळगलेली आशा पूर्णतः सफल झाली आहे असे वाटत होते. हीच 'काळाची समृद्धी', ऐतिहासिक जीवनाची परिपक्वता होय. खरोखरीच तीस वर्षापूर्वी युरोपीय मानवाला असा विश्वास वाटत असे की, मानवी जीवन जसे असावयास हवे तसे ते आहे, ते जसे असावे अशी पूर्वीच्या कित्येक पिढ्यांची आकांक्षा होती त्या प्रमाणेच ते उतरले आहे, यापुढेही ते जसे असावयास पाहिजे तसेच खरोखरी राहील. आपल्यापूर्वी पूर्वतयारी करणारे जे कित्येक कालखंड होऊन गेले, त्यांची परिणती आपल्या काळात झाली आहे, त्या काळामध्ये परिपूर्ततेचा अभाव होता, ते काळ आपल्या स्वतःपेक्षा कनिष्ठ होते, ते मागे पडून आपला पूर्ण बहराचा काळ उदयाला आला आहे, असे ही समृद्धीची युगे सदैव मानीत असतात. त्यांच्या उंचीवरून पाहिले म्हणजे या पूर्वतयारीच्या कालखंडांचा मनावर असा ठसा उमटतो की, त्यांच्याकाळी जीवन हे केवळ उत्कट इच्छांचे, अप्राप्त मोहांचे, अतृप्त कामनांचे, सोत्कंठ लक्षणांचे, 'अजूनही नाही' च्या काळातील होते आणि निश्चित आकांक्षा आणि त्यांच्याशी न जुळणारी वास्तवता

यांच्यातील क्लेशदायक विरोधाचे ते काळ होते. १९ वे शतक मध्ययुगाकडे अशा दृष्टीने पाहते. अखेरीस त्या जुन्या, कधी कधी युगानुयुगाच्या, कामनेची पूर्णपणे पूर्ती झाल्याचा दिवस उगवतो. वास्तवता त्याचा स्वीकार करते आणि त्याच्यापुढे मान तुकवते. जी उंची आमच्या दृष्टीपथात होती, ज्या ध्येयावर आमची दृष्टी खिळली होती, त्या काळाच्या शिखराकडे आम्ही पोहोचलो आहोत. 'अजूनही नाही' हे 'सरते शेवटी'च्या मागून आले आहे.

आमच्या वाडवडिलांची आणि त्यांच्या सबंध शतकाची स्वतःच्या काळाविषयी हीच भावना होती. आमचा काळ हा समृद्धीच्या कालखंडामागून येणारा काळ आहे हे विसरता कामा नये. म्हणून पैलतीरावरच्या माणसाला, नुकत्याच होऊन गेलेल्या त्या समृद्धीच्या युगातील माणसाला, प्रत्येक गोष्टीकडे स्वतःच्याच दृष्टीकोनातून पाहणाऱ्या त्या माणसाला आजचे युग हे परिपूर्तीच्या उंचीवरून झालेले पतन आहे, ऱ्हासकाळ प्राप्त झाला आहे असे मानण्याच्या दृष्टीभ्रमाची बाधा होणे अटळ आहे. परंतु इतिहासाचा आजीव विद्यार्थी, काळाची नाडी ओळखणारा सराईत परिपूर्तीच्या काल्पनिक काळावर आधारलेल्या अशा भ्रामक दृष्टीकोनाने स्वतःची फसवणूक करून घेणार नाही. मी म्हटल्याप्रमाणे असा 'समृद्धीचा काळ' अस्तित्वात येण्यासाठी तत्प्रीत्यर्थ दीर्घकाळ इच्छा बाळगावी लागते आणि शतकानुशतके त्या इच्छेला चिंतातुर अवस्थेत आतुरतेने मार्ग रेटीत पुढे जावे लागते. म्हणजेच शेवटी ती सफल होण्याचा दिवस उगवतो. हे पूर्णतेचे कालखंड खरोखरीच आत्मतृप्त असतात. कधीकधी १९ व्या शतकाप्रमाणे ते आत्मतृप्तीच्याही पलीकडे जातात. परंतु ही इतकी आत्मतृप्त, इतकी पूर्ण झालेली शतके आतून मेलेली असतात, हे आता आमच्या प्रत्ययास येऊ लागलेले आहे. खरेखुरे चैतन्यदायी पूर्णत्व हे सफल होण्यात, सिद्ध होण्यात, त्याच्या आगमनात सामावलेले असते. सरव्हँटिसने फार पूर्वी म्हटल्याप्रमाणे 'पथिकाश्रमापेक्षा पथ नेहमीच चांगला असतो.' जेव्हा एखाद्या कालखंडाच्या कामनांची, त्याच्या ध्येयाची पूर्ती होते, तेव्हा त्याचा अर्थ असा की त्यापेक्षा अधिक कशाचीही तो इच्छा करीत नाही, त्याच्या इच्छांचे साठे आटले आहेत. म्हणजेच आमची गाजलेली समृद्धी म्हणजे वस्तुतः अंतकाल होय. ज्याप्रमाणे मीलनाच्या भरारीनंतर संतृप्त मधुकर मरून जातो, त्याप्रमाणे स्वतःच्या इच्छा पुनः कशा पालवाव्या हे न समजल्याने आत्मतृप्तीतच नष्ट होणारे कालखंड आढळात येतात?

यात आश्चर्याची गोष्ट ही की, या तथाकथित समृद्धीच्या युगाना एक विशेष प्रकारची विषण्णता खोलवर सदैव जाणवत असते. इतका वेळपर्यंत केवळ संकल्पनेच्या स्वरुपात असलेली इच्छा शेवटी १९ व्या शतकात फलद्रूप झालेली दिसते. या इच्छेनेच 'आधुनिक संस्कृति' असे स्वतःला नाव घेतले. हे नावच मुळी अस्वस्थ करणारे आहे. हा काळ स्वतःला आधुनिक म्हणवितो. म्हणजेच तो अंतिम, निश्चित असून त्याच्यापुढे इतर सगळे काही केवळ भूतकालीन आहे, विनम्र पूर्वतयारींचे आणि या वर्तमानानाची आकांक्षा बाळगणारे आहे. नेम चुकलेले निस्त्राण बाणच ते![ अलिकडच्या काळाने 'आधुनिक', 'आधुनिकता' अशा ज्या शब्दांनी स्वतःचे नाव धारण केले आहे, त्यांचा मूळ अर्थ मी सध्याच्या 'काळाच्या उंची'चे विश्लेषण करीत आहे, त्याची जाणीव फार सूक्ष्मपणे व्यक्त करतो. 'आधुनिक' म्हणजे जे रूढ आहे अशा, म्हणजेच भूतकाळी प्रचारात असलेल्या जुन्या सांप्रदायिक प्रकारांच्या विरूद्ध उद्‌भवलेला नवा प्रकार किंवा बदल होय. म्हणून 'आधुनिक' हा शब्द नव्या जीवनाची जाणीव व्यक्त करतो, ते जुन्यापेक्षा वरच्या दर्जाचे असते आणि त्याबरोबरच स्वतःच्या काळाची उंची गाठण्याचे त्यात आज्ञार्थी आवाहन असते. 'आधुनिक' मानवाने 'आधुनिक' नसणे म्हणजे ऐतिहासिक पातळीच्या खाली घसरणे होय.]

अनुक्रमाणिका

येथे सध्याचा काळ आणि नुकताच होऊन गेलेला काळ यांच्यामध्ये जो मूलभूत भेद दिसतो, त्याला तर आम्ही स्पर्श करीत नाही ना? वस्तुतः आजचा काळ स्वतःला निर्णायक समजत नाही. उलटपक्षी, अशी निर्णायक, खात्रीची आणि कायमची, स्थिरस्वरूपी युगे नसतात याचा शोध तो स्वतः अंधुकपणे का होईना, पण खोलात जाऊन अंतःप्रेरेणेने घेत असतो. याच्या अगदी उलट एका विशिष्ट नमुन्याचे अस्तित्व—तथाकथित 'आधुनिक संस्कृति'—हे निर्णायक असते असा दावा करणे म्हणजे दृष्टीची व्याप्ती विलक्षण संकुचित आणि बंदिस्त करणे होय असे आम्हाला वाटते. याचा परिणाम असा की आम्ही एका बंदिस्त कुंपणातून बाहेर पडलो आहो; आम्हाला स्वातंत्र्य परत मिळाले आहे.

पुनः एकदा आम्ही वास्तवतेच्या खुल्या वातावरणात आलो आहो आणि येथे गाढ, भयंकर, अकल्पनीय, अक्षय, थोडक्यात सर्वात चांगले आणि सर्वात वाईट असे सर्वकाही संभवनीय आहे, अशा आल्हादकारक समजुतीत आम्ही मश्गुल आहोत. आधुनिक संस्कृतीवरची ही श्रद्धा उदासीनतेची होती. सर्व मूलभूत गोष्टीत उद्या हा आजच्यासारखाच व्हावयाचा आहे, यापुढे प्रगतिही केवळ सर्वकाळी सध्या ज्या मार्गाने आपण आलो आहोत त्या मार्गानेच पुढे जाण्यात असते असा याचा अर्थ होतो. हा मार्ग काहीसा एक प्रकारचा तुरुंग असून तो लवचीक स्वरुपाचा आहे. तो रूंदावत जातो, पण त्यातून आमची कधीही सुटका होत नाही. रोमन साम्राज्याच्या प्रारंभीच्या अवस्थेत ल्यूकान किंवा सेनेका अशा प्रांतातला सुसंस्कृत माणूस रोममध्ये प्रथम दाखल होऊन तेथील चिरंतन सत्तेची प्रतीके अशा भव्य साम्राज्यशाही वास्तु पहात असे, त्यावेळी त्याला आपले हृदय आतल्याआत कोंडल्यासारखे वाटत असे, जणुकाही यापुढे जगात नवे काही घडणे शक्य नव्हते, जणू रोम शाश्वत होते. तेथे जरी साचलेल्या डबक्यातून निघणाऱ्या वाफेप्रमाणे भग्नावशेषांची विषण्णता पसरली असली, तरी हा परप्रांतीय संवेदनशील माणूस त्या विषण्णतेनेच अधिक भारावून जात असे. ही विषण्णता विरोधी लक्षणे चिरकाल टिकण्याकरिता बांधलेल्या वास्तूंची विषण्णता असे.

या भावनात्मक स्थितीच्या उलट आजच्या काळाच्या संवेदना अधिक प्रमाणात शाळेतून बाहेर पडलेल्या मुलांच्या खळखळाटी आनंदासारख्याच नाहीत का? आजकाल आमच्या जगात उद्या काय घडणार आहे हे आम्हाला माहीत नसते. पण त्यामुळे आम्हाला एक छुपा आनंद होत असतो. कारण दूरदृष्टीच्या असंभाव्यतेनेच आमचे खरेखुरे जीवन घडत असते, आमच्या अस्तित्वाला खरी पूर्तता येत असते. आणि दूरदृष्टीचा अभाव म्हणजे तर सर्व प्रसंगाना सदा खुले असणारे क्षितिजच होय. या निदानाला दुसरी बाजू नाही. ज्या ऱ्हासाविषयी कित्येक विद्यमान लेखक पानेच्या पाने भरुन विलाप करीत असतात ती ही बाजू होय. विविध कारणामुळे आम्हाला दृष्टिभ्रम होत असतो. त्यातील काही कारणांचा विचार मी दुसऱ्या एखाद्या वेळी करीन. या क्षणी सर्वात उघड असे कारण मी सादर करू इच्छितो. मुळात हे कारण असे की, जिला मी भूतकालीन समजतो अशा विचारप्रणालीला चिकटून राहून केवळ इतिहासाच्या राजकीय किंवा सांस्कृतिक अंगाचाच तेवढा विचार होत असतो आणि ही अंगे म्हणजे केवळ इतिहासाचे पृष्ठभाग असतात, याचे भान ठेवले जात नाही. त्यापेक्षाही अधिक चांगली आणि खोल अशी इतिहासाची एक वास्तवता असते आणि ती जीवशक्तीत, शुद्ध चैतन्यशक्तीत, मानवात वसत असणाऱ्या वैश्विक शक्तीच्या अंशात अंतर्भूत असते. हीच शक्ती सागरात प्रक्षोभ माजवते, प्राण्यांना प्रसविते, वनस्पतीना फुलविते, तारकांना प्रकाश देते आणि त्या वैश्विक शक्तीशी एकरूप नसली तरी संबंधित असते.

अनुक्रमाणिका

या निराशावादी लक्षणावर एक उतारा म्हणून पुढील विचार मी सादर करतो. ऱ्हास ही अर्थातच एक तौलनिक संकल्पना आहे. अधःपतन हे वरच्या अवस्थेतून खालच्या अवस्थेत होत असते. परंतु ही तुलना कल्पना करता येण्याजोग्या अत्यंत भिन्न भिन्न दृष्टीकोणातून होऊ शकेल. धूम्रपानाकरिता तोंडात धरावयाच्या अंबरच्या नळीच्या उत्पादकाला हे जग ऱ्हासमान वाटते. कारण हल्ली क्वचितच कोणी अंबरच्या नळीचा धूम्रपानाकरिता उपयोग करतो. इतर दृष्टीकोन यापेक्षा अधिक भारतदस्त असतील. पण काटेकोरपणे सांगायचे, तर ते सर्व दृष्टीकोन स्वच्छंद, पक्षपाती आणि ज्या जीवनाच्या घटकांची आम्ही कसून तपासणी करण्याच्या प्रयत्नात आहोत, त्याच जीवनाला परके आहेत. समर्थनीय आणि स्वाभाविक असा एकच एक दृष्टिकोन म्हणजे खुद्द जीवनातच स्वतःच्या स्थानावर ठाम उभे राहाणे, जीवनाच्या अंतरंगाचा ठाव घेणे आणि आपण स्वतः ऱ्हासमान म्हणजेच क्षीण, दुर्बल, निःसत्व झालो आहो काय हे तपासून पहाणे. परंतु जरी आम्ही जीवनाचे आतून निरीक्षण केले, तरी जीवनाला उतरती कळा लागली आहे की नाही हे आम्हाला कसे समजू शकेल? माझ्यामते त्याच्या निर्णायक लक्षणासंबंधी शंका असू शकत नाही. ज्या जीवनाला पूर्वीच्या कोणत्याही कालखंडातील अन्य कोणते जीवन पसंत पडत नाही, आणि म्हणून स्वतःचे अस्तित्व तेवढेच त्याला पसंत पडते, त्या जीवनाला कोणत्याही विशेष अर्थाने ऱ्हासमान जीवन म्हणता येणार नाही. कालाच्या उंचीच्या प्रश्नाविषयी मी जे विवेचन केले त्याचा रोख याच मुद्याकडे होता. त्यातून निष्पन्न होते ते हे की, नेमका आमचाच काल याबाबतीत विलक्षण संवेदना अनुभवीत आहे आणि माझ्या माहितीप्रमाणे लिखित इतिहासात हे युग अनन्यसाधारण आहे.

गेल्या शतकात घरगुती मेळावे जमले म्हणजे असा एक क्षण अटळपणे यायचाच की स्त्रिया आणि त्यांच्याभोवती नाचणारे बापुडवाणे कवि एकमेकांना असा प्रश्न विचारीत की, इतिहासातील कोणत्या कालखंडात जगणे त्याना आवडेल? त्यांच्यापैकी प्रत्येकजण सरळ आपल्या वैयक्तिक अस्तित्वाची शिदोरी बांधून कोणत्या कालखंडात आपण आनंदाने चपखल बसू त्याचा शोध घेण्याकरिता इतिहासाच्या काल्पनिक मोहिमेवर निघत असत. त्याचे कारण हे होते की, १९ व्या शतकाला आपण परिपूर्णतेला पोहोचलो असे वाटत होते; आणि तसे वाटत होते याच कारणामुळे ते शतक भूतकालाला बांधले गेले होते आणि त्या भूतकालाच्या खांद्यावर आपण उभे आहो असे त्याला वाटत होते. ते शतक प्रत्यक्षात आपण भूतकालाची परिणती आहो असे समजत होते. म्हणून अद्यापही पेरिक्लिस आणि प्रबोधन यांच्या युगासारख्या सापेक्षत्वाने अभिजात कालखंडांवर त्याचा विश्वास होता आणि आज मान्यता पावलेली मूल्ये याच कालखंडात तयार झाली अशी त्याची समजूत होती. परिपूर्ततेच्या या काळाविषयी शंका निर्माण होण्याला इतके पुरेसे आहे. त्या काळाची तोंडे मागे वळलेली आहेत. त्याची दृष्टी भूतकालावर खिळलेली आहे आणि त्या भूतकाळाची परिणती स्वतःमध्ये झाली आहे असे तो समजतो.

आजच्या काळातील कोणत्याही प्रातिनिधिक मानवाला वर दिलेला प्रश्न केला, तर तो त्याचे प्रामाणिक उत्तर काय देईल ? मला वाटते याबद्दल शंका असू शकत नाही. अपवाद न करता कोणताही भूतकाळ घेतला तरी तो त्याला कोंडून ठेवणाऱ्या संकुचित अवकाशाची जाणीव करून देईल. म्हणजेच आजच्या मानवाला असे वाटते की कोणत्याही भूतकालीन जीवनापेक्षा आपले जीवन अधिक मोठे आहे; किंवा दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाले तर आजच्या प्रत्यक्ष मानव्याशी तुलना करता गतकाळाची संपूर्णता तोकडी वाटते. आजच्या अस्तित्वाविषयीची ही अंतःप्रेरणा निःसंदिग्ध असल्यामुळे ऱ्हासासंबंधीचे कोणतेही विवेचन

अतिसावधपणे करावयास हवे; नाही तर ते निरर्थक ठरेल. प्रथमतः पूर्वीच्या कोणत्याही जीवनापेक्षा आपण अधिक विशाल आहो असे आजच्या जीवनाला वाटते. मग ते स्वतःचा ऱ्हास होत आहे असे कसे समजू शकेल ? छे! अगदी उलट! जे घडले आहे ते असे की, स्वतःचे जीवन 'अधिक मोठे' आहे असेच ते केवळ मानत असल्यामुळे भूतकालाविषयीचा सगळा आदर, सगळा विचार ते गमावून बसले आहे. म्हणून अगदी पहिल्या प्रथम ज्या कालखंडाशी आमची गाठ पडते, तो सर्व प्राचीनत्वाला कोऱ्या पाटीचे रूप देतो आणि जे भूतकालीन आहे, त्यात कोणताही संभाव्य आदर्श किंवा दंडक आहे असे तो मानीत नाही. विकासक्रमात कोणताही खंड न पडता कित्येक शतकानंतर तो अवतीर्ण होऊनही नुकताच आरंभ होत आहे, उषःकाल येत आहे, नवा उपक्रम सुरू होत आहे, बाल्यावस्था सुरू होत आहे अशी समजूत तो करून देतो. आम्ही मागे वळून पहातो आणि प्रसिद्ध प्रबोधनाचा काळ हा संकुचित प्रादेशिक भावनेचा, निष्फळ हालचालीचा—आणि का म्हणू नये ?—'सामान्य' कालखंड म्हणून समोर उभा रहातो.

काही दिवसापूर्वी या स्थितीसंबंधीचा समारोप मी पुढीलप्रमाणे केला होता : 'भूत आणि वर्तमान यातील मोठी फारकत हा आजच्या काळाचा अंगभूत विशेष आहे. या फारकतीमुळेच कमी अधिक प्रमाणात संदिग्ध शंका निर्माण होते आणि या शंकेतून निर्माण होणारा गोंधळ आमच्या आजच्या जीवनाचे वैशिष्ट्य आहे. आम्हा प्रत्यक्ष मानवांना अकस्मात पृथ्वीवर सोडून देण्यात आले आहे, जे पूर्वी मरून गेले त्यांचा मृत्यू केवळ आभास नव्हता, तर तो प्रत्यक्षात घडला होता, आणि यापुढे ते आमच्या सहाय्याला धावून येणार नाहीत असे आम्हाला वाटू लागले आहे. पारंपरिक चेतनेचे उरले-सुरले अवशेष विरून गेले आहेत. आदर्श, नमुने, दंडक हे आता आमच्या उपयोगाचे नाहीत. आमचे प्रश्न आम्हाला भूतकालाचे कोणतेही सक्रीय सहाय्य न घेता सोडवावयाचे आहेत. हे प्रश्न कलेचे वा विज्ञानाचे वा राजकारणाचे असोत, ते आम्हाला पूर्णपणे प्रत्यक्षात सोडविले पाहिजेत. युरोपीय मानव हा एकाकी उभा आहे. त्याच्याभोवती कोंणतीही जागती भुते उभी नाहीत. पीटर श्लेमिलप्रमाणे तो आपली सावलीच हरवून बसला आहे. माध्यान्ह येते त्यावेळी नेहमी असेच घडते.[ 'The Dehumanisation of Art'.]

तेव्हा थोडक्यात, 'आमच्या काळाची उंची' कोणती ? या उंचीत काळाची पूर्णता नसूनही सगळ्या भूतकाळापेक्षा आपण श्रेष्ठ आहो आणि सगळ्या ज्ञात पूर्णतेच्या पलीकडचे आहो असे तिला वाटते. आमच्या युगाचा जो ठसा उमटतो तो सूत्ररुपाने सांगणे सोपे नाही. इतर सर्वांपेक्षा आपण काहीतरी अधिक आहो, अशी या युगाची श्रद्धा आहे आणि त्याबरोबरच ही नुसती सुरवात आहे असे त्याला वाटते. त्यासाठी कोणते बरे शब्द योजावेत ? कदाचित हे असे इतर कालापेक्षा श्रेष्ठ, स्वतःच्या मानाने कनिष्ठ, सामर्थ्यशाली तर खचित, पण त्याबरोबरच आपल्या नियतिविषयी अनिश्चित, स्वतःच्या सामर्थ्याविषयी अभिमान बाळगणारे, पण त्याचवेळी त्याची भीतिही बाळगणारे युग !

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण ४ थे

## जीवनाची वाढ

जनसमुदायांचे राज्य आणि उंचावलेली पातळी आणि त्यावरून दिसून येणारी काळाची उंची ही आपापल्या परीने एका अधिक संपूर्ण आणि अधिक सार्वत्रिक घटनेची केवळ लक्षणे आहेत. ही घटना साधी आणि निखालस सत्य असून ती बव्हंशी चमत्कारिक आणि अविश्‍वासार्ह आहे. ही घटना म्हणजे जग हे अकस्मात अधिक मोठे झाले आहे आणि त्याबरोबरच व त्यातच जीवनही विस्तारले आहे. जीवन हे प्रत्यक्षात जगद्व्यापी बनले आहे हे आरंभीच सांगितले पाहिजे. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा की, आजच्या सरासरी मानवाच्या अस्तित्वाच्या व्यापात सारी पृथ्वी सामावलेली असते आणि प्रत्येक व्यक्ती सरावाने सगळ्या जगाचे जीवन जगत असते. सुमारे एक वर्षामागे सेव्हियेच्या लोकांना उत्तर ध्रुवाजवळ गेलेल्या काही माणसांच्याबाबतीत काय घडत होते, म्हणजे बर्फाचे डोंगर अंदालुशियाच्या भूभागाच्या तापलेल्या पार्श्वभूमीवर कसे येऊन थडकत होते हे वृत्तपत्रावरुन तासातासाला समजत होते. पृथ्वीचा प्रत्येक भाग यापुढे स्वतःच्या सीमारेषेत बंदिस्त राहिलेला नाही. मानवी जीवनाच्या कित्येक उद्दिष्टाकरिता या ग्रहाच्या एका भागाची दुसऱ्या भागावर क्रिया होत असते. जेथे वस्तूंचे परिणाम जाणवतात, तेथे त्या असतात या वास्तवशास्त्रीय तत्वाला अनुसरुन पृथ्वीतलावरील कोणतेही ठिकाण परिणामाच्या दृष्टीने सर्वगामी झाले आहे असे आम्ही म्हणू शकतो. दूर असलेले जवळ येणे, गैरहजर असलेल्याची हजेरी लागणे, यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे क्षितिज कल्पनातीत प्रमाणात विस्तारले आहे.

कालाच्या दृष्टिकोणातून पहाता देखील जग विस्तारले आहे. प्राक्इतिहास आणि पुरातत्वविद्या यांना कल्पनाही करवणार नाही, इतक्या कालावधीचे ऐतिहासिक कालखंड शोधून काढले गेले आहेत. कालपरवापर्यंत ज्यांचे नाव देखील ठाऊक नव्हते, अशा संपूर्ण संस्कृति आणि साम्राज्ये यांचा शोध लागल्याने नव्या खंडाप्रमाणेच त्यांचीही आमच्या ज्ञानात भर पडली आहे. सचित्र वृत्तपत्रे आणि चित्रपट यानी विश्वाचे दूरदूरचे भाग लोकसमूहाच्या प्रत्यक्ष दृष्टीक्षेपात आणले आहेत.

पण जगाच्या या दिक्कालिक विस्तारावरून काहीही सूचित होत नाही. भौतिक अवकाश आणि काल ह्या विश्वाच्या अगदीं वेडगळ बाजू आहेत. म्हणून आजच्या कालातील माणसे केवळ गतीच्या पूजनात गुंग झाली आहेत. यात सामान्यतः वाटते त्यापेक्षा अधिक सयुक्तिकता आहे. गति ही दिक् आणि काल यांची बनलेली असते. आणि ती तिच्या या घटकांइतकीच वेडगळ असते. पण ते घटक नाहीसे करण्याच्या कामी ती उपयोगी पडते. एका वेडगळपणानेच केवळ दुसऱ्या वेडगळपणावर मात करणे शक्य असते. वैश्विक दिक्कालावर विजय मिळविणे हा मानवाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता.[ माणसाचा चैतन्ययुक्त काल मर्यादित आहे, माणूस मर्त्य आहे, या नेमक्या कारणामुळे त्याला अंतर आणि अवधि यांच्यावर विजय मिळविण्याची गरज भासते. अमर प्राण्याला मोटारगाडीत काहीही अर्थ वाटणार नाही.] दिक्काल ही दोन्ही पूर्णतः निरर्थक आहेत. ज्या गतीच्या योगाने आम्ही दिक् नष्ट करतो आणि काळाला गळफास लावतो, त्या नुसत्या गतीत गुंगून रहाण्यात आम्हाला बालिश आनंद मिळतो. या गोष्टीचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यांचा लोप करून आम्ही त्यांना जीवदान देतो. महत्तम कार्यासाठी त्याना कारणी लावतो, पूर्वीपेक्षाही अधिक

ठिकाणी आम्ही हजर राहू शकतो, अधिक येजा करू शकतो, कमी महत्तम काळात अधिक वैश्विक कालाचा वापर करू शकतो.

पण अखेरीस आमच्या जगाचा होणारा खरोखरीच महत्वाचा विस्तार त्याच्या अधिक मोठ्या परिमितीत नसून जगात कितीतरी अधिक गोष्टी सामावलेल्या असतात त्यामुळे तो होत असतो. त्यापैकी प्रत्येक गोष्ट—येथे या शब्दाचा रूढार्थ शक्य तितका व्यापक घ्यावयाचा आहे—अशी काहीतरी आहे की जिची आम्ही इच्छा धरावी, जीकरिता प्रयत्न करावा, जी घडवावी किंवा बिघडवावी, जिच्याशी सामना द्यावा, जी उपभोगावी किंवा दूर लोटावी. या सर्व कल्पना चैतन्ययुक्त क्रिया सूचित करणाऱ्या आहेत. आमच्या नेहमीच्या क्रियापैकी कोणतीही एक घ्या, उदाहरणार्थ, खरेदी करणे. अशा दोन माणसांची कल्पना करा की, त्यापैकी एक आजच्या काळातील व दुसरा १८ व्या शतकातील असून या दोघांपाशी त्यांच्या कालानुरूप सापेक्षतेने सारख्याच किंमतीचा पैसा आहे. त्याना विकत मिळण्याजोग्या वस्तूंची तुलना करा. म्हणजे त्यात तुम्हाला कल्पनातीत तफावत दिसेल. आजच्या ग्राहकाला मिळणाऱ्या संभाव्य वस्तूंची कक्षा जवळजवळ अमर्याद आहे. बाजारात मिळणार नाहीत अशी कोणतीही वस्तू मनात आणावी आणि ती घेण्याची इच्छा करावी हे आता सोपे राहिले नाही, आणि या उलट बाजारातील प्रत्यक्ष विक्रीची प्रत्येक वस्तू मनात आणणे व ती घेण्याची इच्छा धरणे हेही शक्य नाही. तुलनेने सारखाच पैसा असूनही आजच्या मानवाला १८ व्या शतकातील मानवापेक्षा अधिक जिनसा खरीदता येणार नाहीत असे कोणी मला सांगेल; पण तशी स्थिती नाही. कितीतरी अधिक वस्तू आज खरीदता येतात. कारण यंत्रोत्पादनामुळे सगळ्याच जिनसा स्वस्त झाल्या आहेत. पण शेवटी जरी तशी स्थिती असती, तरी माझ्या मुद्याच्या ती आड येत नाही. उलट मी जे सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, त्याला ती दुजोराच देते. विशिष्ठ वस्तु विकत घ्यावी या निर्णयाचा शेवट ती विकत घेण्याच्या क्रियेत होत असतो. पण त्याच कारणाकरिता निवड करण्याची क्रिया आधी घडते. निवड करण्याच्या क्रियेची सुरवात बाजारात मिळणाऱ्या संभाव्य वस्तु दृष्टीसमोर आणून होत असते. यावरून असे अनुमान निघते की, 'विकत घेण्या'च्या बाजूचा विचार करता जीवन हे प्रथमतः विकत घेण्याच्या संभाव्यता पूर्ण होण्यात सामावलेले असते. जीवनाविषयी लोक बोलतात, त्यावेळी एक गोष्ट ते विसरतात आणि तीच मला सर्वात महत्वाची वाटते. ती म्हणजे आमचे अस्तित्व हे मुळात प्रत्येक क्षणी आम्हाला जे करणे शक्य असते त्याची जाणीव होण्यास असते. जर प्रत्येक वेळी आमच्या समोर एकापेक्षा अधिक संभाव्यता नसतील, तर त्याना संभाव्यता हे नाव देणे निरर्थक ठरेल. उलट ती शुद्ध अनिवार्यता ठरेल. पण मौज ही की आमच्या जीवनासमोर विविध दृश्ये असतात; त्यांच्या विविधतेमुळे त्याना संभाव्यतांचे स्वरुप प्राप्त होते आणि त्यातूनच आम्हाला निवड करावी लागते. ही आमच्या जीवनाची मूलभूत स्थिती सर्वात चमत्कारिक गोष्ट आहे.[ वाईटात वाईट म्हणजे जग हा एकच सुटकेचा मार्ग आहे असे धरून चालले, तरीही दोन मार्ग शिल्लक राहतीलच. सुटकेचा मार्ग पत्करणे किंवा जग सोडून जाणे. पण जग सोडणे हाही जगाचाच भाग आहे. जसा दरवाजा हा खोलीचा भाग असतो.] आम्ही जगतो असे म्हणणे म्हणजे निश्चित संभाव्यतांच्या वातावरणाचा अनुभव आम्ही घेत असतो असे म्हणणे होय. या वातावरणाला सामान्यतः आम्ही आमची परिस्थिती असे म्हणतो. सगळे जीवन याचा अर्थ अशा परिस्थितीचा किंवा भोवतालच्या जगाचा अनुभव घेणे हा आहे. [ Meditaciones, del Quijote, 1916 या माझ्या पहिल्या पुस्तकाची प्रस्तावना पहा. Las Atlantidas मध्ये मी क्षितीज हा शब्द वापरतो. तसेच El origen deportive del Eatado, 1926 हा निबंध पहा. त्याचा समावेश El Espectador Vol. VII यामध्ये झाला आहे.] कारण 'जग' या कल्पनेचा हाच मूलभूत अर्थ आहे. जग म्हणजे आमच्या चैतन्ययुक्त संभाव्यतांची गोळा बेरीज होय. ते आमच्या अस्तित्वाहून काहीतरी वेगळे वा परके नसून त्या अस्तिवाचीच प्रत्यक्ष परिधी आहे. त्यात आमच्या अस्तित्वाची कुवत, आमची प्राणभूत अंतःशक्ती प्रत्ययास येते. पण त्यासाठी त्या अंतःशक्तीला मूर्त रूप यावे लागते किंवा हेच दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे

आम्हाला जे होणे संभवनीय असते, त्याचे आम्ही केवळ अंशभाग असतो. म्हणून जग हे अवाढव्य असे काहीतरी आहे आणि त्यात आम्ही एक क्षुद्र वस्तु आहो असे वाटू लागते. जग किंवा आमचे संभाव्य अस्तिव हे आमची नियती किंवा प्रत्यक्ष अस्तित्व यापेक्षा नेहमीच अधिक विशाल असते. माणसाच्या जीवनात उपलब्ध गोष्टींची कक्षा किती वाढली आहे हे मला येथे स्पष्ट करावयाचे आहे. पूर्वी केव्हाहीपेक्षा संभाव्यतांचा कल्पनातीत विस्तार झाला असून त्यावर मानवी जीवनाला विसंबून रहाता येते. बौद्धिक क्षेत्रात 'कल्पना प्रक्रियणाच्या दिशा' (Paths of Ideation), समस्या, आधार सामग्री, विज्ञाने, दृष्टिकोन ही जीवनात अधिकाधिक प्रमाणात आढळून येऊ लागली आहेत. आदिम अवस्थेतील जीवनात व्यवसायांची संस्था हाताच्या बोटावर मोजता येण्याइतकी असते. मेंढपाल, पारधी, योद्धा, दर्शनकार. पण आज शक्य कोटीतील व्यवसायांची यादी फार मोठी आहे. आज सुखे जीवनाच्या इतर अंगाइतकी ओसंडून वाहात नसली (आणि ही घटना दिसते त्यापेक्षा अधिक महत्त्वाची आहे) तरी सुखाच्या बाबतीतही यासारखेच काहीतरी घडून येत आहे हे खरे आहे. तथापि शहरात राहणाऱ्या मध्यम वर्गीय माणसासाठी—कारण शहरे ही आधुनिक जीवनाची प्रातिनिधिक आहेत—उपभोगाच्या संभाव्यता चालू शतकात भरमसाठ प्रमाणात वाढल्या आहेत. पण प्राणभूत अंतःशक्तीची वाढ एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. ती देखील प्रत्यक्षपणे आणि गूढ दिशेने वाढली आहे. खेळाशी संबंधित असलेल्या शारीरिक मेहनतीच्या बाबतीत आज केले जाणारे प्रयोग भूतकाळात ज्ञात असलेल्या प्रयोगाना असाधारणपणे मागे टाकणारे आहेत. ही गोष्ट आता नित्याची आणि परिचित झाली आहे. विशिष्ट अशा एखाद्या प्रयोगाने आश्चर्यचकित होऊन उच्चांक मोडल्याची नोंद घेणे एवढेच पुरेसे पडत नाही. पण पुनःपुनः हे घडते याचा जो ठसा मनावर उमटतो त्यामुळे मानवी जीवपिंडाला पूर्वी केव्हाही नव्हती इतक्या वरच्या दर्जाची क्षमता प्राप्त झाली आहे याची खात्री पटते, याची नोंदही घेतली पाहिजे. कारण विज्ञानाच्या बाबतीत असेच काहीतरी घडत आहे. एका दशकाच्या अवधीत विश्वाच्या क्षितिजाची मर्यादा विलक्षण विस्तारली आहे. आयन्स्टायनचे वास्तवविज्ञान इतक्या विशाल अवकाशातून पुढे जात आहे की, न्यूटनचे जुने वास्तवविज्ञान तुलनेने एखाद्या पोटमाळ्याच्या कोपऱ्यात कोंडून पडल्याप्रमाणे संकुचित वाटू लागते. विज्ञानाची ही व्याप्ती वैज्ञानिक अचूकतेमुळे वाढली आहे. पूर्वी जे सूक्ष्म भेद दिसण्यात क्षुल्लक म्हणून तुच्छतेने दुर्लक्षिले जात, त्यातूनच आयन्स्टायनचे वास्तवविज्ञान उदयाला आले. जगाची अंतिम मर्यादा म्हणून कालपर्यंत मानला गेलेला अणु हा आज एक ग्रहपद्धती बनण्याइतका विशाल झाला आहे. हे सर्व सांगत असताना संस्कृतीला पूर्णता आणण्याच्या कामी विज्ञानाने जे महत्तम कार्य केले आहे, त्याचा निर्देश मी येथे करीत नाही. या क्षणी त्यात मला रस नाही. पण त्यात गर्भित असलेल्या अंतर्गत सामर्थ्याची झालेली वाढ मला येथे निदर्शनास आणावयाची आहे. आयन्स्टायनचे वास्तवविज्ञान हे न्यूटनच्या वास्तवविज्ञानापेक्षा अधिक अचूक आहे. या गोष्टीवर मी भर देत नाही. माझा भर आहे तो न्यूटन या माणसापेक्षा आयन्स्टायन हा माणूस अचूकता आणि चेतनेचे स्वातंत्र्य [चैतनेचे स्वातंत्र्य म्हणजे बौद्धिक सामर्थ्य; पारंपरिक दृष्ट्या अतूट समजल्या गेलेल्या कल्पना पृथःकरणाच्या त्याच्या क्षमतेने मोजले जाते. कल्पना जोडण्यापेक्षा अलग करणे अधिक प्रयासाचे आहे. हे कोहलरने शिपँझीवरील आपल्या संशोधनाने दाखवून दिले आहे. मानवी समजशक्तीत आजच्या इतके पृथःकरणाचे सामर्थ्य कधीही नव्हते.] याबाबतीत अधिक समर्थ आहे यावर. आजचा विजेता मुष्टीयोद्धा पूर्वीपेक्षाही अधिक 'सणसणीत' ठोसे लगाऊ शकतो. त्यातलाच हा प्रकार आहे. ज्याप्रमाणे सचित्र दैनिके आणि चित्रपट पृथ्वीवरील सर्वात दूरची ठिकाणेसुद्धा सामान्य माणसाच्या दृष्टीक्षेपात आणतात, त्याप्रमाणे वृत्तपत्रे आणि संभाषणे त्याला नव्या बौद्धिक विक्रमांच्या हकिगती पुरवितात आणि दुकानांच्या दर्शनिकात त्या विक्रमाना दुजोरा देणारी ताज्या शोधांची तांत्रिक उपकरणे त्याच्या दृष्टीस पडतात. या सर्वामुळे अचाट सामर्थ्याच्या प्रभावाने त्याचे मन भारुन जाते. मी जे सांगत आहे, त्यावरून इतर काळांच्या मानाने आजचे मानवी जीवन अधिक चांगले आहे असे मला सुचवावयाचे नाही. प्रत्यक्ष जीवनाच्या गुणाविषयी मी बोललो नाही, तर त्याच्या संख्यावाचक प्रगतीविषयी, त्याच्या अंतःशक्तीत

अनुक्रमाणिका

झालेल्या वाढीविषयी मी बोलत आहे. माझा असा विश्वास आहे की, आजच्या मानवाच्या सदसद्विवेक बुद्धीचे, त्याच्या प्राणभूत प्रवृत्तीचे, यथार्थ वर्णन मी केले आहे. त्या प्रवृत्तीस पूर्वी कधीही नव्हते इतके सामर्थ्य स्वतःपाशी असल्याची भावना सामावलेली असते आणि पूर्वीचा सर्वकाळ तुलनेने त्याला खुजा वाटतो. ऱ्हास झाला आहे, विशेषतः पश्चिमेचा ऱ्हास झाला आहे, या जाहीर घोषणानी गेल्या दशकाचे वातावरण दुमदुमून गेले होते. त्याला तोंड देण्यासाठी हे वर्णन आवश्यक होते. मी आरंभी मांडलेला युक्तिवाद ध्यानात आणा. मला तो जितका सरळ तितकाच स्पष्ट वाटतो. ऱ्हास कशाचा होत आहे हे स्पष्ट केल्याशिवाय ऱ्हासाबद्दल बोलणे निरुपयोगी आहे. ही निराशावादी भाषा संस्कृतीच्या संदर्भात आहे काय ? युरोपीय संस्कृतीचा ऱ्हास झाला आहे काय ? किंवा युरोपच्या राष्ट्रीय पातळीवरील संघटनांचाच ऱ्हास झाला आहे ? वस्तुस्थिती अशी आहे असे धरून चालू या. पण त्यामुळे पश्चिमेच्या ऱ्हासाविषयी बोलण्याचा अधिकार आम्हाला प्राप्त होईल कां ? मुळीच नाही. कारण ऱ्हासाची अशी स्वरूपे संस्कृती आणि राष्ट्रीयत्व या दुय्यम ऐतिहासिक घटकांची अंशतः घट होते हे दर्शवितात. केवळ ऱ्हास असा फक्त एकच. तो चेतना क्षीण होण्यात असतो; आणि ज्यावेळी तो जाणवतो त्याचवेळी तो सुरू झालेला असतो. याच कारणाकरिता सामान्यतः दुर्लक्षिल्या गेलेल्या ज्या एका घटनेचा विचार मी लांबणीवर टाकला होता, ती म्हणजे प्रत्येक कालखंड स्वतःच्या मूलभूत पातळीची जाणीव वा संवेदना अनुभवत असतो, ही होय. त्यावरून काही शतकाना इतर शतकांच्या 'पूर्णते'संबंधी जे जाणवले त्याविषयी बोलणे भाग पडले. उलट ही इतर शतके फार मोठ्या उंचीवरून, फार पूर्वीच्या उज्ज्वल सुवर्णयुगातून आपले पतन झाले असे मानीत होती. या विवेचनाचा शेवट करताना एका स्पष्ट गोष्टीची नोंद मी घेतली. ती म्हणजे मागच्या सर्व काळापेक्षा आपण श्रेष्ठ आहो ही विलक्षण धारणा आमच्या युगाचे लक्षण आहे. त्याच्याही वर ताण म्हणजे आमचे युग भूतकालीन गोष्टींचा विचार करण्याचे सोडून देत आहे; कोणतीही अभिजात किंवा आदर्श युगे ते ओळखीत नाही. स्वतःचेच जीवन नवे म्हणून समजून पूर्वीच्या सर्व पद्धतीहून आपण श्रेष्ठ आहो आणि कोणत्याही प्रकारे त्याहून आपण कमी नाही असे ते समजते. हा विचार पक्का ध्यानात घेतल्याशिवाय आमच्या युगाचे आकलन होईल की नाही याची मला शंका आहे. कारण तीच नेमकी त्याची विशेष समस्या आहे. आमच्या युगाला स्वतः ऱ्हासमान होत आहोत असे वाटले असते, तर त्याने दुसऱ्या युगाकडे स्वतःपेक्षा श्रेष्ठ म्हणून पाहिले असते. मग त्याचा अर्थ त्या युगाची प्रशंसा करणे, त्याचे कौतुक करणे, त्याला प्रेरणा देणाऱ्या तत्वाविषयी पूज्य भाव बाळगणे असा झाला असता. मग आमच्या युगाला स्पष्ट आणि निश्चित ध्येये प्राप्त झाली असती आणि ती साध्य करण्याला देखील ते असमर्थ ठरले असते तरी चालले असते. पण सत्य केनेम उलट आहे. आम्ही अशा काळात राहात आहोत की, आपली निर्माणक्षमता अचाट वाढली आहे, असा मानवाला विश्वास वाटत आहे. पण काय निर्माण करावे हे मात्र त्याला समजत नाही. सर्व गोष्टींचा स्वामी असूनही तो स्वतःचाच स्वामी नाही. स्वतःच्या विपुलतेत तो स्वतःलाच हरवून बसला आहे. त्याच्यापाशी पूर्वीपेक्षा अधिक साधने, अधिक ज्ञान, अधिक तंत्रविद्या असूनही मागची सर्वात वाईट जगे ज्या मार्गाने गेली त्याच मार्गाने आमचेही पण जग जात आहे हेच शेवटी निष्पन्न होते. आजचे जग नुसते भरकटत चालले आहे.

म्हणून आधुनिक मानवात सत्ता आणि असुरक्षितता या दोन्ही जाणीवांचा विचित्र संगम झाला असून तो त्यांच्या अंतरात्म्यात पक्का ठसला आहे. १५ व्या लुईच्या अज्ञात दशेत राजपालकासंबंधी 'त्याच्यापाशी सर्व अक्कल होती पण तिचा उपयोग करण्याची अक्कल तेवढी नव्हती,' असे म्हणत असत; तसेच या मानवाच्या बाबतीतही घडत आहे. १९ व्या शतकाची प्रगतीवर दृढ श्रद्धा असूनही त्या शतकाला कित्येक गोष्टी शक्य वाटत नव्हत्या. आज आम्हाला प्रत्येक गोष्ट शक्य वाटते आणि सर्वात वाईट म्हणजे पुच्छगमन, रानटीपणा, ऱ्हास

अनुक्रमाणिका

हीसुद्धा संभवनीय आहेत अशी आमची भावना झाली आहे. [ऱ्हासाविषयीच्या आमच्या सगळ्या निदानांचा मूळ उगम हा आहे. आमचा ऱ्हास होत आहे असे नव्हे, तर प्रत्येक संभाव्यता स्वीकारण्याकडे आमची पूर्वप्रवृत्ति असल्यामुळे आम्ही ऱ्हासाची संभाव्यता वगळत नाही.] हे लक्षण आपल्यापरीने वाईट ठरणार नाही. त्याचा अर्थ एवढाच होईल की असुरक्षितता ही जीवनाच्या सगळ्या स्वरुपाना अत्यावश्यक असून ती आमच्यापर्यंत पुनः एकदा येऊन ठेपली आहे; आणि त्या असुरक्षिततेमुळे वाटू लागणारी चिंता उद्‌विग्न करणारी पण त्याबरोबरच आल्हाददायक असून प्रत्येक क्षणी ती जाणवत असते. मात्र तिची प्रचिती घेण्यासाठी तिच्या गाभ्यात, थेट तिच्या स्पंदणाऱ्या चैतन्यशक्तीपर्यंत पोहचून जीवन कसे जगावे हे माहीत असले पाहिजे. ज्यावेळी एखादी गोष्ट मनात सलत रहाते आणि आपले अंतःकरण संकोचून धडधडू लागते, त्यावेळी भीतीचे स्पंदन अनुभवण्याचे आम्ही टाळतो. सुरक्षिततेच्या शोधार्थ आम्ही धडपडत असतो. आमच्या नियतीचे मूलभूत नाट्य, नेहमीच्या सवयी, रूढी, वायफळ गप्पा अशा हरतऱ्हेच्या भुलभुलावणीत त्या नाट्याची जाणीव बुडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. यात सर्वात चांगली गोष्ट म्हणजे जवळजवळ तीन शतकानंतर अगदी पहिल्या प्रथमच उद्या काय घडणार आहे हे आम्हाला माहीत नाही याची जाणीव होत आहे आणि त्यामुळे आम्ही दिङमूढ झालो आहोत.

जो स्वतःच्या जीवनाविषयी गंभीर वृत्ती धारण करून त्याबद्दल स्वतःला पूर्णपणे जबाबदार धरतो, अशा प्रत्येक माणसाला एक विशिष्ट प्रकारची असुरक्षितता वाटत असते; आणि त्यामुळे तो सदैव सावध रहाण्याची खबरदारी घेत असतो. सुस्ती टाळण्यासाठी आणि दक्ष रहाण्यासाठी स्वतःचे बोट ओठावर ठेवण्याची सक्ती पहारेकऱ्यावर करणारा हुकूम रोमन सेना विभागाने काढला होता. या कृतीला स्वतःचे असे मोल आहे. आगामी संकटाच्या गुप्त बीजांकुराची चाहूल लागावी म्हणून रात्रीपेक्षाही अधिक शांतता पाळण्याचा आदेश त्या हुकुमात होता असे दिसते. गेल्या शतकासारख्या 'पूर्ण'तेच्या कालखंडाची सुरक्षितता हा एक दृष्टीभ्रमच आहे. या दृष्टीभ्रमामुळे भविष्याकडे दुर्लक्ष होते. भविष्याचे सर्व नियंत्रण वैश्विक यंत्रणेच्या हाती असते. पुरोगामी उदारमतवाद आणि मार्क्सप्रणीत समाजवाद हे असे गृहीत धरतात की सर्वात अधिक संभवनीय असा जो भविष्यकाल ते इच्छितात, तो त्यांना अवश्यतया प्राप्त होणारच आहे आणि खगोल शास्त्रातील घटनेप्रमाणे हे अनिवार्यतेने घडून येणार आहे. या कल्पनेने सद्‌सद्‌विवेकबुद्धी झोपी गेल्यामुळे त्यानी इतिहासाचे सुकाणू झुगारुन दिले आहे. त्यांचा चपळपणा आणि कार्यक्षमता ते गमावून बसले आहेत. म्हणून जीवनावरची त्यांची पकड सुटली आहे. ते पूर्णतः बेमुर्वतखोर झाले आहेत; दिशाहीन होऊन इतस्ततः भरकटत आहेत. पुरोगामी माणूस ऐसपैस भविष्यदर्शनाच्या बुरख्याखाली भावी कालाची चिंता करीत नाही. भविष्याने त्याच्यासाठी आश्चर्ये किंवा गुपिते राखून ठेवलेली नाहीत. काहीही साहसाचे, काहीही मूलतः नवीन असे भविष्यात नाही, जग सरळ मार्गाने पुढे जाईल, ते आडवळण घेणार नाही किंवा माघारही घेणार नाही अशी त्याला खात्री वाटत असते. त्यामुळे भविष्याविषयीची सारी चिंता तो बाजूला सारतो आणि निश्चित अशा वर्तमानात ठाम उभा राहतो. उद्दिष्टे, आकांक्षा, ध्येये यांच्याविना जग आज पोकळ भासते यामुळे आम्ही आश्चर्यचकित का व्हावे ? या गोष्टी पुरविण्याची पर्वा कोणीही केली नाही. मार्गदर्शन करणाऱ्या अल्पजनांचे पलायन घडून आल्याचा हा परिणाम आहे. हे अल्पजन नेहमीच जनसमुदायांच्या बंडाच्या विरुद्ध दिशेला आढळून येतात.

या शेवटच्या मुद्याकडे वळण्याची वेळ आता आली आहे. जनसमुदायांच्या विजयाने दर्शविलेल्या अनुकूल बाजूवर भर दिल्यानंतर आता दुसऱ्या बाजूकडे वळणे उचित होईल. ही बाजू कितीतरी अधिक धोक्याची आहे.

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण ५ वे

## लोकसंख्येची वाढ

हा निबंध म्हणजे आमच्या काळाचे, आमच्या प्रत्यक्ष अस्तित्वाचे निदान शोधण्याचा एक प्रयत्न आहे. त्याचा सारांश असा सांगता येईल. संभाव्यतांचा कार्यक्रम या दृष्टीने आमचे जीवन भव्य आहे, विपुल आहे; इतिहासाला ज्ञात अशा दुसऱ्या सर्व जीवनापेक्षा श्रेष्ठ आहे. परंतु त्याची व्याप्ती मोठी असल्यामुळे परंपरागत सारे मार्ग, तत्त्वे, आदर्श, ध्येये, यांच्यावरून ते ओसंडून वाहत आहे. पूर्वीच्या सर्व जीवनापेक्षा हे अधिक मोठे जीवन आहे. म्हणून ते अधिक प्रश्नात्मक झाले आहे. भूतकाळापासून त्याला कोणतेही मार्गदर्शन मिळत नाही. [तथापि भूतकालापासून निश्चितपणे दिशानिदेशन झाले नाही, तरी त्यापासून विशिष्ट नकरात्मक बोध मिळणे कसे शक्य असते, हे आम्ही पुढे पाहू. आम्ही काय करावयास हवे, हे भूतकाळ सांगणार नाही. पण आम्ही काय टाळावे हे मात्र तो सांगेल.] स्वतःच्या नियतीचा त्याला स्वतःलाच शोध घ्यावयाचा आहे.

आता आमचे निदान आम्हाला पूर्ण केले पाहिजे. जीवन म्हणजे जे होणे आम्हाला शक्य असते ते असा प्रथमतः त्याचा अर्थ आहे. त्यानुसार आणि त्याच कारणाकरिता अशा अनेक शक्यतामधून एकाच शक्यतेची निवड होऊन आमचे खास जीवन बनते. आमच्या भोवतालची परिस्थिती, संभाव्यता या आम्हाला लाभलेल्या जीवनाचा भाग असतात. आणि हा भाग आमच्यावर लादला जातो. ज्याला आम्ही जग म्हणतो ते हेच होय. जीवनाला स्वतःच्या जगाची निवड करता येत नाही. अपरिवर्तनीय आणि नियत झालेल्या जगात आपण आलो आहो असे त्याच्या प्रारंभीच प्रत्ययास येते : हेच वर्तमान जग. आमचे जीवन घडविणाऱ्या नियतीचा जो भाग आमच्या वाट्याला येतो, तेच आमचे जग होय. पण ही मूलभूत नियती म्हणजे यंत्राचा एखादा प्रकार नव्हे. बंदुकीतून सुटणारी गोळी ज्याप्रमाणे ठरलेल्या प्रक्षेप मार्गानेच जाते, त्याप्रमाणे जीवनात आम्ही फेकले जात नाही. या जगात—सदैव याच इहलोकात, प्रत्यक्ष याच जगात—येताना जी नियती आमच्या वाट्याला येते, ती नेमकी याच्या उलट असते. आमच्यावर एकच प्रक्षेप मार्ग लादण्याऐवजी नियती आमच्यावर अनेक प्रक्षेपमार्ग लादत असते आणि परिणामतः त्यातून निवड करणे आम्हाला भाग पाडते. आमच्या जीवनाची ही स्थिती किती आश्चर्यकारक आहे बरे ! जगणे म्हणजे आम्हाला मिळालेले स्वातंत्र्य वापरण्याला, या जगात आम्हाला कोण व्हावयाचे आहे याचा निर्णय घेण्याला दैवनियतीने आम्ही बांधले गेलो आहोत याची जाणीव होणे होय. निर्णय घेण्याच्या क्रियेत एका क्षणाचीही उसंत आम्हाला नसते. हताश अवस्थेत जेव्हा घडेल ते घडो म्हणून आम्ही स्वतःला वाऱ्यावर सोडून देतो, तेव्हा देखील निर्णय न घेण्याचाच निर्णय आम्ही घेत असतो.

म्हणून जीवनात 'परिस्थिति निर्णय घेते' असे म्हणणे खोटे आहे. उलट परिस्थिति ही शृंगापत्ति असून ती सतत नवनव्या स्वरुपात उभी रहात असते आणि त्या स्थितीतच आम्हाला निर्णय घ्यावे लागतात. प्रत्यक्षात निर्णय घेतो तो आमचा स्वभावधर्मच होय. हे सर्व सामुदायिक जीवनाच्या बाबतीतही तितकेच लागू पडते. त्यातही प्रथम संभाव्यतांचे क्षितिज समोर येते आणि सामुदायिक जीवनांचे प्रत्यक्ष स्वरुप काय असावे याची निवड करून त्याप्रमाणे निर्णय घेणे या संबंधीचा निर्धार मागावून येतो. या निर्धाराचे मूळ समाजाच्या स्वभावधर्मात असते; किंवा दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे समाजातील प्रभावी व्यक्तींच्या स्वभावधर्मात असते. आजच्या काळात समुदाय-मानवच वर्चस्व गाजवितो आणि निर्णयही तोच घेतो. सार्वत्रिक

मताधिकाराच्या, लोकशाहीच्या काळात हे असेच घडते असे म्हणून भागणार नाही. सार्वत्रिक मताधिकारात निर्णय घेणारे जनसमुदाय नसतात. या किंवा त्या अल्पजनांनी घेतलेल्या निर्णयाला पाठिंबा देणे, ही त्यांची भूमिका असते. अल्पजनच त्यांचे ‘कार्यक्रम’—वा! काय नामी शब्द—मांडीत असतात. खरोखरीच असे कार्यक्रम सामुदायिक जीवनाचे कार्यक्रम असतात. त्यात निर्णयाची दिशा स्वीकारण्याचे आवाहन तेवढे जनसमुदायाना केलेले असते.

आज याहून काहीतरी फार वेगळे घडू लागले आहे. ज्या देशात जनसमुदायाच्या विजयाने सर्वात अधिक आघाडी मारली आहे—हे देश भूमध्यसागरी आहेत—त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे निरीक्षण केले, म्हणजे राजकीय दृष्ट्या ते रोजच्या-रोज जीवन जगत आहेत. हे पाहून आम्ही आश्चर्यचकित होतो. घटना असाधारण विलक्षण आहे. सार्वजनिक अधिसत्ता जनसमुदायांच्या प्रतिनिधींच्या हाती असते. हे प्रतिनिधी इतके सामर्थ्यशाली आसतात की, त्यांनी सगळा विरोध निपटून काढला आहे. इतकी निरंकुश सत्ता त्यांच्या हाती आली आहे की, इतिहासात त्यांच्याइतकी सर्वसत्ताधारी शासनाची उदाहरणे सापडणे कठीण आहे; आणि तरीही सार्वजनिक अधिसत्ता—म्हणजे शासन—हातातोंडाची गाठ पडण्यापुरतीच अस्तित्वात असते. ती स्वतः होऊन भविष्याची स्पष्ट उकल करू शकत नाही, भविष्याबद्दल स्पष्ट घोषणा करीत नाही. ज्याच्या विकासाची वा उत्क्रांतीची कल्पना करता येईल अशा कोणत्याही गोष्टीचा आरंभ करण्याला ती पुढे सरसावत नाही. थोडक्यात ती कोणत्याही जोमदार कार्यक्रमाशिवाय, अस्तित्वाची कोणतीही योजना आखल्याशिवाय जगत असते. आपण कोठे जात आहोत हे तिला माहीत नसते. कारण काटेकोरपणे सांगावयाचे म्हणजे तिच्यापुढे निश्चित मार्ग नसतो. पूर्वनियोजित गतिमार्ग नसतो. जेव्हा अशी सार्वजनिक सत्ता स्वतःचे समर्थन करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्यात भविष्याची दखल नसते, उलट ती स्वतःला वर्तमानात कोंडून घेते आणि कमालीच्या प्रामाणिकपणे उद्‌गारते : ‘माझ्या शासनाचे असाधारण स्वरुप हे परिस्थितीने लादले आहे’. म्हणून त्याच्या हालचाली तात्पुरत्या अडचणी टाळण्यापुरत्याच असतात. हालचाली अडचणी सोडविण्यासाठी नसतात, तर कोणतेही मार्ग वापरून कसेबसे तात्पुरते त्या अडचणीतून निसटण्यासाठीच असतात. मग तसे करताना पुढच्या काळासाठी अधिक मोठ्या अडचणींचे ढीग साचले तरी त्याची त्याला पर्वा नसते. जनसमुदाय ज्यावेळी प्रत्यक्षपणे सार्वजनिक सत्ता चालवितात, त्यावेळी तिचे स्वरुप सर्वशक्तिमान पण अल्पायुषी असेच असते. समुदाय—मानव तोच की, ज्याच्या जीवनात उद्दिष्टाचा अभाव असतो, जो नुसता प्रवाहाबरोबर भरकटत जातो. परिणामतः त्याच्या अंगी क्षमता आणि साम्‌र्थ्य अचाट असूनही त्याच्या हातून कशाचीही उभारणी होत नाही. आजच्या काळी निर्णय घेणारा मानवाचा नमुना तो हाच. येथे त्याच्या स्वभावाचे विश्लेषण करणे उचित होईल.

या निबंधाच्या प्रारंभाकडे वळून आम्ही स्वतःलाच जेव्हा अशा प्रश्न करतो की : ‘इतिहासाचा रंगमंच तुडुंब भरुन टाकणारे हे सगळे समुदाय आले तरी कोठून?’ तेव्हा या विश्लेषणाची किल्ली हाती लागते. काही वर्षापूर्वी वेर्नेर सोम्बार्ट या प्रख्यात अर्थशास्त्रज्ञाने एका अगदी साध्या गोष्टीवर भर दिला होता. चालू घडामोडीचे चिंतन करणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मनात ती साधी गोष्ट कशी येत नाही याचे मला आश्चर्य वाटते. ही अगदी साधी गोष्टच आजच्या युरोपसंबंधी आमची दृष्टि निवळण्याला पुरेशी आहे. अथवा ती पुरेशी नसेल, तर निदान प्रकाशाचा मार्ग तरी दाखवील. ती गोष्ट म्हणजे : ६ व्या शतकात युरोपीय इतिहासाचा आरंभ झाल्यापासून इ. स. १८०० पर्यंत म्हणजे बारा शतकांच्या अवधीत युरोपाने एकूण १८ कोटी लोकसंख्येची मर्यादा काही गाठली नव्हती. पण इ. स. १८०० ते १९१४ पर्यंत एका शतकापेक्षा थोड्या अधिक काळात युरोपची लोकसंख्या १८

अनुक्रमाणिका

कोटीवरुन ४६ कोटीपर्यंत वाढली. आकड्यातील या फरकामुळे गेल्या शतकाच्या बहुप्रसव गुणाबद्दल शंकेला जागा रहात नाही असे मी धरून चालतो. तीन पिढ्यात मानव जातीचा एक प्रचंड समुदाय त्या शतकाने निर्माण केला. हा समुदाय इतिहासाच्या क्षेत्रावर एखाद्या लोंढ्यासारखा धडकला आणि महापूर आला. मी पुनः सांगतो की ही गोष्ट जनसमुदायाच्या विजयाचा आणि त्यात जे कांही गर्भित, घोषित आहे, त्या सर्वांचा आम्हाला प्रत्यय आणून द्यायला पुरेशी आहे. शिवाय जीवनाची पातळी चढली हे मी पूर्वी दर्शविले आहेच. त्यात या गोष्टीची सर्वात ठळकपणे भर घातली पाहिजे.

पण त्याबरोबरच जेव्हा आम्ही युनायटेट स्टेटस ऑफ अमेरिका यासारख्या नव्या देशाच्या वाढीवर भर देतो, तेव्हा आम्ही त्यांची जी प्रशंसा करतो ती किती बिनबुडाची आहे हे सिद्ध होते. एका शतकात १० कोटींच्या घरात गेलेली अमेरिकेची वाढ आम्हाला चकित करते; पण त्यापेक्षाही युरोपही उफाळणारी प्रसवशक्ती हीच खरोखर चकित करणारी बाब आहे. युरोपचे अमेरिकाकरण झाल्याची फसवी कल्पना बदलली पाहिजे याचे हे आणखी एक कारण आहे. लोकसंख्येतील शीघ्र वाढ हे अमेरिकेचे वैशिष्ट्य खास तिचेच आहे असे नाही. गेल्या शतकात अमेरिकेपेक्षा युरोपची वाढ कितीतरी अधिक झाली आहे. युरोपला जे उधाण आले, त्यातूनच अमेरिका तयार झाली. परंतु वेर्नेर सोंबार्टने खात्री करून घेतलेल्या या गोष्टीची सर्वाना जितकी माहिती असावयास पाहिजे तितकी ती नाही. तरीपण युरोपची लोकसंख्या खूपच वाढली आहे ही कल्पना गोंधळात टाकणारी असून ती इतकी सर्वदूर पसरली आहे की, तिच्यावर अधिक भर देणे अनावश्यक आहे. म्हणून वर दिलेल्या आकड्यानुसार लोकसंख्येची वाढ झाल्याबद्दल मला विशेष काही वाटत नाही; पण पूर्वीच्या आकड्याशी तुलना करता या वाढीची शीघ्र गती ठळकपणे नजरेत भरणारी असून चक्रावणारी आहे. येथे हाच मुद्दा महत्वाचा आहे. कारण या शीघ्रगतीचा अर्थ असा की ऐतिहासिक रंगभूमीवर मानवी प्राण्यांचे थवेच्या थवे इतक्या वेगाने येऊन थडकत आहेत की पारंपरिक संस्कृती त्यांच्या गळी उतरविणे कठीण झाले आहे. आजच्या सर्वसामान्य युरोपीय मानवाचा आत्मा हा गेल्या शतकातील मानवांच्या आत्म्यापेक्षा अधिक निकोप आणि अधिक जोमदार आहे. हे खरे असले, तरी तितकाच तो कितीतरी अधिक साधाही आहे. म्हणून कधी कधी तो अति प्राचीन संस्कृतीत अकस्मात उदयाला आलेला आदिमानव आहे असा भास होतो. जी विद्यालये १९व्या शतकात मोठ्या अभिमानाचे स्थान होती, ती आज जनसमुदायाना आधुनिक जीवनाच्या तंत्राविषयी ओझरती माहिती देण्यापेक्षा अधिक काही करू शकत नाहीत. त्यांना चांगले शिक्षण देणे अशक्य होत असल्याचे आढळून येते. जीवनाचे अधिक प्रगल्भ स्वरूप, जगण्याची साधने त्याना देण्यात आली आहेत; पण त्यांच्या महान ऐतिहासिक कर्तव्याची जाणीव त्याना देण्यात आली नाही. आधुनिक साधनांची शक्ती आणि त्यांच्याबद्दलचा अभिमान ही त्यांच्यात घाईघाईने बिंबविण्यात आली आहेत. पण त्या साधनांची चेतना मात्र त्यांच्यामध्ये भिनली नाही. म्हणून त्या चेतनेशी आपले काही कर्तव्य आहे असे त्याना वाटत नाही. नव्या पिढ्या जगाचे आधिपत्य हाती घेण्याकरिता सिद्ध होत आहेत. जणुकाही जग म्हणजे एक स्वर्गच आहे, जणुकाही त्यात पूर्वीच्या पावलांचा कोणताही मागमूस नाही आणि पारंपरिक व अतिशय गुंतागुंतीचे प्रश्नही नाहीत.

इतिहासाच्या क्षेत्रावर मोठमोठे जनसमुदाय मोकाट सोडण्याचा मान आणि जबाबदारी गेल्या शतकाच्या वाट्याला येते. ही घटना लक्षात घेतली म्हणजे समदृष्टीने त्या शतकाबद्दल निर्णय घेण्याचा सर्वात योग्य दृष्टिकोण प्राप्त होतो. ज्याअर्थी त्या शतकाच्या हवामानात मानवी फलांचे इतके मोठे पीक आले, त्याअर्थी त्या शतकात काहीतरी असाधारण, अतुलनीय असले पाहिजे. पण या प्रचंड घटनेची जाणीव होऊन ती पचनी

अनुक्रमाणिका

पाडण्याचा प्रयत्न झाल्याचा पुरावा दर्शविता येत नसेल, तर भूतकालीन युगाना स्फूर्ती देणारी तत्वे अधिक चांगली म्हणून पसंत करणे उथळपणाचे आणि हास्यास्पद ठरेल. सगळा इतिहास एक विराट प्रयोग शाळा म्हणून समोर उभा राहतो. या प्रयोग शाळेत 'मानव'रूपी वनस्पतीसाठी अत्यंत अनुकूल असे सार्वजनिक जीवनाचे एक सूत्र शोधण्याचे शक्य ते सर्व प्रयोग करण्यात आले आहेत. शक्य ते सर्व स्पष्टीकरण करण्याच्या पलीकडे जाऊन आमच्यासमोर उभी राहते ती गोष्ट ही की, मानव जातीच्या बीजावर उदार लोकशाही आणि तांत्रिक ज्ञान या दोन तत्त्वांचे संस्कार झाले असल्यामुळे युरोपातील मानवजात एका शतकात तिपटीने वाढली आहे.

आम्ही आमची बुद्धी योग्यपणे चालवली, तर या प्रचंड घटनेवरून पुढील निष्कर्ष निघतात : एक म्हणजे, तांत्रिक ज्ञानावर आधारलेली लोकशाही ही आतापर्यंत ज्ञात असलेल्या सार्वजनिक जीवनाचा सर्वोच्च नमुना आहे. दुसरे, हा नमुना कल्पनीय असा सर्वोत्तम नसेल, पण त्याच्याहीपेक्षा श्रेष्ठ म्हणून ज्या नमुन्याची आम्ही कल्पना करू, त्यात या दोनही तत्वांचे सार जतन झाले पाहिजे; आणि तिसरे, १९ व्या शतकापेक्षा जीवनाच्या कोणत्याही कनिष्ठ स्वरुपाकडे परत मागे जाणे हे आत्मघातकीपणाचे आहे.

वरील गोष्ट अगदी स्पष्टपणे समजून घेऊन हे निष्कर्ष एकदा मान्य केले, म्हणजे मग आम्हाला १९ व्या शतकाविरुद्ध बंड करून उठणे भाग आहे. त्या शतकात काहीतरी असाधारण आणि अतुलनीय होते, हे जसे स्पष्ट आहे, तसेच त्यात काही मूलतः दुर्गुण, काही रचनात्मक दोष असले पाहिजेत, हेही तितकेच स्पष्ट आहे. कारण त्याने मानवांची एक जात—बंड करणारा समुदाय मानव—जन्माला घातली, आणि हेच मानव आपल्या अस्तित्वला कारणीभूत झालेल्या तत्त्वानाच शीघ्रगतीने धोक्यात आणीत आहेत. युरोपवर या मानवी नमुन्याचे आधिपत्य यापुढेही असेच राहिले, तर आमच्या या खंडाला रानटी अवस्थेत मागे जाण्याला तीस वर्षेही लागणार नाहीत. कित्येक व्यापारी गुपिते अनेकदा जितक्या सहजासहजी लुप्त होतात, तितक्याच सहजतेने वैधानिक आणि औद्योगिक तंत्रेहि लोप पावतील. [हेरमान वेलाय हा आजच्या श्रेष्ठ वास्तवशास्त्रज्ञापैकी एक आहे. तो आयनस्टायनचा सहकारी असून त्याचे कार्य पुढे चालविणारा आहे. त्याला असे म्हणण्याची सवय आहे की, दहा किंवा बारा विशिष्ट व्यक्ति जर अकस्मात मृत्युमुखी पडल्या, तर मानवजातीला आजच्या वास्तवशास्त्रीय आश्चर्यांना कायमचे मुकावे लागेल, हे जवळजवळ निश्चित समजावे. मनाचे इंद्रिय वास्तवशास्त्रीय उपपत्तीच्या गहन जटिलतेला जुळवून घेण्याला कित्येक शतकांच्या पूर्व तयारींची गरज लागली आहे. कोणत्याही अकस्मात घटनेमुळे भावी तांत्रिक विकासाला पायाभूत असणाऱ्या प्रचंड मानवी संभाव्यता पूर्णपणे नष्ट होण्याचा संभव आहे.] सगळ्या जीवनाचा संकोच होईल. संभाव्यतांच्या विपुलतेचे रुपांतर प्रत्यक्ष टंचाईत, केविलवाण्या दौर्बल्यात, खऱ्या ऱ्हासात होईल. कारण झुंडीचे बंड आणि राथेनो ज्याला 'रानटी लोकांचा सर्व आघाड्यावर हल्ला' म्हणतो ती एकच गोष्ट आहे. म्हणून या समुदाय—मानवाला, त्याच्या सर्वात चांगल्या आणि सर्वात वाईट गोष्टींच्या सामर्थ्यासह पूर्णपणे समजून घेणे फार महत्वाचे आहे.

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण ६ वे

## जनसमुदायमानवाचे विच्छेदन

राजकीय आणि बिगर राजकीय या दोन्ही सार्वजनिक जीवनावर वर्चस्व गाजविणारा हा समुदायमानव आहे तरी कसा? तो तसा का आहे? म्हणजेच तो कसा निर्माण झाला?

या दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकत्रच देणे उचित होईल. कारण तीं एकमेकावर प्रकाश टाकतात. युरोपच्या जीवनात आज पुढाकार घेण्याला धडपडणारा मानव हा १९ व्या शतकाचे मार्गदर्शन करणाऱ्या मानवाहून फार वेगळा आहे. पण त्याची निर्मिती आणि पूर्वतयारी १९ व्या शतकात झाली. १८२०, १८५० व १८८० या वर्षातील कोणताही तल्लख बुद्धीचा माणूस साध्या तर्काने सध्याच्या ऐतिहासिक स्थितीचे गांभीर्य आगाऊ ओळखू शकला असता आणि खरोखरच १०० वर्षापूर्वी ज्याचे भाकित करता आले नसते, असे नवे आता काहीच घडत नाही. हेगेलने द्रष्टेपणाचा आव आणून म्हटले की, 'जनसमुदाय आगेकूच करीत आहे.' कोंतने घोषित केले की, 'कोणतातरी एक नवा आध्यात्मिक प्रभाव नसेल, तर आमच्या क्रांतिकारक युगावर घोर आपत्ती ओढवेल.' एंगाडाइनच्या कड्यावरून नित्शेने आरोळी ठोकली की, 'शून्यवादाच्या भरतीची लाट उसळताना मला दिसते आहे.' इतिहासाचे भाकित वर्तविता येत नाही, हे म्हणणे मिथ्या आहे. अशी भाकिते असंख्य वेळा वर्तविण्यात आली आहेत. भविष्याचे भाकित वर्तविण्याचा मार्ग जर मोकळा होणार नसेल, तर वर्तमानाचे भाकीत खरे ठरत आहे हे समजणारही नाही. इतिहासकार हा उलट्या बाजूने द्रष्टा असतो या कल्पनेत सगळ्या इतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे सार येते. हे खरे आहे की, भविष्याचा सर्वसाधारण आराखडा पूर्वसूचित करणे एवढेच केवळ शक्य असते. पण भूत अगर वर्तमानाविषयी आम्हाला जे खरोखरीच समजते ते सर्व एवढेच होय. त्यानुसार तुमच्या युगाचे योग्य दर्शन घडावे असे वाटत असेल तर त्याच्याकडे फार दुरून पहावे. किती दूर अंतरावरुन? याचे उत्तर सोपे आहे विलओपात्राचे नाक दिसणार नाही इतक्या दुरून!

एकोणीसाव्या शतकात प्रचंड संख्येने ज्या मानवाची निर्मिति सतत वाढत्या श्रेणीने होत होती, त्याला जीवनाचे स्वरुप कसे दिसले? आरंभी त्याचे स्वरुप सार्वत्रिक भौतिक स्वास्थ्याचे होते. स्वतःचे आर्थिक प्रश्न अधिक सुकरतेने सोडविण्याला सामान्य मानव इतका समर्थ कधीही बनला नव्हता. मोठमोठ्या संपत्तीची प्रमाणशीर घट होत होती आणि वैयक्तिक कामगारांचे जीवन अधिक बिकट होत होते, त्यावेळी मध्यम वर्गांना आपले आर्थिक क्षितिज प्रतिदिनी विस्तारत असल्याचे आढळून येत होते. या वर्गांच्या जीवनमानात दररोज एकेका नव्या चैनीची भर पडत होती. प्रत्यही त्यांचे स्थान अधिक सुरक्षित होत होते आणि दुसऱ्याच्या इच्छेच्या तंत्राने त्याला चालावे लागत नव्हते. पूर्वी जी दैवाची देणगी, नियतीविषयी वाटणारी स्फूर्तिप्रद कृतज्ञता गणली गेली असती, तिचेच आता हक्कात रुपांतर झाले होते. या हक्काविषयी कृतज्ञ रहाण्याचा प्रश्न नव्हता, तर तो आग्रहाने प्राप्त करुन घेण्याचा होता.

इ. स. १९०० नंतर याप्रमाणे कामगाराचे जीवन विस्तारण्याला आणि त्याबद्दल हमी मिळण्याला आरंभ होतो. तथापि त्याला आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी झगडावे लागते. समाज आणि राज्यसंस्था ही आज अद्भुत संघटनेची रुपे दिसतात, त्यांचे फायदे मध्यमवर्गाला जसे दक्षतेने मिळत होते, तसे आपल्याला मिळत

नाहीत हे कामगारांना आढळून येते. आर्थिक स्वास्थ्य आणि सुरक्षितता यांच्या जोडीला सुखसोयी आणि सार्वजनिक सुव्यवस्था या वस्तुस्थितीची भर पडते. जीवनाची गाडी सुरळीत रुळावरून चालत असते आणि मध्ये घातपाताची किंवा धोक्याची कोणतीही आपत्ती कोसळण्याचा संभव नसतो. अशा प्रकारच्या मोकळ्या आणि अनिर्बंध, अशा आत्म्याच्या अंतरंगात अस्तित्वाची जी कल्पना बिंबविली जाणे अवश्य होते, ती आमच्या या पुरातन देशाच्या विनोदी आणि मार्मिक वाक्यात व्यक्त करता येईल. 'कास्ताइल विशाल आहे.' म्हणजेच नव्या मानवासमोर जे जीवन उभे राहिले, ते त्याच्या सर्व प्राथमिक आणि निर्णायक स्वरुपात निर्बंधापासून मुक्त होते. भूतकाली सामान्य माणसांत अशा स्वतंत्र अस्तित्वाचा पूर्णतः अभाव होता, हे लक्षात घेतले म्हणजे ही वस्तुस्थिती आणि तिचे महत्व ही तात्काळ पटू लागतात. उलटपक्षी, त्याना जीवन म्हणजे आर्थिक आणि शारीरिक या दोन्ही दृष्टींनी भारभूत नियती वाटत होती. त्यांच्या लेखी जन्मापासून जीवनाचा अर्थ अडथळ्यांची रास असा असून ते अडथळे सोसणे त्याना भाग होते आणि त्या अडथळ्यांशी जुळवून घेणे आणि उरल्यासुरल्या संकुचित जागेत प्रपंच करणे हाच सुटकेचा मार्ग होता.

पण जेव्हा आम्ही भौतिक स्थितीकडून राजकीय आणि नैतिक स्थितीकडे वळतो तेव्हा या दोन स्थितीतील विरोध अधिक स्पष्ट होतो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून पुढे सर्वसामान्य मानवाला त्यांच्या मार्गात सामाजिक अडथळे उभे राहिल्याचे आढळून येत नाही. म्हणजेच सार्वजनिक जीवनाच्या बाबतीत जन्मतःच अडथळे किंवा मर्यादा स्वतःसमोर उभ्या राहिल्याचे त्याच्या अनुभवास येत नाही. त्याच्या अस्तित्वाला मर्यादा घालणारे काहीही नसते. येथेही पुन्हा 'कास्ताईल विशाल आहे', येथे 'दौलती' नाहीत, की 'जाती' नाहीत, राजकीय विशेषाधिकारही नाहीत. कायदा सर्वांना समान लेखतो हे सामान्य माणूस शिकतो.

इतिहासाच्या मार्गक्रमणात मानव आज जसा चैतन्ययुक्त परिसरात स्थानापन्न झाला आहे, तसा पूर्वी कधीही झाला नव्हता. या परिसराशी वर उल्लेखिलेल्या परिस्थितीतून निर्माण झालेल्या परिसराचे दूरान्वयानेही साम्य नाही. खरोखरीच आमच्या समोर १९ व्या शतकाने मानवी नियतीमध्ये रूजविलेले नवे मूलगामी बदल उभे आहेत. मानवी अस्तित्वासाठी एका नव्या रंगमंचाची उभारणी झाली आहे. हा रंगमंच भौतिक आणि सामाजिक अशा दोन्ही बाजूनी नवा आहे. तीन तत्वानी हे नवे जग शक्य कोटीत आणले आहे. उदार लोकशाही, वैज्ञानिक प्रयोग आणि उद्यमवाद. यातील शेवटच्या दोहोंचे सार एका शब्दात सांगता येई : तंत्रवाद. यापैकी एकाही तत्वाचा शोध १९ व्या शतकात लागला नाही. आधीच्या दोन शतकातूनच ती तत्वे चालत आली आहेत. १९ व्या शतकाची थोरवी त्यांचा शोध लावण्यात नसून ती बद्धमूल करण्यात आहे, हे तथ्य कोणालाही उमगले नाही. पण अमूर्त स्वरुपात ते उमगणे पुरेसे नाही. त्याचे परिणाम अटळ असतात याची प्रत्यक्ष जाणीव होणे अवश्य आहे.

१९ वे शतक हे मूलतः क्रांतिकारी होते. त्या शतकाची ही क्रांतिकारक बाजू त्याने उभ्या केलेल्या अडथळ्यांच्या देखाव्यात शोधता येणार नाही. हे अडथळे केवळ आनुषंगिक बाबी आहेत. ती शोधावयाची झाल्यास तिने सर्व सामान्य मानवाला—या महान सामाजिक समूहाला—तो पूर्वी ज्या परिस्थितीने सदैव घेरला जात असे त्याच्या विरुद्ध परिस्थितीत ठेवले आहे, या गोष्टीत शोधली पाहिजे. तिने त्याच्या सार्वजनिक जीवनात उलथापालथ घडवून आणली. क्रांती म्हणजे पूर्वी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेविरुद्ध बंड नव्हे, इतर पारंपरिक व्यवस्थेविरुद्ध नवी व्यवस्था प्रस्थापित करणे होय. म्हणून सार्वजनिक जीवनावर झालेल्या

परिणामांच्या दृष्टीने पूर्वीच्या इतर सर्व मानवाहून १९ व्या शतकाने जन्माला घातलेला मानव निराळा आहे असे म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. १८ व्या शतकातील मानव हा अर्थात १७ व्या शतकातील मानवाहून भिन्न आहे आणि १७ व्या शतकातील मानव हा आपल्या परीने १६ व्या शतकातील आपल्या बांधवाहून निराळा आहे. परंतु या नव्या मानवासमोर त्यांना उभे केले, म्हणजे महत्वाच्या बाबतीत ते सर्व परस्पराशी सबंधित, परस्परासारखे आणि एकमेकाशी तंतोतंत जुळणारे वाटतात. पूर्वीच्या सर्व कालखंडातील 'सामान्य' मानवाला 'जीवनाचा' अर्थ प्राधान्येकरून मर्यादा, बंधन, परावलंबन, एका शब्दात दडपण असा वाटे. हवे तर त्याला जुलुम म्हणा. मात्र हे केवळ कायदेशीर किंवा सामाजिक अर्थाने नव्हे, तर व्यापक अर्थाने सुद्धा समजून घेतले पाहिजे. पण या व्यापक संदर्भाची उणीव शंभर वर्षापूर्वी कधीही भासत नव्हती. त्यानंतर वैज्ञानिक तंत्राची, भौतिकीय आणि शासकीय तंत्राची जवळ जवळ अमर्याद वाढ होत आहे. पूर्वी जग हे श्रीमंत आणि सामर्थ्यवान लोकांनासुद्धा दारिद्र्य, अडचणी आणि संकटे यांचे निधान वाटत होते. [एखादी व्यक्ती आपल्या सोबत्यांच्या मानाने कितीही श्रीमंत असली, तरी तत्कालीन जग हे सामान्याने दरिद्री असल्यामुळे त्या श्रीमंतीच्या योगाने त्याला प्राप्त होणाऱ्या सुखसोयींचे आणि वस्तूंचे क्षेत्र फारच मर्यादित असे. आजच्या सरासरी मानवाचे जीवन अन्य युगांच्या सर्वात सामर्थ्यशाली माणसांच्या जीवनापेक्षा अधिक सुकर, अधिक सोयीस्कर आणि अधिक सुरक्षित आहे. जग जर अधिक श्रीमंत असते आणि त्याने त्याला प्रचंड रस्ते, आगगाड्या, तारायंत्रे, आहारगृहे, वैयक्तिक सुरक्षिता आणि व्याधीपरिहारक औषधे पुरविली असती तर इतरांपेक्षा आपण कमी श्रीमंत आहो म्हणून त्याला असा काय मोठासा फरक जाणवला असता?]

या नव्या मानवाच्या भोवतालच्या जगात त्याच्या जन्मापासूनच त्याला कोणत्याही प्रकारे मर्यादा घालून घेण्याची सक्ती नसते. त्याच्या विरूद्ध कोणताही नकाराधिकार प्रस्थापित होत नाही. उलट या जगामुळे त्याची भूक उद्दीपित होते. तत्वतः ही भूक अमर्यादपणे वाढू शकते. त्यामुळे १९व्या शतकाच्या आणि २० व्या शतकाच्या आरंभीचे जग प्रत्यक्षात परिपूर्ण आणि समग्र आहे. इतकेच नव्हे, तर उद्याचे जग याहूनही अधिक संपन्न, अधिक प्रशस्त, अधिक परिपूर्ण होईल असे मौलिक आश्वासन त्यात रहाणाऱ्या लोकाना ते देते, ही अत्यंत महत्वाची गोष्ट त्यातून निष्पन्न होते. जणु काही त्याच्या वाढीची शक्ती उत्स्फूर्त आणि अक्षय होती. आज या दृढ विश्वासाला तडा पडण्याची चिन्हे दिसत असूनसुद्धा पाच वर्षाच्या अवधीत आजच्यापेक्षा मोटारगाड्या अधिक सुखावह आणि अधिक स्वस्त होतील याबद्दल शंका घेणारी माणसे अगदी विरळा सापडतील. सूर्य सकाळी उगवेल यावर त्यांचा जितका विश्वास असतो, तितकाच यावरही असतो. ही उपमा तंतोतंत लागू पडते. कारण खरोखरीच सामान्य मानव तंत्रदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या इतक्या उत्कृष्ट जगात स्थिर असल्यामुळे हे जग निसर्गाने निर्माण केले आहे अशी त्याची श्रद्धा असते. या जगाच्या निर्मितीला गुणसंपन्न व्यक्तींचे वैयक्तिक परिश्रम कारणीभूत असतात हे गृहीत धरले पाहिजे, हा विचारही त्याच्या मन ला शिवत नाही. या सर्व सुखसोयीही विशिष्ट दुर्मीळ मानवी गुणांच्या आधारावर उभ्या असतात आणि या गुणात थोडीशी जरी कमतरता झाली तरी त्यामुळे हे सगळे भव्य मंदिर कोसळून पडेल ही कल्पनाही तो करू शकत नाही.

येथे आजच्या समुदायमानवाविषयीच्या आमच्या मानसशास्त्रीय तक्त्यात पुढील दोन मूलभूत गुणविशेषांची नोंद घेतली पाहिजे. एक, त्याच्या प्राणभूत कामनांची आणि म्हणूनच त्याच्या व्यक्तित्वाची मोकळी वाढ; आणि दुसरा, त्याच्या जीवनाचे स्वास्थ्य मिळवून देणाऱ्या सर्व गोष्टीविषयीची त्याची मूलभूत अकृतज्ञता. हे दोन्ही गुणविशेष मिळून बिघडलेल्या मुलाचे सुप्रसिद्ध मानसाशास्त्र बनते. खरोखरीच आजच्या झुंडीच्या आत्म्याचे निरीक्षण करण्याची 'दृष्टी' म्हणून या मानसशास्त्राचा उपयोग करणे चुकीचे होणार नाही. सामान्य जनता प्रशस्त आणि उदार भूतकालाची—ध्येये आणि कृति या दोन्ही दृष्टीनी त्या भूतकालाची वारसदार असून ती भोवतालच्या जगाने बिघडून टाकली आहे. बिघडणे याचा अर्थ लहरीपणाला आळा न घालणे आणि प्रत्येक

अनुक्रमाणिका

गोष्ट करण्याला आपल्याला मुभा असून आपल्यावर कोणतीही बंधने नाहीत अशी समजून करून घेणे हा होय. अशा स्थितीत सापडलेल्या लहान मुलाला स्वतःच्या मर्यादांची जाणीव नसते. सगळे बाह्य निर्बंध, दुसऱ्या गोष्टीशी होणारे सगळे संघर्ष नाहीसे झाल्या कारणाने आपल्या एकट्याचेच तेवढे अस्तित्व आहे असा प्रत्यक्षात त्याला विश्वास वाटू लागतो आणि दुसऱ्यांचा विचार न करण्याची आणि विशेषतः त्याना स्वतःपेक्षा कनिष्ठ मानण्याची सवय त्याला जडते. दुसऱ्याच्या श्रेष्ठत्वाची जाणीव त्याच्या मनावर बिंबवण्याचा एक मार्ग म्हणजे त्याच्यापेक्षा कोणीतरी बलवान माणसाने त्याच्या कोणत्यातरी इच्छेचा त्याग करायला, स्वतःवर निर्बंध घालून घेण्याला, स्वतःवर नियंत्रण ठेवण्याला त्याला भाग पाडले पाहिजे. तेव्हाच तो "माझी मर्यादा येथे संपते आणि येथूनच माझ्यापेक्षा अधिक बलवान अशा दुसऱ्या माणसाची मर्यादा सुरू होते; जगात उघडपणे दोन प्रकारचे लोक आहेत : मी स्वतः आणि माझ्यापेक्षा श्रेष्ठ दुसरा." ही मूलभूत शिस्त तो शिकेल. भूतकालातील सामान्य मानव सभोवारच्या जगाकडून हे मूळचे शहाणपण प्रत्यही शिकत होता. कारण त्या जगाची संघटना इतक्या धोपट रीतीने झाली होती की, त्यावर वारंवार महान आपत्ति कोसळत आणि त्यात निश्चित, विपुल, टिकाऊ असे काहीही नसे. पण या नव्या जनसमुदायाना संभाव्यतानी भरलेले दृश्य समोर दिसत असते. शिवाय हे दृश्य अगदी सुरक्षित असते आणि ज्याप्रमाणे आम्ही आमच्या खांद्यावर उचलून न धरताही सूर्य वर आकाशात दिसतो, त्याप्रमाणे कोणत्याही पूर्वप्रयत्नाशिवाय या जनसमुदायाना प्रत्येक गोष्ट हाताशी तयार मिळते. कोणाही मानवप्राण्याला श्वासोच्छवास करण्यासाठी दुसऱ्याचे ऋणी व्हावे लागत नाही. कारण त्याच्यासाठी दुसऱ्या कोणी हवा निर्मिलेली नसते. 'जे जे आहे' त्या सर्वांची ती गोळा बेरीज असते. ती 'नैसर्गिक आहे' असे आम्ही म्हणतो, कारण ती कधीही उणी पडत नाही. हे बिघडलेले जनसमुदाय इतके निर्बुद्ध असतात की, हवेप्रमाणे त्यांच्या स्वाधीन असलेल्या भौतिक आणि सामाजिक संघटनेचा उगमही तसाच होतो अशी त्यांची समजूत असते. कारण सकृद्दर्शनी ती कधीही त्याना उणी पडत नाही आणि निसर्गतःच ती जवळजवळ परिपूर्ण असते.

म्हणून माझे प्रमेय असे : १९ व्या शतकाने ज्या परिपूर्णतेने जीवनाच्या काही विशिष्ट पद्धती संघटित केल्या आणि त्यायोगे जनसमुदायाचा फायदा झाला, त्याच परिपूर्णतेमुळे त्यांना असे वाटू लागले की जीवन ही घडवावयाची नव्हे तर एक नैसर्गिक पद्धति आहे. अशाप्रकारे जनसमुदायात प्रकट होणाऱ्या या वेडगळ मनःस्थितीचे स्पष्टीकरण आणि निरूपण करता येते. जनसमुदाय केवळ स्वतःच्याच कल्याणाची काळजी घेत असतात. पण त्याबरोबरच त्यासाठी कारणीभूत होणाऱ्या गोष्टींना ते पारखे होतात. भौतिक सुधारणेपासून मिळणाऱ्या फायद्यांच्या पलीकडे जाऊन नवे शोध आणि रचनात्मक कार्ये यांची अद्‌भुतता त्याना दिसत नाही आणि यागोष्टी केवळ महत्प्रयासाने आणि दूरदृष्टीनेच कराव्या लागतात हेही त्याना समजत नाही. त्यामुळे हे फायदे म्हणजे जणू काही नैसर्गिक हक्कच आहेत असे मानून त्यांची मागणी करण्यापुरती तेवढीच आपली भूमिका मर्यादित आहे अशी ते कल्पना करतात. अन्नाच्या टंचाईमुळे उद्‌भवणाऱ्या दंगलीत लोकांच्या झुंडी पावाच्या शोधात बाहेर पडतात आणि सामान्यतः त्यांचा मार्ग म्हणजे पावांच्या भट्ट्यांचा विध्वंस करणे हा होय. हे उदाहरण म्हणजे आजचे जनसमुदाय त्याना आधारभूत असलेल्या भौतिक संस्कृतीविषयी जी वृत्ती धारण करतात तिचे अधिक मोठे आणि अधिक जटिल लक्षण होय.

* *

अनुक्रमाणिका

## प्रकरण ७ वे

## अमीरी जीवन आणि सामान्य जीवन किंवा यत्नशीलता आणि जडता

आरंभी हे सांगितले पाहिजे की, आम्ही कसे जगावे याविषयी जगाचे एक आवाहन असते. त्याला अनुसरून आमचे जीवन घडत असते. आणि एखाद्या साच्यात ठसा उमटावा त्याप्रमाणे आमच्या आत्म्याच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा ठसा जगाच्या परिसरावर उमटत असतो हेही स्वाभाविक आहे. कारण आमचे जीवन म्हणजे भोवतालच्या जगाशी असणारे आमचे संबंध याशिवाय दुसरे काहीही नसते. भोवतालच्या जगाचे स्वरुप जसे असेल, त्यानुसार आमच्या जीवनाचे सर्वसाधारण स्वरुप घडेल. याच कारणास्तव ज्या जगाने आजच्या जनसमुदायाला जन्माला घातले, तेच जग इतिहासाला मूलतः नवीन असणारी वैशिष्ट्ये प्रकट करीत आहे या माझ्या विधानावर मी इतका भर देत आहे भूतकालात सामान्य मानवाच्या बाबतीत जीवनाचा अर्थ अडचणी, संकटे, गरजा, स्वतःच्या नियतीच्या मर्यादा, परावलंबन यांनी चोहोबाजूनी घेरले जाणे असा होता. पण आता नवे जग हे जवळजवळ अमर्याद संभाव्यतांचे क्षेत्र झाले असून ते सुरक्षित आणि स्वतंत्र आहे. आजच्या प्रत्येक मानवाचे मन जे घडत असते, ते त्याच्या मनावर उमटणाऱ्या मूळच्या आणि टिकाऊ ठशांच्या आधाराने होय. पूर्वीच्या काळी माणसांची मने उलट प्रकारे घडत असत. या आधारभूत ठशातूनच आतला आवाज उमटत असतो; तोच व्यक्तीच्या अंतरात्म्यात विशिष्ट शब्द सतत गुणगुणत असतो आणि त्यातूनच जीवनाची व्याख्या सूचित होत असते. त्याबरोबरच ही व्याख्या नैतिक आदेशही असते. पारंपरिक भावना कुजबुजत असते की, 'जगणे म्हणजे स्वतःला मर्यादा आहेत याची जाणीव ठेवणे आणि म्हणून ज्यामुळे मर्यादा पडतात त्यांचा शोध घेणे होय.' तर हा नवा आवाज ओरडून सांगतो की 'जीवन म्हणजे कोणत्याही मर्यादांशी गाठ न पडणे आणि परिणामी स्वतः बेभान होऊन स्वैर वागणे होय. व्यवहारतः काहीही अशक्य नाही; धोकादायक असे काहीही नाही आणि तत्वतः कोणीही दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ नसतो.' समुदाय-मानवाला या मूलभूत अनुभवामुळे त्याचा पारंपरिक आणि टिकाऊ पोत पूर्णपणे बदलून जातो. कारण पूर्वीच्या मानवात स्वभावतःच नेहमी अशी जाणीव असे की, जीवनात भौतिक मर्यादा आणि उच्चतर सामाजिक शक्ती याना तोंड द्यावे लागते. त्या काळच्या मानवाच्या दृष्टीने जीवनच तसे होते. जर आपली स्थिती सुधारण्यात तो यशस्वी होऊ शकला, सामाजिक सोपान चढू शकला, तर त्याचे श्रेय तो त्याला विशेषेकरून अनुकूल झालेल्या दैवाला देत असे. तसेच जेव्हा त्याला श्रेय द्यावयाचे नसेल तेव्हा तो ते प्रचंड प्रयत्नाला देत असे. त्या प्रयत्नांचे मोल तो चांगले जाणून असे. या दोहोंच्या बाबतीत प्रश्न होता तो जग आणि जीवन यांच्या सर्वसामान्य स्वरुपाला अपवाद कोणता ? अपवाद असेल, तर त्याला तसेच खास कारण असले पाहिजे.

परंतु आधुनिक जनसमुदायाला संपूर्ण स्वातंत्र्य ही स्वतःची स्वभाविक स्थिती असल्याचे आढळून येते. त्यासाठी खास कारण असे लागत नाही. स्वतःला मर्यादा असतात हे ओळखण्यासाठी आणि परिणामी स्वतःपेक्षा वरिष्ठ अशा इतर अधिकारी व्यक्तीकडे सर्वकाळ धाव घेण्यासाठी त्याला बाह्य चेतावणीची गरज लागत नाही. अगदी परवापर्यंत चिनी शेतकऱ्याची अशी श्रद्धा असे की त्याच्या जीविताचे कल्याण त्याच्या सम्राटाच्या अंगी वसणाऱ्या गुणावर अवलंबून असते, म्हणून त्या सर्वोच्च अधिसत्तेवर त्याचे जीवन अवलंबून असे, त्याच्याशीच ते सतत बांधलेले असे. परंतु ज्या मानवाचे आम्ही विश्लेषण करीत आहोत त्याला स्वतः होऊन कोणत्याही बाह्य अधिकारी व्यक्तीकडे धाव न घेण्याची सवय जडलेली असते. जसे असेल तसेच

तंतोतंत राहण्यात तो समाधान मानतो. कोणत्याही प्रकारे बढाई मारण्याची गरज नसता स्वतःची प्रत्येक गोष्ट, मते, वासना, पसंत्या, अभिरुची ही सर्व उत्तम समजून तसे ठासून सांगण्याला तो प्रवृत्त होतो. आणि त्याने तरी तसे का न व्हावे ? कारण याची जाणीव व्हावी म्हणून त्याला भाग पाडणारे काहीही आणि कोणीही नसते; तसेच तो दुय्यम दर्जाचा असून अनेक बंधनानी वेढलेला आहे आणि त्याच्या जीवनाला पूर्ण आणि समाधान देणारी – या दोन गुणाच्या आधारावर तो आपले व्यक्तित्व प्रस्थापित करीत असतो–संघटना निर्माण करण्याला व तिचे जतन करण्याला तो असमर्थ असतो. म्हणूनच तो असा तोरा मिरवू शकतो.

समुदाय मानवाला त्याच्या परिस्थितीने, सक्तीने भाग पडले नसते, तर त्याने बाह्य अधिकाराचा कधीही स्वीकार केला नसता. आजच्या स्थितीत त्याची परिस्थिती त्याला तसे करण्याला भाग पाडीत नाही. म्हणून या चिरंतन समुदायमानवाने आपल्या स्वभावाला जागून इतर प्रामाण्ये मानण्याचे बंद केले आहे. आपल्या जीविताचे धनी आपण स्वतःच आहोत असे त्याला वाटते. उलट पक्षी निवडक माणूस, उत्तम पुरुष, हा आंतरिक गरजेमुळे स्वतः होऊन आपल्यापेक्षा वरच्या, आपल्याहून श्रेष्ठ, अशा एखाद्या मानवाला आवाहन करण्याला उद्युक्त होतो आणि त्या मानवाकडून होणारी व्यवस्था मोकळेपणाने स्वीकारीत असतो. उत्तम पुरुष आणि सामान्य मानव यांच्यात प्रारंभीच सांगितलेला हा फरक लक्षात ठेवावा. उत्तम पुरुष तोच की जो स्वतःकडून मोठ्या अपेक्षा करीत असतो आणि सामान्य मानव स्वतःकडून अशा कोणत्याही अपेक्षा करीत नाही; पण स्वतः जे असतो त्यातच तो समाधान मानतो आणि स्वतःमध्येच मश्गूल होऊन राहतो. [कोणताही प्रश्न समोर उभा राहिला म्हणजे डोक्यात पहिल्या प्रथम आलेल्या गोष्टीचाच विचार करण्यात जो समाधान मानतो तो बौद्धिक दृष्ट्या समुदायातील मानव होय. उलटपक्षी उत्तम पुरुष पूर्वप्रयत्नाशिवाय जे मनात येते, ते हीन लेखतो आणि स्वतःहूनही जे श्रेष्ठ असते आणि जे गाठण्याकरिता अधिक प्रयत्न करावे लागतात त्याचाच योग्य म्हणून स्वीकार करतो.]

नेहमीच्या समजुतीच्या उलट जो आवश्यक सेवा वृत्तीने जगतो तो सामान्य मानव नसून उत्तम मानव असतो. काहीतरी अलौकिकाच्या कारणी आपले जीवन लावल्याशिवाय उत्तम मानवाला जीवनात रस वाटत नाही. म्हणून सेवा करण्याची आवश्यकता पडली तर तीकडे तो सक्ती म्हणून पहात नाही. प्रसंगोपात्त जेव्हा योगायोगाने अशा आवश्यकतेची उणीव भासते, तेव्हा तो अस्वस्थ होतो आणि कोणते तरी नवे मानक तो शोधून काढतो. हे मानक अधिक कठीण, अधिक निकडीचे आणि सक्तीने स्वतःवर लादून घेतलेले असते. शिस्त म्हणून जगावयाचे जीवन–अमीरी–जीवन ते हेच होय. अमीरशाहीची व्याख्या ती आमच्याकडे ज्या मागण्या करते त्यावरून करण्यात येते, हक्कांवरून नव्हे, तर जबाबदाऱ्यावरून, 'अमिरीबरोबर जबाबदाऱ्या येतात.' (Noblesee oblige). 'मनमानेल तसे जगणे हे प्राकृत जनांचे काम अमीरी माणसाला कायदा आणि सुव्यवस्था यांची ओढ असते.' (ग्योथे) अमीरशाहीबरोबर येणारे विशेषाधिकार हे मुळात तिच्यापासून मिळणाऱ्या सवलतीत किंवा अनुग्रहात नसतात. उलट ते जिंकून घ्यावे लागतात. त्यांचे रक्षण करताना तत्वतः असे गृहीत धरले जाते की, विशेषाधिकार प्राप्त झालेली व्यक्ति कोणत्याही क्षणी, जरूर पडल्यास आणि कोणी हरकत घेतल्यास ते पुनः जिंकून घेण्यास समर्थ असते. [Vide 'Espana Invertebrada' (1922), P. 156] तेव्हा खाजगी हक्क वा विशेषाधिकार यांची मालकी म्हणजे निष्क्रियता नव्हे आणि केवळ उपभोगही नव्हे. तर वैयक्तिक यत्नांनी साध्य केलेला दर्जा त्यात प्रतीत होतो. दुसऱ्या पक्षी, मानव व नागरिक यांच्या हक्कासारखे समान हक्क म्हणजे निष्क्रिय मत्ता होय, निव्वळ फलोपभोग, आपोआप मिळणारे फायदे होत, प्रत्येक माणसाला स्वतःसमोर विनासायास आढळणारी ती दैवाची उदार देणगी असून तिच्याकरिता प्रयत्न करावे लागत नाहीत. याला अपवाद म्हणजे

जगण्यासाठी आणि वेडेपणा टाळण्यासाठी होणारे प्रयत्न होत. म्हणून मी म्हणतो की, व्यक्तीनिरपेक्ष हक्क हे आयते मिळतात. तर वैयक्तिक हक्क सतत रक्षावे लागतात.

'अमीरशाही' (Nobility) या स्फूर्तिप्रद शब्दाचे नेहमीच्या बोलण्यात होणारे अधःपतन पहाणे तापदायक वाटते. कित्येक लोक तिचा अर्थ आनुवंशिक 'आमीरी रक्त' असा करतात. त्यामुळे ती काहीतरी सामान्य हक्कासारखी आहे, काहीतरी जड वस्तुसारखा आयता मिळालेला आणि वंशपरंपरा चालणारा स्थितिबद्ध निष्क्रिय गुण आहे असे समजून चालतात. काटेकोर अर्थाने nobility (अमीरशाही) या शब्दाचा धात्वर्थ मूलतः क्रियाशील असा आहे. noble याचा अर्थ ख्यातनाम. म्हणजे सर्वांना माहीत असलेला, कीर्तिमान, अनामिक जनसमुदायापेक्षा श्रेष्ठ असल्याने प्रसिद्धी मिळालेला असा आहे. त्यात त्याच्या कीर्तीचे कारण म्हणून असाधारण यत्न अंतर्भूत असतात. म्हणून noble (अमीर) हा शब्द यत्नशील, उत्तम, या शब्दाला समानार्थी आहे. पुत्राची सरदारकी किंवा कीर्ती हा आयता लाभ असतो. पुत्राला लोक ओळखतात ते पित्याने मिळविलेल्या कीर्तीवरून होय. तो ओळखला जातो तो प्रतिबिंब म्हणून. खरोखरीच आनुवंशिक अमिरीचे स्वरुप अप्रत्यक्ष असते. ती प्रतिबिंबीत प्रकाश, परप्रकाशित अमिरी आहे; काहीतरी मृतवत आहे. त्यामध्ये जिवंत, अस्सल, क्रियाशील अशी कोणती गोष्ट शिल्लक रहात असेल, तर पूर्वजांनी गाठलेली यत्नांची पातळी राखण्याकरिता वंशजाना चेतविणारी प्रेरणा हीच होय. या बदललेल्या अर्थाने सुद्धा सदैव 'अमिरीबरोबर जबाबदाऱ्या येतात'. मूळचा अमीर स्वतःवर जबाबदारी लादून घेतो आणि त्याच्या वारसदाराकडे वारसाबरोबर ही जबाबदारी येते. पण कोणत्याही परिस्थितीत पहिल्या अमीराकडून वंशजाकडे अमिरी जाते, त्यावेळी त्यात एक विशिष्ट अंतर्विरोध असतो. चिनी लोक अधिक तार्किक असल्यामुळे वंश परंपरेचा क्रम ते उलटा लावतात. तेथे बाप मुलाला अमीरपद मिळवून देत नाही. तर मुलगा ते मिळवितो आणि पूर्वजापर्यंत पोचवितो; आणि स्वतःच्या वैयक्तिक यत्नांनी कनिष्ठ दर्जाच्या वंशाला प्रसिद्धीला आणतो. म्हणून अमीरपदाचा दर्जा देताना पूर्वी सन्मानित झालेल्या पिढ्यांच्या संख्येवरून त्यांचा क्रम लावण्यात येतो. केवळ आपल्या पित्यालाच उच्च पद मिळवून देणारे काही असतात किंवा आपल्या पाचव्या किंवा दहाव्या महापितरापर्यंत आपली कीर्ती मागे नेणारेही असतात. पूर्वज जगतात ते आजच्या प्रत्यक्ष मानवाच्या योगाने आणि त्या मानवाची अमिरी पभावी आणि क्रीयाशील असते—एका शब्दात 'वर्तमान', 'भूत' नव्हे. [पूर्वी सांगितल्याप्रमाणे ही बाब nobility या शब्दाला मूळचा अर्थ प्राप्त करून देण्याची आणि मूळ अर्थातून आनुवंशिकता वर्ज्य करण्याची आहे. इतिहासात वारंवार दिसून येणाऱ्या 'रक्ताची अमीरशाही' या गोष्टीचा अभ्यास करण्याचे हे स्थळ नव्हे. म्हणून हा प्रश्न येथे असाच सोडून दिला आहे.]

'अमिरी' ही रोमन साम्राज्याच्या काळापर्यंत रीतसर नामाभिधान म्हणून पुढे आलेली दिसत नाही. नंतर ज्यावेळी ते नामाभिधान प्रचारात आले, त्यावेळी ऱ्हासमान होत असलेल्या आनुवंशिक अमीर लोकांच्या नेमक्या विरूद्ध अर्थाने ते रुढ झाले.

म्हणून माझ्या मते 'अमिरी' हा शब्द यत्नशील जीवनाला समानार्थी आहे. असे जीवन स्वतःला मागे टाकून पुढे जाते. स्वतःच्या अस्तित्वाच्याही पलीकडे जाऊन स्वतःसमोर कर्तव्य आणि जबाबदारी ठेवते आणि त्याप्रीत्यर्थ सदा बद्धपरिकर असते. अशारितीने अमिरी जीवन हे सामान्य किंवा निष्क्रिय जीवनाच्या विरूद्ध आहे. सामान्य जीवन स्थितीबद्ध अवस्थेत सुस्त पडून रहाते. जोपर्यंत एखादी बाह्यशक्ती त्याला खेचून बाहेर काढीत नाही, तोपर्यंत ते सतत, अचल अवस्थेत खितपत पडून रहाते. म्हणूनच मी अशा प्रकारच्या मानवाला झुंड ही संज्ञा देतो. सामुदायिकतेवरुन नव्हे तर त्याच्या निष्क्रियतेवरुन होय.

अनुक्रमाणिका

माणूस जीवनात जसजसा प्रगत होत जातो, तसतसे त्याच्या प्रत्ययास येते की, बहुसंख्य पुरुष आणि स्त्रिया जे यत्न करतात, ते बाह्य दडपणाची प्रतिक्रिया म्हणून सक्तीने लादलेले असतात. त्याखेरीज इतर कोणतेही यत्न करण्याला ते असमर्थ असतात. याच कारणास्तव आमच्या आढळात स्वयंस्फूर्तीने आणि आनंदाने यत्न करू शकणाऱ्या अगदी थोड्या व्यक्ती येतात, त्या ठळकपणे उठून दिसतात; आणि त्या आमच्या अनुभवात स्मृतीरुपाने कायम रहातात हे सांगितले पाहिजे, निवडक माणसे ती हीच. सरदार पुरुष ते हेच. हेच तेवढे क्रियाशील असतात; केवळ प्रतिक्रियाशील नव्हेत. त्यांच्यासाठी जीवन हा निरंतरचा झगडा आहे. एक अखंड प्रशिक्षण आहे. प्रशिक्षण=योग (skeasis). ही माणसे योगी असतात. [नुकतेच प्रसिद्ध झालेले El Origin Deportivo del Estado in El Espectador VII पहावे.] या वरवर दिसणाऱ्या विषयांतराने आश्चर्यचकित होण्याचे कारण नाही. समुदाय-मानव हा सदैव समुदायच असतो. पण तो 'उत्तमा'ला हुसकून लावू इच्छितो, अशा प्रत्यक्ष समुदाय-मानवाची व्याख्या करण्याकरिता त्याच्यामध्ये ज्या दोन शुद्ध रूपांचे मिश्रण झाले आहे, त्यातील विरोध दर्शविणे अवश्य आहे. एक नित्याचा समुदाय आणि दुसरा खराखुरा अमीर किंवा यत्नशील मानव.

आता अधिक जलदगतीने आपणाला पुढे जाता येईल. कारण माझ्या विचारानुसार आज प्रबल झालेल्या मानवी नमुन्याची किल्ली—मानसशास्त्रीय समीकरण—आमच्या हाती आली आहे. तिला अनुसरून निष्पन्न होणारे सर्व मूळ रचनेचा परिणाम असून तिचाच अनुषंजक आहे. त्याचे सार थोडक्यात असे सांगता येईल; एकोणिसाव्या शतकाने संघटित केलेल्या जगाने आपोआप एक नवा मानव निर्माण करीत असतानाच त्याच्यामध्ये विविध क्षुधा ओतल्या असून त्या भागविण्याकरिता हरएक तऱ्हेची प्रभावी साधनेही निर्माण केली आहेत. या साधनामध्ये आर्थिक, शारीरिक (शरीरस्वास्थ्य, पूर्वीच्या कोणत्याही युगापेक्षा उच्च प्रतीचे सरासरीचे आरोग्य), राजकीय आणि तांत्रिक (याचा अर्थ मी आजच्या सर्वसामान्य माणसापाशी असलेले आंशिक ज्ञानाचे प्रचंड परिणाम आणि त्याची प्रत्यक्ष कार्यक्षमता असा करतो. भूतकाळात सर्वसामान्य माणसात त्यांचा अभाव होता) या गोष्टींचा समावेश आहे. या सर्व शक्ती प्राप्त करून दिल्यानंतर १९ व्या शतकाने त्याला सर्वस्वी मोकाट सोडून दिले आणि सर्वसामान्य मानवाने आपल्या स्वाभाविक कृतीनुसार स्वतःमध्येच माघार घेतली आहे. म्हणून आमच्यासमोर जो जनसमुदाय आहे, तो पूर्वीच्या कोणत्याही कालखंडाच्या जनसमुदायापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे. पण तो स्वतःमध्येच पूर्णपणे बंदिस्त रहातो, स्वतःला स्वयंपूर्ण समजून कोणाच्याही पुढे आणि कशाच्याही पुढे नमण्याला तो असमर्थ असतो—थोडक्यात तो कुणालाही जुमानत नाही. [जनसमुदायांच्या नाठाळपणाविषयी, विशेषतः स्पॅनिश जनसमुदायांच्या नाठाळपणाविषयी, Espana Invertebrada (1922) यात मी पूर्वी जे लिहिले आहे त्याकडे वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो.] याबाबतीत तो पारंपरिक नमुन्याहून भिन्न आहे. सध्याची स्थिती अशीच चालू राहिली, तर युरोपमध्ये—आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून सगळ्या जगात—जनसमुदाय कोणत्याही प्रकारच्या मार्गदर्शनापुढे नमण्याला असमर्थ ठरतात. हे प्रत्यही अधिकाधिक लक्षात येत जाईल. मात्र हे संभवनीय आहे की, आमच्या भूखंडावर येऊ घातलेल्या कठीण दिवसात एखाद्या आकस्मिक आपत्तीमुळे काही विशिष्ट तातडीच्या प्रसंगी श्रेष्ठ अल्पजनांचे मार्गदर्शन स्वीकारण्याची सदिच्छा एखाद्या क्षणी या जनसमुदायाना होईल.

पण ही सदिच्छासुद्धा शेवटी अपयशी ठरेल. कारण त्यांच्या आत्म्याचा मूलभूत पोत हा कवाडेबंदी आणि कोणालाही न जुमानण्याची वृत्ती यानी बनलेला आहे. त्यांच्या स्वतःच्या बाहेर जे असेल, मग ती घटना असो वा व्यक्ति असो, त्याकडे लक्ष देण्याच्या मनःस्थितीचा जन्मतःच त्यांच्यामध्ये अभाव असतो. कोणाचे तरी अनुयात्रित्व करण्याची ते इच्छा करतील, तर त्यालाही नालायक ठरतील. त्याना दुसऱ्याचे ऐकावे अशी इच्छा झालीच, तर आपण बहिरे झालो आहोत असे त्याना आढळून येईल.

अनुक्रमाणिका

दुसऱ्यापक्षी इतर कालखंडाशी तुलना करता आजच्या समुदाय मानवाच्या जोमदारपणाची पातळी कितीही वरची असली, तरी तो स्वतः होऊन संस्कृतीच्या प्रक्रियेचे नियंत्रण करू शकेल अशी कल्पना करणे भ्रामक ठरेल. मी क्रिया म्हणतो, प्रगती नव्हे. आमची आजची संस्कृती जतन करण्याची साधी प्रक्रिया ही कमालीची गुंतागुंतीची असून त्यासाठी सूक्ष्म क्षमतांची गरज आहे. हा सर्वसामान्य मानव त्या संस्कृतीचे मार्गदर्शन करण्याला अपात्र असला तरीही संस्कृतीच्या यंत्रणेचा तो मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यास शिकला आहे. पण त्या संस्कृतीच्या खास तत्वांचे मूलतः अज्ञान हे त्याचे वैशिष्ट्य आहे.

येथपर्यंत सोशिकपणे माझ्याबरोबर आलेल्या वाचकाला मला पुन्हा हेच सांगावयाचे आहे की, वर प्रतिपादन केलेल्या घटनांना प्रामुख्याने राजकीय महत्व देऊ नये. उलटपक्षी राजकीय कृत्ये विशेषतः सार्वजनिक जीवनातील अत्यंत कार्यक्षम आणि अतिशय स्पष्ट अशी कृत्ये अधिक खोल आणि अधिक प्रच्छन्न अशा दुसऱ्या कृत्यांची अंतिम फळे असतात. म्हणून राजकीय बेगुमानपणा हा अधिक खोल आणि अधिक निर्णायक अशा बौद्धिक बेगुमानपणातून निष्पन्न झाला नसता तर ती बाब इतकी गंभीर ठरली नसती. परिणामी या दुसऱ्या बेगुमानपणाचे पृथःकरण केल्याशिवाय या प्रबंधाच्या विषयाला अंतिम स्पष्टता येणार नाही.

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण ८ वे

## झुंडशाही—रानटीपणाची सनद

काहीतरी पराकाष्ठेचे विरोधाभासात्मक घडले आहे असे आम्ही गृहीत धरतो. पण जे घडले ते खरोखरीच अत्यंत स्वाभाविक होते. सर्वसामान्य मानवाला जीवनाच्या आणि जगाच्या वाटा मोकळ्या झाल्या वेळेपासूनच त्याचा आत्मा स्वतःमध्ये बंदिस्त झाला आहे. म्हणून मी म्हणतो की, सरासरी आत्मा लोप पावण्यात जनसमुदायाचे बंड सामावलेले आहे आणि त्यातून मानवजातीसमोर राक्षसी प्रश्न उद्‌भवला आहे.

माझ्या कित्येक वाचकांना माझे हे मत पटणार नाही हे मी जाणून आहे. पण हेही अतिशय स्वाभाविक असून माझ्या प्रमेयाला त्याने पुष्टीच मिळते. कारण माझे मत चुकीचे ठरले, तरी मतभेद असणाऱ्या अनेक वाचकांनी या गुंतागुंतीच्या विषयावर कधी थोडाही विचार केलेला नसेल ही गोष्ट शिल्लक रहातेच. ते माझ्यासारखाच विचार कसा बरे करतील? तरीपण अशा वाचकाना पूर्वप्रयत्नाशिवाय या विषयावर स्वतःचे मत बनविण्याचा हक्क आहे असा विश्वास वाटत असल्यामुळे 'बंडखोर जनसमुदाय' असे मी ज्याला म्हटले आहे त्या मानव प्राण्याच्या नमुन्यापैकीच ते आहेत हे स्पष्ट होते. ज्याला मी आत्म्याचा लोप होणे, तो पूर्णपणे 'कवाडेबंद' होणे असे म्हणतो, ते नेमके हेच. बौद्धिक कवाडेबंदीचे हे खास उदाहरण आहे. अशा व्यक्तीला स्वतःपाशी विचारांचा साठा आहे असे वाटते. त्या विचारांत संतुष्ट राहून बौद्धिक दृष्ट्या आपण पूर्ण आहोत असे समजून तो चालतो. स्वतःबाहेर उणे असे काहीही नाही असे वाटत असल्यामुळे तो स्वतःच्या मानसिक सरंजामात निश्चितपणे स्थिरावतो. हीच आत्मलोपाची यंत्रणा.

समुदाय—मानव स्वतःला पूर्ण समजतो. पण निवडक मानवाला आपण पूर्ण आहोत असे समजण्यासाठी मुद्दाम बढाईखोर बनावे लागते. आपण पूर्ण आहोत ही समजूत त्याच्यामध्ये मुरलेली नसते, ती अकृत्रिम नसते, तर ती त्याच्या बनावट बढाईखोरीतून उद्‌भवलेली असते आणि त्याच्या स्वतःच्याही बाबतीत ती नकली, काल्पनिक आणि प्रश्नात्मक असते. बढाईखोर माणसाला स्वतःविषयीच्या मानवी कल्पनेसाठी आधार शोधण्यासाठी दुसऱ्यांची गरज लागते. यत्नशील माणूस अशा विपरीत अवस्थेत बढाईखोरीमुळे आंधळा बनल्यानंतरही आपण खरेच पूर्ण आहोत असे समजून चालत नाही. उलटपक्षी आजच्या सामान्य प्रतीच्या मानवाला, या नव्या आदमला, आपल्या स्वतःच्या पूर्णतेविषयी कधीही शंका वाटत नाही. आदमप्रमाणेच त्याचा आत्मविश्वास स्वर्गीय असतो. त्याच्या अपुरेपणाचा शोध लावण्यासाठी त्याच्याशी दुसऱ्या माणसाची तुलना होणे आवश्यक असते. पण त्याची अंगभूत कवाडेबंदी याच्या आड येते. स्वतःची दुसऱ्याशी तुलना करणे म्हणजे क्षणभर स्वतःच्या बाहेर जाणे आणि आपल्या शेजारच्या दृष्टीतून स्वतःला पहाणे होय. परंतु सामान्य प्रतीचा आत्मा परकायाप्रवेश करण्याला असमर्थ असतो. कारण ते खुलेपणाचे परम रुप असते.

येथे आमच्यासमोर मूर्ख आणि समंजस यांच्यातील चिरंतन फरक उभा रहातो. समंजस माणूस मूर्खपणापासून स्वतःला सतत सावरीत असतो. मूर्खपणा पदरी पडू नये म्हणून त्यातून निसटण्याचा तो प्रयत्न असतो. या प्रयत्नातच त्याचा शहाणपणा सामावलेला असतो. उलटपक्षी मूर्ख माणूस स्वतःबद्दल शंकाही घेत नाही. स्वतःला तो सर्वात शहाणा समजतो. म्हणून हेवा वाटावा अशा मनःशांतीत तो स्थिरावतो आणि स्वतःच्या

मूर्खपणात ठाम राहतो. काही कीटकाना त्यांच्या राहत्या घरट्यातून बाहेर खेचून काढणे अशक्य असते. तसेच मूर्खाला त्याच्या मूर्खपणातून खेचून बाहेर काढण्याला उपाय नसतो. त्याच्या आंधळ्या अवस्थेतून क्षणभर त्याला दूर नेऊन त्याची अंधुक दृष्टी आणि इतरांची तीक्ष्ण दृष्टी यांच्यातील फरक जाणण्याला त्याला भाग पाडील असा मार्ग नसतो. मूर्ख जन्मभर मूर्खच रहातो. त्याला छिद्रे नसतात. याकरिताच अनातोल फ्रांसने म्हटले की, 'मूर्ख हा ठकापेक्षा कितीतरी अधिक वाईट असतो; कारण ठक काहीवेळा तरी विश्रांती घेतो, पण मूर्ख कधीही विश्रांती घेत नाही. [मी स्वतःला पुढील प्रश्न पुष्कळवेळा विचारला आहे. आपल्या शेजाऱ्यांच्या मूर्खपणाशी संपर्क येणे, त्यांच्याशी संघर्ष होणे, ही सर्वकाळी कित्येक मानवांच्या बाबतीत सर्वात मोठी यातना ठरली आहे यांत शंका नाही. तथापि या विषयावर एखादा अभ्यास, मूर्खपणावरील एखादा निबंध लिहिण्याचा, मला वाटते, कधीही प्रयत्न झाला नाही हे कसे ? इरॅस्मसच्या ग्रंथात सुद्धा या अंगाचे विवेचन नाही.]

समुदायमानव मूर्ख असण्याचा प्रश्न नाही. उलट तो आज अधिक शहाणा झाला आहे. पूर्वीच्या कोणत्याही काळातील त्याच्या बांधवापेक्षा त्याची सर्जनशक्ती वाढली आहे. पण ती शक्ती त्याच्या काही उपयोगाची नाही. वस्तुतः असे दिसते की आपल्या अंगी ती शक्ती आहे, ही जाणीवच केवळ त्याला स्वतःमध्ये बंदिस्त ठेवते, आणि त्याला तिचा उपयोग करू देत नाही. सामान्य गोष्टी, पूर्वग्रह, अर्ध्याकच्च्या कल्पना किंवा योगायोगाने मनात साठलेले नुसते पोकळ शब्द यांचा संचय एकदा जो तो करतो तो कायमचाच. प्रत्येक ठिकाणी धिटाईने तो ते लादण्याला तयार असतो. त्याच्या या धिटाईचे स्पष्टीकरण केवळ भाबडेपणात सापडते. आजच्या काळाचे वैशिष्ट्य म्हणून मी जे पहिल्या प्रकरणात नमूद केले ते हेच. सामान्यजन स्वतःला सामान्य न समजता अतिश्रेष्ठ समजतो, इतकेच नव्हे, तर सामान्यत्वाचे म्हणून हक्क असतात किंवा सामान्यत्व हाच मुळी हक्क असतो असे तो जाहीर करतो आणि इतरावर तो हक्क लादतो.

आज बौद्धिक दृष्ट्या सामान्यजन सार्वजनिक जीवनावर प्रभुत्व गाजवीत आहे. कदाचित वर्तमान स्थितीचा हा एक घटक असावा आणि तो सर्वात अभिनव असून भूतकाळातील दुसऱ्या कोणत्याही घटकाशी तो जुळत नाही. निदान आजपर्यंतच्या युरोपच्या इतिहासात सामान्य जनाना आपण सर्वच विषयांवर 'विचार' करू शकतो असे कधीही वाटत नव्हते. त्यांच्यापाशी श्रद्धा, परंपरा, अनुभव, सुभाषिते, मानसिक सवयी होत्या; पण गोष्टी काय आहेत आणि कशा असावयास पाहिजेत, उदा. राजकारण किंवा वाङ्मय अशा गोष्टीवरील सैद्धांतिक मते स्वतःपाशी असतात अशी कल्पना ते कधी करत नसत. राजकारणी माणसे ज्या योजना आखित असत आणि त्या कार्यवाहीत आणीत असत त्या त्यांना बऱ्या किंवा वाईट वाटत असत; त्यांना ते पाठिंबा तरी देत किंवा त्या अमान्य तरी करीत. पण त्यांची कृती दुसऱ्यांच्या सर्जनशील कृतीना होकारार्थी वा नकारार्थी प्रतिसाद देण्यापुरतीच मर्यादित असे. राजकारणी लोकांच्या 'विचारा'ना स्वतःच्या वेगळ्या 'विचारा'वर घासून पहाव्यात असे त्यांच्या कधी ध्यानीमनीही येत नसे. हीच गोष्ट कलेची आणि सार्वजनिक जीवनाच्या इतर अंगांची. आपल्याला मर्यादा आहेत, सिद्धांत मांडण्याला [यापासून सुटका नसते. प्रत्येक मत म्हणजे एका सिद्धांताची मांडणी होय.] आपण अपात्र आहोत ही जाणीव त्यांच्यामध्ये उपजत असल्यामुळे ते तसे करू धजत नसत. याचा आवश्यक परिणाम असा होत असे की सामान्यांना बव्हंशी सैद्धांतिक स्वरुपाच्या कोणत्याही सार्वजनिक कार्यासंबंधी निर्णय घ्यावा असे दूरान्वयानेही कधी वाटत नसे. दुसऱ्यापक्षी आज सर्वसामान्य मानवापाशी विश्वात जे जे घडावयास हवे त्यासंबंधीचे अत्यंत रेखीव 'विचार' असतात. म्हणून आपला श्रवणशक्तीचा उपयोग तो गमावून बसला आहे. त्याच्यापाशी आवश्यक ते सर्व असल्यानंतर त्याने दुसऱ्याचे ऐकावे तरी का? आता त्याने दुसऱ्याचे ऐकण्याचे कारण नाही; किंबहुना कारणच असेल तर ते निवाडा करण्याचे, जाहीर घोषणा करण्याचे,

निर्णय देण्याचे होय. सार्वजनिक जीवनाबद्दल तर प्रश्नच नाही. कारण त्याच्या आंधळेपणामुळे व बहिरेपणामुळे आपली मते लादण्याकरिता त्याने हस्तक्षेप करू नये असे सार्वजनिक जीवनात क्षेत्रच राहिले नाही.

पण हा एक प्रकारे फायदाच नाही का ? जनसमुदायाला 'विचार' असावेत म्हणजेच तो सुसंस्कृत असावा, हे प्रचंड प्रगतीचे लक्षण नाही काय ? मुळीच नाही. सर्वसामान्य माणसाचे 'विचार' हे अस्सल विचारच नव्हेत मुळी; किंवा ते बाळगणे ही संस्कृती नव्हे. विचार म्हणजे सत्यावर मात करणे होय. आपल्यापाशी विचार असावेत असे ज्याला वाटते त्याने स्वतः प्रथम सत्य जाणून घेण्याची आणि ते शोधताना आवश्यक नियम स्वीकारण्याची तयारी ठेवली पाहिजे. विचाराचे नियमन करणारा एखादा उच्चाधिकार किंवा चर्चमध्ये आवाहन करता येण्यासारख्या मानकांची एखादी श्रेणी स्वीकारण्याची तयारी हवी. तसे नसेल तर विचारासंबंधी बोलण्यात अर्थ नाही. ही मानके म्हणजे संस्कृतीची आधारभूत तत्त्वे होत. ती कोणत्या स्वरुपात असतात याच्याशी मला येथे कर्तव्य नाही. मला हेच सांगावयाचे आहे की ज्या मानकांचा आमच्या बांधवांनी अवलंब करावा, अशी मानके जेथे नाहीत, तेथे संस्कृती नाही. ज्याना आवाहन करावे अशी कायदेशीरपणाची तत्वे नसतील, तेथे संस्कृती नसते. एखाद्या वादासाठी विशिष्ट अंतिम बौद्धिक भूमिका जेथे घेण्यात येत नाहीत, तेथे संस्कृति नाही असे समजावे. [आमच्या बरोबरच्या चर्चेत जो कोणी सत्याशी जुळवून घेण्याची काळजी घेत नाही, सत्य शोधण्याची इच्छा धरीत नाही तो बौद्धिकदृष्ट्या असंस्कृतच होय. जेव्हा समुदायमानव बोलतो, व्याख्यान झोडतो किंवा लिहितो तेव्हा खरोखरीच अशी स्थिती असते.] जेथे आर्थिक संबंधावर त्यात गुंतलेल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याकरिता नियामक तत्वांचे नियंत्रण नसते, तेथे संस्कृती नसते. जेथे सौंदर्यविषयक वादात कलाकृतीचे योग्य मूल्यमापन करण्याची आवश्यकता मान्य केली जात नाही, तेथे संस्कृती नसते.

जेव्हा या सर्व गोष्टींचा अभाव असतो, तेव्हा तेथे संस्कृतीचाही अभाव असतो. अगदी नेमक्या अर्थाने सांगावयाचे तर तेथे रानटीपणा असतो. आम्ही स्वतःची फसवणूक करुन घेऊ नये. आज युरोपात जनसमुदायांच्या वाढत्या बंडाच्या रुपाने हेच दिसून येण्याला सुरवात झाली आहे. रानटी देशात पोचलेल्या प्रवाशाला त्या प्रदेशात ज्यांचा आधार घेता येईल अशी नियामक तत्वे नसतात हे समजून येते. यथार्थपणे सांगावयाचे तर रानटीपणाची अशी मानके नसतात. रानटीपणा म्हणजे आधाराकरिता घेता येण्यासारख्या मानकांचा अभाव होय.

संस्कृतीच्या भिन्नभिन्न अवस्था त्यांच्या मानकांच्या कमीअधिक अचूकपणाच्या योगाने अजमावता येतात. जेथे हा अचूकपणा अलल्प असतो, तेथे जीवनावर या मानकांचे नियंत्रण केवळ ढोबळपणेच असते. जेथे खूप अचूकपणा असतो, तेथे ही मानके सर्व कृतीना तपशीलवार लागू पडतात. [स्पेनच्या बौद्धिक संस्कृतीत उणीव दिसते ती कमी वा अधिक ज्ञानाची नव्हे, तर लेखक आणि वक्ते यांना सत्याशी मेळ घालण्याच्या कामी सावधपणा आणि निष्काळजीपणाची जी खोड जडली आहे तिची आहे; योग्य किंवा अयोग्य निर्णय घेण्याची नव्हे-सत्य आमच्या आवाक्यात नसते-तर बरोबर निर्णय घेण्याकरिता लागणाऱ्या प्राथमिक गरजाना फाटा देण्यात जी बेपर्वाई दिसून येते तिची आहे. आम्ही ग्रामीण पाद्रीसारखे आहोत. कारण तो पाद्री मॅनिकिनवाद्याची श्रद्धा काय आहे याची चौकशी करण्याची तसदी न घेताच त्याचे खंडण करीत असतो.]

गेली काही वर्षे युरोपात 'चमत्कारिक घटना' घडू लागल्या आहेत हे कोणालाही दिसून येईल. या 'चमत्कारिक घटनां'चे प्रत्यक्ष उदाहरण द्यावयाचे झाल्यास संघसत्तावाद (syndicalism) आणि फासीवाद (fascism) या विशिष्ट राजकीय आंदोलनांचा मी निर्देश करीन. हे नवीन आहेत, म्हणूनच केवळ चमत्कारिक

आहेत असे समजू नये. युरोपीय लोकात नाविन्याचा उत्साह इतका उपजत आहे की, त्याची परिणती सर्व ज्ञात इतिहासात अत्यंत अस्थिर असा इतिहास निर्माण करण्यात झाली आहे. या नव्या घटनांतील चमत्कारिकपणाचा संबंध त्यातील नाविन्याशी जोडता येणार नाही; तो या नव्या घटनानी धारण केलेल्या असाधारण स्वरुपाशी जोडता येईल. संघसत्तावाद आणि फासीवाद या जातकुळींच्या योगाने युरोपमध्ये अगदी प्रथमच जो मानवी नमुना उदयाला आला, त्याला आपण जे करतो त्याची कारणे देण्याची किंवा ते योग्य आहे की नाही हे सांगण्याची गरज वाटत नाही. आपली मते दुसऱ्यावर लादण्याचा त्याचा निश्चय दिसून येतो. नवी घटना ती हीच : समजूतदार नसण्याचा हक्क, 'अविवेकाचे समर्थन' (reason of unreason). [हा उल्लेख डॉन क्विझोटमधील प्रसिद्ध वचनाला अनुलक्षून आहे.] येथे जनसमुदायांच्या नव्या मनोवृत्तीचा सर्वात ठळक आविष्कार मला दिसतो. कारण स्वतःची क्षमता नसताना समाजावर राज्य करण्याचा निर्णय त्यानी घेतला आहे. त्यांच्या राजकीय वर्तनात या नव्या मनोवृत्तीची घडण अत्यंत अपक्व आणि अगदी विश्वासनीय प्रकाराने उघडकीस येते. पण तिचे मूळ बौद्धिक कवाडेबंदीत आहे. सर्वसामान्य मानवाला आपल्या डोक्यात 'विचार' आहेत असे वाटते, पण विचारप्रक्रीयणाच्या (ideation) शक्तीचा त्याच्या ठायी अभाव असतो. विचार ज्या तरल वातावरणात वावरतात, त्याची तो कल्पनाही करू शकत नाही. स्वतःची मते असावीत असे त्याला वाटते, पण सर्व मतांच्या बुडाशी काही अटी व समजुती असतात हे मानण्याला तो नाखूष असतो. म्हणून वस्तुतः त्याचे विचार म्हणजे शब्दरुपी क्षुधा याखेरीज दुसरे काहीही नसते; संगीताची लकेर फिरावी तशा काहीतरी त्या असतात.

स्वतःपाशी एखादा विचार असणे याचा अर्थ तो असण्याची कारणे आपल्याला माहीत आहेत असा विश्वास असणे आणि परिणामतः बुद्धी नावाची एक चीज असते, सुगम सत्याचे एक जग असते, यावर श्रद्धा ठेवणे होय. विचार असणे, मते बनविणे म्हणजे अशा एखाद्या प्रामाण्याला आवाहन करणे, त्याच्यापुढे नमणे, त्यांची संहिता आणि त्यांचे निर्णय स्वीकारणे होय. आणि म्हणून परस्पर देवाणघेवाणीचे परमोच्च रूप म्हणजे आमच्या विचारांच्या मुळाशी असणाऱ्या कारणांची चर्चा करणारा संवाद होय, त्यावर श्रद्धा बाळगणे होय. पण समुदायमानव जर चर्चा करण्याचे मान्य करील, तर आपण स्वतःला हरवून बसलो असे त्याला वाटेल आणि स्वतःबाहेर असणाऱ्या सर्वोच्च प्रामाण्याला मान्यता देण्याचे बंधन तो सहजासहजी झिडकारुन टाकील. म्हणून युरोपातील 'नवी टूम' म्हणजे 'विचारविनिमयाला फाटा देणे' ही असल्याने संभाषणापासून संसदेपर्यंत (विज्ञानाचा समावेश करुन) वस्तुनिष्ठ मानके मान्य असल्याचे ध्वनित करणाऱ्या आणि परस्पर दळणावळणाच्या सर्व प्रकाराविषयी तिरस्कार दाखविला जातो. यांचा अर्थ मानकानुसार चालणाऱ्या संस्कृतीवर आधारलेले सामाईक जीवन टाकून देणे आणि रानटीपणाच्या सामान्य जीवनाकडे परत मागे जाणे होय. स्वतःचे इच्छित प्रत्यक्षपणे दुसऱ्यावर लादता यावे यासाठी नित्याच्या प्रक्रिया दडपल्या जातात. मागे आपण पाहिल्याप्रमाणे आत्म्याची कवाडेबंदी हीच सगळ्या सार्वजनिक जीवनात हस्तक्षेप करण्यासाठी जनसमुदायाला प्रेरित करीत असते आणि तीच हस्तक्षेपाच्या एकमेव प्रक्रियेकडे अटळपणे त्याला खेचून नेत असते. ती म्हणजे : प्रत्यक्ष कृति.

आमच्या युगाच्या उत्पत्तीविषयीच्या इतिहासाची फेररचना करण्याचे काम ज्यावेळी हाती घेण्यात येईल, त्यावेळी दिसून येईल की, या युगाच्या खास निनादाचे पहिले सूर सन १९०० च्या सुमारास फ्रेंच संघसत्तावाद्यांच्या आणि वास्तववाद्यांच्या गोटात छेडले गेले. 'प्रत्यक्ष कृति' या नामाभिधानाचे आणि पद्धतीचे नवकल्पकही तेच होते. मानवाने नेहमीच हिंसेचा अवलंब केला आहे. काही वेळा हा अवलंब म्हणजे निव्वळ गुन्हा होता. त्याच्याशी येथे आम्हाला कर्तव्य नाही. इतर वेळी त्याला जे न्याय्य हक्क वाटत होते, त्यांच्या

अनुक्रमाणिका

रक्षणाकरिता दुसरी सगळी साधने वापरून निकामी झाल्यानंतर त्याने हिंसेच्या साधनांचा अवलंब केला. मानवी स्वभाव काही प्रसंगी या प्रकारच्या हिंसेकडे झुकतो हे शोचनीय असेल; पण त्यात बुद्धी आणि न्याय यांचा सर्वात मोठा गौरव सूचित होतो हे नाकबूल करता येणार नाही. कारण या प्रकारची हिंसा म्हणजे बुद्धीच्या क्षोभाखेरीज दुसरे काहीही नसते. खरे म्हणजे बळाचा वापर हा 'शेवटचा युक्तिवाद' होय. काहीशा मूर्खपणाने हा वाक्प्रयोग उपरोधाने घेण्याची चाल पडली आहे. त्यावरून बुद्धीच्या पद्धतीला बळ शरण जाते हे स्पष्टपणे दिसून येते. संस्कृती म्हणजे बळाला युक्तिवादाचे बंधन घालण्याचा प्रयत्न या खेरीज दुसरे काहीही नाही. याची धक्का देणारी जाणीव आम्हाला आताच स्पष्टपणे होऊ लागली आहे. कारण प्रत्यक्ष कृतीत हा क्रम उलटा करून हिंसा हाच 'प्रथम युक्तिवाद' किंवा काटेकोरेपणे सांगावयाचे तर 'एकमेव युक्तिवाद' असे जाहीर करण्यात येते. हा दंडक इतर सगळ्या दंडकांचे उच्चाटण करू पहातो आणि आमचे उद्दिष्ठ आणि त्याची पूर्ति यामधील प्रक्रिया थोपवून धरतो. रानटीपणाची 'महान सनद' ती हीच होय.

प्रत्येक युगात ज्या ज्यावेळी जनसमुदायाने कोणत्या ना कोणत्या हेतूने सार्वजनिक जीवनात भाग घेतला आहे; त्या त्या वेळी तो 'प्रत्यक्ष कृती'च्या रुपाने घेतला आहे, याकडे लक्ष देणे उचित होय. तेव्हा जनसमुदायांची नैसर्गिक 'कार्यपद्धति' हीच होती. सार्वजनिक जीवनातील जनसमुदायांच्या नैमित्तिक आणि प्रसंगोपात होणारा आक्रमक हस्तक्षेप ज्यावेळी नित्याचा होतो, त्यावेळी 'प्रत्यक्ष कृती'च्या पद्धतीला मान्यता प्राप्त होते आणि ती अधिकृतपणे प्रकट होते. ही ठराविक गोष्ट या निबंधातील सिद्धांताला बळकटी आणते.

आमचे सगळे सामूहिक जीवन या पद्धतीखाली येत असून तीत अप्रत्यक्ष प्रामाण्यांकडे जाण्याला बंदी आहे. सामाजिक संबंधात 'चांगल्या रीतिरिवाजांचे' वर्चस्व आता राहिले नाही. 'प्रत्यक्ष कृती' म्हणून निर्माण होत असलेले वाङ्मय अप्रतिष्ठा करणारे असते. तसेच लैंगिक संबंधावरील निर्बंध ढिले होत आहेत.

निर्बंध, मानके, सौजन्य, अप्रत्यक्ष पद्धति, न्याय, विवेक! ही सगळी का बरे शोधून काढण्यात आली? ह्या सर्व गुंतागुंती का निर्माण केल्या? या सगळ्यांचे सार 'नागरिकता' (Civilization) या शब्दात येते. तिच्या मुळाशी असणाऱ्या नागरिक (civic) या कल्पनेवरून तिचा खरा उगम स्पष्ट होतो. वर सांगितलेल्या सर्व गोष्टींच्या योगाने नगर, समाज, सामूहिक जीवन ही शक्य कोटीत आणण्याचा प्रयत्न चालू असतो. म्हणून नागरिकत्वाचे हे सर्व घटक तपासले, तर त्या सर्वांना एकच समान पाया असतो असे आढळून येईल. या सर्व घटकात प्रत्येक व्यक्ती दुसऱ्यासंबंधी मूलतः प्रगतीपर विचार करण्याची इच्छा करीत असते हे पूर्वगृहीत आहे. सर्वाआधी नागरिकता म्हणजे सामाईकपणे जगण्याची इच्छा होय. माणूस जितक्या प्रमाणात दुसऱ्यांचा विचार करीत नाही, तितक्या प्रमाणात तो मागासलेला, रानटी असतो. रानटीपणा म्हणजे समाजापासून फटकून राहण्याची वृत्ती. तदनुसार सर्व रानटीपणाची युगे ही मानवी विखुरणाची, एकमेकापासून अलग आणि परस्परांचे वैरी असे लहान लहान गट अंकुरित होण्याची युगे होत.

सामाईक जीवनासाठी उत्तुंग प्रयत्न करणारा राजकीय सिद्धांत म्हणजे उदार लोकशाही होय. तीमध्ये आपल्या शेजाऱ्याचा विचार करण्याचा निर्धार पराकोटीला गेलेला असतो. 'अप्रत्यक्ष कृती'चे ते आदिरूप होय. उदारमतवाद हे असे राजकीय हक्कांचे तत्त्व आहे की, त्यानुसार सार्वजनिक सत्ता सर्वशक्तीमान असून देखील स्वतःला मर्यादा घालून घेते आणि तिच्याशी विचारभावनादि गोष्टीत सहमत नसणाऱ्या बलवान बहुसंख्यांकांना

स्वतः झीज सोसून झाले तरी भरपूर वाव देते. उदारमतवाद हे उदारतेचे सर्वोच्च रूप आहे हे ध्यानात ठेवणे अवश्य आहे. बहुसंख्यांना प्रदाने केलेला तो हक्क आहे आणि म्हणून या पृथ्वीतलावर निनादणारा तो उदात्ततम उद्घोष आहे. तो शत्रूशी आणि विशेषतः दुर्बल शत्रूशी जीवनात सहभागी होण्याचा निर्धार जाहीर करतो. मानव जातीने इतक्या उदात्त, इतक्या विरोधाभासी, इतक्या परिष्कृत कसरतीइतक्या अनैसर्गिक भासणाऱ्या प्रवृत्तीपर्यंत मजल गाठावी यावर विश्वास बसणेही कठीण आहे. म्हणून मानव जातीने इतक्या लवकर त्यातून सुटून बाहेर पडण्याची आतुरता दाखववावी यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. या पृथ्वीवर पक्के मूळ धरण्याला उदारमतवाद ही अति कठीण आणि अति जटिल शिस्त आहे.

शत्रूबरोबर जीवनात सहभागी होणे; विरोधकासह राज्य करणे, कोमलवृत्तीचे हे रूप अनाकलनीय वाटत नाही काय? जेथे विरोधी पक्ष अस्तित्वात आहे असे देश इतके थोडे आहेत की यापेक्षा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीने आजच्या काळाची वैशिष्ट्ये अधिक स्पष्टपणे दिसून येणार नाहीत. बहुतेक सर्व देशात एकसंघ जनसमुदाय आपल्या भाराखाली सार्वजनिक सत्ता दडपून टाकीत आहे, प्रत्येक विरोधी गटाला चिरडून टाकीत आहे, त्यांना नमवीत आहे. जनसमुदाय—त्याचे एकसाची झुंडीचे स्वरुप पाहून त्यावर कोण भरवसा ठेवील?—त्यांचे जे नसतात त्याना जीवनात सहभागी करून घेऊ इच्छित नाही. आपला स्वतःशिवाय इतर सर्वांचा तो भयंकर द्वेष करतो.

✶ ✶

अनुक्रमाणिका

## प्रकरण ९ वे

## झुंडीचा रानटीपणा आणि तांत्रिकज्ञान

आम्ही येथे मूलतः संदिग्ध अशा एका स्थितीच्या—प्रत्यक्ष स्थितीच्या—विश्लेषणात गुंतलो आहोत, हे ध्यानात घेतले पाहिजे म्हणजे माझा हेतु सफल होईल. प्रारंभीच मी हे सूचित केले होते की आजची सर्व वैशिष्ट्ये आणि विशेषतः झुंडीचे बंड यांचे खरे स्वरूप दुहेरी आहे. त्यापैकी कोणत्याही एका वैशिष्ट्यातून अनुकूल आणि प्रतिकूल अशी दुहेरी स्पष्टीकरणे निघू शकतील. इतकेच नव्हे, तर तशा स्पष्टीकरणाची त्याला गरजही असते. ही द्विधार्थता आमच्या मनातील नसून खुद्द वास्तवातीलच आहे. सध्याची स्थिती एका दृष्टीकोणातून चांगली आणि दुसऱ्या दृष्टीकोणातून वाईट दिसते असे नव्हे, तर खुद्द तिच्यामध्येच विजय आणि विनाश अशा जुळ्या अंतःशक्ती सामावलेल्या आहेत.

इतिहासाचे पूर्ण तत्वज्ञान सांगणे हे या प्रबंधाचे प्रयोजन नाही. परंतु माझ्या स्वतःच्या तत्वज्ञानात्मक निष्ठांच्या पायावर मी हा प्रबंध आधारला आहे हे उघड आहे. इतिहासाच्या निर्भेळ नियतिवादावर माझा विश्वास नाही. उलट सगळे जीवन आणि इतिहासाचा जीवनपट साध्यासुध्या क्षणांचा बनलेला असतो अशी माझी समजूत आहे. प्रत्येक क्षण आधीच्या क्षणाच्या संदर्भात सापेक्षत्वाने अनियत असतो. म्हणून त्या क्षणात वास्तवता डळमळते तिच्यात चढउतार होतात आणि निरनिराळ्या संभाव्यतांमधून कोणती निवडावी याविषयी ती अनिर्णित असते. हीच तात्विक दोलायमानता प्रत्येक सजीव वस्तूला थरथरणाऱ्या कंपनाचे स्वरुप अचूकपणे देत असते. जनसमुदायांचे बंड हे खरोखरीच एखाद्या नव्या अपूर्व अशा मानवी समाज रचनेकडे नेणारी संक्रमणावस्था असेल, पण ते बंड मानवी नियतीवर कोसळलेली घोर आपत्तीही ठरण्याचा संभव आहे. प्रगतीची वास्तवता नाकारण्याचे कारण नाही. पण ही प्रगती सुरक्षितच असते हे खरे मानून चालण्याची कल्पना टाकली पाहिजे. 'अपक्रांतीचा', पुच्छ-गमनाचा धोका असल्याखेरीज प्रगतीची, उत्क्रांतीची हमी देता येत नाही, असे धरून चालणे हे वस्तुस्थितीला अधिक अनुसरून आहे. इतिहासात प्रत्येक गोष्ट संभवनीय असते. यशस्वी, अमर्याद प्रगती आणि त्याबरोबरच अधुनमधून पुच्छगती ही सारखीच संभवनीय असतात. कारण जीवन, वैयक्तिक असो वा सामुदायिक असो, खाजगी असो वा ऐतिहासिक असो, त्याच्या आशयात साहस आणि संकट खच्चून भरलेली असतात. काटेकोर अर्थाने बोलावयाचे तरी ते एक नाट्य आहे. [क्वचितच कोणी एखादा हे शब्द गंभीरपणे घेईल आणि यदाकदाचित ते आश्चर्यकारक वाटले, तरी सद्‌हेतू बाळगणारा ही केवळ रुपके आहेत असेच समजून चालेल हे सांगण्याची गरज नाही. जीवन काय आहे किंवा निदान ते काय नाही ते आधीच आपल्याला निश्चितपणे माहीत असते, यावर विश्वास ठेवणाऱ्या भाबड्या मनाचा चुकून एखादा वाचक या वाक्याचा मूळ अर्थ घेऊन भारून जाईल आणि नेमके त्याला एकट्याला—खरा वा खोटा—अर्थ चांगला कळेल. इतरांमध्ये एकवाक्यता ओसंडून वाहात राहील. मात्र यात फरक एवढाच : काहीना वाटेल की जीवन हे, गंभीरपणे सांगावयाचे झाल्यास, आत्म्याच्या अस्तित्वाची प्रक्रिया आहे. इतराना वाटेल की, ते रासायनिक क्रियाची मालिका आहे. जीवनाचा आद्य मूलगामी अर्थ जीवशास्त्रीय अर्थाने नव्हे तर माणसाचा आयुष्यक्रम या अर्थाने वापरला म्हणजे समजते. या शब्दात माझ्या सगळ्या विचारांची दिशा साररूपाने जर मी सांगितली, तर पूर्णतः कवाडेबंद मनाच्या वाचकाना माझी भूमिका अधिक पटेल अशी कल्पना मी करीत नाही. काही विशिष्ट लोकांच्या आयुष्यक्रमात सगळी जैविकता ही निश्चितपणे केवळ एक अध्याय असते. याच सबळ कारणामुळे जीवनशास्त्रज्ञ चरित्रकथनाप्रीत्यर्थ आपल्या जीवनाचा हाच अर्थ लावीत असतात. बाकीचे सर्व अमूर्त/कल्पनारंजन आणि मिथ्या होय.]

सामान्यतः हे खरे आहे आणि सध्यासारख्या संकटावस्थेच्याक्षणी हे नाट्य अधिक प्रभावी ठरते. म्हणून जनसमुदायांच्या प्रत्यक्ष राज्यात दिसून येणाऱ्या आणि 'प्रत्यक्षकृती' या सदरात मोडणाऱ्या नव्या वर्तणुकीच्या लक्षणांच्या पोटात कितीतरी भावी गोष्ट दडून राहिल्या असतील. प्रत्येक जुनी संस्कृती आपल्या वाटचालीत

स्वतःबरोबर झिजलेले अवशेष आणि निकामी झालेल्या गोष्टींचे बरेचसे ओझे फरपटत नेत असते. जीवनातील अडथळे ते हेच. ते नुसते विषारी गाळ, अद्यापही टिकून राहिलेल्या संस्था, मूल्यमापने, भाकिते आहेत. पण ती सर्व निरर्थक झाली असून त्यातून सुटका करून घेणे अनावश्यक गुंतागुंतीचे झाले आहे. त्यांची मानके सत्वहीन झाली आहेत हेही सिद्ध झाले आहे. हे सर्व 'अप्रत्यक्ष कृती'चे म्हणजे संस्कृतीचे घटक असून ते पुढील काळात एकजात सुलभ होणे अवश्य आहे. आजचा अर्धनग्न पोषाख आणि आखूड कोट हे अद्‌भुतरम्यतेच्या युगातील उंच टोप्या, पायघोळ झगे यांच्यावर जणू सूड उगवीत आहेत. येथे सुलभीकरणाचा अर्थ आरोग्याच्या आणि अधिक चांगल्या अभिरुचीच्या दृष्टीने घ्यावयाचा आहे. परिणामी लहान-सहान साधनांनी मोठ्या गोष्टी प्राप्त होतात असे नेहमी घडते, त्याप्रमाणे यातून अधिक स्पष्ट सोडवणूक प्राप्त होण्याचा संभव आहे. अद्‌भुतरम्य प्रणयवृक्षाच्या फांद्यावर नकली मॅग्नोलिया फोफावला आहे, नागमोडी वेलींनी आणि लतानी आणि फांद्यांच्या जटिल गुंतावळीनी इतकी गर्दी केली आहे की सूर्यकिरणानाही तेथे प्रवेश मिळत नाही म्हणून त्या प्रणयवृक्षाची काटछाट करण्याची आत्यंतिक गरज निर्माण झाली आहे. आजही अगदी अशीच गरज निर्माण झाली आहे.

सामान्यपणे सार्वजनिक जीवनाला आणि विशेषतः राजकारणाला पुनः वस्तुस्थितीची जाणीव करुन देण्याची तातडीची निकड आहे. युरोपीय मानवतेला स्वतःची वस्त्रे फेकून दिल्याशिवाय, स्वतःच्या मूळ सत्वापर्यंत पोचल्याशिवाय, तिच्या खऱ्या 'स्व'कडे परत आल्याशिवाय, आशावादी अपेक्षा करतात त्याप्रमाणे, स्थिती पालटणार नाही. स्वतःची वस्त्रे फेकून नग्न होण्याची, खरेखुरे 'स्व' होण्याची शिस्त आवश्यक आहे असे मला वाटते. तसेच ही शिस्त योग्य भविष्याची वाट मोकळी करण्याकरिता अनिवार्य आहे. अशी माझी श्रद्धा आहे. म्हणून भूतकालीन सर्व गोष्टींच्या संबंधात संपूर्ण विचारस्वातंत्र्य असावे अशी मागणी मी करतो. भूतावर भविष्याचे वर्चस्व असले पाहिजे. भविष्यापासूनच भूतकाळात घडलेल्या गोष्टीविषयी कोणती वृत्ती धारण करावी याचे आदेश आम्ही घेतले पाहिजेत. [भूतकालासंबंधीच्या वृत्तीविषयीचे हे स्वातंत्र्य म्हणजे चिडून केलेले बंड नव्हे. तर उलटपक्षी प्रत्येक समीक्षा करणाऱ्या कालखंडाची ती स्पष्ट जबाबदारी आहे. १९व्या शतकाच्या उदारमतवादावर जोरदार हल्ला करणाऱ्याना जनसमुदायांच्या विरुद्ध मी त्या वादाचे समर्थन करीत असलो, तरी त्याचा अर्थ असा नव्हे की, त्याच उदारमतवादासंबंधीच्या माझ्या पूर्ण मतस्वातंत्र्याचा मी त्याग केला आहे. या उलट या निबंधात सर्वात वाईट स्वरुपात दिसून येणारी आदिम अवस्था ही एका विशिष्ट अर्थाने प्रत्येक महान ऐतिहासिक प्रगतीला एक आवश्यक गोष्ट आहे. काही वर्षांपूर्वी 'Biologia Y Pedagogia' (El Espectador, III, La paradoji del salvajismo) या निबंधात या विषयावर मी जे लिहिले आहे ते ताडून पहा.]

परंतु ज्यांनी १९ व्या शतकाचे मार्गदर्शन केले, त्यांनी एक मोठी चूक टाळणे आवश्यक आहे. ती म्हणजे, स्वतःच्या जबाबदाऱ्यांच्या जाणिवेच्या अभावामुळे ते दक्ष आणि जागरूक राहिले नाहीत. घटनांच्या ओघाबरोबर उतारावरून सहजासहजी घरंगळत जाणे आणि धोक्याच्या मर्यादेपर्यंत पोचण्याइतके मनाला मठ्ठ होऊ देणे ही अत्यंत आनंदाच्या क्षणाचासुद्धा विचका करणारी कुलक्षणे आहेत. स्वतःवरच्या जबाबदारीच्या बंधनातून पार पडण्यात अयशस्वी होणे असा त्यांचा अर्थ होतो. ज्यांना जबाबदारीची जाणीव आहे त्यांच्यामध्येच जबाबदारीची जादा जाणीव चेतविणे आज अवश्य झाले आहे आणि सध्याच्या लक्षणांची जी स्पष्ट धोक्याची बाजू आहे, तिच्यावर भर देणे हे अत्यंत निकडीचे झाले आहे.

आमच्या सार्वजनिक जीवनाचा अशा प्रकारे ताळेबंद काढल्यानंतर आणि अनुकूल आणि प्रतिकूल घटकांचा विचार केल्यानंतर वर्तमानापेक्षा भविष्यासंबंधी ते घटक काय भाकीत करतात आणि कोणती आश्वासने देतात, हे अजमावले म्हणजे प्रतिकूल घटकांचे पारडे कितीतरी अधिक जड दिसते यात शंका नाही.

अनुक्रमाणिका

युरोपीय जीवनात भौतिक गोष्टी अधिकाधिक शक्य होत आहेत. या शक्यता नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. कारण त्याना धक्का देणारी एक समस्या युरोपच्या नियतीवर कोसळत आहे आणि तिला तोंड देणे भाग आहे. ही समस्या पुनः एकदा मी सूत्ररूपाने मांडतो : ज्याला संस्कृतीच्या तत्वाविषयी आस्था नाही, अशा मानवी नमुन्याने स्वतःच्या हाती समाजाचे संचालन घेतले आहे. ही तत्वे या किंवा त्या संस्कृतीची नव्हेत–आज आम्ही पारखू शकतो त्यावरून–तर कोणत्याही संस्कृतीची. अर्थात गुंगीची औषधे, मोटारगाड्या आणि इतर काही थोड्या वस्तूविषयी त्याला आस्था वाटते. परंतु त्यामुळे त्याच्यामध्ये संस्कृतीविषयीच्या आस्थेचा मूलभूत अभाव आहे, या गोष्टीला पुष्टीच मिळते. कारण या वस्तु म्हणजे संस्कृतीची केवळ फळे आहेत. ज्या उत्साहाने तो त्यांचे स्वागत करतो त्यामुळे त्यांना निर्माण करणाऱ्या तत्वाविषयी त्याला वाटणारी अनास्था अधिकच उठून दिसते. येथे ही गोष्ट पुढे मांडली तरी पुरेसे आहे : (व्हिकोच्या) 'नव विज्ञाना'च्या काळानंतर म्हणजेच प्रबोधनाच्या काळापासून पुढे, भौतिक विज्ञाने अस्तित्वात आली आणि काळाबरोबर त्यांच्याविषयीचा उत्साह वाढत गेला. हेच अधिक प्रत्यक्षपणे सांगावयाचे झाल्यास शुद्ध शास्त्रीय संशोधनाला वाहून घेणाऱ्या लोकांची संख्या प्रत्येक पिढीगणिक अधिकाधिक वाढत गेली. यात पिछेहाट झाल्याचे पहिले उदाहरण घडून आले–मी पुनः सांगतो सापेक्ष उदाहरण–ते म्हणजे सध्याच्या पिढीतील वयाने वीस ते तीसच्या दरम्यान असणाऱ्यांचे होय. शुद्ध विज्ञानाच्या प्रयोगशाळांकडे विद्यार्थ्यांना आकर्षून घेणे कठीण होत आहे. हे अशावेळी घडत आहे की, जेव्हा उद्योगधंदे विकासाची सर्वोच्च व्यवस्था गाठीत आहेत आणि विज्ञाननिर्मित औषधे आणि उपकरणे वापरण्याची लोकांची भूक अधिकाधिक वाढत आहे. राजकारण, कला, नीति धर्म आणि जीवनाची दैनंदिन कार्ये यांच्यातील अशाच प्रकारची विसंगति येथे विस्तारभयावस्त दाखवता येत नाही.

अशा या विरोधाभासी स्थितीचा आमच्या दृष्टीने अर्थ कोणता ? हा निबंध म्हणजेच या प्रश्नाचे उत्तर देण्याचा एक प्रयत्न आहे. त्याचा अर्थ हा की, आज प्रबल झालेल्या मानवी नमुना आदिम मानवाचा आहे. सुसंस्कृत जगामध्ये उदयाला आलेला तो निसर्ग-मानव आहे. सुसंस्कृत आहे ते जग, त्यातील रहिवासी नव्हे. हा रहिवासी भोवतालच्या जगाची संस्कृति समजून घेत नाही. ती जणू एक नैसर्गिक शक्ती आहे असे समजून तो तिचा वापर करतो. नव्या मानवाला आपली मोटरगाडी उपभोगाकरिता हवी असते. पण ईडनच्या बागेतील वृक्षाचे ते स्वयंभू फळू आहे, असे तो समजून चालतो. त्याच्या आत्म्यात खोलवर संस्कृतीच्या कृत्रिम, बव्हंशी अविश्वसनीय, स्वरुपाची जाण नसते. संस्कृतीच्या साधनाविषयी त्याला वाटणारा उत्साह ती साधने शक्य कोटीत आणणाऱ्या तत्वापर्यंत पोहचत नाही. मागे राथेनोच्या शब्दांची अदलाबदल करून 'रानट्यांचा सर्व आघाड्यावर हल्ला' आम्ही पहात आहोत, असे मी म्हणालो, त्यावरून असे वाटण्याचा संभव आहे की (सामान्यतः तसे वाटतेही) तो केवळ एक वाक्प्रयोग आहे. त्या शब्दात सत्य असो वा नसो; पण एवढे खरे की 'सगळ्या गुंतागुंतीच्या पृथक्करणाची साररुप लक्षणे' त्यात मुळीच सापडणार नाहीत. प्रत्यक्ष समुदायमानव खरोखरीच आदिम आहे आणि तो संस्कृतीच्या युगानुयुगाच्या रंगमंचावर बाजूच्या कक्षातून निसटून पुढे आला आहे.

तांत्रिक ज्ञानाच्या कल्पनातील प्रगतीची भाषा सातत्याने चालू आहे. पण या भाषेत, त्यातील सर्वोकृष्ट भाषेतसुद्धा, तिच्या भाविष्याची पुरेशी नाट्यपूर्ण जाणीव झाल्याची चिन्हे मला दिसत नाहीत. स्पेंगलर इतका मार्मिक, इतका गाढ–तितकाच छांदिष्टही–पण मला या बाबतीत तो अतिशयच आशावादी वाटतो. कारण 'संस्कृति' (culture) ही 'भौतिक सुधारणे'च्या (Civilization) युगामागून येते, अशी त्यांची समजून आहे.

‘भौतिक सुधारणा’ या शब्दाचा अर्थ विशेषेकरून तंत्रिक कार्यक्षमता असा तो समजतो. ‘संस्कृति’ आणि सामान्यतः इतिहास याविषयी स्पेंगलरची कल्पना या निबंधाच्या मुळाशी असलेल्या कल्पनेहून इतकी दूरची आहे की तीत सुधारणा सुचविण्याच्या हेतूनेदेखील त्यांच्या निष्कर्षावर येथे टीका करणे सोपे नाही. आमच्यातील मतभेद स्पष्ट करण्याकरिता एकदम मोठी उडी घेऊन आणि अचूक तपशीलाकडे दुर्लक्ष करुनच दोघांच्याही दृष्टीकोणाचा साधारण विभाजक काढणे शक्य होईल. स्पेंगलरला असा विश्वास वाटतो की, संस्कृतीच्या मुळाशी असणाऱ्या तत्वाविषयीची आस्था नष्ट झाली, तरी ‘तंत्रवाद’ जीवंत राहू शकतो. अशा कोणत्याही गोष्टीवर मी विश्वास ठेवू शकत नाही. तंत्रवाद आणि विज्ञान यांचे सत्व एकच आहे. विज्ञान ज्यावेळी केवळ स्वतःचेच हित पहाणे सोडून देते, त्यावेळी त्याचे अस्तित्व संपुष्टात येऊ लागते. संस्कृतीच्या सर्वसाधारण तत्वाविषयी लोकांना उत्साह वाटल्याशिवाय विज्ञानाला स्वतःचेही हित पहाता येणार नाही. हा उत्साह जर थंडावेल—हे घडत असल्याचे दिसत आहे—तर तंत्रवाद हा काही काळापुरताच, म्हणजे त्याला जन्म देणारी सांस्कृतिक प्रेरणा अस्तित्वात राहील त्या कालापुरताच, टिकून राहील. आम्ही जगतो, ते आमच्या तांत्रिक गरजासह जगतो; त्यांच्या योगाने नव्हे. या तांत्रिक गरजा स्वतःचे पोषण करीत नाहीत किंवा स्वतःचे जीवन जगत नाहीत; त्या स्वयंकारकही नाहीत; तर अनावश्यक, अव्यवहारी क्रियांच्या उपयुक्त आणि व्यवहारोपयोगी गाळासारख्या त्या आहेत. आता मी अशा भूमिकेकडे येत आहे की, तांत्रिक संपादणीविषयी प्रत्यक्ष आस्था बाळगल्याने अशा संपादणीच्या प्रगतीची किंवा कालावधीची काही म्हणजे काहीही हमी मिळत नाही. तंत्रवाद हा आधुनिक ‘संस्कृती’चे एक वैशिष्ट्यपूर्ण लक्षण मानले जाते हे अगदी योग्य आहे. या संस्कृतीत भौतिकदृष्ट्या लाभदायक ठरणाऱ्या अशा विज्ञानाची शाखा समाविष्ट आहे. म्हणून १९ व्या शतकाने पक्केपणी रोवलेल्या जीवनाच्या अगदी नव्या स्वरुपाचे वर्णन करताना माझ्यापाशी दोनच लक्षणे आहेत. उदार लोकशाही आणि तंत्रवाद. मी पुनः सांगतो की तंत्रवादाविषयी बोलताना त्याचे मूळ केंद्र शुद्ध विज्ञान आहे आणि तंत्रवाद सातत्याने टिकून रहावा यासाठी ज्या परिस्थितीत शुद्ध वैज्ञानिक कार्य करणे शक्य होते तीच परिस्थिती चालू रहाणे अवश्य असते, हे सहजासहजी लोक विसरतात यांचे मला आश्चर्य वाटते. खरोखरीच ‘वैज्ञानिकां’चे सातत्य टिकून रहावे यासाठी मानवाचा आत्मा सतत क्रियाशील राहिला पाहिजे, याचा कोणी विचार तरी केला आहे कां? जोपर्यंत डॉलर आहेत तोपर्यंत विज्ञान राहील, असेच खरोखरीच वाटते काय? या कल्पनेने दिलासा मिळतो हाच आदिमतेचा आणखी एक पुरावा होय. जणुकाही वास्तव-रसायन शास्त्रांचे मिश्रण (कॉकटेल) तयार करण्यासाठी एकत्र मिसळून घुसळण्याकरिता अनेक तऱ्हेची द्रव्ये उपलब्ध नव्हती ! या विषयाच्या सर्वात जुजबी तपासणीत देखील चटकन नजरेत भरणारी ठळक गोष्ट म्हणजे दिक्कालाच्या सगळ्या विस्तारात लंडन, बर्लिन, व्हिएन्ना आणि पॅरिस यांनी वेढलेल्या छोट्याशा चौकोनातच वास्तवारसायनशास्त्र बद्धमूल झाले आणि तेही १९ व्या शतकात. यावरून प्रायोगिक विज्ञान हे इतिहासाच्या सर्वांत असंभाव्य फलितापैकी एक आहे हे सिद्ध होते. द्रष्टे, पुरोहित, योद्धे आणि मेंढपाळ हे सर्वकाळी आणि सर्व स्थळी विपुल होऊन गेले आहेत. परंतु प्रयोगशील मानवाची ही प्राणिजात निर्मिण्यासाठी दंतकथेतील एकश्रृंगी प्राण्याला जन्माला घालणाऱ्या परिस्थितीहून अधिक असाधारण संमित्र परिस्थिती लागते हे उघड आहे. इतक्या उघड, साध्या गोष्टीवरून वैज्ञानिक प्रेरणा किती चंचल आणि विरल आहे याविषयी थोडा विचार व्हायला हवा. [यामुळेच माझ्यामते उत्तर अमेरिकेच्या तिच्या तंत्रवादाच्या सहाय्याने केलेल्या व्याख्येवरून काहीही बोध होत नाही. सर्वात सुसंस्कृत व्यक्तीनीसुद्धा अमेरिकेसंबंधी जाहीर केलेले बालिश निर्णय युरोपीय मनाला अतिशय गोंधळात टाकणारे आहेत. आजच्या समस्यांची जटिलता आणि आजच्या मनाची कुवत यांच्यातील व्यस्त प्रमाण मी पुढे दर्शविणार आहे, त्याचे हे एक विशिष्ट उदाहरण आहे.] युरोपचा लोप झालाच, तर उत्तर अमेरिकेचे लोक विज्ञान पुढे चालवतील, यावर विश्वास ठेवणारा धन्य होय. या विषयाचा पूर्णपणे विचार करणे आणि प्रायोगिक विज्ञान आणि परिणामी तांत्रिक संपादणी यांना प्राणभूत असणाऱ्या ऐतिहासिक पूर्वकल्पना कोणत्या आहेत याचा तपशीलवार

अनुक्रमाणिका

स्पष्टपणे उल्लेख करणे हे अतिशय मोलाचे आहे. परंतु हा मुद्दा स्पष्ट करून सुद्धा तो समुदायमानवाला समजेल अशी आशा कोणीही करू नये. समुदायमानवाला सुसंगत विचार करण्याकडे लक्ष देण्याला सवड नसते. पार्थिव शरीराच्या द्वारे शिकणे एवढेच त्याला माहीत असते.

माझी अशी प्रवचने बुद्धीवर आधारलेली असल्यामुळे अवश्यतया सूक्ष्म असतात. त्यांच्या परिणामकारकतेविषयी मी भ्रम बाळगीत नाही. त्याला कारण माझे एक निरीक्षण. ते म्हणजे प्रत्यक्ष परिस्थिती अशी आहे की, सर्वसामान्य मानवाला ही विज्ञाने आणि जीवशास्त्राशी संबंधित असलेली इतर विज्ञाने यांच्याविषयी उत्स्फूर्तपणे काहीही वाटत नाही, आणि त्यासंबंधी प्रचार केल्याशिवाय त्याला त्यांच्याबद्दल उत्साहही वाटणार नाही. हा सर्वथा वेडेपणाच नव्हे काय ? कारण प्रत्यक्ष स्थिती काय आहे याचा थोडा विचार करा. संस्कृतीचे इतर सर्व घटक—राजकारण, कला, सामाजिक मानके, आणि खुद्द नीतिसुद्धा—उघडपणे प्रश्नात्मक झाले आहेत. तरीपण एक घटक असा आहे की जो समुदाय-मानवावर अत्यंत सोईस्करपणे, अतिशय निर्विवादपणे प्रभाव टाकीत असतो आणि त्याची अद्‌भुत कार्यक्षमता वाढत्या प्रमाणात सिद्ध होत आहे. तो म्हणजे प्रायोगिक विज्ञान. दररोज एक नवा शोध लागतो आणि सर्वसामान्य मानवाला तो उपयोगात आणायला मिळतो. प्रत्यही गुंगी आणणारे नवे औषध किंवा नवी लस निर्माण होते आणि त्याचा फायदा या सर्वसामान्य मानवाला मिळतो. वैज्ञानिक प्रेरणा मंदावली नाही आणि प्रयोगशाळा तिपटीने वा दसपटीने वाढल्या म्हणजे संपत्ति, स्वास्थ्य, आरोग्य, समृद्धि ही आपोआप वाढतील हे प्रत्येकाला माहीत झाले आहे. एखाद्या मूलभूत तत्वाच्या बाजूने याहून अधिक जबरदस्त, अधिक खात्री पटविणारा प्रचार होऊ शकतो याची कल्पना करता येणे शक्य आहे का? तर मग विज्ञानाला यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने समृद्ध करण्यासाठी सामान्यजनानी धन किंवा ध्यान याबाबतीत कोणताही त्याग स्वतः होऊन केल्याचे काहीही चिन्ह दिसत नाही, हे कसे? ही गोष्ट दूरच राहो, पण युद्धोत्तर काळात [हे झाले अधिक खोल प्रश्नाविषयी न बोलताही. बहुसंख्य संशोधकांना स्वतःला त्यांचे विज्ञान ज्या गंभीर आणि धोक्याच्या अंतर्गत संकटावस्थेतून जात आहे याविषयी आज यत्किंचितही शंका येत नाही.] वैज्ञानिकांचे एका नव्या सामाजिक बहिष्कृतात रुपांतर झाले आहे. लक्षात ठेवा की, मी येथे वास्तवशास्त्रज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, जीवशास्त्रज्ञ यांचा उल्लेख करीत आहे; तत्ववेत्त्यांचा नव्हे. तत्वज्ञानाला जनसमुदायांकडून संरक्षणाची, आपल्याकडे लक्ष वेधून घेण्याची किंवा सहानुभूतीची गरज नसते. तत्वज्ञान आपल्या संपूर्ण अनुपयोगितेचे [Aristotle, Metaphysics, 893 a 10.] स्वरूप राखून ठेवते आणि त्यामुळे सर्वसामान्य मानवाच्या सर्व ताबेदारीतून ते मुक्त असते. आपण मूलतः प्रश्नात्मक आहो हे ते ओळखते आणि आकाशातील विहंगमाप्रमाणे आपली स्वतंत्र नियति आनंदाने स्वीकारते. स्वतःविषयी विचार करा अशी कोणाकडे ते याचना करीत नाही, स्वतःची शिफारस करीत नाही, की स्वतःचे समर्थन करीत नाही. त्याच्यामुळे कोणाचा खरोखरी फायदा झालाच तर साध्या मानवी सहानुभूतीने ते हर्षभरित होते. ते दुसऱ्यांचा जो फायदा करून देते त्यावर जगत नाही किंवा त्या फायद्याची अपेक्षा वा आशाही बाळगत नाही. ते स्वतःच्या अस्तित्वाचीच शंका घेण्यापासून आरंभ करते आणि स्वतःशीच झगडत स्वतःच जीवनापासून वंचित होत केवळ जगत असते, तर मग दुसऱ्यानी गंभीरपणे दखल घ्यावी असा दावा ते कसा करू शकेल? तेव्हा आपण तत्वाज्ञानाचा विचार सोडून देऊ. कारण ते एका निराळ्या पद्धतीचे साहस आहे. ज्याप्रमाणे एखाद्या ग्रहावर आज अस्तित्वात असलेली प्राणिसंख्या वास्तव—रसायन शास्त्राशिवाय टिकून रहाणे शक्य होणार नाही, त्याप्रमाणे समुदायमानवाला नष्ट होण्याच्या भीतीपोटी प्रायोगिक विज्ञानांची गरज भासते आणि विज्ञानाना समुदायमानवाच्या सहकार्याचीही गरज असते.

अनुक्रमाणिका

माणसांची ने-आण करणाऱ्या मोटारगाड्या आणि त्यांच्या वेदना अद्‌भुतरीतीने नाहीशा करणारी रामबाण इंजेक्शने यांनी जे घडून आले नाही ते युक्तिवादानी कसे बरे घडून येऊ शकेल? विज्ञानापासून त्यांना मिळणारे सततचे उघड फायदे आणि विज्ञानाविषयी ते दाखवीत असलेली आस्था यातील प्रमाण इतके व्यस्त आहे की, भ्रामक आशांनी स्वतःची फसवणूक कोणीही करुन घेऊ नये. अशा रीतीने वागणाऱ्याकडून रानटीपणाशिवाय दुसऱ्या कशाची अपेक्षा करता येणार नाही. विशेषतः विज्ञानाची ही उपेक्षा इतरत्र आढळते, त्यापेक्षा खुद्द तंत्रज्ञांच्या समुदायामध्ये डॉक्टर, इंजिनिअर्स आदि तंत्रज्ञांमध्ये संभवतः अधिक सप्रमाण आढळते हे आम्ही पुढे पहाणार आहोतच. स्वतःचा व्यवसाय चालविणाऱ्या तंत्रज्ञाची मनःस्थिती आणि स्वतःची मोटारगाडी वापरण्यात आणि आस्पिरिनची गोळी विकत घेण्यात समाधान मानणाऱ्या माणसाची मनःस्थिती ही सर्व मूलभूत गोष्टीत सारखीच आहे. त्यांना विज्ञानाच्या, संस्कृतीच्या भवितव्याविषयी यत्‌किंचितही आत्मीयता वाटत नाही. नव्याने उद्‌भवलेल्या या रानटीपणाची इतर काही लक्षणे निश्चित गुणवाचक असल्यामुळे ती अकृतीचे (omission) नव्हे तर कृतीचे परिणाम आहेत. ते अधिक लक्ष वेधून घेतात आणि मूर्तरुपात दृष्टीस पडतात. अशा लक्षणानी अधिक अस्वस्थ होणारे काहीजण असतील. माझ्यापुरते सांगावयाचे झाले तर सर्वसामान्य मानवाला विज्ञानापासून मिळणारे फायदे आणि कृतज्ञतेने—किंबहुना अकृतज्ञतेने—तो जी परतफेड करतो, यामधील व्यस्त प्रमाण हे कितीतरी अधिक भयानक आहे. [इ. स. १९१४ ते १८ च्या युद्धानंतर.][ मी दर्शविल्याप्रमाणे इतर सर्व प्राणभूत तत्वे, राज्यशास्त्र, कायदा, कला, नीति, धर्म ही प्रत्यक्षात एका महान संकटावस्थेतून जात आहेत, निदान तात्पुरती तरी दिवाळखोर बनली आहेत. या गोष्टीमुळे ही भयानकता शतपटीने वाढली आहे. विज्ञान हेच तेवढे दिवाळखोर बनले नाही. किंबहुना ते भरमसाट व्याजाने, अपेक्षेपेक्षा प्रचंड व्याजाने परतफेड करीत आहे. त्याच्याशी स्पर्धा करणारे काहीही नाही. म्हणून सामान्य मानव विज्ञानाची जी उपेक्षा करतो, ती दुसऱ्या कोणत्यातरी सांस्कृतिक उत्साहाच्या भरात अन्यत्र लक्ष वेधल्यामुळे करतो, असे मानले तरीही त्याला क्षमा करता येणे शक्य नाही.] मध्य आफ्रिकेतील निग्रोसुद्धा मोटारगाड्यात बसतात आणि आस्पिरीन घेतात हे लक्षात आणून विज्ञानाला पुरेशी मान्यता मिळत नाही, या मतासंबंधी मी स्वतःचे कसेबसे समाधान करून घेऊ शकेन. पण जो युरोपीय मानव आज वर्चस्व गाजवू लागला आहे—हेच माझे गृहीतकृत्य आहे—तो ज्या संमिश्र संस्कृतीत जन्मला आहे, तिच्या बाबतीत तो आदिम मानव, चोर दरवाजाने रंगभूमीवर येणारा रानटी माणूस, 'सर्व आघाड्यावरचा हल्लेखोर' आहे.

* *

अनुक्रमाणिका

# प्रकरण १० वे

## आदिम अवस्था आणि इतिहास

निसर्ग हा सदाचाच आमचा सांगाती आहे. तो स्वाश्रयी आहे. निसर्गदेवतेच्या जंगलात आम्ही निर्धास्तपणे जंगली राहू शकतो. त्याचप्रमाणे त्याच अवस्थेत आम्ही निरंतर जंगलातच राहण्याचा निर्धार करून अन्य लोक येण्याचा धोकाही टाळू शकतो. परंतु सर्वकाळ आदिम अवस्थेत रहाणारे लोक असावेत, हे तत्वतः शक्य आहे. ब्रेसिंगने अशा लोकांना 'शाश्वत उषःकालाचे जन' असे म्हटले आहे. असे लोक गतिहीन, गोठलेल्या उषःकालात राहात आले आहेत. हा उषःकाल असा आहे की तो मध्यान्हाच्या दिशेने कधीही पुढे सरकत नाही.

केवळ निसर्गाच्या जगातच हे घडते. पण आमचे जग संस्कृतीचे असल्याने त्यात असे घडत नाही. संस्कृती ही आहे तेथेच रहाणारी वस्तु नाही. ती स्वाश्रयी नसते. ती कृत्रिम असून तिला कलाकार किंवा कारागीर लागतात. संस्कृतीपासून मिळणाऱ्या फायद्यांचा उपयोग तेवढा करायचा, पण तिच्या रक्षणाची काळजी घेण्याची तयारी दाखवावयाची नाही, असे कराल, तर तुम्ही आटोपलाच म्हणून समजा. मग एका क्षणात आपण संस्कृतीहीन झाल्याचे तुम्हाला स्वतःलाच आढळून येईल. थोडीशी चूक होण्याचा अवकाश; सभोवर पाहाल तर सगळेच ओंफस झालेले दिसेल; आदिम जंगल मूळच्या अवस्थेत दिसेल. जणूकाही निखळ निसर्ग झाकणारे पडदे बाजूला सारले गेले आहेत असे वाटेल. जंगल आदिम असते, या उलट जे जे आदिम असते तेते केवळ जंगल असते.

प्रत्येक कालखंडातील अद्‌भुतरम्यवादी मोडतोडीच्या दृश्यांनी उत्तेजित झाले आहेत. अशा दृश्यात नैसर्गिक आणि अव-मानवीय (Infra-human) यांचा गौरांगिनीवर हल्ला होतो. त्यांनी लेडा आणि हंस, अँटीओप आणि मेंढा, पॅसिफी आणि बैल यांची चित्रे रंगविली आहेत. चित्रणाचे सामान्यीकरण करून त्यांनी निसर्गदृश्यांचे भग्नावशेषासह जे देखावे शोधून काढले आहेत ते अधिक सूक्ष्मपणे असभ्य असून त्यात रेखीव शिला स्वैर फोफावलेल्या रानवेलींच्या आलिंगनात गुदमरुन गेलेल्या दाखविलेल्या असतात. एखादी वास्तु जेव्हा तुमच्या या भल्या अद्‌भुतरम्यवाद्याच्या दृष्टीपथात येते, तेव्हा त्याची नजर प्रथम छपरावरची किंवा कुंपणावरची मोहरीची पिवळी फुले शोधत असते. ही गोष्ट शेवटी प्रत्येक वस्तु ही मातीच आहे आणि सर्वत्र जंगलच उगवते हे सांगून जाते. अद्‌भुतरम्यतावाद्याला हसणे मूर्खपणाचे होईल. तोसुद्धा बरोबरच असतो. अशा अजाणता विकृत प्रतिमांच्या मागे एक सदाचीच फार मोठी समस्या दडलेली आहे : संस्कृति आणि तिच्या मुळाशी असणारी प्रकृति यांच्यातील संबंध; बौद्धिक आणि वैश्विक यांच्यातील संबंध. या विषयावर दुसऱ्या एखाद्या प्रसंगी विवेचन करण्याचा आणि योग्यक्षणी स्वतः अद्‌भुरतम्यवादी होण्याचा हक्क मी येथे राखून ठेवीत आहे.

पण तूर्त मी एका निराळ्याच कार्यात गुंतलो आहे. प्रश्न आहे तो आक्रमण करणाऱ्या जंगलाला कसे थोपवून धरावे हा. सध्या भल्या युरोपियनानी आस्ट्रेलियातील राज्यांना घोर चिंतेत टाकणाऱ्या प्रश्नासारख्या कोणत्या तरी उद्योगात स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. सतत पसरत जाणाऱ्या निवडुंगाच्या वाढीमुळे मानवाची समुद्रात हकालपट्टी होण्याची पाळी आली आहे, त्याला कसा प्रतिबंध घालावा? इ. स. १८४० च्या सुमारास केव्हातरी भूमध्यसागरी प्रदेशातील मलागा किंवा सिसिली येथून कोठूनतरी एक देशनिर्वासी ऑस्ट्रेलियात

अनुक्रमाणिका

गेला. जाताना त्याने मायदेशाच्या निसर्गाच्या आठवणीसाठी करंट्या निवडुंगाची एक कुंडी बरोबर नेली. त्या निवडुंगाने त्या खंडावर स्वारी केली आणि दरसाल तो एक चौरस किलोमीटर भूमी व्यापत चालला आहे. या निवडुंगाशी सामना देण्याकरता लागणाऱ्या खर्चाच्या ओझ्याखाली ऑस्ट्रेलियाची अंदाजपत्रके दबून जात आहेत.

समुदायमानव ज्या संस्कृतीत जन्माला आला आणि जिचा तो उपभोग घेतो, ती निसर्गाइतकीच उत्स्फूर्त आणि स्वयंनिर्माणक आहे असे तो मानतो. प्रत्यक्षात त्याचे रूपांतर आदिम मानवात झाले असल्यामुळे त्याच्या लेखी संस्कृति म्हणजे जंगलच, हे मी पूर्वीच सांगितले आहे. आता अधिक तपशीलात मला त्याचा परामर्श घ्यावयाचा आहे.

सुसंस्कृत जग-हे जग तर सुस्थितीत असलेच पाहिजे—ज्या तत्वांवर आधारलेले आहे, तीं आजच्या सर्वसामान्य माणसाच्या लेखी अस्तित्वातच नाहीत. मूलभूत सांस्कृतिक मूल्यांत त्याला रस वाटत नाही, त्यांच्याविषयी आत्मीयता वाटत नाही आणि त्यांच्याकारणी लागण्याची त्याची तयारी नसते. हे कसे घडून आले? त्याला अनेक कारणे आहेत. पण याक्षणी मी फक्त एका कारणावरच भर देणार आहे. संस्कृति जसजशी प्रगत होत जाते, तसतशी ती अधिक संमिश्र व जटिल होत जाते. तिने आमच्या समोर जे प्रश्न केले आहेत, ते अतिशय गुंतागुंतीचे आहेत. युद्धोत्तर काळ हे याचे ठळक उदाहरण होय. आज आम्ही युरोपची जी पुनर्रचना पहात आहोत, ती सर्वस्वी अतिशय गुंतागुंतीची बाब असून सामान्य युरोपीय मानव या मोठ्या साहसकार्यात उणा पडत आहे. प्रश्नांची उकल करण्याकरिता साधनांचा अभाव आहे असे नव्हे; अभाव आहे तो डोक्यांचा. किंबहुना काही डोकी आहेत, पण ती अगदीच थोडी. परंतु मध्य युरोपातील सर्वसामान्य जनसमुदाय आपली डोकी नीट ठिकाणावर ठेवायला नाखूष आहे.

प्रश्नांची जटिल सूक्ष्मता आणि ते प्रश्न अभ्यासणारी मने यांच्यातील प्रमाण व्यस्त आहे. जर त्यावर उपाय शोधून काढला नाही, तर ते वाढतच जाईल. हीच तर आमच्या संस्कृतीची मूलभूत शोकांतिका आहे. ही संस्कृती घडविणाऱ्या तत्त्वांची सुपीकता आणि निश्चितता यांच्या योगाने तिची फलनिष्पत्ती आणि तिचे मर्म या दोन्ही बाबतीत इतकी वाढ होत आहे की ती सामान्य मानवाला ग्रहण करता येत नाहीत. भूतकालात असे कधी घडले आहे असे मला वाटत नाही. पूर्वीच्या सगळ्या संस्कृति त्यांच्या मुळाशी असणाऱ्या तत्वांच्या अकार्यक्षमतेमुळे नष्ट झाल्या. युरोपची संस्कृति विरुद्ध कारणांकरिता बळी पडू लागली आहे. ग्रीस आणि रोममध्ये अयशस्वी झाली ती तत्वे, माणूस नव्हे. रोमन साम्राज्याचा अंत होतो, तो तंत्राच्या अभावामुळे. ज्यावेळी त्या साम्राज्याने लोकसंख्येचा उच्चांक गाठला आणि त्या विराट समाजाला केवळ तंत्राच्या योगाने साध्य होणाऱ्या विशिष्ट भौतिक प्रश्नांच्या सोडवणुकीची गरज निर्माण झाली, त्यावेळी त्या प्राचीन जगात अपक्रांतीच्या, पुच्छगतीच्या आणि ऱ्हासाच्या प्रक्रियेला आरंभ झाला.

आज अपेशी झाला आहे तो मानव. कारण तो स्वतःच्या संस्कृतीच्या प्रगतीबरोबर पाऊल टाकण्याला असमर्थ ठरला आहे. सापेक्षतया अधिक सुसंस्कृत माणसाला आजच्या सर्वात प्राथमिक प्रश्नाविषयी बोलताना ऐकणे हे दुःखदायक असते. आपल्या जाड बोजड बोटांनी मेजावर पडलेली सुई उचलण्याचा प्रयत्न करणाऱ्या एखाद्या राकट शेतकऱ्यासारखी ही माणसे वाटतात. उदा. २०० वर्षापूर्वी प्रत्यक्षात दोनशे पटीनी कमी

गुंतागुंतीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी विचारांची रांगडी साधने वापरली जात, त्याच साधनानी आज राजकीय आणि सामाजिक प्रश्न हाताळले जात आहेत.

प्रगत संस्कृती आणि जटिल समस्या ही एकच असतात, म्हणून जितकी प्रगति अधिक तितका तिला धोकाही अधिक. जीवन क्रमाक्रमाने सुधारत जाते, पण त्याबरोबरच उघडच ते अधिकाधिक गुंतागुंतीचे होत जाते. प्रश्न जसजसे अधिक गुंतागुंतीचे होत जातात, तसतशी ते सोडविण्याची साधनेही परिपूर्ण होतात. प्रत्येक नव्या पिढीने या परिपूर्ण साधनांवर प्रभुत्व मिळविले पाहिजे. त्यापैकी एक-प्रत्यक्ष उदाहरणच द्यावयाचे तर- संस्कृतीच्या वाटचालीशी अगदी स्पष्टपणे संलग्न आहे. ते म्हणजे या संस्कृतीच्या पाठीशी फार मोठा भूतकाळ, फार मोठा अनुभव आहे; एकाच शब्दात इतिहास आहे. ऐतिहासिक ज्ञान हे आधीच प्रगत झालेली संस्कृती जतन करण्याचे आणि तिचे सातत्य टिकविण्याचे पहिल्या प्रतीचे तंत्र आहे. हे तंत्र मूळच्या परिस्थितीच्या नव्या स्वरुपाकरिता निश्चित सोडवणुकीचे मार्ग दाखवील असे नव्हे. जीवन हे पूर्वीपेक्षा नेहमीच भिन्न असते. इतर काळातील भाबड्या चुका आमच्या हातून होऊ नयेत म्हणून ते प्रतिबंध करते; पण वृद्धत्वाबरोबर जीवन कठिण असल्याची जाणीव सुरु होते. जेव्हा तुम्ही भूत काळ विसरून अनुभवाने शहाणे होणार नसाल तर सगळेच अंगलट येईल. युरोप आज याच स्थितीत आहे, अशी माझी समजूत आहे. अत्यंत 'सुसंस्कृत' लोकांना आज इतिहासाचे कमालीचे अज्ञान आहे. माझे असे ठाम मत आहे की युरोपच्या सध्याच्या नेत्यांना १८ व्या शतकाच्याच नव्हे, तर १७ व्या शतकाच्याही नेत्यांपेक्षा इतिहासाचे कितीतरी कमी ज्ञान असते. १९ व्या शतकाची अचाट प्रगति शासनकर्त्या—व्यापक अर्थाने शासनकर्त्या—अल्पसंख्य वर्गाच्या इतिहासज्ञानामुळे शक्य झाली. त्यांची धोरणे १८ व्या शतकावरुन ठरत असत आणि ती नेमकी पूर्वीच्या राजकारणाच्या चुका टाळण्याकरिता विचारपूर्वक ठरविली जात असत. मागच्या चुका लक्षात घेऊनच ती ठरविली जात आणि साऱ्या अनुभवाचे सार त्यात समाविष्ट होत असे. पण १९ व्या शतकाने 'ऐतिहासिक संस्कृती' गमावायला आरंभ केला; तरी त्या शतकात विशेषज्ञानी शास्त्र या नात्याने उल्लेखनीय प्रगति केली. [एखाद्या विशिष्ट कालखंडातील विज्ञानांची स्थिती आणि त्यातील संस्कृतीची स्थिती यांच्यातील फरकाचे विवेचन पुढे येणार आहे. त्याचे हे ओझरते दर्शन.] इतिहासाची अशी उपेक्षा झाल्यामुळेच बव्हंशी त्याच्या हातून विशिष्ट चुका घडून आल्या आणि त्यांचे ओझे आज आमच्यावर पडत आहे. त्या शतकात शेवटच्या खंडात प्रच्छन्नपणे का असेना पण अपक्रांती, रानटीपणाच्या दिशेने पुच्छगती, सुरू झाली. म्हणजेच भूतकाल नसलेल्या किंवा तो विसरलेल्या मानवाच्या रांगडेपणाच्या आदिम अवस्थेच्या दिशेने पुच्छगती सुरू झाली.

म्हणून बोलशेविकवाद आणि फासीवाद हे युरोप आणि त्याच्या सरहद्दीवर जे दोन 'नवे प्रयत्न' राजकारणात चालले आहेत, ते मूलभूत प्रतिगमनाची दोन स्पष्ट उदाहरणे आहेत. हे वाद त्यांच्या सिद्धांतात अंतर्भूत असणारे बुद्धिनिष्ठ घटक ज्या इतिहासविरोधी आणि कालविसंगत रीतीने हाताळत आहेत, त्यामुळे हे प्रतिगमन घडून येत आहे. त्यांच्या प्रत्यक्ष आशयामुळे हे प्रतिगमन तितकेसे घडून आले नसते. त्या सिद्धांतांचा पृथकपणे विचार केला तर त्यात सत्याचा अंश आहे हे दिसून येते. सत्याचा लवलेशही नसलेले या विश्वात काय आहे? समुदायमानवांच्या सर्व नमुनेदार चळवळींचे मार्गदर्शन कामचलाऊ सामान्य प्रतीची माणसे करीत असतात. या माणसापाशी गतकालीन स्मृती आणि 'ऐतिहासिक जाणीव' नसते. जणु काही आरंभापासूनच ही माणसे भूतकालात असल्यासारखी वागतात; जणू काही ती वर्तमान काळात असूनही खरोखरीच गतयुगातील एखादी प्राणीजात आहे.

अनुक्रमाणिका

साम्यवादी वा बोलशेविकवादी असण्याचा किंवा नसण्याचा येथे प्रश्न नाही. मतप्रणालींची चर्चा येथे मी करीत नाही. पण इ. स. १९१७ च्या साम्यवाद्याने पूर्वी होऊन गेलेल्या सर्व क्रांत्यांच्या उपक्रमात उडी घेण्याची आणि तेही पूर्वीच्या क्रांत्यांचे दोष आणि चुका यत्किंचितही न सुधारता, हे मात्र अतर्क्य आणि कालविसंगत आहे. म्हणून रशियात जे घडत आहे ते इतिहासाच्या दृष्टीने हिताचे नाही. काटेकोर सांगावयाचे तर दुसरे काहीही होत असेल, पण मानवी जीवनाचा नव्याने आरंभ मात्र होत नाही. उलटपक्षी त्यात चिरक्रांतीची कंटाळवाणी पुनरावृत्ती आहे, ती पूर्णतः सामान्य क्रांती आहे. क्रांत्यांची ठराविक वचने असतात. त्यात मानवी अनुभवातून निष्पन्न झालेले असे एकही ठेवणीतले वचन नाही, की जे या क्रांतीला पुष्टी देत नाही. 'क्रांती स्वतःची लेकरे खाऊन टाकते,' 'क्रांतीची सुरुवात नेमस्तपक्षाकडून होते, पुढे ती जहालांच्या हाती जाते आणि लवकरच पुनःस्थापनेच्या कोणत्यातरी स्वरूपाचा आश्रय घेऊ लागते.' इत्यादी इत्यादी. या पुरातन धोपट वचनात अधिक संभवनीय पण कमी प्रसिद्ध अशा अन्य सत्यवचनांची भर घालता येईल. त्यापैकी एक असे– 'क्रांती १५ वर्षापेक्षा अधिक काळ टिकत नाही. हा काळ एक पिढी भरभराटीला येण्याचा असतो.' [एक पिढी सुमारे ३० वर्षे टिकते. तिचे कार्य दोन अवस्थान विभागले गेल्याने दोन रुपे धारण करते. साधारणतः प्रथमार्धात नवी पिढी आपल्या विचारांचा, पसंत्यांचा आणि अभिरुचींचा प्रचार करते आणि द्वितीयार्धात तिच्या वाटचालीत ही सर्व सत्ताधिष्ठित होतात आणि वर्चस्व गाजवितात. परंतु तिच्या वर्चस्वाखाली शिकलेली पुढची पिढी दुसरे विचार, पसंत्या आणि अभिरुची पुढे आणत असते. एकंदर वातावरणात ती त्यांचा प्रसार करू लागते. जेव्हा सत्ताधारी पिढीचे विचार, पसंत्या आणि अभिरूची या जहाल आणि म्हणून क्रांतिकारक असतात, तेव्हा नव्या पिढीचे विचार पसंत्या आणि अभिरुची त्या जहालांच्या आणि त्या क्रांतीच्या विरूद्ध असतात. म्हणजे त्यांची चेतना बव्हांशी पुनःस्थापनावादी असते. अर्थात पुनःस्थापनावादी याचा अर्थ साधे 'जुन्या मार्गाकडे परत जाणे' असा समजावयाचा नाही. पुनःस्थापना अशी कधीच होत नाही.]

जो कोणी नवी सामाजिक वा राजकीय वास्तवता निर्माण करण्याची आकांक्षा धरतो, तो जी परिस्थिती निर्माण करतो तीमुळे ही ऐतिहासिक अनुभवाची धोपट वचने रद्दबादल ठरतील याची खात्री त्याने सर्वाआधी करून घेतली पाहिजे. माझ्यापुरते सांगावयाचे झाल्यास 'प्रतिभाशाली पुरुष' ही पदवी मी विशिष्ट राजकारणी माणसाकरिताच राखून ठेवीन. जेव्हा इतिहासशास्त्राचे सगळे 'नियम' प्रत्यक्ष कृतीच्यावेळी मोडून पडलेले, उध्वस्त झालेले, धुळीस मिळालेले पाहून आमच्या महाविद्यालयातील इतिहासाच्या प्राध्यापकांना वेड लागण्याची पाळी येते, तेव्हा या पुरुषांनी नुकतीच कोठे आपल्या कार्याला सुरवात केलेली असते.

बोलशेविकवादाचे हे खास लक्षण फासीवादाला लागू केले म्हणजे अशीच विधाने आम्हाला करता येतील. या दोहोपैकी कोणताही प्रयोग 'आमच्या काळाची उंची' गाठत नाही. सगळ्या भूतकाळाचे ते थोडक्यात यथादर्शन घडवीत नाहीत. भूतकाळात सुधारणा करून पुढे जाण्यासाठी असे दर्शन होणे ही आवश्यक गोष्ट आहे. भूतकाळाबरोबर झगडा म्हणजे हातघाईची लढाई नव्हे. भविष्यकाळ भूताला गिळंकृत करून त्याच्यावर मात करीत असतो. त्यातून काही सुटलेच तर ते कायमचे गमावले म्हणून समजावे.

बोलशेविकवाद आणि फासीवाद हे दोन फसवे उषःकाल आहेत. त्यांच्यामुळे नव्या दिवसाची प्रभात उगवत नाही; पण मागे पुनः पुनः होऊन गेलेल्या कोणत्यातरी प्राचीन दिवसाची प्रभात ते घेऊन येतात. उषःकाल म्हणजे आदिम अवस्था होत. जी आंदोलने भूतकाळाबरोबर सामना देण्याचा मूर्खपणा करतात, त्यांची गत अशीच व्हायची. १९व्या शतकाच्या उदारमतवादाच्याही पुढे गेले पाहिजे यात शंकाच नाही. पण उदारमतविरोधी म्हणून स्वतःचा डंका पिटणारी फासीवादासारखी आंदोलने नेमके हेच करू शकत नाहीत. कारण उदारमतविरोध किंवा उदारमताचा अभाव यापैकी एकाच गोष्टीने उदारमतवादापूर्वीचा मानव घडला होता. उदारमतवादाने आपल्या विरूद्ध बाजूवर जय मिळविला असल्यामुळे एकतर तो आपल्या विजयाची

पुनरावृत्ती करील किंवा सर्वकाही—उदारमतवाद आणि उदारमतवादविरोध—युरोपच्या विनाशाबरोबरच नष्ट होऊन जाईल. जीवनाचा कालानुक्रम निष्ठुर असतो. त्यात उदारमतवाद ही उदारमतविरोधाच्या मागाहून येतो, अथवा याचाच अर्थ असा की, ज्याप्रमाणे बंदूक ही भाल्यापेक्षा अधिक समर्थ हत्यार असते, त्याचप्रमाणे तो उदारमतवादविरोधापेक्षा अधिक चैतन्ययुक्त असतो.

प्रथमदर्शनी 'कोणत्याही घटनेला विरोध' (anti-anything) ही प्रवृत्ती ती घटना घडल्यानंतर मागाहून येणारी असते. कारण ती त्या घटनेच्याविरूद्ध प्रतिक्रिया सूचित करते आणि तिचे पूर्वीचे अस्तित्व गृहीत धरते. पण 'विरोधी' (anti) यामुळे होणारा बदल पोकळ, अभावात्मक प्रवृत्तीत विरून जातो आणि मागे उरतो तो केवळ 'जीर्ण' (antique) हा निश्चित आशय. स्वतःला 'पीटरविरोधी' म्हणवून घेणाऱ्या माणसाची वृत्ती जेव्हा तो शब्दात व्यक्त करतो, तेव्हा पीटर नसलेल्या जगाचाच तो पाठपुरावा करीत असतो. पीटरच्या जन्मापूर्वीच्या जगात नेमके हेच घडले. पीटरविरोधक स्वतःचे स्थान पीटरच्या पश्चात ठेवण्याऐवजी त्याच्या आधी ठेवतो आणि सगळाच पट भूतकालाच्या दिशेने उलट फिरवितो आणि त्याचा शेवट अटळपणे पीटरच्या आगमनात होतो. कानफ्युसिअसच्या दंतकथेप्रमाणेच या 'विरोधी'च्या (anti) बाबतीतही घडते. कान्फ्युसिअस आपल्या पित्यानंतर जन्मणे स्वाभाविकच होते. पण तो जन्माला आला त्यावेळी पिता ८० वर्षाचा होता आणि त्याची आई अवघ्या तीस वर्षाची होती. म्हणून प्रत्येक 'विरोधी गोष्ट' ही केवळ पोकळ 'नकारा पेक्षा दुसरे काहीही नसते'.

चांगल्या गरगरीत 'न'च्या सहाय्याने आम्ही भूतकाळ करु शकलो असतो, तर हे सगळे फार नामी झाले असते. पण भूतकाळ हा मूलतः पुनःपुनः येणाऱ्या पिशाच्चासारखा आहे. त्याला घालवून दिले, तरी तो अटळपणे पुनः येतच राहतो. म्हणून त्याचा संबंध तोडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्यांची हकालपट्टी करणे हा नसून त्यांचे अस्तिव मान्य करुन त्याला चकविता यावे अशारीतीने वागणे हाच होय. थोडक्यात 'आजच्या काळाच्या उंचीवर' बसून जगावयाचे आणि तेही ऐतिहासिक परिस्थितीची जादा जाणीव ठेवूनच.

भूतकलाचे स्वतःचे असे प्रयोजन असते. ते प्रयोजन जर स्वीकारले नाही तर तो परत येऊन हक्काने त्याची मागणी करील. उदारमतवादाला त्याचे स्वतःचे प्रयोजन होते आणि ते चिरंतन महत्वाचे होते हे मान्य करावे लागेल. पण त्याचे हे प्रयोजन पूर्ण नव्हते. त्याचा जो अपूर्ण भाग त्याच्याकडून काढून घेणे अवश्य आहे, त्याच्याही पुढची मजल गाठण्याकरिता हे अत्यावश्यक आहे.

येथे मी बोलशेविकवाद व फासीवाद यांचा उल्लेख केला तो केवळ अप्रत्यक्षपणे आणि त्यांच्यातील कालविसंगतीच्या बाजूचाच तेवढा विचार करुन माझ्यामते ही बाजू आज त्यांच्यामध्ये जे काही सकृद्दर्शनी यशस्वी झाले आहे, त्यापासून अतूट आहे. आज विजयी झाला आहे तो समुदायमानवच. परिणामी त्याच्या प्रेरणेने योजलेले आणि त्याच्या खऱ्या आदिम पद्धतीने पुरे केलेले संकल्प तेवढेच सकृद्दर्शनी यशस्वी झाले. पण याशिवाय सध्या या दोहोपैकी एकाच्याही खऱ्या अंतरंगाची चर्चा मला करायची नाही. त्याप्रमाणेच क्रांती आणि उत्क्रांती यांची शाश्वत श्रृंगापत्ती सोडविण्याचा प्रयत्नही मी करणार नाही. या निबंधाच्या द्वारे मी जास्तीत जास्त मागू इच्छितो ते हे की, क्रांती असो वा उत्कांती असो, ती ऐतिहासिक असावी; पण कालविसंगत नसावी.

अनुक्रमाणिका

आतापर्यंत ज्या विषयाचा मी पाठपुरावा करीत आलो आहे, तो राजकीयदृष्ट्या तटस्थ आहे. कारण राजकारण आणि त्यातील मतभेद यांच्यापेक्षा त्याची व्याप्ती फार मोठी आहे. पुराणमतवादी आणि जहालमतवादी हे काहीही झाले तरी शेवटी समुदायच आहेत. त्यांच्यात मतभिन्नता असली—प्रत्येक काळात अशी भिन्नता वरपांगीच असते—तरीही ते एकच मानव—बंड करून उठलेले सामान्य मानव—आहेत, याला प्रत्यवाय येत नाही.

युरोपची नियति अशा माणसांच्या हाती सोपविली पाहिजे की, जी माणसे खरोखरीच ‘सद्यःकालीन’ आहेत, ज्यांच्या अंतर्मनात इतिहासाच्या सगळ्या अंतस्तराचे स्पंदन थरारत असते, ज्यांना अस्तित्वाच्या सांप्रतच्या पातळीची पुरेपूर जाणीव असते आणि जे प्रत्येक आर्ष आणि आदिम वृत्तीचा तिटकारा करतात. त्याखेरीज आशेला जागा नाही. आज आम्हाला गरज आहे ती इतिहासाचा साकल्याने विचार करण्याची. मागे जाऊन इतिहासात दडी मारून बसण्याची नव्हे; तर त्यातून कसे बाहेर पडावे याची.

∗ ∗

अनुक्रमाणिका

# प्रकरण ११ वे

## आत्मसंतुष्ट युग

सारांश, येथे विश्लेषण केलेली नवी सामाजिक घटना म्हणजे : युरोपीय इतिहास अगदी प्रथमच सामान्य माणसाच्या निर्णयावर सोपविण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अथवा हे निराळ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास जो सामान्य माणूस आजपर्यंत दुसऱ्याच्या मार्गदर्शनाने चालत होता, त्याने स्वतःच जगाचे राज्य चालविण्याचा निर्धार केला आहे. सामाजिक आघाडीवर येण्याचा त्याचा हा निर्णय आपोआप घडून आला आहे. तोही अशावेळी की, त्याच्याद्वारे जो नवीन मानवी नमुना प्रतीत होतो, तो नुकताच कोठे पक्वदशेला येत आहे. सार्वजनिक जीवनाच्या दृष्टीकोणातून नव्या नमुन्याच्या समुदायमानवाच्या मनोरचनेचा अभ्यास केला म्हणजे येणेप्रमाणे आढळून येते :

(१) जीवन हे सोपे, समृद्ध असून त्याला कोणत्याही प्रकारच्या महत्वाच्या मर्यादा नसतात ही मूळ समजूत उपजत असते. परिणामी प्रत्येक सर्वसामान्य मानवाला त्याच्या सत्तेची आणि विजयाची जाणीव असते. (२) ही जाणीव, आहे त्याच स्थितीत त्याने रहावे, त्याच्या अंगचे नैतिक आणि बौद्धिक गुण सर्वोत्तम, परिपूर्ण आहेत असे समजून चालावे, असे त्याला सांगत असते. त्याची ही आत्मसंतुष्टता त्याला कोणत्याही बाह्य अधिकरणाकडे धाव घेण्याला प्रतिबंध करते. तो दुसऱ्याचे ऐकत नाही, त्याची मते विवेकबुद्धीवर पारखू देत नाही, दुसऱ्याच्या अस्तित्वाचा तो विचारही करीत नाही, सत्तेच्या खोल जाणीवेने ते सदैव प्रभुत्व गाजविण्याला प्रेरित होतो. जणू काही आपण आणि आपल्यासारख्यांचेच तेवढे जग आहे असा तो वागतो. परिणामी, (३) सर्व गोष्टीत तो हस्तक्षेप करतो, दुसऱ्याचा आदर किंवा मान राखत नाही, कोणतीही मर्यादा वा संकोच बाळगत नाही; आणि 'प्रत्यक्ष कृती'च्या पद्धतीला अनुसरून तो स्वतःची क्षुद्र मते दुसऱ्यावर लादतो.

समुदाय मानवाच्या या विविध स्वरूपांमुळे आम्हाला बिघडलेले मूल, बंड करून उठलेला आदिम, म्हणजेच रानटी मानव यासारख्या मानवजातीच्या विशिष्ट सदोष नमुन्यांचा विचार करणे भाग पडले. (दुसऱ्या पक्षी, खरा आदिम मानव कोणत्याही बाह्य अधिकारापुढे, मग तो धर्माचा असो, निषेधक शक्तीचा असो, सामाजिक परंपरेचा असो किंवा रूढीचा असो, पूर्णतः नमते घेतो.) मानवी प्राण्याच्या या नमुन्यावर अपशब्दांची मी लाखोली वाहिली, तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. प्रस्तुत निबंध हा या विजयी मानवाबरोबरची एक प्रारंभिक चकमक असून काही विशिष्ट युरोपीय माणसे त्याच्या जुलुमाचा प्रतिकार करू इच्छित आहेत हे जाहीर करावे हाच त्याचा हेतू आहे. या क्षणी ही केवळ पहिली चकमक आहे. समोरासमोर हल्ला हा नंतर, कदाचित फारच लौकर व्हायचा आहे; आणि तो या निबंधातल्या स्वरूपापेक्षा अगदी वेगळा असेल. हा हल्ला अशा रीतीने झाला पाहिजे की, समुदायमानवाला त्याविरूद्ध सावधगिरीही घेता येऊ नये. तो हल्ला त्याला समोर दिसेल, पण तो नेमका समोरून येणारा हल्ला आहे अशी शंकाही त्याला येऊ देता कामा नये.

हा मानवी नमुना सध्या सर्वत्र आढळतो आणि तो सर्वत्र आपला आत्मिक रानटीपणा लादत आहे. खरोखरीच तो मानवी इतिहासाचे बिघडलेले मूल आहे. बिघडलेले मूल हे केवळ आपण वारसदार आहो अशा दिमाखात वागणारे असते. वारसा म्हणजे संस्कृतीचा वारसा—तिच्या सोयी, सुरक्षितता यांच्यासह—एका

अनुक्रमाणिका

शब्दात, तिच्या सगळ्या फायद्यांसह. आमच्या संस्कृतीने निर्माण केलेल्या सुलभ अस्तित्वाच्या परिस्थितीतच केवळ असा नमुना उत्पन्न होतो. त्याची लक्षणे आणि त्याच्या स्वभावधर्माच्या प्रेरणा आम्ही मागे पाहिल्याच आहेत. मानवी साधनसामुग्रीच्या अतिसमृद्धीने निर्माण केलेल्या अनेक विकृतीपैकी ही एक आहे. समृद्धीच्या जगात जन्माला आलेले जीवन हे अधिक चांगले असते, टंचाईविरूद्ध झगडणाऱ्या जीवनापेक्षा ते अधिक खरेखुरे असते, यावर विश्वास ठेवण्याची फसवी प्रवृत्ती काही जणांची असेल. पण येथे तसे नाही. त्याला अत्यंत काटेकोर आणि मूलभूत स्वरुपाची कारणे आहेत. ती विस्ताराने सांगण्याचे हे स्थळ नव्हे. सध्यापुरते त्या कारणांचा विचार करण्याऐवजी आनुवंशिक अमीरशाहीची शोकांतिका घडवून आणणारी आणि पुनः पुनः घडणारी घटना लक्षात ठेवली तरी पुरेसे आहे. अमीराकडे वारसा येतो, त्याचा अर्थ त्याने निर्माण न केलेल्या आणि म्हणून त्याच्या वैयक्तिक जीवनाशी समरस न होऊ शकणाऱ्या परिस्थितीत तो गोवला जातो. जन्मतःच तो अकस्मात आणि अजाणतःच खास अधिकारात आणि संपत्तीत अधिष्ठित झालेला असतो. स्वतः होऊन त्याला याबाबतीत काहीही करावे लागत नाही. कारण त्या गोष्टी त्याच्यापासून उद्‌भवलेल्या नसतात. कोणातरी दुसऱ्या मानवी प्राण्याचे, त्याच्या पूर्वजाचे, ते भक्कम कवच असते. त्याला वारसदार म्हणून जगावयाचे असते; म्हणजेच दुसऱ्या एखाद्याच्या अस्तित्वाचा साज त्याला चढवावा लागतो. यावरून बोध काय घ्यावयाचा ? 'अमीर' वारशाने आलेले कोणते जीवन जगणार आहे? स्वतःचे का त्याच्या पहिल्या पूर्वज अमीराचे ? यापैकी कोणतेही नाही. त्याच्या नशिबी येते ते अन्य मानवाचा प्रतिनिधी होण्याचे; परिणामी तो कोणाचाही प्रतिनिधी नसतो. किंबहुना तो स्वतःचाही प्रतिनिधी नसतो. आपल्या जीवनाचा अस्सलपणा तो अटळपणे गमावून बसतो; आणि त्याच्या जीवनाचे रुपांतर दुसऱ्या कोणाचे तरी नुसते प्रतिरुप होण्यात किंवा थोतांड बनण्यात होते. ज्या विपुल साधनसामग्रीचा त्याला उपयोग करावा लागतो, ती त्याला स्वतःची नियती जगण्याची संधी देत नाही. त्याचे जीवन म्हणजे अपक्षयच होय. सगळे जीवन प्रत्यक्षात जगण्यात ज्या अडचणी येतात, त्याच नेमक्या माझ्या हालचालीना, माझ्या अंगाच्या सामर्थ्याला चालना देतात. माझ्या शरीराला वजन नसते, तर मी चालू शकलो नसतो. माझ्यावर वातावरणाचा दाब नसता, तर माझे शरीर मला काहीतरी अधांतरी, फोफसे आणि पोकळ वाटले असते. याच नियमानुसार 'अमीरशाही' वारसदाराचे व्यक्तित्व कारणी येत नाही. अत्यावश्यक यत्नही तो करू शकत नाही. म्हणून त्याचे व्यक्तित्व सारे अधांतरीच रहाते. याचा परिणाम म्हणजे आमच्या जुन्या अमीरशाहीचा विशिष्ट प्रकारचा मूर्खपणा होय. त्याची बरोबरी करणारे दुसरे काहीही सापडणार नाही. अगदी काटेकोरपणे सांगावयाचे तर हा मूर्खपणा त्याच्या शोकात्म यंत्रणेत खोलवर जाऊन अद्याप कोणीही वर्णिला नाही. या शोकात्म यंत्रणेमुळे सगळ्या आनुवांशिक अमीरशाहीचे अनिवार्यपणे अधःपतन झाले.

साधनसामग्रीचे अतिवैपुल्य जीवनाला उपकारक असते अशी आमची भाबडी समजूत असते. ती दूर करावी म्हणून एवढा प्रपंच केला. वस्तुस्थिती याच्या अगदी उलट असते. संभाव्यतांचे अतिवैपुल्य [साधनसामग्रींची वाढ व त्यांचे वैपुल्य आणि त्यांचा अतिरेक यांची गल्लत करता कामा नये. १९ व्या शतकात जीवनाच्या सोयी वाढतात. त्यातून मी दर्शविल्याप्रमाणे आश्चर्यकारक वाढ—संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ—होते. पण आता असा क्षण आला आहे की, सर्वसामान्य मानवाच्या क्षमतेशी तुलना करता सुधारलेल्या जगात अतिवैपुल्य, संपत्तीचा अतिरेक, अतिरिक्तता झाली आहे. याचे एकच उदाहरण म्हणजे : प्रगतीने म्हणजे सतत वाढत्या महत्वाच्या फायद्याने देऊ केलेल्या दिखाऊ सुरक्षिततेने सामान्य मानवाच्या ठिकाणी खोटा, सदोष आणि दुबळा विश्वास जागृत करून त्याला नीतिभ्रष्ट केले आहे.] झालेल्या या जगात आपोआप ज्या विद्रूपता, मानवी जीवनाचे जे दुष्ट नमुने, निर्माण होतात त्यांची गणना 'वारसदार' या सर्वसाधारण वर्गात करता येईल. त्यापैकी 'उमराव' हे केवळ एक विशिष्ट उदाहरण आहे. बिघडलेले मूल हे दुसरे आणि सद्यःकालीन समुदायमानव हे पूर्णांशाने आणि अधिक मूलतः तिसरे उदाहरण होय. शिवाय सर्वकाळी आणि सर्व लोकात 'अमीरा'च्या वैशिष्ट्यपूर्ण लक्षणापैकी समुदायमानवात किती रूजली

अनुक्रमाणिका

आहेत हे दाखवून या तिसऱ्या संदर्भाचा अधिक तपशीलाने विचार करता येईल. उदाहरणार्थ : शिकार आणि मैदानी खेळ याना जीवनात प्रमुख स्थान देण्याकडे कल, शरीर सौष्ठव कमाविण्याचा छंद–शरीर-स्वास्थ आणि पोषाख याबाबत दक्षता–स्त्रियांबरोबर वागण्यात प्रणयभावनेचा अभाव, 'बुद्धिवान' माणसाकडून स्वतःची करमणूक करून घेत असतानाच त्यांचा तिरस्कार करणे आणि कधीमधी हुजऱ्याकडून आणि पाळलेल्या धटिंगणाकडून त्यांचा छळ करून, मौज पहाणे, मोकळ्या विचारविनिमयाच्या राज्यापेक्षा अनियंत्रित सत्तेखाली रहाणे पसंत करणे. [पूर्वी आम्ही जे म्हटले आहे, त्याला या आणि इतरही बाबतीत इंग्लिश उमरावशाही अपवाद आहे. हे उदाहरण कौतुकास्पद असले तरी अपवादेकरून नियम सिद्ध होतो हे दर्शविण्याकरिता इंग्लंडच्या इतिहासाची रुपरेषा सूचित केली तरी पुरेसे होईल. नेहमी सांगितले जाते त्याच्या उलट इंग्लिश सरदारवर्ग हा युरोपमधील किमान 'विपुलता' असणारा वर्ग होता. इतर कोणापेक्षाही तो सतत अधिक धोक्याच्या परिस्थितीत जगत होता. त्यामुळे स्वतःविषयी आदर निर्माण करण्यात तो यशस्वी झाला आहे–यात असे गर्भित होते की, तो अखंडपणे मोडकळीस आलेल्या अवस्थेत रहात होता. १८ व्या शतकापर्यंत इंग्लंड पश्चिम युरोपातील अत्यंत गरीब देश होता, ही मूलभूत गोष्ट विसरली जाते. त्यामुळेच तो वर्ग बचावला. साधनसामग्रीची विपुलता नसल्याने त्याला फार लौकर व्यापारी आणि औद्योगिक व्यवसायामध्ये शिरावे लागले. त्यावेळी युरोपात हे व्यवसाय हीन समजले जात होते. म्हणजे लवकरच त्याने सर्जनशील स्वरुपाचे आर्थिक जीवन जगण्याचे आणि आपल्या विशेषाधिकारावरच सर्वश्री अवलंबून राहण्याचे ठरविले.]

वाचकांना कंटाळवाणे वाटेल, पण तो धोका पत्करूनही मला आग्रहाने मांडावयाचा मुद्दा हा की, असंस्कृत प्रवृत्तींनी पूर्ण असा हा मानव, नूतनतम रानटी माणूस, म्हणजे आधुनिक संस्कृतीतून विशेषतः १९ व्या शतकातील संस्कृतीच्या स्वरुपातून आपोआप झालेली फलनिष्पत्ती होय. ५ व्या शतकातील 'महान गोऱ्या बर्बरा' प्रमाणे त्याने या सुधारलेल्या जगावर येऊन धडक मारली नाही, किंवा ॲरिस्टॉटलच्या म्हणण्याप्रमाणे डबक्यातील बेडकुळीसारख्या स्वयंसिद्ध रहस्यमय जननाच्या योगानेही तो या जगात जन्माला आला नाही. तो त्या संस्कृतीचे नैसर्गिक फळ आहे. या संदर्भात पुरातत्वविद्या आणि जैविक भूगोल यानी पक्का केलेला नियम पुढीलप्रमाणे मांडता येईल. मानवापाशी असलेली भरंवशाची साधनसामग्री आणि त्याच्यासमोर उभ्या राहिलेल्या समस्या या ज्यावेळी तुल्यबळ ठरल्या तेव्हाच केवळ मानवी जीवनांचे उत्थान होऊन त्याची प्रगती झाली. हे जितके आध्यात्मिक तितकेच आधिभौतिक क्षेत्रातही खरी आहे. म्हणून माणसाच्या भौतिक बाजूचा उल्लेख करावयाचा झाला तर पृथ्वीच्या ज्या भागात उष्ण ऋतूच्या जोडीने अतिशीत ऋतु येतो, तेथे मानवजात भरभराटीला आली, या गोष्टीकडे मी लक्ष वेधीन. उष्णकटिबंधात प्राणीमानवाचा ऱ्हास होतो. याच्या उलट समशीतोष्ण कटिबंधात मागाहून उत्पन्न होऊनही विकासक्रमात वरिष्ठ दर्जा प्राप्त झालेल्या वंशानी पिग्मीसारख्या कनिष्ठ दर्जाच्या वंशाला मागे रेटले. ['Klima and Entwicklung 1923' हे ओलब्रिस्तचे पुस्तक पहावे.]

तेव्हा १९ व्या शतकाच्या संस्कृतीचे स्वरूप असे : ती सामान्य मानवाला अतिवैपुल्याच्या जगात त्याचे स्थान घेण्याला वाव देते, या अतिवैपुल्यामध्ये त्याच्या हाती असलेल्या साधनांची सढळता तेवढी त्याला कळते; पण त्यातून उद्‌भवणारी दुःखे मात्र त्याला कळत नाहीत. आपल्या सभोवती त्याला अद्‌भुत उपकरणे, रोगपरिहारक औषधे, जागरूक शासने आणि सोईस्कर विशेषाधिकार आढळून येतात. दुसऱ्या बाजूने ती औषधे आणि ती उपकरणे यांचा शोध लावणे आणि त्यांच्या भावी उत्पादनाची हमी देणे, या गोष्टी किती कठीण आहेत यासंबंधी तो अज्ञानी असतो. राज्याची संघटना किती अस्थिर असते याची त्याला जाणीव नसते. त्याच्या जबाबदाऱ्यांची त्याला स्वतःला क्वचितच जाण असते. त्याच्यामध्ये संतुलनाचा अभाव असल्यामुळे त्याच्या स्वभावात खोटेपणा शिरतो. मुळापासूनच तो बिघडतो. जीवनाच्या खास सत्वाशी त्याचा संबंध तुटत जातो. त्याचे जीवन पूर्णतः धोक्याचे आणि मूलतः प्रश्नात्मक असते. मानवजातीत दिसून येणारे जीवनाच्या अत्यंत विरुद्ध असे स्वरूप म्हणजे 'आत्मसंतुष्ट मानव' हे होय. परिणामतः जेव्हा या मानवाला वर्चस्व प्राप्त होते तेव्हा

आगामी संकटाचा इषारा देण्याचा आणि मानवजातीच्या ऱ्हासाचा म्हणजे सापेक्ष मृत्यूचा धोका निर्माण झाला आहे, हे ओरडून करण्याचा समय प्राप्त होतो. या दृष्टीने पहाता युरोपात प्रदर्शित होणारी महत्तम पातळी ही सगळ्या मानवी भूतकाळापेक्षाही श्रेष्ठ आहे. पण भविष्याकडे पाहिले म्हणजे अशी भीति वाटू लागते की, आतापर्यंत गाठलेली पातळी युरोपला यापुढे टिकवून धरता येणार नाही किंवा वरची पातळीही त्याला गाठता येणार नाही. उलट तो मागे पडेल आणि खालच्या पातळीवर जाईल.

'आत्मसंतुष्ट मानावा'त प्रदर्शित होणारी परकाष्ठेची अपसामान्यता यावरून पुरेशा स्पष्टपणे प्रत्ययास येईल असे मी समजतो. या मानवाने 'मन मानेल ते' करण्यासाठीच जीवनात प्रवेश केला आहे. वस्तुतः कुटुंबातील 'लाडावलेल्या मुलाला' होणारा हा भ्रम आहे. त्याचे कारण आम्ही जाणतो. कुटुंबाच्या मर्यादेत सर्व गोष्टी, सर्वात मोठे प्रमादसुद्धा, शेवटी शिक्षा न होताच सोडून दिले जातात. कुटुंब हे सापेक्षत्वाने कृत्रिम असते आणि समाजात, बाह्य जगात ज्या कित्येक कृत्यांचे भीषण परिणाम कर्त्याला सहजगत्याच भोगावे लागतात ती कृत्ये तेथे सहन केली जातात. पण या मानवी नमुन्याला आपण जसे घरी वागतो, तसेच बाहेरही वागावे असे वाटते. त्याची समजूत अशी असते की, प्राणघातक, निरुपाय, अपरिवर्तनीय असे काहीही नसते. म्हणूनच आपल्याला जे आवडते, ते करावे असे त्याला वाटते. [समाज आणि घर यांचा जसा संबंध असतो तसाच मोठ्या प्रमाणात राष्ट्र आणि राष्ट्रसमूह यांचा असतो. सध्या आत्मसंतुष्टतेचे वर्चत्व असृन त्याच्या तात्कालिक आणि प्रचंड आविष्कारापैकी एक म्हणजे काही राष्ट्रानी राष्ट्रसंघात मन मानेल तसे करण्याचा केलेला निर्धार होय हे आम्ही पुढे पहाणार आहो. भाबडेपणाने ते त्याला 'राष्ट्रवाद' म्हणतात. आंतरराष्ट्रवादाला खोटी शरणागति देण्याचा मला तिरस्कार वाटतो. दुसऱ्या बाजूने किमान विकसित राष्ट्रांच्या आत्मप्रौढीची सध्याची स्थिती मला मूर्खपणाची वाटते.] केवढी प्रचंड चूक ही ! एका पोर्तुगीज कथेतील पोपटाला सांगण्यात येते की 'जेथे तुला नेतात तेथे तुला जावे लागेल.' त्यातलाच हा प्रकार. म्हणजे स्वतःला आवडते ते करता कामा नये, असा त्याचा अर्थ नव्हे. एवढेच की आमच्यापैकी प्रत्येकाला जे करणे आणि होणे प्राप्त आहे, त्या व्यतिरिक्त दुसरे काहीही करता येणार नाही. यातून सुटकेचा एकच मार्ग. जे करणे प्राप्त असते, ते नाकारणे होय. पण म्हणून मन मानेल तसे वागण्याशिवाय दुसरे काही तरी करण्याला आम्हाला मोकळीक मिळते असे नव्हे. याबाबतीत आमच्यापाशी नुसते नकाराचे इच्छास्वातंत्र्य असते, 'अनिच्छा' असते. आमच्या खऱ्या नियतीपासून आम्ही सहज दूर जाऊ शकतो. पण ते केवळ आमच्या नियतीच्या गडद अंधार कोठडीत बंदिस्त होण्यासाठी. माझ्या प्रत्येक वाचकाच्या नियतीच्या संबंधात ही गोष्ट मला स्पष्ट करता येणार नाही. कारण प्रत्येक वाचकाला काही मी ओळखत नाही. तथापि त्याच्या नियतीचे जे भाग, जे पैलू इतरांच्या नियतीशी जुळणारे आहेत, ते तेवढे स्पष्ट करता येणे शक्य आहे. उदाहरणार्थ सध्याच्या प्रत्येक युरोपीय मानवाला त्याच्या सर्व व्यक्त 'कल्पना' आणि मते या व्यतिरिक्त त्याला निश्चितपणे हे माहीत असते की, आजचा युरोपीय हा उदारमतवादी असलाच पाहिजे. त्याचा उदारमतवाद कोणत्या स्वरुपाचा असावा या चर्चेशी येथे कर्तव्य नाही. येथे या गोष्टीचा मी उल्लेख करतो की, सर्वांत प्रतिगामी युरोपीय माणूससुद्धा आपल्या सद्सद्विवेकबुद्धीच्या गाभ्यात हे जाणून आहे की, गेल्या शतकात उदारमतवादाच्या नावाखाली युरोपने जो प्रयत्न केला, तो अंतिमतः काहीतरी अटळ होता, अत्यावश्यक होता. पाश्चात्य माणूस आज जसा आहे, त्यासारखाच काहीतरी तो होता; मग ते त्याला आवडो वा नावडो.

राजकीय स्वातंत्र्य ही युरोपच्या ललाटलिखितावर कोरलेली नैतिक प्रेरणा (categorical imperative) होती. ही प्रेरणा प्रत्यक्षात आणण्यासाठी केलेले प्रयत्न जेव्हा मूर्तरूपाला आले, तेव्हा त्यामध्ये नकलीपणा आला आणि ते दैव नेईल तसे वहात गेले, हे भरपूर आणि बिनतोड प्रमाणानिशी सिद्ध झाले आहे. तरी देखील गेल्या शतकात मूलतः ती प्रेरणा योग्यच होती हा अंतिम पुरावा आजही प्रमाणभूत आहे. आणि हे

अनुक्रमाणिका

युरोपीय साम्यवादी तसेच फासीवादी या दोघातही सारख्याच प्रमाणात आढळून येते. मग ते तसे नाही म्हणून स्वतःची खात्री पटविण्याकरिता ते कोणताही आव आणोत. उदारमतवादाच्या आविष्काराविरुद्ध झोडलेल्या रास्त टीकेच्याही पलीकडे एक अबाधित सत्य आहे, हे सर्व 'चांगले जाणून' आहेत. ते सत्य सैद्धांतिक, वैज्ञानिक, बौद्धिक नाही; तर मूलतःच याहून भिन्न पद्धतीचे असून अधिक निर्णायक आहे. म्हणजेच ते नियतीचे सत्य आहे. सैद्धांतिक सत्ये ही केवळ विवाद्य असतात; इतकेच नव्हे, तर त्यांचा सगळा अर्थ आणि जोर विवाद्यतेतच सामावलेला असतो आणि ती वादविवादातूनच जन्माला येतात. जोपर्यंत त्यांच्याविषयी चर्चा चालू असते, तोपर्यंतच ची टिकून रहातात. निव्वळ चर्चेकरताच ती निर्मिली जातात. परंतु नियतीविषयीच्या मूलभूत दृष्टिकोणातून माणसाला जे काय व्हावयाचे असते त्याविषयी चर्चा होत नाही. ती नियति स्वीकारावी तरी लागते किंवा धिक्कारावी तरी लागते. आम्ही ती स्वीकारली, तर खरे ठरतो. नाही तर आम्ही नकारात्मक ठरतो, स्वतःलाच खोटे बनवितो. [अवनति, अधोगति हा जीवन–प्रकार त्याच माणसाचा असतो की, तो जे होणे त्याचे कर्तव्य असते, तेच होण्याचे नाकारतो, तरीदेखील त्याचे खरे अस्तित्व नष्ट होत नाही. उलट त्याचे रुपांतर एका दोषास्पद छायेत, एका आभासात होते. हा आभास, तो जे जीवन जगतो ते त्याने जगायला हवे ह्या मानाने निकृष्ट प्रतीचे असते त्याची जाणीव त्याला सतत देत असतो. अधोगतीला गेलेला मानव स्वतःच ओढून घेतलेले मरण जगत असतो.] मन मानेल तसे करावे यात नियति सामावलेली नसते. उलट आम्हाला जे करू नये असे वाटते, तेच केले पाहिजे या जाणीवेत तिची स्पष्ट ओळख पटते.

ठीक. तर मग 'संतुष्ट मानवा'चे वैशिष्ट्य हे की, काही विशिष्ट गोष्टी होऊ शकत नाहीत, हे तो जाणत असतो; तरीही त्याच कारणास्तव त्याविरुद्ध आपली खात्री पटल्याचा तो कृतीने आणि शब्दाने बहाणा करीत असतो. फासीवादी हा राजकीय स्वातंत्र्याविरुद्ध आपली भूमिका घेतो, त्याचे नेमके कारण हे की, ते स्वातंत्र्य अंतिमतः कधीही अपयशी होणार नाही, आणि ते युरोपीय जीवनाच्या खास सत्वाचा अटळ असा एक भाग आहे आणि गंभीर संकटकाळी जेव्हा त्याची खरोखरीच गरज भासेल, त्यावेळी ते परत येईल हे तो जाणून असतो. समुदायमानवाला सुस्थितीत ठेवणारे शक्तिवर्धक म्हणजे अप्रामाणिकपणा, 'कोणतीही गोष्ट थट्टेवारी नेणे.' त्याच्या सगळ्या कृतीमध्ये अटळपणाचा सूर लवलेशालाही नसतो. लाडावलेले मूल ज्याप्रमाणे आपला वेडाचार चालवीत असते, त्याप्रमाणेच समुदाय-मानवाचे चाळे चालू असतात. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात निर्णायक, शोकात्म, अंतिम प्रवृति धारण करण्याची तो जी घाई दर्शवितो, तो सारा केवळ बाह्य देखावा होय. माणसे शोकात्मिकेचा आव आणतात; कारण सुसंस्कृत जगाच्या रंगभूमीवर प्रत्यक्षात खेळल्या जाणाऱ्या शोकात्मिकेच्या खरेपणावर त्यांचा विश्वास नसतो.

एखाद्या व्यक्तीचे स्वत्व आम्हाला मान्य करायला लागावे ही किती बरे नामी गोष्ट आहे ! मग त्याप्रीत्यर्थ तो काहीही प्रयत्न करो. दोन अधिक दोन पाच होतात यावर आपला विश्वास आहे, असा जर कोणी आग्रह धरील आणि तो वेडा आहे असे समजण्याला काही कारण नसेल, तर त्याने त्यासाठी कितीही कंठशोष केला किंवा मरणही जरी ओढवून घेतले, तरी त्यावर त्याचा विश्वास नसतो हे पक्के समजावे. युरोपच्या भूमीवर आज नकलीपणाचे तुफान प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक स्वरूपात माजले आहे. ज्या भूमिका घेण्यात येतात आणि जाहीर करण्यात येतात, त्यापैकी बहुतेक सर्व नकली असतात. जे यत्न होत आहेत, ते केवळ आमच्या खऱ्या नियतीतून निसटण्यासाठी; तिच्या अस्तित्वाकडे डोळेझाक करण्यासाठी, तिच्या गाढ आवाहनाकडे दुर्लक्ष करण्यासाठी, 'जे होणार आहे' त्याला तोंड देण्याचे टाळण्यासाठीच होय. आम्ही विदुषकी थाटाने जगत आहोत. आम्ही धारण केलेले मुखवटे जितके उघडपणे अधिक शोकात्म, तितका तो थाट अधिक विदुषकी. जेथे जेथे जीवनात घेतलेल्या भूमिकात अटळपणा नसतो तेथे विदुषकीपणा आलाच. समुदायमानव आपल्या

नियतीच्या अचल पक्क्या भूमीवर ठाम उभा रहात नाही. तो हवेत तरंगणारे भ्रामक अस्तित्व अधिक पसंत करतो. म्हणून सत्व किंवा मूळ नसलेली ही जीवने, त्याच्या स्वतःच्या नियतीतून उपटली गेलेली ही आणि उथळ प्रवाहाबरोबर वहात जाणारी ही जीवने, पूर्वी कधीही अशी नव्हती. हे युग 'वहात जाण्याचे' आणि 'गोष्टी घरंगळत जाऊ देण्या'चे आहे. कलेत, विचारात, राजकारणात किंवा सामाजिक रीतिरिवाजात उठणाऱ्या भुरट्या वावटळींचा प्रतिकार करणारा क्वचितच कोणी एखादा निघतो. परिणामी कधीही नव्हती इतकी वाचाळपणाला भरती आली आहे. अतिवास्तववाद्याला असे वाटते की, जेथे दुसरे जाईजुई, हंस आणि प्राणी यांच्याविषयी लिहितात, तेथे आपण जे (येथे ते शब्द लिहिण्याची गरज नाही) लिहितो, त्यामुळे सगळ्या वाङ्मयीन इतिहासावर आपण ताण करीत आहो. पण खरोखरीच आतापर्यंत संडासात दडलेले वाक्चातुर्य दुसऱ्या रूपाने उजेडात आणण्याचे काम तेवढे त्याने केले आहे.

सध्याच्या परिस्थितीची विशिष्ट लक्षणे बाजूला सारून भूतकाळाशी असलेली तिची साम्ये शोधली म्हणजे ती अधिक स्पष्ट समजेल. अशा प्रकारे पहाता, ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकात भूमध्यसागरी संस्कृति कळसाला पोचते न पोचते, तोंच सर्व तुच्छतावादी (cynic) उदयाला येतात. डायोजीनिस आपल्या चिखल माखलेल्या चपलांनी ॲरिस्टिपसचे गालिचे तुडवत जातो. प्रत्येक कोनाकोपऱ्यात आणि सर्वांत उच्चपदी हे सर्व तुच्छतावादी डोके वर काढतात. त्यानी तत्कालीन संस्कृतीचा विध्वंस करण्याखेरीज काहीही केले नाही. त्यांची भूमिका मोडतोडीची होती; किंबहुना मोडतोडीचा प्रयत्न करण्याची होती. कारण आपला उद्देश साध्य करण्यात ते अपेशी ठरले. हे सर्व तुच्छतावादी, संस्कृतीवरची ही बांडगुळे, संस्कृती नाकारूनच जगत असतात. त्याचे कारण हेच की, संस्कृती निष्फळ ठरणार नाही, ही त्यांची खात्री असते. सर्व तुच्छतावादी स्वतःची जी भूमिका नकलीपणाने वठवीत असतात, तशीच भूमिका वन्य लोकात प्रत्येकजण स्वाभाविकपणे आणि गंभीरपणे पार पाडीत असतो. अशा वन्य लोकात या सर्व तुच्छतावाद्यांचे काय बरे होईल? स्वातंत्र्याविषयी बोटे मोडणारा नसेल, तर मग तो फासीवादी कसचा? अथवा कलेची नास्लती करणार नसेल तर तो अतिवास्तववादी कसचा?

अतिशय सुसंघटित जगात जन्माला आलेल्या या मानवी नमुन्याची वर्तणूक यापेक्षा निराळी असू शकत नाही. या जगाचे फायदे तेवढे तो जाणतो; पण धोके मात्र लक्षात घेत नाही. त्याच्या भोवतालची परिस्थिती त्याला बिघडवीत असते; आणि तीच त्याची 'संस्कृती' असते, म्हणजेच त्याचा आसरा असतो. या लाडावलेल्या मुलाला त्याचा लहरीपणा टाकून द्यायला भाग पाडील, त्याच्यापेक्षा वरिष्ठांचा सल्ला मानायला त्याला प्रेरित करील असे काहीहि तो जाणत नाही. म्हणून त्याला आपल्या नियतीच्या कठोर अंतरंगाचे आकलन होण्याचा सुतराम संभव नाही.

✶ ✶

अनुक्रमाणिका

# प्रकरण १२ वे

## विशेषज्ञता आणि रानटीपणा

[Specialization = विशेषज्ञता. Specialism = विशेषतावाद. Specialized विशेषीकृत. Specialist = विशेषज्ञ. Speciality = विशेषत्व. Qualified= पात्र, गुणवान. Qualification= पात्रता, गुणवत्ता.]

माझ्या सिद्धांत असा : समुदाय—मानव हा १९ व्या शतकाच्या संस्कृतीतून आपोआप निर्माण झाला आहे. हे सर्वसाधारण विवेचन आटोपते घेण्यापूर्वी या समुदाय मानवाला निर्माण करणाऱ्या यंत्रणेचे एका विशिष्ट बाबतीचे पृथःक्करण होणे अवश्य आहे. त्यामुळे या सिद्धांताला मूर्त रुप प्राप्त होईल आणि त्यामुळे हा सिद्धांत समर्थपणे पटवून देता येईल.

मी सांगितलेच आहे की, १९ व्या शतकाच्या संस्कृतीचे सार दोन मोठ्या परिमाणात सांगता येईल; उदार लोकशाही आणि तंत्रज्ञान. तूर्त यापैकी फक्त तंत्रज्ञानाचाच आपण विचार करू. आधुनिक तंत्रज्ञान भांडवलशाही आणि प्रायोगिक विज्ञान यांच्या संयोगातून जन्माला येते. सर्वच तंत्रज्ञान काही वैज्ञानिक नसते. पुराणाश्म युगाच्या कालखंडात (Chelian Period) केलेला दगडी कुऱ्हाडीमध्ये विज्ञानाचा अभाव होता आणि तरीही तंत्र निर्माण झाले होते. भौतिकशास्त्राच्या अस्तित्वाची पुसटदेखील शंका येणे शक्य नव्हते, अशा परिस्थितीत चीनने उच्च दर्जाचे तंत्र गाठण्यापर्यंत मजल मारली होती. आधुनिक युरोपीय तंत्रालाच काय तो वैज्ञानिक पाया आहे आणि त्यातूनच त्याचे विशिष्ट स्वरुप, त्याच्या अमर्याद प्रगतीची संभाव्यता त्याला प्राप्त झाली आहे. इतर सर्व तंत्रे-मेसोपोटेमिया, ईजिप्त, ग्रीस, रोम, पौर्वात्य यांची तंत्रे-प्रगतीच्या एका विशिष्ट टप्प्याच्या पलीकडे जाऊ शकली नाहीत. आणि त्या टप्प्यापर्यंत ती पोहोचतात न पोहोचतात तोच त्यांचा शोचनीय ऱ्हास दृगोचर होऊ लागला.

पाश्चात्याच्या अद्‌भुत तंत्रामुळे युरोपीय मानव वंश बहुप्रसव होऊ शकला. ज्या घटनेपासून या प्रबंधाची सुरवात झाली आणि ज्या घटनेत हे सर्व प्रस्तुत विचार बीजरुपाने सामावलेले आहेत, ती ध्यानात आणा इ. स. ६ व्या शतकापासून सन १८०० पर्यंत युरोपची लोकसंख्या १८ कोटीपेक्षा कधी अधिक नव्हती तीच सन १८०० पासून १९१४ पर्यंत ४६ कोटीच्याही वर गेली. ही उडी आमच्या इतिहासात अपूर्व आहे. तंत्रज्ञान आणि उदार लोकशाही यांच्या संयोगातून संख्यावाचक अर्थाने समुदायमानव निर्माण झाला यांत शंका नाही. परंतु तेच तंत्रज्ञान समुदायमानवाच्या अस्तित्वाला गुणावाचक नव्हे तर व्यंजक अर्थाने जबाबदार आहे हे दाखविण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

मी आरंभीच दर्शविल्याप्रमाणे जनसमुदाय म्हणजे केवळ कामगार समजावयाचा नाही. तो सामाजिक वर्ग दर्शवीत नाही. तर आज सगळ्या सामाजिक वर्गात आढळून येणारा मानवाच तो एक प्रकार आहे. परिणामी तो आमच्या युगाचा प्रतिनिधी असून या युगात त्याचे वर्चस्व आहे आणि राज्यकर्ती सत्ताही तोच आहे. याचा आता हवा तेवढा पुरावा उपलब्ध होत आहे.

आज सामाजिक सत्ता कोण चालवीत आहे? या कालखंडावर मन मानेल ते प्रकार कोण लादीत आहे? मध्यमवर्गीय मानवच यात शंका नाही. त्या मध्यमवर्गातील कोणता गट श्रेष्ठ, कोणता गट सध्याची अभिजनशाही

म्हणून समजली जाते? निःसंशय तंत्रज्ञच-इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षक, भांडवलदार इ. तंत्रज्ञांच्या या समूहाचा सर्वात उत्तम आणि सर्वात अस्सल असा प्रतिनिधी कोण आहे? पुनः निःसंशय वैज्ञानिकच. आकाशातील तेजोगोलावर रहाणारी एखादी व्यक्ती आज जर युरोपला भेट देईल आणि कोणत्या मानवी नमुन्यावरून युरोपविषयी आपले मत बनवावे असा प्रश्न विचारील, तर अनुकूल अभिप्राय मिळेल या खात्रीने खुषीत येऊन युरोप आपल्या वैज्ञानिकाकडे बोट दाखवील. अर्थात त्या तेजोगोलावरील ही व्यक्ती अपवादात्मक मानवांची चौकशी करणार नाही; तर युरोपीय मानव्याचा उच्च बिंदू अशा वैज्ञानिकाच्या नमुन्याचा तो शोध घेईल.

आता यातून निष्पन्न होते ते हे की, प्रत्यक्ष वैज्ञानिक हा समुदाय—मानवाचे आदिरूप आहे. योगायोगाने नव्हे, प्रत्येक विशिष्ट वैज्ञानिकाच्या वैयक्तिक उणीवामुळे नव्हे, तर आमच्या संस्कृतीचे मूळ जे खुद्द विज्ञान त्यानेच आपोआप त्याचा समुदायमानव बनविला आहे. त्याला आदिम मानव, आधुनिक रांगडा मानव बनविले आहे ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पुनःपुनः हे स्पष्ट झाले आहे. पण या गोष्टीचा पूर्ण अर्थ समजण्याला आणि त्याचे गांभीर्य स्पष्ट समजण्याला या प्रबंधात तिला योग्य स्थान मिळाले पाहिजे.

प्रायोगिक विज्ञानाचा आरंभ १६ व्या शतकाच्या अखेरीस झाला (गॅलिलिओ). १७ व्या शतकाच्या शेवटी ते निश्चितपणे प्रस्थापित झाले (न्यूटन). आणि १८ व्या शतकाच्या मध्याला ते वाढीला लागले. कोणत्याही गोष्टीचा विकास म्हणजे त्याची प्रस्थापना नव्हे. विकास निरनिराळ्या गोष्टींवर अवलंबून असतो. म्हणून प्रायोगिक विज्ञानाचे सामुदायिक नाव जे भौतिकशास्त्र त्याच्या प्रस्थापनेमुळे एकत्रीकरणाच्या दिशेने प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली. न्यूटन आणि तत्कालीन इतर व्यक्ती यांचे कार्य या प्रकारचे होते. परंतु भौतिकशास्त्रांच्या वाढीमुळे एकीकरणाला विरोधी अशा स्वरूपाच्या कार्याचा प्रादुर्भाव झाला. प्रगती साधण्यासाठी विज्ञानाला विशेषज्ञतेची गरज भासू लागली. ही विशेषज्ञता खुद्द त्या विज्ञानाची नव्हती, तर वैज्ञानिकाची होती. विज्ञान हे काही विशेषज्ञ नसते. ते तसे असते, तर खरोखरीच स्वतःशी प्रामाणिक राहिले नसते. अनुभवजन्य विज्ञानाचा सामग्र्याने विचार केला तर ते सुद्धा तर्कशास्त्र, गणित, तत्वज्ञान, यापासून वेगळे काढले म्हणजे खरेखुरे विज्ञान म्हणून राहू शकणार नाही. पण वैज्ञानिक कार्य अवश्यतया विशेषीकृत असावेच लागते.

संशोधकांच्या कार्यातील वाढत्या विशेषज्ञतेची प्रक्रिया दर्शवून भौतिक आणि जैविक विज्ञानांचा इतिहास लिहीणे मोठ्या हिताचे आणि प्रथमदर्शनी दिसते त्यापेक्षा अधिक मोठ्या उपयुक्ततेचे होईल. ह्यावरून वैज्ञानिकाच्या मानसिक व्यापाचे क्षेत्र पिढ्यामागून पिढ्या कसे अधिकाधिक संकुचित होत गेले आणि वैज्ञानिक क्रमशः त्यात कसा मर्यादित होत जाऊन कोंडला गेला हे पहाता येईल पण अशा इतिहासावरून स्पष्ट होणारा महत्वाचा मुद्दा हा नसून त्याची उलट बाजू आहे. आपल्या श्रमाचे क्षेत्र-संकुचित करावे लागल्यामुळे प्रत्येक पिढीत वैज्ञानिकाचे संबंध इतर विज्ञान शाखाशी आणि त्याबरोबरच विश्वाच्या एकात्म स्पष्टीकरणाशीही तुटत गेले. असे एकात्म स्पष्टीकरण ही एकच गोष्ट विज्ञान, संस्कृती, युरोपीय सुधारणा या नावाना शोभण्याजोगी आहे.

सुसंस्कृत मानवाला 'विश्वज्ञ' (Encyclopaedic) ही पदवी ज्या काळी मिळाली, तेव्हापासून नेमकी विशेषज्ञतेला सुरवात झाली. १९ व्या शतकाची वाटचाल 'विश्वज्ञ' म्हणून गणल्या गेलेल्या व्यक्तींच्या

अनुक्रमाणिका

मार्गदर्शनाने सुरू झाली. तथापि त्यांच्या निर्मितीवर विशेषतावादाची काहीशी छटा आधीच उमटली होती. पुढच्या पिढीत समतोल बिघडतो आणि विशेषतावादामुळे वैज्ञानिक व्यक्तीपासून संस्कृती हिरावून घेण्याची क्रिया सुरु होते. इ. स. १८९० च्या सुमारास तिसऱ्या पिढीच्या हाती जेव्हा बौद्धिक वर्चस्व येते, तेव्हा इतिहासात अपूर्व अशा वैज्ञानिकांच्या नमुन्याशी आमची गाठ पडते. तारतम्य बुद्धीचा माणूस म्हणून समजल्या जाणाऱ्यापैकी वैज्ञानिक ही अशी एक व्यक्ति आहे की, जिचा केवळ एकाच विज्ञान शाखेशी परिचय असतो. आणि त्या शाखेतसुद्धा ज्या एका कोपऱ्यात तो संशोधक म्हणून कार्य करतो त्याचेच तेवढे त्याला ज्ञान असते. त्याने स्वतः खास करून जोपासलेल्या संकुचित क्षेत्राबाहेर तो कशाचीही दखल घेत नाही; आणि हे देखील आपला एक सद्‌गुण म्हणून तो मिरवीत असतो. ज्ञानाच्या सर्वसाधारण पद्धतीविषयीच्या कोणत्याही जिज्ञासेला तो ‘नाक खुपसणे’ म्हणून नावे ठेवतो.

घडते ते असे की, आपल्या दृश्य क्षेत्राच्या संकुचित मर्यादामध्ये कोंडला गेल्यामुळे प्रत्यक्षात नवी तथ्ये तो शोधून काढतो आणि ज्या विज्ञानाचे त्याला फारच थोडे ज्ञान असते, अशा विज्ञानात प्रगति घडवून आणण्यात तो यशस्वी होतो. त्याच्या अनुषंगाने ज्या विचार—विश्वासंबंधी त्याचे प्रामाणिक अज्ञान असते, त्यात तो भर घालीत असतो. ही गोष्ट कशी शक्य झाली? आणि अद्यापीही कशी शक्य होत आहे? त्यासाठी एका असाधारण आणि निर्विवाद गोष्टीवर भर देणे अवश्य आहे. ती म्हणजे, प्रायोगिक विज्ञान हे आश्चर्यकारक सामान्य दर्जाच्या इतकेच नव्हे, तर त्याहूनही कमी दर्जाच्या माणसांच्या कार्यामुळे प्रगत झाले आहे, हे होय. म्हणजेच आमच्या प्रत्यक्ष संस्कृतीचे मूळ आणि प्रतीक असे जे आधुनिक विज्ञान, त्यात बौद्धिकदृष्ट्या सामान्य दर्जाच्या माणसाला स्थान मिळून यशस्वीपणे कार्य करण्याला वाव मिळतो. याचे कारण यांत्रिकीकारण होय. यांत्रिकीकरणामुळे नवे विज्ञान आणि संस्कृती यांचा मोठा फायदा होतो आणि त्याबरोबरच त्याना सर्वात गंभीर धोकाही पोचतो. विज्ञान संस्कृतीचे मार्गदर्शन करीत असते आणि ते तिचे प्रतिनिधित्वही करते. भौतिक किंवा जैविक विज्ञानाच्या कार्यापैकी बराचसा भाग यांत्रिक—मानसिक क्रियेचा असतो आणि ती क्रिया कोणीही, किंवा प्रायः कोणीही, करू शकतो. संशोधन मोठ्या प्रमाणात व्हावे यासाठी विज्ञानाची छोट्या छोट्या भागात विभागणी करण्यात येते आणि त्यापैकी एका भागामध्ये स्वतःला कोंडून घेऊन आणि बाकी सर्वाचा विचार सोडून देऊन कार्य करणे वैज्ञानिकाला शक्य होते. विज्ञानाच्या पद्धतीमध्ये भरीवपणा आणि अचूकपणा आला आहे. त्यामुळे ज्ञानाची तात्पुरती पण अगदी खरी विभागणी करता येते. यापैकी कोणत्याही एका पद्धतीने यंत्रासारखे कार्य होते आणि विपुल प्रमाणात निष्कर्ष मिळविण्यासाठी त्यांचा अर्थ आणि त्यांचे आधार याविषयी काटेकोर कल्पना असल्याच पाहिजेच असे नसते. अशारीतीने बहुसंख्य वैज्ञानिक हे मोहोळाच्या कोशात रहाणाऱ्या मधमाशीप्रमाणे किंवा घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे आपल्या प्रयोगशाळेच्या अरुंद कोठडीत बंदिस्त राहूनही विज्ञानाच्या सर्वसाधारण प्रगतीला हातभार लावीत असतात.

पण यातूनच मानवाचा अत्यंत विलक्षण असा नमुना निर्माण होतो. जो संशोधक निसर्गाचे नवे तथ्य शोधून काढतो, त्याला सामर्थ्याच्या आणि आत्मप्रतीतीच्या जाणीवेचा अनुभव अवश्यतया येतोच येतो. त्याने स्वतःकडे ‘ज्ञाता’ म्हणून पाहिले, तर ते सकृद्दर्शनी न्यायाचे होईल; आणि वस्तुतः त्याच्यापाशी जे काही थोडे असते त्यात त्याला ज्ञात नसलेल्या इतर गोष्टींची भर घातली, म्हणजे खरोखरीचे ज्ञान तयार होते. विशेषज्ञाचे खरे अंतर्गत स्वरुप असे आहे. विशेषज्ञाने चालू शतकाच्या आरंभी अतिशयोक्तीची अगदी शेवटी तड गाठली.

अनुक्रमाणिका

विशेषज्ञाला विश्वातील त्याचा स्वतःचा चिमुकला कोपरा फारच चांगला 'ज्ञात' असतो; बाकीच्या सर्व गोष्टींबद्दल तो मूलतः अज्ञानी असतो.

विलक्षण नव्या मानवाचे हे तंतोतंत उदाहरण आहे आणि त्याच्या दोन्ही परस्परविरोधी बाजूंची लक्षणे सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे. इतिहासातील अभूतपूर्व असे हे मानवी फलित आहे असे मी म्हटले आहे. विशेषज्ञ हा मानवजातीचे एक नजरेत भरणारे ठळक उदाहरण म्हणून उपयोगी पडतो आणि त्यावरून नाविन्याचे मूलगामी स्वरुप स्पष्ट होते. कारण पूर्वी मानवाची विभागणी केवळ विद्वान आणि अडाणी, कमीअधिक प्रमाणात यातील एक वा दुसरा, अशी करता येत असे. पण हा विशेषज्ञ दोहोपैकी एकाही कोटीत मोडत नाही. तो विद्वान नसतो. कारण त्याच्या विशेषत्वात जे येत नाही, त्या साऱ्याविषयी तो औपचारिकपणे अज्ञानी असतो; पण तो अज्ञानी नसतो; कारण तो 'वैज्ञानिक' असतो आणि विश्वातील आपल्या चिमुकल्या भागाचे त्याला चांगले 'ज्ञान' असते. तो 'विद्वान अडाणी' असतो असेच म्हणावे लागेल. ही तर खरी गंभीर बाब आहे. कारण त्यात तो माणूस अडाणी आहे, हे गर्भित असते. पण नेहमीच्या अडाणी माणसाच्या धर्तीचा नव्हे, तर आपल्या स्वतःच्या खास विषयातील विज्ञानी माणसाच्या मगरूरपणासह तो अज्ञानी असतो.

आणि खरोखरीच विशेषज्ञाची वागणूक अशीच असते. राजकारणात, कलेत, सामाजिक रूढीत आणि इतर विज्ञानात तो आदिम, अज्ञ मानवाची वृत्ती धारण करील. पण तो ती जोरदारपणे आणि आत्मनिर्भरतेने पत्करील. यातील विरोधाभास हा की, त्या क्षेत्रातील विशेषज्ञाना तो मानणार नाही. संस्कृतीने त्याला विशेषीकृत करून पूर्णपणे कवाडेबंद स्थितीत, त्याच्या मर्यादांमध्ये आत्मसंतुष्ट ठेवले आहे. पण आपल्या योग्यतेची आणि वर्चस्व गाजविण्याची आंतरिक जाणीव यामुळे त्याच्या विशेषत्वाच्या क्षेत्राबाहेरही वर्चस्व गाजविण्याला तो उद्युक्त होतो. त्याचा परिणाम असा होतो की, याबाबतीतसुद्धा माणसाची कमालीची पात्रता दर्शविणारी जी गोष्ट म्हणजे विशेषज्ञता आणि म्हणून समुदाय-मानवाच्या अगदी विरुद्ध अशी गोष्ट, तिचा परिणाम म्हणून तो जीवनाच्या सर्व क्षेत्रात अपात्र माणसाप्रमाणे, म्हणजेच समुदाय-मानवाप्रमाणे वर्तन करतो.

हे काही केवळ भरमसाट विधान नव्हे. राजकारण, कला, धर्म व जीवित आणि जगत यांच्या सर्वसाधारण प्रश्नात 'वैज्ञानिक' हे विचार, निर्णय आणि कृति यांच्या बाबतीत मूर्खपणाचे प्रदर्शन कसे करतात, हे ज्या कोणाला हवे असेल, तो पाहू शकेल. अर्थात 'वैज्ञानिक' म्हटला म्हणजे त्याच्या पोटात डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक, भांडवलदार इत्यादि आलेच. दुसऱ्याचे 'न ऐकणे', निर्णय देणाऱ्या वरिष्ठ अधिकरणापुढे मान न तुकविणे ही समुदायमानवाचे वैशिष्ट्य दर्शविणारी वृत्ती मी पुनः पुनः सांगितली असून ती अंशतः पात्र असलेल्या या माणसात नेमकी कळसास पोहोचते. ही माणसे समुदायांच्या प्रत्यक्ष राज्याचे प्रतीक असतात आणि ते राज्य मोठ्या प्रमाणात त्यांचेच बनलेले असते. त्यांचा रानटीपणा हाच युरोपच्या नैतिक अधःपतनाचे सर्वात तात्कालिक कारण आहे. मागच्या शतकाची संस्कृति सर्वस्वी तिच्या स्वतःच्या हिकमतीवर सोडून देण्यात आली होती. त्या संस्कृतीमधून आदिम अवस्थेचा आणि रानटीपणाचा पुनर्जन्म कसा झाला हे पहावयाचे असेल, तर ही माणसे त्याचे अत्यंत स्पष्ट आणि ढळढळीत उदाहरण आहे.

या असमतोल विशेषज्ञतेचा प्रत्यक्ष परिणाम असा झाला आहे की, कोणत्याही काळापेक्षा आज 'वैज्ञानिकांची संख्या' अधिक असूनही इ. स. १७५० च्या मानाने 'सुसंस्कृत' माणसाची संख्या कितीतरी कमी

आहे. सर्वात वाईट हे की, विज्ञानाच्या या घाण्याच्या बैलांच्या योगाने खुद्द विज्ञानाच्या प्रगतीची हमी मिळेनाशी झाली आहे. कारण विज्ञानाची वेळोवेळी पुनर्रचना करण्यासाठी परिश्रम घ्यावे लागतात. असे परिश्रम विज्ञानाच्या प्रगतीचे नियमन करण्यासाठी आवश्यक असतात. मागे मी म्हटल्याप्रमाणे या कार्यासाठी एकत्रीकरणाच्या दिशेने यत्न होण्याची गरज असते, पण ज्ञानाच्या जगात सतत अधिकाधिक विशाल क्षेत्रांची भर पडत असल्यामुळे हे एकत्रीकरण अधिकाधिक बिकट होत आहे. तत्वज्ञानाची फारशी माहिती नसताही न्यूटन भौतिकविज्ञानाची पद्धति स्थापण्याला समर्थ झाला. पण आयन्स्टायनला स्वतःच्या सूक्ष्म विश्लेषणापर्यंत पोहोचण्यापूर्वी कांट आणि माख् यांचे तत्वज्ञान आत्मसात करावे लागले. कांट आणि माख् ही नावे आयन्स्टायनवर प्रभाव पाडणाऱ्या तत्वज्ञानात्मक आणि मानसशास्त्रीय विचारांच्या प्रचंड संभाराची केवळ प्रतीके आहेत. त्यानी आयन्स्टायनचे मन 'मुक्त' करण्याचे कार्य केले आणि नवप्रवर्तनाचा मार्ग खुला केला. पण आयन्स्टायनही पुरेसा नाही. भौतिक विज्ञान आपल्या इतिहासाच्या सर्वात गंभीर अशा संकटावस्थेत प्रवेश करीत आहे आणि पहिल्या पेक्षाही अधिक पद्धतशीर अशा एका नव्या सर्वव्यापी ज्ञानाच्या योगानेच केवळ त्याला वाचविता येणे शक्य आहे.

तेव्हा, विशेषज्ञतेमुळे एका शतकात प्रायोगिक विज्ञानाची प्रगति होऊ शकली. आता ही विशेषज्ञता अशा अवस्थेप्रत येऊन पोहोचली आहे की, यापुढे नव्या पिढीने त्याच चक्रातून फिरण्याऐवजी त्याला अधिक शक्तीशाली स्वरूप प्राप्त करून देण्याचे कार्य हाती घेतले पाहिजे. त्याशिवाय विज्ञानाची प्रगति पुढे चालू राहणार नाही.

परंतु विशेषज्ञ ज्या विज्ञानाची जोपासना करतो, त्याच्या सखोल तत्वज्ञानाविषयी तो अज्ञानी असतो; पण त्यापेक्षाही विज्ञानाच्या सातत्याला आवश्यक असणाऱ्या ऐतिहासिक परिस्थितीबद्दल तो कितीतरी अधिक प्रमाणात मूलतः अज्ञानी असतो. म्हणजेच संशोधकांची परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी समाज आणि मानवी मन ही कशी घडवावी लागतात याविषयी तो अज्ञानी असतो. अलिकडच्या काळात वैज्ञानिक व्यवसायात जी घट दिसून येते, तिचा उल्लेख मी मागे केलाच आहे. अशा कोणालाही ही घट पाहून चिंता वाटेल. नमुनेदार 'वैज्ञानिका'मध्ये साधारणतः संस्कृतीच्या कल्पनेचा अभाव असतो आणि वैज्ञानिक हा तर सध्याच्या सुधारणेचा उच्च बिंदू समजला जातो. पृथ्वीचा पृष्ठभाग आणि आद्ययुगीन जंगल जसे आपोआप अस्तित्वात आले, तसेच संस्कृतीही आयती अस्तित्वात येते अशी त्याची समजूत असते.

∗ ∗

# प्रकरण १३ वे

## राज्यसंस्था—महत्तम संकट

सार्वजनिक कारभार व्यवस्थितरीतीने चालविण्याच्या कामी स्वतः होऊन कृति न करणारा समाजाचा एखादा भाग असेल तर तो जनसमुदायच होय. ते त्याचे जीवीतकार्य असते. तो जगात आला आहे, ते मार्गदर्शन घेण्यासाठी, प्रभावित होण्यासाठी, दुसऱ्याला प्रतिनिधित्व देण्यासाठी, संघटित केला जाण्यासाठी, इतकेच नव्हे, तर समुदाय म्हणून न राहाण्यासाठी सुद्धा, किंबहुना तशी आकांक्षा न बाळगण्यासाठी सुद्धा. पण हे सर्व स्वतः होऊन करण्यासाठी तो जगात आला नाही. स्वतःचे जीवन श्रेष्ठ अल्पजनांच्या एखाद्या उच्च न्यायाधिकरणाकडे सोपविण्याची गरज त्याला भासते. या श्रेष्ठ व्यक्ति कोण आहेत, या प्रश्नाची चर्चा हवी तितकी करता येईल. पण अशा व्यक्तीशिवाय, मग त्या कोणीही असोत, मानवजातीच्या मूलभूत तत्वांचे संवर्धन करण्याचे कार्य थांबेल याविषयी शंका घेण्याचे कारण नाही. मग इतके साधे सत्य समजून घेण्याचे टाळण्यासाठी शहामृगाप्रमाणे आपल्या पंखाखाली डोके खुपसण्यात युरोपचे एक शतक खर्ची पडले तरी चालेल. कारण कमी अधिक नित्याच्या आणि संभाव्य अशा घटनावर आधारलेल्या एखाद्या मताचा येथे आम्ही विचार करीत नसून समाजाच्या 'भौतिक विज्ञाना'च्या एका नियमाचा विचार करीत आहोत. हा नियम न्यूटनच्या भौतिक विज्ञानाच्या नियमापेक्षा कितीतरी अधिक स्थिर आहे. ज्या दिवशी युरोपवर पुनः एकदा एका खऱ्याखुऱ्या तत्वज्ञानाचा [तत्वज्ञानाचे राज्य असावे यासाठी तत्ववेत्त्यांनी राज्यकर्ते होण्याची—प्लेटोने इच्छा दर्शविल्याप्रमाणे—आवश्यकता नाही; किंवा राज्यकर्त्यांनीही—प्लेटोच्या नंतरच्या अधिक माफक इच्छेप्रमाणे—तत्ववेत्ते होण्याची गरज नाही. या दोन्ही गोष्टी, काटेकोरपणे सांगावयाचे तर, अत्यंत घातक आहेत. तत्वज्ञानाचे राज्य होण्यासाठी त्याचे अस्तित्वही पुरेसे आहे. म्हणजे तत्ववेत्त्यांनी तत्ववेत्तेचे राहाणे पुरेसे आहे. कारण जवळजवळ गेले एक शतक तत्ववेत्ते हे सोडून सर्व काही—राजकारणी, पांडित्यजड, साहित्यिक, वैज्ञानिक झाले आहेत.] पगडा बसेल—ही एकच गोष्ट त्याला वाचवू शकेल—त्या दिवशी युरोपला पुनः एकदा जाणीव होईल की, मानवप्राण्याला स्वभावतःच कोणत्या तरी वरिष्ठ अधिकारी व्यक्तीचा शोध घेणे भाग पडते; मग ते त्याला आवडो वा नावडो. असे तत्वज्ञान शोधण्यात जर तो स्वतः यशस्वी झाला, तर तो श्रेष्ठ दर्जाचा मानव ठरेल. नाहीतर तो समुदायमानवच राहील आणि मग त्याला ते तत्वज्ञान त्याच्यापेक्षा वरिष्ठ असलेल्याकडूनच स्वीकारावे लागेल.

म्हणून जनसमुदायाने स्वतः होऊन कृति करण्याच्या हक्काचा दावा करणे म्हणजे स्वतःच्या नियतीविरुद्ध बंड करणे होय. सध्या तो हेच करीत आहे. म्हणून झुंडीच्या बंडासंबंधी मला बोलावे लागत आहे. कारण शेवटी, खऱ्या अर्थाने आणि बव्हंशाने त्यालाच बंड म्हणता येते की, ज्यात स्वतःची नियति न स्वीकारण्याचा, स्वतःविरुद्ध बंड करण्याचा, अंतर्भाव असतो. ल्युसिफर या श्रेष्ठ देवदूताने देव होण्याचीही त्याची नियति नव्हती—धडपड करण्याऐवजी अत्यंत कनिष्ठ दर्जाचा देवदूत होण्याची—हीही तितकीच त्याची नियति नव्हती—धडपड केली असती, तरीही त्याचे बंड कमी प्रतीचे ठरले नसते. (ल्युसिफर हा टॉलस्टॉयप्रमाणे रशियन असता, तर कदाचित त्याने सर्वात कनिष्ठ देवदूत होण्याचे दुसऱ्या प्रकारचे बंड करणे पत्करले असते; निदान दुसऱ्या अधिक प्रसिद्ध बंडापेक्षा देवाविरुद्ध बंड करणे त्याने अधिक पसंत केले असते.)

जनसमुदाय ज्यावेळी स्वतः होऊन कृति करतो, त्यावेळी त्याचा मार्ग एकच असतो. कारण त्याच्यापाशी दुसरा मार्गच नसतो. तो दुर्विहित वध करतो. (Lynch). 'लिंच कायदा' अमेरिकेतून यावा हा काही सर्वस्वी योगायोग नव्हे. कारण एकप्रकारे अमेरिका हा जनसमुदायांचा स्वर्ग आहे. सध्या जनसमुदाय विजयी

अनुक्रमाणिका

होत असताना हिंसेचा विजय व्हावा, ती एकमेव प्रमाण ठरावी, तिचा एकच सिद्धांत बनावा, यात विशेष आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. थोड्या वेळापूर्वी नित्याची स्थिती म्हणून हिंसेच्या या वाढीकडे मी लक्ष वेधले होते. [Vide Espana Invertebrada, 1912.] आज हिंसेची वाढ पूर्णतेला पोहोचली आहे हे लक्षण चांगले आहे. कारण त्याचा अर्थ ती आता आपोआप उताराला लागण्याच्या बेतात आहे. आज हिंसेचे गोडवे वक्तृत्वपूर्ण रीतीने गाईले जातात आणि पोकळ वाचाळानी हे गोडवे गाण्याचे काम स्वतःकडे घेतले आहे. मानवी अस्तित्व जेव्हा एका ऐतिहासिक क्रमातून पार पडते, त्याचे तारू खडकावर आपटून जेव्हा नष्ट होते, तेव्हा लाटा तिला त्या पोकळ शब्दांच्या किनाऱ्यावर फेकून देतात आणि तेथेच तिचे कलेवर दीर्घकाल पडून राहते. पोकळ वक्तृत्व म्हणजे मानवी अस्तित्वाची स्मशानभूमी, निदान वृद्धाश्रम तरी होय. मागे रहाते ते नाव तेवढेच आणि ते नाव म्हणजे केवळ शब्द; आणि शब्द असले, तरी अखेरीस निदान शब्द म्हणून त्यांच्यामध्ये काहीतरी जादूच्या शक्तीचा अंश रहातोच.

परंतु उपेक्षावृत्तीने प्रस्थापित झालेल्या हिंसेच्या राज्याची प्रतिष्ठा उताराला लागली आहे हे संभवनीय आहे. तरी पण दुसऱ्या एखाद्या स्वरुपात अद्याप त्या राज्यात आम्हास रहावे लागेल. युरोपीय संस्कृतीला भेडसावणाऱ्या अत्यंत गंभीर संकटाचा मी येथे उल्लेख करीत आहे. तिला भेडसावणाऱ्या इतर सर्व संकटाप्रमाणेच हेही खुद्द त्या संस्कृतीतूनच जन्माला आलेले संकट आहे. याहीपेक्षा अधिक म्हणजे त्यातच तिचा गौरव सामावलेला आहे : आम्हाला ज्ञात असलेली राज्यसंस्था. गेल्या प्रकरणात विज्ञानासंबंधी जे सांगितले त्याची प्रतिकृतिच येथे आमच्यासमोर उभी रहाते : विज्ञानाच्या तत्वांच्या सुपीकतेमुळे अचाट प्रगति घडून येते, पण त्यामुळे अटळपणे विशेषज्ञता लादली जाते आणि त्यामुळेच विज्ञानाची गळेचेपी होण्याचा धोका असतो.

हीच गोष्ट राज्यसंस्थेच्या बाबतीत घडत आहे. सर्व युरोपीय राष्ट्रात १८ व्या शतकाच्या अखेरीस राज्यसंस्था काय होती हे मनात आणा. एक अगदी मामुली बाब! आरंभीची भांडवलशाही आणि तिच्या औद्योगिक संस्था यामध्ये एक सूत्रबद्ध तंत्र अगदी प्रथम यशस्वी झाले आणि त्यामुळेच समाज वाढण्याला सुरवात झाली. एक नवा सामाजिक वर्ग उदयाला आला. पूर्वीच्या वर्गापेक्षा हा वर्ग संख्येने आणि सामर्थ्याने अधिक मोठा होता. हाच तो मध्यमवर्ग. या चाणाक्ष मध्यम वर्गाजवळ इतर सर्वांपेक्षाही अधिक अशी एक गोष्ट होती. बुद्धिमत्ता, व्यवहारी बुद्धिमत्ता. संघटना कशी बांधावी, शिस्त कशी राखावी, आपल्या यत्नात सातत्य आणि सुसंगति कशी ठेवावी, हे त्याला चांगले माहीत होते. या मध्यम वर्गामधून एखाद्या महासागरातल्याप्रमाणे 'राज्यनौका' आपला धोक्याचा मार्ग सुरळीतपणे आक्रमित होती. राज्यनौका हे रूपक भांडवलदार वर्गाने नव्याने शोधून काढलेले आहे. या वर्गाला आपण स्वतः महासागराप्रमाणे विशाल सर्व शक्तिमान आणि वादळी आहो, असे वाटत होते. मागे सांगितल्याप्रमाणे ही नौका म्हणजे एक मामुली व्यवहार होता. तिच्यापाशी क्वचितच सैन्य, नोकरशाही वा पैसा असे. मध्ययुगात भांडवलदार वर्गाहून अगदीच भिन्न अशा वर्गाने—सरदार वर्गाने—ती नौका बांधली होती. या वर्गाचे धैर्य, त्याच्या अंगच्या नेतृत्वाच्या देणग्या, त्याची जबाबदारीची जाणीव, या गोष्टी कौतुकास्पद होत्या. त्यांच्याशिवाय आज युरोपीयन राष्ट्रे अस्तित्वात आली नसती. पण हृदयाचे हे सारे गुण अंगी असूनही सरदार वर्गापाशी डोक्याच्या गुणांचा अभाव होता आणि हा अभाव सदैव रहात आला आहे. त्याची बुद्धिमत्ता मर्यादित होती आणि तो भावनाप्रधान असून सहजप्रवृत्तीने, अंतःप्रेरणेने वागणारा, थोडक्यात म्हणजे 'तर्कविहीन' होता. म्हणून कोणत्याही तंत्राचा विकास करण्याला तो असमर्थ

होता. कारण त्यासाठी तर्कसंगत विचार करण्याची गरज असते. बुंदकीच्या दारूचा शोध तो लावू शकला नाही. नवीन शस्त्रांचा शोध लावण्याच्या कामी हा सरदार वर्ग असमर्थ ठरल्यामुळे भांडवलदारांना पूर्वेकडून अथवा दुसऱ्या कोठून तरी त्यानी मिळवून आणलेल्या दारूच्या सहाय्याने सरदार योद्ध्यांचा सहजासहजी लढाईत पराभव करता आला. हा सरदार योद्धा अस्सल घोडेस्वार होता. लोखंडी चिलखत वापरण्याचा मूर्खपणा तो करीत होता. त्यामुळे त्याला युद्धात क्वचितच चपळ हालचाल करता येत असे. युद्धकलेचे सनातन गुपित चढाई करण्याच्या पद्धतीत जितके असते, तितके ते संरक्षक पद्धतीत नसते, याची कल्पना त्याला कधीही आली नाही. या रहस्याचा शोध नेपोलियनच्या हातून व्हावयाचा होता. [सरदार वर्गाच्या वर्चस्वाऐवजी भांडवलदार वर्गाचे वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या महान ऐतिहासिक परिवर्तनाचे चित्र प्रामाणिकपणे रंगविल्याबद्दल आम्ही रांकेचे ऋणी आहोत. पण त्याची पूर्ण सत्यता पटण्यासाठी त्याच्या प्रतिकात्मक रेखीव आराखड्यात भर घातली पाहिजे. बंदुकीच्या दारूची माहिती अनादिकालापासून होती. नळीत दारू भरून ती उडविण्याचा शोध लोंबार्डीमधील कोणा एकाने लावला होता. त्यानंतरही ओतीव गोळ्याचा शोध लागेपर्यंत त्याचा प्रभाव पडला नव्हता. सरदार लोक लहान प्रमाणात बंदुकीचा वापर करीत असत. पण ते त्याना महागात पडे. केवळ भांडवलशाही सैन्येच अधिक चांगल्या आर्थिक संघटनेच्या जोरावर त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात करू शकली. सरदारांच्यावतीने आलेल्या मध्ययुगीन धर्तीच्या बर्गंडीच्या सैन्याचा नव्या सैन्याने निखालस पराभव केला हे अक्षरशः खरे आहे. हे सैन्य धंदेवाईक नसून स्विस लोकानी तयार केलेले भांडवलशाही सैन्य होते. त्यांची मूळची शक्ती नव्या शिस्तीत आणि रण नीतीच्या नव्या संयोजनात होती.]

राज्यसंस्था ही तांत्रिक म्हणजे सार्वजनिक सुव्यवस्था आणि प्रशासनाची बाब असल्यामुळे 'जुनी राजवट' १७ व्या शतकाच्या अखेरीस अतिशय दुर्बल झाली होती. सर्वव्यापी सामाजिक बंडानी तिला चोहोबाजूनी वेढून त्रस्त करून सोडले होते. राज्यसत्ता आणि समाजाची सत्ता यांच्यातील व्यस्त प्रमाण यावेळी इतके वाढले होते की, शार्लमेनकालीन स्थितीशी या स्थितीची तुलना करता १८ वे शतक हे अधोगतीचे भासते. कॅरोलिंजियन राज्य हे अर्थात १६ व्या लुईच्या राज्यापेक्षा कितीतरी कमी सामर्थ्यशाली होते. पण दुसऱ्या बाजूने त्याच्या भोवतालचा समाज पूर्णतः दुबळा बनला होता. समाजाची शक्ती आणि राजशक्ती यांच्यातील प्रचंड व्यस्त प्रमाणामुळे १७८९ ची 'महान क्रांति' तसेच १८४८ पर्यंतच्या इतर क्रांत्या शक्य कोटीत आल्या. [या मुद्यावर भर देत असताना युरोपमधील अनियंत्रित राजसत्तेचे युग आणि अतिदुर्बल राज्यसंस्था ही एकत्र जुळून आली होती हे स्पष्ट करणे उचित होईल. याचे स्पष्टीकरण कसे करावयाचे? राज्य हे जर सर्वशक्तिमान, 'अनियंत्रित' होते, तर ते स्वतः अधिक बलवान का झाले नाही? त्याचे एक कारण मागे दर्शविल्याप्रमाणे रक्ताच्या उमरावशाहीची असमर्थता, तंत्राची, संघटनेची, नोकरशाहीची असमर्थता हे होय. पण एवढेच पुरेसे नाही. याशिवाय असेही घडले की, अनियंत्रित राज्य आणि उमरावशाह्या यांना सर्वसाधारण समाजाचा बळी घेऊन राज्याचा बडेजाव माजवावयाचा नव्हता. सामान्य समजुतीच्या उलट अनियंत्रित राज्य आमच्या लोकशाही राज्यापेक्षा सहजप्रवृत्तीने समाजाला कितीतरी अधिक मान देत असे. लोकशाही राज्य अधिक शहाणे आहे, पण त्याला ऐतिहासिक जबाबदारीची जाणीव कमी आहे.]

पण या महान क्रांतीबरोबर मध्यमवर्गाने सार्वजनिक सत्ता हस्तगत करून आपल्या अंगचे निर्विवाद गुण राज्याच्या कामी उपयोगात आणले. एका पिढीच्या आत त्याने बलाढ्य राज्य निर्माण केले आणि या राज्याने क्रांत्यांचा शेवट केला. सन १८४८ नंतर म्हणजे भांडवलशाही शासनाच्या दुसऱ्या पिढीची सुरवात झाल्यानंतर युरोपमध्ये खऱ्या क्रांत्या झाल्याच नाहीत. त्यासाठी लागणाऱ्या प्रेरणा नव्हत्या, म्हणून खचित नव्हे; तर त्यासाठी लागणारी साधने नव्हती म्हणून. राज्यसत्ता सामाजिक सत्तेच्या पातळीवर आणली गेली. क्रांत्यांना कायमचा रामराम ठोकण्यात आला! आता युरोपमध्ये एकच गोष्ट शक्य आहे आणि ती याच्या विरुद्ध आहे : अकस्मात उलथापालथ. यानंतरच्या काळात जे सर्व क्रांतिसदृश प्रयत्न झाले त्या सर्व प्रच्छन्न 'अकस्मात उलथापालथी' होत्या.

सध्याच्या काळी राज्य हे एक जबरदस्त यंत्र झाले असून ते अद्भुतरीतीने कार्य करीत असते. त्याच्या सांधनांची संख्या आणि त्यांचा अचूकपणा यांच्या योगाने या यंत्राची कार्यक्षमता आश्चर्यकारक झाली आहे.

अनुक्रमाणिका

समाजात एकदा हे यंत्र प्रस्थापित झाले म्हणजे मग कळ दाबली की पुरे, त्याच्या अवाढव्य तरफांचे कार्य सुरू होते आणि सामाजिक चौकटीच्या कोणत्याही भागावर त्यांची प्रचंड सत्ता अमलात येते.

सद्यःकालीन राज्य ही चटकन् नजरेत भरणारी आणि सर्वांच्या परिचयाची अशी संस्कृतीची निर्मिति आहे. समुदायमानवाने त्यासंबंधी धारण केलेली वृत्ती लक्षात घेणे हा मनोवेधक अनुभव आहे. तो त्याकडे पहातो, त्याचे कौतुक करतो, ते आयते 'तेथे आहे' आणि आपल्या अस्तित्वाचे कवच आहे हे त्याला माहीत असते. परंतु राज्य ही विशिष्ट मानवांनी शोधून काढलेली मानवी निर्मिति असून तिचे रक्षण ज्या विशिष्ट गुणानी आणि मूलभूत वैशिष्ट्यानी होत असते, आणि ते गुण कालच्या मानवापाशी होते, पण उद्या हवेत विरून जाणार आहेत, या गोष्टीची त्याला जाणीव नसते. शिवाय समुदायमानवाला राज्यामध्ये एक अनामिक सत्ता दिसते आणि तिच्याप्रमाणे स्वतःही अनामिक आहो असे त्याला वाटत असल्यामुळे राज्य हे आपले स्वतःचेच असे काहीतरी आहे असे त्याला वाटते. कल्पना करा की, एखाद्या देशाच्या सार्वजनिक जीवनात काही अडचण, काही संघर्ष, काही समस्या उद्‌भवल्या आहेत. अशावेळी राज्याने ताबडतोब हस्तक्षेप करून आपल्या प्रचंड व अजिंक्य साधनानी त्या सोडविण्याचे कार्य प्रत्यक्षपणे हाती घ्यावे, अशी मागणी करण्याला समुदायमानव तात्काळ प्रवृत्त होईल.

आज संस्कृतीला भेडसावणारे हे अत्यंत गंभीर संकट आहे : राज्याचा हस्तक्षेप; राज्याने सगळे उत्स्फूर्त सामाजिक प्रयत्न म्हणजेच उत्स्फूर्त ऐतिहासिक कृति स्वतःकडे खेचून घेणे; ही ऐतिहासिक कृति शेवटी मानवी नियतींचा सांभाळ करते, त्याचे पोषण करून त्याना कार्यप्रवृत्त करते. जनसमुदायावर जेव्हा एखादी आपत्ति कोसळते किंवा कोणती तरी तीव्र भूक जेव्हा त्याला जाणवते, तेव्हा त्याला मोह पडतो तो केवळ कळ दाबून प्रचंड यंत्राला गति देऊन प्रत्येक गोष्ट प्रयास, झगडा, संशय किंवा धोका यांच्याविना कायमची आणि निश्चित मिळविण्याचा. जनसमुदाय स्वतःशीच म्हणत असतो: 'राज्य? मी स्वतःच राज्य आहे' (L'Etat, C'estmoi'), ही तर घोडचूक. दोन माणसे आहेत, पैकी एकाचेही नाव जॉन नाही, म्हणून ते एकच आहेत असे ज्या अर्थाने म्हणता येते, त्याच अर्थाने राज्य आणि जनसमुदाय ही एक आहेत. सद्यःकालीन राज्य आणि जनसमुदाय ही केवळ अनामिकतेत एकमेकाशी जुळतात. पण आपण राज्य आहो अशी समुदायमानवाची खरोखरीच श्रद्धा असते; आणि राज्याची यंत्रणा कोणत्यातरी सबबीवर चालू ठेवावी, तीत अडथळा आणणाऱ्या—राजकारणात, विचारात, उद्योगधंद्यात दुसऱ्या कोणत्याही व्यवहारात—अडथळा आणणाऱ्या सर्जनशील अल्पजनाना त्या यंत्रणेखाली चिरडून टाकण्याकडे तो अधिकाधिक प्रवृत्त होतो.

ही प्रवृत्ती घातक ठरेल. उस्स्फूर्त सामाजिक कार्यात राज्याच्या हस्तक्षेपामुळे पुनःपुनः खंड पडेल. कोणत्याही नव्या बीजाला फळ येणार नाही. राज्याकरताच समाजाला आणि शासन यंत्रणेकरताच मानवाला जगणे भाग पडते. आणि शेवटी राज्य हे केवळ एक यंत्र आहे आणि त्याचे अस्तित्व आणि निर्वाह त्याच्या भोवतालच्या कणखर आधारांवर अवलंबून असते, त्यामुळे राज्याने समाजाचा जीवनरसच शोषून घेतल्यानंतर जे मागे राहील, ते चेतनाहीन सांगडा, यंत्रावरील गंजाप्रमाणे निकामी, प्रेतापेक्षाही भयानक असेल.

प्राचीन संस्कृतीचे भवितव्य असेच शोचनीय होते. जुलाय आणि क्लॉडाय यांनी निर्मिलेले साम्राज्यशाही राज्य हे एक प्रशंसनीय यंत्र होते. केवळ एक संघटना या दृष्टीने उच्चकुलीन घराण्यांच्या प्राचीन गणराज्यापेक्षा

अनुक्रमाणिका

ते अतुलनीय श्रेष्ठ दर्जाचे होते. पण विचित्र योगायोग असा की, ते पूर्ण विकासावस्थेप्रत पोचते, न पोचते तोच समाजसंस्थेचा ऱ्हास सुरू झाला.

अँटोनाइनच्या काळी (दुसरे शतक) राज्याच्या चैतन्यहीन सार्वभौमत्वाने समाज दबला जातो. समाज गुलाम बनू लागतो. राज्याची चाकरी केल्याशिवाय तो जगूच शकत नाही. सगळ्या जीवनाचे नोकरशाहीकरण होते. याचे परिणाम कोणते? जीवनाच्या नोकरशाहीकरणामुळे सर्व क्षेत्रामध्ये संपूर्ण अधोगति सुरू होते, संपत्तीला ओहोटी लागते; जनन घटते. मग स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी राज्य मानवी जीवनाचे नोकरशाहीकरण अधिकच पुढे रेटीत नेते. नोकशाहीकरणाची ही चढती कमान म्हणजे समाजाचे लष्करीकरणच. राज्याची अत्यंत तातडीची गरज म्हणजे त्याची युद्धयंत्रणा, त्याचे सैन्य. सर्वप्रथम सुरक्षितता देते ते राज्यच होय. (या सुरक्षिततेतूनच समुदाय–मानव जन्माला आला, हे लक्षात ठेवले पाहिजे) म्हणूनच तर सैन्य हवे. मूळचा आफ्रिकेचा सेवेरी जगाचे लष्करीकरण करतो. व्यर्थ खटाटोप! दैन्य वाढत जाते; दिवसेंदिवस स्त्रिया कमी फलद्रूप होतात. सैनिकांचीसुद्धा उणीव भासू लागते. सेवेरीच्या काळानंतर परदेशातून सैन्यभरती करणे भाग पाडते.

राज्यवादाची (Statism) प्रक्रिया विरोधाभासी आणि शोकांत असते याची जाणीव आता तरी होते का? अधिक चांगले जगता यावे यासाठी साधन म्हणून समाज राज्य निर्माण करतो. पुढे राज्याचा वरचष्मा होतो आणि समाजाला राज्याकरता जगणे भाग पडू लागते. [सेप्टिमस सेवेरूस याने आपल्या मुलाजवळ काढलेल्या उद्‌गारांची आठवण ठेवा : 'एकीने रहा. सैनिकांना वेतन द्या आणि बाकी कशाचीही पर्वा करू नका.'] राज्य हे काही झाले तरी समाजातील व्यक्तींचेच बनलेले असते. पण त्या व्यक्ती राज्य सांभाळण्याला अपुऱ्या पडतात. प्रथम दाल्मेशियन आणि नंतर जर्मन येतात. हे सर्व परके लोक राज्याचा ताबा घेतात. आणि बाकीच्या सर्व समाजाला, मूळच्या सामान्य जनतेला, त्यांचे दास, ज्या लोकांशी काहीही समान नसते अशांचे दास म्हणून जगावे लागते. राज्याचा हस्तक्षेप शेवटी नेतो तो याकडे : केवळ राज्यरूपी यंत्राला पोसण्यासाठी लोकांचे जळणात रूपांतर करणे. सांगाडाच स्वतःभोवतालचे मांस खाऊन टाकतो; बांधकामासाठी उभारलेली परांचीच घराची भाडेकरू आणि मालकही बनते.

हे एकदा पटल्यानंतर मुसोलिनी जेव्हा 'सगळे काही राज्याकरता, राज्याबाहेर काहीही नाही, राज्याविरूद्ध काहीही नाही' या सूत्राचा पुकारा करतो आणि इटलीने नुकताच लावलेला आश्चर्यकारक शोध म्हणून जाहीर करतो, तेव्हा ते ऐकून कोणीही गोंधळातच पडेल. फासीवाद हा समुदायमानवाची नमुनेदार चळवळ आहे, हे स्पष्ट होण्याला एवढेच पुरेसे आहे. मुसोलिनीला गौरवास्पद राज्ययंत्र मिळाले होते, त्याने निर्मिलेले नव्हे, तर नेमके ज्या विचारांशी तो झगडत होता त्यानीच म्हणजे उदार लोकशाहीने निर्मिलेले राज्य त्याला मिळाले. ते कठोरपणे वापरण्यासाठी तो स्वतः बद्ध होतो आणि त्याच्या कार्याच्या सविस्तर तपासणीत न शिरताही निर्विवादपणे सांगता येते की, आजपर्यंत त्याला साध्य झालेल्या कार्याची तुलना उदारमतवादी राज्याच्या राजकीय आणि शासकीय कार्यातून निष्पन्न होणाऱ्या परिणामांशी होऊ शकत नाही. मुसोलिनीला जर काही यश मिळालेच असेल, तर ते इतके सूक्ष्म, दिसायला इतके अल्प आणि इतके सत्वहीन आहे की, ते राज्ययंत्र संपूर्णपणे वापरण्याकरिता ज्या असाधारण सत्ता त्याने धारण केल्या, त्यामुळे झालेली हानी भरून निघणे कठीण आहे.

हिंसा आणि प्रत्यक्ष कृति यांची मानके म्हणून प्रस्थापना झाल्यानंतर त्यांनी धारण केलेले उच्चतर रूप म्हणजेच राज्यवाद होय. राज्याच्या या अनामिक यंत्राच्या द्वारे आणि त्याच्या सहाय्याने जनसमुदाय स्वतः होऊन कृति करतात. युरोपीय राष्ट्रांसमोर त्यांच्या अंतर्गत जीवनातील मोठ्या अडचणींचा काळ उभा आहे. त्यांच्यासमोर कायदा, अर्थकारण, सार्वजनिक व्यवस्था यांचे कमालीच्या जिकीरीचे प्रश्न उभे आहेत. जनसमुदायांचे राज्य व्यक्ती आणि गट यांचे स्वातंत्र्य चिरडून टाकण्याचा प्रयत्न करील आणि अशाप्रकारे भविष्यकाळ निश्चितपणे धोक्यात आणील असे वाटल्यावाचून राहात नाही.

या राज्यवादाचे प्रत्यक्ष उदाहरण गेल्या वर्षातील एका अत्यंत धोक्याच्या घटनेत आढळून येते. सर्व देशांच्या पोलीसदलात झालेली प्रचंड वाढ. लोकसंख्येच्या वाढीमुळे ही वाढ अटळपणे आवश्यक झाली. या गोष्टीला आपण कितीही सरावलो असलो, तरी एका भयंकर विरोधाभासाकडे आम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही; तो म्हणजे आधुनिक मोठ्या शहरातील लोकसमूहाना शांततेने हिंडता फिरता यावे, आपल्या व्यवसायाकडे नीट लक्ष देता यावे, यासाठी रहदारीचे नियमन करण्याकरता पोलीसदलाची अवश्यतया गरज असते. पण 'कायदा आणि सुव्यवस्थे'च्या पक्षाची अशी जर कल्पना असेल की सुव्यवस्था राखण्याकरता निर्माण झालेली ही 'सार्वजनिक सत्तेची दले' पक्षाच्या इच्छेप्रमाणेच सुव्यवस्था राखण्यात सदैव समाधान मानून राहतील, तर तो त्यांचा मूर्खपणा ठरेल. ती दले शेवटी स्वतःच निर्णय घेऊन कोणती व्यवस्था लादावयाची हे ठरवितील हे अटळ आहे; आणि स्वाभाविकपणेच ती व्यवस्था त्याना सर्वात जास्त सोयीस्कर अशीच ठरेल.

या विषयाला आता हात घातला आहे, ही संधि साधून एका सार्वजनिक गरजेवर प्रकट झालेल्या विविध समाजांच्या निरनिराळ्या प्रतिक्रिया पहाणे उचित होईल. इ. स. १८४० च्या सुमारास ज्यावेळी नव्या उद्योगधंद्यात पारंपरिक प्रकारापेक्षा गुन्हेगारीकडे अधिक झुकणारा असा नवा मानवी नमुना—औद्योगिक कामगार—निर्माण व्हावयाला सुरवात झाली. त्यावेळी फ्रान्सने लगेच फार मोठे पोलीसदल निर्माण केले. इ. स. १८१०च्या सुमारास इंग्लंडमध्येही याच कारणाकरता गुन्हेगारीची वाढ झाली. आपल्यापाशी पोलीसदल नाही, याची जाणीव इंग्रजांना अकस्मात होते. कान्सर्वेटिव्ह पक्ष अधिकारारूढ असतो. तो काय बरे करतो? पोलीसदल स्थापन करण्याचे पसंत करतो? छे, तसे काहीही नाही. तो गुन्हेगारी जितकी सहन करता येईल तितकी सहन करण्याचे पसंत करतो. 'स्वातंत्र्याप्रीत्यर्थ द्यावे लागणारे मोल असे समजून लोक ही अव्यवस्था तशीच चालू देण्यात समाधान मानतात.' जॉन विल्यम वार्ड लिहितो, 'पॅरिसमध्ये प्रशंसनीय पोलीसदल आहे. परंतु त्याचे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी त्यांना जबर किंमत द्यावी लागते. घरी होणाऱ्या पोलीसांच्या फेऱ्या, त्यांची पाळत आणि फूशेच्या इतर सर्व कारवाया यांच्यापुढे मान तुकवण्यापेक्षा रॅट्क्लिफ पथावर प्रत्येक ३/४ वर्षांनी ५/१० माणसांचे मुडदे पडलेले पाहणे मी पसंत करतो. [Vide Elie Halevy, Historie du peuple, anglais an XIX siecle, Vol. 1, P. 40.] राज्यासंबंधीच्या या दोन परस्पर विरुद्ध कल्पना आहेत. राज्याने स्वतःला मर्यादा घालून घ्याव्यात अशी इंग्रज माणसाची मागणी असते.

* *

# प्रकरण १४ वे

## जगावर कोण राज्य करतो ?

मी पुनः पुनः सांगत आलो आहे की हे झुंडीचे बंड युरोपीय संस्कृतीतून आपोआप निर्माण झाले आहे. एका दृष्टिकोणातून पहाता या घटनेची एक बाजू अत्यंत अनुकूल आहे हे मी पूर्वी नमूद केले आहे. झुंडीचा उठाव आणि आजच्या काळी मानवी जीवनात झालेली कल्पनातीत वाढ ही एकच गोष्ट आहे. परंतु याच घटनेची उलट बाजू भयावह आहे. ती म्हणजे मानव जातीचे झालेले आमूलाग्र नैतिक अधःपतन याखेरीज दुसरे काहीही नाही. या दुसऱ्या बाजूचा आपण आता एका नव्या दृष्टीकोणातून विचार करूया.

(१)

एखाद्या नव्या ऐतिहासिक कालखंडाचे सार किंवा स्वरूप ही अंतर्गत बदलांची म्हणजे मानव आणि त्याचा आत्मा यांच्यातील बदलांची परिणति असते. किंवा ती बाह्य बदलांची म्हणजे आकारिक आणि जणू काही यांत्रिक बदलांची परिणति असते. बाह्य बदलामध्ये सत्तेचे विस्थापन हे निःसंशय अत्यंत महत्वाचे असते. येथेच आम्ही आत्म्याच्या विस्थापनाकडे येऊन पोचतो.

परिणामतः ज्यावेळी एखादा कालखंड समजून घेण्याकरिता त्याची तपासणी करण्यात आम्ही सुरवात करतो, त्यावेळी आमचा पहिला प्रश्न हा असला पाहिजे: त्याकाळी जगात शासन कोण करीत आहे? असेही घडेल की, मानवजात भिन्नभिन्न समूहात परस्पर कोणतेही दळणवळण नसता विखुरलेली असते. अशावेळी तिच्या अंतर्गत स्वतंत्र अशी जगे तयार झालेली असतात. मिल्टिआडिसच्या काळी भूमध्यसागरी जगाला अतिपूर्व जगाची माहितीही नव्हती. अशा वेळी 'जगावर कोण राज्य करतो?' हा आमचा प्रश्न प्रत्येक पृथक समूहाच्या संदर्भात विचारावा लागेल. परंतु १६ व्या शतकापासून मानवजातीने एका विशाल एकीकरणाच्या प्रक्रियेला सुरवात केली आहे आणि या प्रक्रियेने आजच्या काळी शेवटची मर्यादा गाठली आहे. आता अलग राहिलेला असा मानवजातीचा कोणताही भाग नाही, आता मानवी अस्तित्वाची बेटे नाहीत. परिणामी, त्या शतकानंतर जो कोणी जगावर राज्य करीत आला आहे, तो खरोखरीच सगळ्या जगावर अधिकारयुक्त प्रभाव गाजवीत आला आहे असे म्हणता येईल. गेल्या तीन शतकात युरोपीय लोकांच्या एकजिनसी समूहाने हीच भूमिका वठविली आहे. युरोप हा राज्यकर्ता होता. त्याच्या हुकमतीच्या ऐक्याखाली जग एकत्रित राहिले किंवा निदान क्रमशः एकत्रित होत गेले. अस्तित्वाच्या या पद्धतीला सामान्यतः 'आधुनिक युग' असे नाव देण्यात आले आहे. हे नाव रंगहीन आणि मूक असून त्यात 'युरोपीय नेतृत्वाचे युग' ही वस्तुस्थिती दडलेली आहे.

येथे राज्य करणे म्हणजे प्रत्यक्ष सत्तेचा, शारीरिक जबरदस्तीचा वापर, असे मुख्यतः समजावयाचे नाही. येथे आम्ही वेडगळ कल्पना, निदान अधिक ढोबळ आणि उघड वेडगळ कल्पना टाळण्याचा प्रयत्न करीत आहोत. 'राज्य' म्हणून समजला जाणारा माणसामाणसातील स्थिर आणि नित्याचा संबंध हा कधीही बलावर आधारलेला नसतो. उलट एखादा माणूस किंवा गट सत्ता चालवितो याच कारणामुळे त्याच्या दिमतीला 'सेनाबल' या नावाने ओळखले जाणारे सामाजिक साधन वा यंत्रणा असते. सत्तेचा पाया बलात असतो असे

अनुक्रमाणिका

प्रथमदर्शनी दर्शविणारी उदाहरणे बारकाईने तपासली, म्हणजे ती आमचे प्रमेय सिद्ध करणारी उत्कृष्ट उदाहरणे आहेत हे समजून येते. नेपोलियनने स्पेनमध्ये आक्रमक सैन्य घुसविले. काही काळ त्याने आक्रमण चालू ठेवले. पण खरे सांगावयाचे म्हणजे त्याने एकही दिवस राज्य केले नाही. तेही त्याच्यापाशी सेना असूनही आणि सेना होती याच नेमक्या कारणाकरता. आक्रमणाची प्रक्रिया आणि राज्याचे अस्तित्व यांच्यामध्ये भेद करणे अवश्य आहे. राज्य करणे म्हणजे सत्तेचा नित्य वापर करणे होय; आणि राज्य नेहमी लोकमतावर आधारलेले असते, मग ते आज असो, हजार वर्षापूर्वी असो, इंग्रज लोकात असो वा बुशमनमध्ये असो. लोकमताशिवाय मूलतः दुसऱ्या कोणत्याही गोष्टीच्या आधाराने या पृथ्वीवर कोणीही राज्य केले नाही.

लोकमताचे सार्वभौमत्व हा दांतों या कायदेपंडिताला इ.स. १७८९ मध्ये किंवा सेंट थोंमास अक्वायनासला १३ व्या शतकात लागलेला शोध आहे असे वाटण्याचा संभव आहे. या सार्वभौमत्वाच्या कल्पनेचा शोध या ठिकाणी, वा त्या ठिकाणी, या काळी वा त्या काळी लागला असे झालेही असेल. पण मानवी समाजात राज्य ही घटना निर्माण करणारी पायाभूत शक्ति लोकमत आहे हे तथ्य मानवजातीइतकेच पुरातन आणि चिरस्थायी आहे. न्यूटनच्या भौतिक विज्ञानात गुरुत्वाकर्षण ही गति उत्पन्न करणारी शक्ति आहे आणि राजकीय इतिहासात लोकमताचा कायदा हा गुरुत्वाकर्षणाचा विश्वकायदा आहे. त्याशिवाय इतिहासाचे शास्त्र शक्य होणार नाही. म्हणून ह्यूमने अशी मार्मिक सूचना केली की, इतिहासाचा विषय लोकमताच्या सार्वभौमत्वाची कल्पना ही आदर्श आहे असे मानण्याची नसून मानवी समाजात सर्वत्र आणि सदैव हे सार्वभौमत्व कसे प्रस्थापित होत आले आहे हे सिद्ध करणे हा आहे. क्रूर तुर्की रक्षकांच्या सहाय्याने राज्य करण्याचा प्रयत्न करणारा शास्तादेखील त्या रक्षकांच्या आणि इतर प्रजाजनांच्या मतावरच अवलंबून असतो.

यात सत्य हे आहे की, अशा क्रूर रक्षकांच्या सहाय्याने राज्य चालत नसते. ताल्येरांद हा नेपोलियनला म्हणाला होता, ‘महाराज, सांगिनीच्या जोरावर तुम्ही सर्व काही करू शकाल; पण तीवर बसू मात्र शकणार नाही.’ राज्य करणे म्हणजे सत्ता हिसकावून घेण्याचा पवित्रा नव्हे, तर शांतवृत्तीने सत्तेचा वापर करणे होय. थोडक्यात, राज्य करणे म्हणजे आसनस्थ होणे, मग ते आसन सिंहासन असो, रोमन दंडाधिकाऱ्याचे आसन असो, पुढचे बाक असो किंवा बिशपचे पीठ असो. क्षोभनाट्यात सूचक गोष्टी उघडपणे दिसतात, तसे राज्याचे नसते. उलट राज्य करणे हा आसन खंबीर राखण्याचा प्रश्न आहे, तो जबरदस्तीचा प्रश्न नाही. राज्य ही अंतिमतः मताची स्थिती, समतोलनाची एक अवस्था आहे.

कधी कधी लोकमत अस्तित्वात नसते असेही घडते. जो समाज विसंवादी गटात विभागलेला असतो आणि त्यातील मतांच्या शक्ती एकमेकांना छेद देतात, त्या समाजात राज्यकर्ती सत्ता उभी राहू शकत नाही आणि ‘निसर्ग पोकळीचा तिटकारा करतो’ या न्यायाने लोकमताच्या अभावी निर्माण झालेली पोकळी पाशवी शक्तीने भरुन निघते. निदान पाशवी शक्ती पुढे सरसावते. परिणामी जर आम्हाला लोकमताच्या कायद्याला ऐतिहासिक गुरुत्वाकर्षणाच्या कायद्याचे रूप द्यावयाचे असेल, तर लोकमत अस्तित्वात नसलेली उदाहरणे घ्यावी लागतील आणि लोकमताविरूद्ध राज्य टिकू शकत नाही, या प्रसिद्ध पुरातन धोपत सूत्राकडेच यावे लागेल.

अनुक्रमाणिका

यावरुन राज्य हे मताचे आणि म्हणून आत्म्याचे प्राबल्य सूचित करते आणि सर्व गोष्टींचा विचार करता राज्य म्हणजे आत्मिक शक्तिखेरीज दुसरे काहीही नाही हे समजले पाहिजे. इतिहासातील घटना याला अचूकपणे दुजोरा देतात. सर्व आदिम शासनाचे स्वरुप ‘पवित्र’ असते. कारण ते धर्मावर आधारलेले असते आणि धर्म म्हणजे थोडक्यात जे पुढे अमूर्त आणि भौतिकातीत स्वरुप धारण करते त्याचे आद्यरूप होय. मध्ययुगात हीच घटना मोठ्या प्रमाणावर पुनः घडून येते. युरोपात आकाराला आलेले पहिले राज्य किंवा सार्वजनिक अधिसत्ता म्हणजे चर्च होय. या चर्चला ‘आध्यात्मिक अधिसत्ते’चे विशिष्ट निश्चित स्वरूप प्राप्त होते. चर्चपासून राजकीय सत्ता धडा घेते तो हा की, राज्यसत्ता ही सुद्धा मुळात एक आध्यात्मिक अधिसत्ता असते, काही विशिष्ट विचारांचे प्राबल्य असते आणि त्यातून ‘पवित्र रोमन साम्राज्य’ निर्माण होते. अशाप्रकारे दोन सत्तांमध्ये झगडा उद्‌भवतो ही दोन्ही मूलतः भिन्न नसल्यामुळे (कारण ही दोन्ही चैतन्ययुक्त आहेत) त्यांच्यात समेट घडून येतो. आणि त्यायोगे यापैकी प्रत्येक सत्ता स्वतः काल या परिमाणाने मर्यादित होते. एक कालिक, दुसरी चिरकालिक. कालिक सत्ता आणि धर्मिक सत्ता या सारख्याच आध्यात्मिक आहेत. पण एक आहे कालधर्म, लोकमत, पार्थिव, अस्थिर; तर दुसरी आहे चिरंतन शक्ती, दैवी मत, मानव आणि त्याची नियती या विषयीचा दैवी दृष्टीकोण. याचाच इत्यर्थ हा की विवक्षित काळी अमुक पुरुष, अमुक जन किंवा अमुक लोकांचा गट सत्ता गाजवितो; म्हणजेच विवक्षित काळी मतांच्या अमुक एका पद्धतीचे—कल्पनांचे. पसंत्याचे, आकांक्षाचे, उद्देशांचे—वर्चस्व जगावर असते.

हे वर्चस्व कसे समजून येते? बहुसंख्य माणसाना मते नसतात. यंत्रात जशी वंगणे घालावी लागतात, त्याप्रमाणे मते त्यांच्यामध्ये बाहेरून पंप करावी लागतात. म्हणून कोणीतरी एकाने सत्ता धारण करून ती चालविणे अवश्य असते. म्हणजे मग मते नसणाऱ्या लोकांना, बहुसंख्याना मते धारण करता येतात. कारण मताशिवाय मानवजातीचे सामाइक जीवन हे एक अराजक, एक ऐतिहासिक पोकळी होईल. त्यात कोणत्याही एकजीव रचनेचा अभाव असेल, परिणामी आध्यात्मिक सत्ता नसेल, सत्ता चालविणारा कोणी नसेल, आणि ज्याप्रमाणात ही नसतील त्याप्रमाणात मानव जातीत अराजक माजेल. तसेच सत्तेच्या सर्व विस्थापनात, अधिकाराच्या प्रत्येक बदलात, मतांचा बदल गर्भित असतो. म्हणून ऐतिहासिक गुरुत्वाकर्षणातील बदलही त्यात गर्भित असतो. जेथून आम्ही आरंभ केला, तेथेच आता परत येऊ या. अनेक शतके युरोपने म्हणजे समानधर्मी लोकांच्या समुदायाने जगावर राज्य केले. मध्ययुगात ऐहिक बाबतीत अशा प्रकारचे राज्य नव्हते. इतिहासातील सबंध मध्ययुगामध्ये असेच घडले. म्हणूनच ही युगे सापेक्ष अराजक, सापेक्ष रानटीपणा, लोकमताची उणीव, दर्शवितात. ते काळच असे आहेत की, जेव्हा माणसे प्रेम करतात, द्वेष करतात, इच्छा बाळगतात, तिरस्कार करतात. हे सर्व अमर्याद असते. पण दुसऱ्या बाजूने तेथे मत नसते. अशा युगांना स्वतःची अशी एक आकर्षकता असते. पण थोर युगामध्ये मानवजात जगते ती मतांनी आणि म्हणून तेथे सुव्यवस्था नांदते. मध्ययुगाच्या पलीकडे गेले म्हणजे असा एक काळ आढळतो की, जेथे आधुनिक युगाप्रमाणेच, जगाच्या मर्यादित भागावर का असेना, पण कोणीतरी सत्ता गाजवीत होते. रोम! महान संचालक! भूमध्यसागर आणि त्याची परिसीमा यात सुव्यवस्था कोणी स्थापन केली असेल तर ती रोमनेच!

या युद्धोत्तर काळात अशी वदंता पसरू लागली आहे की, आता जगावर युरोपचे राज्य नाही. या निदानाच्या पूर्ण गांभीर्याची जाणीव झाली आहे काय? त्यायोगे सत्तेचे विस्थापन घोषित होते. कोणत्या दिशेने?

अनुक्रमाणिका

युरोपच्या मागून जगावर राज्य कोण करणार आहे? पण त्याच्या मागून कोणीतरी येणार आहे हे तरी निश्चित आहे का? आणि कोणीही येणार नसेल, तर मग पुढे होणार तरी काय?

(२)

अर्थात हे खरे आहे की जगात कोणत्याही क्षणी आणि म्हणून प्रत्यक्षात अनंत गोष्टी घडत आहेत. तेव्हा जगात आज काय घडत आहे हे सांगण्याच्या कोणत्याही प्रयत्नात मूळचाच एक उपरोध असतो याची जाणीव ठेवली पाहिजे. म्हणून वस्तुस्थितीचे प्रत्यक्षपणे पूर्ण ज्ञान आम्हाला मिळविता येत नाही, याच कारणास्तव एखादी वास्तवता स्वेच्छेनुसार उभी केल्याशिवाय, काही एका विशिष्ट रीतीने गोष्टी घडत आहेत असे गृहीत धरल्याशिवाय आम्हाला काही करता येत नाही. त्यायोगे आम्हाला एखादी रूपरेषा, एखादी संकल्पना किंवा संकल्पनांची चौकट हाती लागते. त्याच्या सहाय्याने प्रत्यक्ष वस्तुस्थितीकडे पहाण्याची ‘दृष्टी’ आम्हाला प्राप्त होते आणि मगच केवळ आम्हाला तिचे जवळून अचूक दर्शन घडते. यातच वैज्ञानिक पद्धति सामावलेली असते. नव्हे, यापेक्षाही अधिक म्हणजे यातच वैज्ञानिक पद्धतीची सारी उपयुक्तता सामावलेली असते. एखाद्या मित्राला बागेच्या वाटेने येताना जेव्हा आम्ही पहातो आणि उद्‌गारतो : ‘हा पाहा पीटर!’ तेव्हा आम्ही बुद्ध्यापूर्वक एक चूक करतो. त्यात एक उपरोध असतो. कारण पीटर या नावाने शारीरिक आणि नैतिक वागणुकीची एक संमिश्र पद्धत—ज्याला आम्ही स्वभाव म्हणतो—सूचित होते. त्यात उघड सत्य हे की, कधी कधी आमचा मित्र पीटर हा ‘आमचा मित्र पीटर’ या आमच्या संकल्पनेसारखा यत्किंचितही नसतो.

प्रत्येक संकल्पना, सर्वात साधी आणि सर्वात यंत्रिक अशी संकल्पना सुद्धा सोन्याच्या कोंदणात बसविलेल्या पैलूदार हिऱ्यासारखी स्वतःच्या उपरोधात बसलेली असते. ती संकल्पना आम्हाला अगदी गंभीरपणे सांगते : ही वस्तु ‘अ’ आहे, ती वस्तु ‘ब’ आहे. पण ही गंभीरता तुमची थट्टा करणाऱ्या माणसाची असते. ओठ घट्ट मिटून घेतले नाही. तर हसू फुटेल म्हणून ते दाबून ठेवणाऱ्या माणसाच्या उमलत्या गंभीरतेसारखी ती असते. ही वस्तु नुसती ‘अ’ नाही किंवा ती वस्तु अगदी नुसती ‘ब’ नाही हे त्या संकल्पनेत अंतर्भूत असते. संकल्पनेतील विचार आणि तिची अभिव्यक्ती यात थोडासा फरक असतो आणि त्यातच उपरोध असतो. त्या संकल्पनेत खरोखरीच अंतर्भूत असते ते हे : नेमके सांगावयाचे तर ही वस्तु ‘अ’ नसते किंवा ती वस्तु ‘ब’ नसते; पण ती ‘अ’ आणि ‘ब’ अशी गृहीत धरल्यामुळे त्या दोन्ही वस्तूंचा व्यावहारिक दृष्ट्या उपयोग करून घेता येणे शक्य होते. बुद्धियुक्त ज्ञानाच्या उपपत्तीने ग्रीक माणूस नाराज होतो. कारण ग्रीक माणसाची अशी श्रद्धा होती की त्याला बुद्धीने, संकल्पनेने, खऱ्या ‘सत्’चा शोध लागला होता. उलटपक्षी आमची श्रद्धा अशी आहे की संकल्पना ही मानवाच्या घरगुती उपकरणापैकी एक असून त्याला तिची गरज आहे आणि अनंत व अत्यंत प्रश्नात्मक वास्तवतांमध्ये आपली भूमिका स्पष्ट करण्याकरता त्या उपकरणाचा तो उपयोग करतो. ही भूमिका हेच त्याचे जीवन. जीवन म्हणजे वर्तमान गोष्टीशी झगडा असून जीवनाचे रक्षण करण्याकरिता तो झगडा चालू रहातो. संकल्पना म्हणजे येणाऱ्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याकरिता आम्ही रचलेले डावपेच होत. म्हणून एकाद्या संकल्पनेच्या गाभ्यात शिरले, तर आढळून येईल की ती संकल्पना खुद्द त्या गोष्टीबद्दल आम्हाला काहीही सांगत नाही; पण ती गोष्ट आणि एखादी व्यक्ती परस्पराबद्दल काय करू शकतील एवढेच थोडक्यात सांगते. या मतानुसार संकल्पनेचा गाभा हा सदैव चैतन्ययुक्त असतो. तो सदैव क्रियाशील असतो. हे मत माझ्या माहितीप्रमाणे यापूर्वी कोणीही प्रतिपादन केले नाही. परंतु कांटने सुरू केलेल्या तत्वज्ञानात्मक प्रक्रियांची ती

अटळ परिणति आहे असे दिसून येते. पण त्या प्रक्रियांच्या प्रकाशात कांटच्या काळापर्यंतच तत्वज्ञानाचा सारा भूतकाळ तपासला, म्हणजे आम्हाला दिसून येईल की, मुळात सर्व तत्ववेत्यांनी एकच गोष्टी सांगितली आहे. ठीक; मग तत्वज्ञानातील प्रत्येक शोध हा प्रच्छन्न गोष्ट उघड करणे, दडलेले पृष्ठभागावर आणणे, याखेरीज दुसरे काहीही नसते.

मी जे सांगणार आहे, त्याची ही अवास्तव प्रस्तावना झाली. तत्वज्ञानात्मक प्रश्नाच्याबाबतीत हे काहीतरी अगदी अप्रस्तुत झाले. मी फक्त एवढेच सांगणार होतो की, इतिहासाच्या जगात प्रत्यक्षपणे जे घडत आहे, ते हे आणि केवळ हेच होय. तीन शतके युरोपने जगावर राज्य केले आहे आणि आपण राज्य करीत आहो किंवा पुढेही करीत राहू याची त्याला खात्री वाटत नाही. सद्यःकालीन ऐतिहासिक वस्तुस्थिति इतक्या साध्या सूत्रात गोवणे हे निःसंशय जास्तीत जास्त म्हणजे अतिशयोक्तीचे आहे. म्हणून विचार करणे म्हणजे, तुमची इच्छा असो वा नसो, अतिशयोक्ति करणे आहे, या गोष्टीची आठवण देणे हे मला अवश्य वाटते. अतिशयोक्ती करणे जर तुम्हाला आवडत नसेल, तर तुम्ही गप्प बसले पाहिजे. किंबहुना तुम्ही तुमच्या बुद्धीला रजा देऊन वेडसर बनण्याचा कोणतातरी मार्ग शोधला पाहिजे.

तेव्हा सध्या जगात घडत आहे ते हेच. बाकीचे सगळे केवळ त्याचे पर्यवसान, त्याची अवस्था, लक्षण किंवा त्या पर्यवसानाचे आनुषंगिक आहे अशी माझी समजूत आहे. युरोपने राज्य करण्याचे थांबविले आहे, असे मी म्हटले नाही. पण युरोपला सध्या आपण राज्य करीत आहो किंवा नाही, उद्या आपण राज्य करू किंवा नाही याविषयी जबर शंका वाटते. जगातील इतर लोकात या मनःस्थितीला जुळणारी आणि तिच्याशी संबंधित अशी एक मनःस्थिति वावरत आहे. त्यानाही आपल्यावर कोणी राज्य करीत आहे वा नाही याबद्दल शंका वाटत आहे. त्यानाही त्याची खात्री वाटत नाही.

अलिकडच्या काळात युरोपच्या ऱ्हासाविषयी खूपच बोलले जात आहे. युरोपच्या किंवा पश्चिमेच्या ऱ्हासाचा उल्लेख केल्याबरोबर तात्काळ स्पेंगलर मनात आणण्याइतके भाबडे बनू नका असे मी लोकांना सांगेन. त्याचे पुस्तक बाहेर पडण्यापूर्वी प्रत्येकजण या विषयासंबंधी बोलत होता. लोकांच्या मनात ही शंका अनेकविध प्रकारानी आणि कारणांनी आधीच वसत होती. ही गोष्ट त्या पुस्तकाच्या यशाला कारणीभूत झाली, हे सर्वश्रुत आहे.

युरोपच्या ऱ्हासाविषयी इतका बोलबाला चालू आहे की, अनेक जण ती एक खरी गोष्ट आहे असे धरून चालतात. तीवर ते गंभीरपणे आणि सप्रमाण विश्वास ठेवतात असे नव्हे. तर ती खरे धरून चालण्याची त्याना सवयच जडली आहे. मग प्रामाणिकपणे कधीतरी त्याबद्दल स्वतःची निश्चितपणे खात्री पटली होती यांचे स्मरण त्यांना नसेल का? वॉल्डो फ्रँकचे 'अमेरिकेचा पुनः शोध' हे ताजे पुस्तक युरोपला शेवटचा घोर लागला आहे या कल्पनेवर पूर्णतः आधारलेले आहे. तथापि फ्रँक या अवास्तव गोष्टींचे विश्लेषण वा चर्चा करत नाही किंवा त्याची छाननीही करत नाही. एक भयानक आधारविधान म्हणून तिचा त्याला उपयोग होतो. अधिक तपासणी न करताच काहीतरी एखाद्या वादातीत गोष्टीपासून सुरवात करावी, तशी तो तिच्यापासून सुरवात करतो. फ्रँकचा आरंभीचाच भाबडेपणा पाहून युरोपच्या ऱ्हासाविषयी त्याची स्वतःचीच खात्री पटली नाही असे मला वाटते. हे तर दूरच राहो; पण त्याने स्वतःसमोर तो प्रश्नही कधी उभा केला नाही. जशी एखादी ट्रामगाडी घाईघाईने

अनुक्रमाणिका

पकडावी तसा त्याने तो प्रश्न पकडला. धोपट वचने ही बौद्धिक दळणवळणाचे ट्राममार्ग आहेत. फ्रँकप्रमाणेच इतरही अनेक तसेच म्हणतात. राष्ट्रांनी, सबंधच्या सबंध राष्ट्रांनी तेच केले आहे.

सध्याच्या काळी जग ज्या तऱ्हेने वागत आहे, तो अगदी पोरकपणाचा नमुना आहे. शाळेत शिक्षक वर्ग सोडून गेला आहे असे जेव्हा कोणीतरी सांगतो, तेव्हा मुलांची झुंड मोकाट सुटते, थयथयाट करते, धिंगाणा घालते. शिक्षक हजर असला म्हणजे जे दडपण असते त्यातून सुटका झाल्याचा आनंद प्रत्येकजण उपभोगतो. नियंत्रणाचे जू झुगारून दिल्याचा, स्वतःच्या भवितव्याचा स्वतःच धनी बनल्याचा तो आनंद असतो. पण एकदा त्याना नेमून दिलेली कामे आणि त्यांच्यावरची देखरेख नाहीशी झाली म्हणजे त्या उत्साही झुंडीला स्वतः करावयाचे नित्याचे काम रहात नाही. त्याना पार पाडावयाचे भरीव काम नसते, सतत करावयाचे काम नसते, हेतु नसतो. मग ओघानेच ती झुंड एकच गोष्ट करू शकते—नुसता गोंधळ घालणे. छोटी राष्ट्रे आज जो उच्छृंखलपणाचा देखावा करीत आहेत, तो असाच शोचनीय आहे. युरोप ऱ्हासाच्या अवस्थेत आहे आणि त्याने राज्य करण्याचे सोडून दिले आहे असे म्हटले जाते. या कारणास्तव प्रत्येक अलबते गलबते राष्ट्र उड्या मारू लागले आहे, हातवारे करू लागले आहे, गोंधळ घालू लागले आहे, किंवा स्वतःच्या नियतीचा धनी आसणाऱ्या जाणत्या माणसाचा आव आणून दिमाखाने इतस्तता मिरवू लागले आहे. म्हणून 'राष्ट्रवादा'च्या वळवळणाऱ्या जंतूंचा देखावा सर्वत्र आमच्या दृष्टीस पडत आहे.

मागील प्रकरणांमध्ये मानवाचे वर्गीकरण करताना त्यात मी जगात आज प्रबल झालेल्या नव्या मानवी नमुन्याचा समावेश केला आहे. मी त्याला समुदायमानव म्हटले आणि स्वतः सामान्य असल्याची जाणीव ठेवून सामान्य रहाण्याचा हक्क तो घोषित करतो आणि स्वतःपेक्षा श्रेष्ठ असलेली कोणतीही पद्धती स्वीकारण्याचे तो नाकारतो हे त्याचे मुख्य लक्षण असल्याचे मी सांगितले आहे. प्रत्येक लोकसमूहात ही मनोवृत्ती जर प्रबळ असेल, तर गट म्हणून राष्ट्रांचा आम्ही जेव्हा विचार करतो, तेव्हा त्यांच्यातही ती प्रकट व्हावी हे केवळ स्वाभाविकच आहे. सापेक्षत्वाने असेही समुदायजन आहेत की, ज्यानी मानवजातीतील महान सर्जनशील लोकाविरुद्ध, इतिहास घडविणाऱ्या अल्पसंख्य लोकाविरुद्ध, बंड करण्याचा निर्धार केला आहे. एखादे हे किंवा ते क्षुल्लक लोकसत्ताक उठते आणि जगाच्या आडवाटेच्या कोपऱ्यावर चवड्यावर उभे राहून युरोपला फटकारते आणि जागतिक इतिहासातील आपले स्थान त्याने गमावले आहे असे जाहीर करते, हा खरोखरीच एक मोठा विनोद आहे.

याचा परिणाम काय? युरोपने मानकांची जी पद्धती निर्माण केली आहे, त्यांची परिणामकारकता आणि सुपीकता अनेक शतकात सिद्ध झाली आहे, ही मानके सर्वोत्तम नाहीत. उलट त्यापासून ती फार दूर आहेत. जोपर्यंत दुसरी मानके अस्तित्वात नाहीत तोपर्यंत तीच निश्चित मानके आहेत यात शंका नाही. त्यांचे उच्चाटन करण्यापूर्वी दुसरी निर्माण करणे आवश्यक आहे. आता समुदाय-जनांनी युरोपीय संस्कृतीत गर्भित असलेली मानकांची पद्धती दिवाळखोर झाली आहे असे ठरविले आहे. परंतु दुसरी मानके निर्माण करण्याला ते असमर्थ असल्यामुळे काय करावे हे त्यांना समजत नाही; आणि वेळ निभावून नेण्यासाठी ते थयथयाट करून गोंधळ माजवीत आहेत. जगात राज्य करणारा कोणीही नसतो, अशावेळी त्याचा पहिला परिणाम असाच व्हावयाचा. इतर लोक जेव्हा बंड करून उठतात तेव्हा समजावे की त्यांना पार पाडावयाचे काम नसते, जीवनाचा कार्यक्रम नसतो.

जिप्सी आत्मनिवेदन करण्यासाठी चर्चमध्ये गेल्याची एक कथा आहे. सावधपणे पाद्रीने त्याला विचारले, 'देवाच्या कायद्याच्या आज्ञा तुला माहीत आहेत का?' जिप्सी 'उत्तरला, फादर त्यांचं असं आहे : मी त्या शिकणार होतो. पण त्या रद्द करणार आहेत असं बोललेलं मी ऐकलं.'

सध्या जगाची स्थिती अशीच नाही का ? अशी वंदता पसरली आहे की युरोपच्या कायद्याचे आदेश आता चालत नाहीत, हे लक्षात घेऊन माणसे आणि लोकसमूह आदेशाशिवायच जगण्याची संधी साधत आहेत. कारण युरोपीय आदेशच तेवढे काय ते अस्तित्वात होते. पूर्वी घडले त्याप्रमाणे जुनी मानके बदलून त्यांच्या जागी नवी मानके निर्माण होण्याचा हा प्रश्न नाही अथवा मरगळलेल्या अवस्थेत जुना उत्साह पुनः ओतून नवे चैतन्य आणण्याचाही नाही. तसे झाले तर ती स्वाभाविक प्रक्रिया होईल. शिवाय जुने हे जुने ठरते, ते त्याला जुनेपणा येतो म्हणून नव्हे; तर त्याच्याविरुद्ध एक नवे तत्त्व पुढे येते आणि ते नवे असल्यामुळे पूर्वीचे तत्त्व जुने ठरते. आम्हाला मुले नसतील तर आम्ही म्हातारे समजले जाणार नाही; किंवा म्हातारे झालो असे समजण्याला कालावधी लागेल. यंत्राच्या बाबतीतही हेच घडते. दहा वर्षांची मोटारगाडी वीस वर्षांच्या रेल्वे इंजिनापेक्षा जुनी वाटते. कारण हेच की, मोटारीच्या उत्पादनात एकामागून एक झपाट्याने शोध लागले आहेत. नव्या तारुण्याच्या उत्थानात ऱ्हासाचे मूळ असते; म्हणून ऱ्हास हे आरोग्याचे लक्षण आहे.

पण आज युरोपमध्ये जे घडत आहे, ते काहीतरी रोगट आणि नेहमीपेक्षा वेगळे आहे. युरोपीय आदेशांचा जोर नाहीसा झाला आहे. पण क्षितिजावर कोणतेही आदेश येण्याचे चिन्ह दिसत नाही. युरोप राज्य करण्याचे थांबवीत आहे असे आम्हाला सांगण्यात येते आणि त्याची जागा कोण घेणार हे कोणाच्याही दृष्टीपथात नाही. युरोप म्हणजे प्रथमतः आणि संभवतः फ्रान्स, इंग्लंड आणि जर्मनी हे त्रिकूट असे आम्ही समजतो. या तीन देशांनी व्यापलेल्या भूभागावर मानवाची जीवन पद्धती पक्व झाली आहे; तिला अनुसरून जगाची संघटना झाली आहे. आता जाहीर करण्यात येत आहे त्याप्रमाणे या तीन लोकसमूहांचा ऱ्हास होत असेल आणि त्यांच्या जीवनक्रमाची शक्ती नष्ट झाली असेल, तर जगाचे नैतिक अधःपतन होत आहे, यात नवलाचे असे काही नाही.

साधे सत्य हे असे आहे. सारे जग-राष्ट्र आणि व्यक्ति-नीतिभ्रष्ट झाले आहे. काही काळ ही नीतिभ्रष्टता लोकांची करमणूक करते आणि अंधुकसा भ्रमही निर्माण करते. खालच्या वर्गाना वाटते की, त्यांच्या उरावरचे एक ओझे दूर झाले आहे. दहा धर्माज्ञा दगडावर किंवा ब्रॉंझवर कोरण्यात आल्या. त्यावेळेपासून त्यांचा भारदस्तपणा शाबूत राहिला आहे. Command (आज्ञा) शब्दाची व्युत्पत्ती कोणाच्यातरी हातावर ओझे ठेवल्याची कल्पना सूचित करते. आज्ञा देणारा कंटाळवाणा वाटल्याशिवाय रहात नाही. साऱ्या जगभर खालचे वर्ग आदेश घ्यायला कंटाळले आहेत, जाचक आदेशातून मुक्त करणारा काळ सुटीच्या दिवसाच्या ऐटीत भोगत आहेत. पण ही सुटी फार काळ टिकणार नाही. आज्ञापकावाचून, एका विशिष्ट प्रकारे जगण्याला भाग पडल्यावाचून, आमचे जीवन हे 'बेकार' माणसाते जीवन बनते. ही आध्यात्मिक स्थिती भयानक असून तीत जगाचे सर्वोत्तम तारुण्य आज सापडले आहे. आपण स्वतः स्वतंत्र आहो, निर्बंधापासून मुक्त आहो, या जाणीवेच्या जोरावर त्याला आपण स्वतः रिकामे आहो असे वाटू लागते. बेकार जिणे म्हणजे जीवन नाकारणे आणि हे खुद्द मरणापेक्षाही अधिक वाईट आहे. कारण जगणे याचा अर्थ काहीतरी निश्चित करीत रहाणे—जीवित

साध्य करणे-आणि कोणत्यातरी गोष्टीवर जीवन स्थिर करण्याचे जितके आम्ही टाळतो, तितके ते आम्ही पोकळ करतो. आकाशातील ताऱ्याकडे पाहून भुंकणारे असंख्य कुत्रे जसा कलाकलाट करतात, तसा भयानक आक्रोश थोड्याच अवधीत सबंध पृथ्वीतलावर ऐकू येऊ लागेल. हा आक्रोश कोणीतरी किंवा कशाने तरी आधिपत्य स्वीकारावे, एखादे साहस, एखादे कर्तव्य लादावे अशी मागणी करील. युरोपचे आधिपत्य यापुढे चालणार नाही, असे बालिश अविचारीपणाने जे जाहीर करतात त्या लोकासाठी हे आहे. आदेश देणे म्हणजे लोकांना काही तरी करावयाला सांगणे, त्यांच्या नियतीत त्यांना चपखल बसविणे, पोकळ, उजाड अस्तित्वाभोवती ध्येयहीनतेने भटकत रहाण्यापासून त्यांना प्रतिबंध करणे.

युरोपचे वर्चस्व संपले तर ते विशेष महत्त्वाचे नाही; मात्र त्याची जागा घेण्याला समर्थ असा दुसरा कोणीतरी आला पाहिजे. पण तसे अंधुकसेही चिन्ह दिसत नाही. युरोपच्या तुलनेने न्यूयॉर्क आणि मास्को ही नवीन असे काहीही दर्शवीत नाहीत. दोन्हीही युरोपीय पद्धतीचे दोन विभाग असून इतरापासून अलग पडल्यामुळे ते आपला अर्थ गमावून बसले आहेत. यात निकोप सत्य हे की, कोणीही न्यूयॉर्क आणि मास्को यांच्याविषयी बोलण्याला भीत असतो. कारण ती खरोखरीच काय आहेत हे त्याला माहीत नसते. त्याला एवढीच गोष्ट माहीत असते की त्यापैकी एकाबद्दलही निर्णायक असे अद्याप काही सांगता येत नाही. परंतु ती काय आहेत याचे पूर्ण ज्ञान नसताही एखाद्याला त्यांचे पुरेसे सर्वसामान्य स्वरूप समजून घेता येते. खरोखरीच ही दोन्ही ज्याला मी 'ऐतिहासिक छद्मावरणाचा आविष्कार' असे कधीकधी म्हणतो, त्यात अगदी चपखल बसतात. स्वभावतः छद्मावरण ही एक वास्तवता असते आणि ती जशी दिसते तशी नसते. त्याचे बाह्यरूप आतील वस्तु प्रकट न करता दडवून ठेवते. म्हणून बहुसंख्य लोकांची फसवणूक होते. ही फसवणूक सामान्यतः ज्याला छद्मावरण नावाची एक चीज असते हे आधीच माहीत असते, तोच केवळ टाळू शकतो. हे मृगजळाप्रमाणे आहे. मृगजळाच्या घटनेची कल्पना आली की मग दृष्टी फसत नाही.

ऐतिहासिक छद्मावरणाच्या प्रत्येक उदाहरणात दोन वास्तवता एकावर एक लादलेल्या असतात. एक खरीखुरी भरीव आणि अंतर्गत असते. दुसरी वरवर दिसणारी आकस्मिक आणि पृष्ठभागी असते. अतएव मास्कोमध्ये युरोपीय विचारांचा एक पडदा—मार्क्सवाद—आहे आणि ते विचार युरोपीय वास्तवता आणि युरोपसमोरील प्रश्न यांच्या दृष्टीकोनातून विचारपूर्वक तयार झाले होते. त्या पडद्यामागील जनता केवळ वंशदृष्ट्याच युरोपीयापासून भिन्न आहे असे नव्हे, तर त्यापेक्षा अधिक महत्वाचे हे की ती आमच्याहून एका निराळ्या युगाची आहे. जेथे उद्योगधंदे नाहीत, अशा रशियात मार्क्सवादाचा विजय होणे, म्हणजे त्याच्या प्रत्ययाला आलेली सगळ्यात मोठी विसंगती होय. परंतु त्यात तशी विसंगती नाही; कारण त्यात तसा विजयही नाही. 'पवित्र रोमन साम्राज्या'तील जर्मन लोक जितके रोमन होते, तितकाच कमी अधिक प्रमाणात रशिया मार्क्सवादी आहे. नव्या लोकसमूहाला विचार नसतात. ज्या वातावरणात जुनी संस्कृति नांदत असते किंवा नांदत आली आहे, त्या वातावरणात जेव्हा हे लोकसमूह वाढतात, तेव्हा ते त्या संस्कृतीने दिलेल्या विचारांच्या वेषाच्या आत दडून रहातात. हेच ते छद्मावरण आणि त्याचे कारणही तेच. दुसऱ्या एका प्रसंगी मी म्हटल्याप्रमाणे लोकांच्यासाठी उत्क्रांतीचे दोन मुख्य नमुने असतात, हे विसरले जाते. संस्कृतिहीन जगात जन्मलेले लोक आहेत. उदाहरणार्थ इजिप्शियन आणि चिनी. अशा लोकांचे सगळेच मूलवासी (autochthonous) असते. त्याच्या कृतीना स्वतःचा स्पष्ट, सरळ, अर्थ असतो. परंतु असेही लोकसमूह आहेत की, जे आधीच्या दीर्घकालीन इतिहासात असलेल्या संस्कृतीने भारलेल्या स्थितीत जन्माला येतात आणि

विकसित होतात. रोम हे असेच भूमध्यसागराच्या योगाने वाढले. त्या सागराचे पाणी ग्रीकी-पौर्वात्य संस्कृतीने भारले गेले होते. म्हणून रोमन लोकांचे अर्धे पवित्रे त्यांचे स्वतःचे नव्हेत, तर दुसऱ्यापासून शिकलेले. उचललेले पवित्रे दुहेरी स्वरूपाचे असतात. त्यांचा खरा अर्थ सरळ नसतो; तर तिरकस असतो. एखादा माणूस जेव्हा दुसऱ्याकडून शिकलेली कृति करतो—उदाहरणार्थ तो एखादा परकी शब्द वापरतो-तेव्हा तिच्या मागे त्याची स्वतःची खरी कृति दडलेली असते. ती परकीय संज्ञा तो स्वतःच्या भाषेत रूपांतरित करतो. म्हणून छद्मावरणात प्रवेश करण्याकरता तिरकस नजरेची गरज असते. शब्दकोश जवळ ठेवून मूळ पुस्तकाचा अनुवाद करणाऱ्या माणसाची ती नजर असते. मी अशा पुस्तकाची वाट पहात आहे की, ज्यात स्टालीनचा मार्क्सवाद रशियाच्या इतिहासात प्रत्यक्षात उतरलेला दिसून येईल. कारण तेच रशियाचे सामर्थ्य आहे, रशियाचे स्वतःचे असे तेच आहे. साम्यवाद्याचे त्याच्यापाशी जे आहे ते नव्हे. हे पुस्तक कसे असेल ते असो! एक गोष्ट निश्चित की, वर्चस्व गाजविण्याची आकांक्षा बाळगण्याला रशियाला कित्येक शतके वेचावी लागतील. अद्यापिही त्याच्यापाशी आज्ञापकांची उणीव असल्या कारणाने मार्क्सच्या युरोपीय तत्वांना चिटकून राहण्याचे ढोंग करणे त्याला भाग पडत आहे. त्याच्यापाशी विपुल तारुण्य असल्यामुळे हे तोथांड त्याला पुरेसे आहे. जगण्यासाठी तारुण्याला कारणे लागत नाहीत, त्याला लागतो तो केवळ बहाणाच. न्यूयॉर्कच्या बाबतीत यासारखेच काहीतरी घडत आहे. ते जे आदेश पाळते, त्यावरून त्याचे प्रत्यक्ष सामर्थ्य ठरविणे चुकीचे आहे. शेवटी हे सर्व एका गोष्टीवर येऊन ठेपते. तंत्रवाद. किती विलक्षण! हा आणखी एक युरोपीय शोध; अमेरिकन नव्हे. तंत्रवाद युरोपने १८व्या आणि १९व्या शतकात शोधून काढला. पुनः किती विलक्षण ! अमेरिका अस्तित्वात येत होती त्यावेळचीच ही शतके! अमेरिका ही इतर वसाहतीप्रमाणेच जुन्या वंशांची, विशेषतः युरोपची, पुनर्यौवनावस्था आहे. असे सांगण्यात येते की, अमेरिकेचे सार तिच्या जीवनाच्या व्यवहारी आणि तंत्रवादी संकल्पनात आहे. रशियाच्या बाबतीहून निराळ्या कारणाकरता, युनायटेड स्टेटस हे ज्याला आम्ही ‘नवे लोक’ म्हणतो त्या विशिष्ट ऐतिहासिक वस्तुस्थितीचे उदाहरण आहे. का केवळ एक शब्दप्रयोग मानण्यात येतो. पण खरोखरीच ती मानवातील तारुण्याइतकीच एक तंतोतंत सत्य गोष्ट आहे. अमेरिका आपल्या तारुण्यामुळे सामर्थ्यशाली झाली आहे. त्या तारुण्यामुळेच ती स्वतः तंत्रवादाच्या आधुनिक आज्ञापकांच्या भजनी लागली आहे. बुद्धधर्माची आज चलती असती, तर ती त्याच्या भजनी जशी लागली असती तशीच. पण असे वागण्याने अमेरिका केवळ आपल्या इतिहासाचा आरंभ करीत आहे. आताच कोठे तिच्या कसोट्या लागत आहेत. तिच्यातील मतभिन्नता, तिचे संघर्ष सुरू होत आहेत. अद्याप तिला आणखी पुष्कळच मजल मारावयाची आहे. त्यापैकी काही गोष्ट तांत्रिक आणि व्यावहारिक गोष्टी यांच्या अगदी विरुद्ध आहेत. अमेरिका रशियापेक्षा तरुण आहे. अतिशयोक्तीचा धोका पत्करूनही मी नेहमी सांगत आलो आहे की, अमेरिका ही आदिम लोकांची आहे आणि अगदी अत्याधुनिक शोधांच्या छद्मावरणाखाली ती झाकली गेली आहे. [El Espectador (VII Hegel Y America) पहा.] आता वाल्डो फ्रॅन्क आपल्या ‘आमेरिकेच्या पुनःशोध’ या पुस्तकात हे उघडपणे जाहीर करतो. अमेरिकेने अद्याप दुःख असे भोगलेले नाही. तिच्यापाशी आधिपत्य चालविण्याचे गुण असू शकतात असे समजणे भ्रामक आहे.

यापुढे कोणाचीही सत्ता चालणार नाही आणि म्हणून ऐतिहासिक जग हे परत अराजकाकडे चालले आहे, या निराशावादी निष्कर्षातून सुटका करून घेऊ इच्छिणाराला आमच्या प्रारंभीच्या मुद्याकडे परत जावे लागेल, आणि स्वतःला गंभीरपणे विचारावे लागेल की, युरोपचा ऱ्हास होत आहे, तो सत्ता सोडून देत आहे, तो पदच्युत होत आहे, असे लोक म्हणतात तितके ते निश्चित खरे आहे कां? हा वरवर दिसणारा ऱ्हास एक इष्टापती

ठरण्याचा संभव नाही कां? आणि ही इष्टापति युरोपला खराखुरा युरोप बनण्याला समर्थ ठरणार नाही कां? युरोपचे जर एक संयुक्त राज्य होणार असेल, युरोपच्या अनेकतेच्या ठिकाणी रीतसर एकता प्रस्थापित होणे शक्य कोटीत येणार असेल असा दिवस उगवेल तर मग युरोपातील राष्ट्रांना या उघड ऱ्हासातून जाणे अवश्यच नव्हते कां ?

(४)

प्रत्येक समाजात आदेश देण्याचे आणि ते पाळण्याचे कार्य निर्णायक असते. आदेश कोण देतो आणि ते कोण पाळतो याविषयी जोपर्यंत पुसट शंका येते, तोपर्यंत सर्वकाही अपूर्ण निष्परिणामी असते. मानवांच्या सदसद्विवेबुद्धीदेखील काही विशेष अपवाद वगळल्यास अस्वस्थ होतील आणि खोट्या ठरतील. मानव हा जर एकाकी, काही प्रसंगीच तेवढा दुसऱ्यांच्या सहवासात येणारा प्राणी असता, तर राज्यकर्त्या सत्तेवर आलेल्या अरिष्टामुळे आणि तिच्या उच्चाटनामुळे उसळलेल्या प्रक्षोभातून तो सहीसलामत बाहेर पडला असता. परंतु त्याच्या अगदी खोल, अंतर्गत पोतात तो समाजप्रिय असल्यामुळे, काटेकोर सांगावयाचे तर, त्याच्या सामुदायिकतेवर केवळ साक्षात परिणाम घडविणाऱ्या बदलामुळे त्याच्या वैयक्तिक स्वभावातही बदल घडून येतो. म्हणून एखादी व्यक्ती वेगळी घेऊन तिचे विश्लेषण केले, म्हणजे आदेश देणे आणि पाळणे याबाबतीत तिच्या देशाची सदसद्विवेकबुद्धी कशी कार्य करते याविषयी अधिक आधारसामग्री उपलब्ध झाल्याशिवायही निष्कर्ष काढणे शक्य असते.

सर्वसाधारण स्पॅनिश माणसाचा वैयक्तिक स्वभाव या कसोटीला लावून पाहणे मनोरंजक तसेच उपयुक्तही ठरेल. तथापि हे काम उपयुक्त असले, तरी ते अप्रिय, उद्वेकजनक असल्यामुळे मी टाळतो. परंतु स्पेन हे राष्ट्र शतकानुशतके आदेश देणे आणि पाळणे याबाबतीत खोट्या सदसद्विवेक बुद्धीने जगत आले आहे. या गोष्टीवरून आमच्या देशाच्या सर्वसामान्य मानवात रुजलेल्या व्यक्तिगत नैतिक अधःपतनाचे, अवनतीचे, प्रमाण किती प्रचंड आहे हे स्पष्ट होईल. ही अवनति म्हणजे दुसरे तिसरे काही नाही, तर एखादी गैर गोष्ट अयोग्य आहे हे माहीत असूनसुद्धा ती नित्याची आणि वाजवी आहे म्हणून तिचा स्वीकार करण्याच्या वृत्तीने ती झाली आहे. जे मूलतः रोगट आणि अस्वाभाविक असते, त्याचे निरोगी स्वाभाविकतेत रूपांतर करणे जसे अशक्य असते, तद्वत व्यक्ती जेव्हा चुकीची गोष्ट स्वीकारण्याचे ठरविते, तेव्हा तिला त्या गैरगोष्टीत, त्या दुष्कृत्यात, भागीदार व्हावे लागते. 'एका खोट्यातून शंभर खोटी निपजतात' या लोकप्रिय म्हणीप्रमाणे ही क्रिया असते. सर्व देशाना अशा कालखंडातून जावे लागले आहे की, त्यांच्यावर ज्यांचे राज्य त्याना नको होते. त्यांनी राज्य करण्याचे प्रयत्न केले. पण प्रबळ सहजप्रवृत्तीच्या जोरावर त्यांनी आपले सारे बळ एकवटून ती अनधिकृत सत्ता चिरडून टाकली; त्यांनी तो अल्पकालिक अनधिकृतपणा धुडकावून लावला आणि अशा प्रकारे जनता या नात्याने आपले मनोधैर्य पुनः प्राप्त करून घेतले. स्पॅनिश माणसाने याच्या अगदी उलट केले. ज्या सत्तेचा त्याने अगदी मनापासून तिटकारा केला होता त्याचा प्रतिकार करण्याऐवजी त्या अवास्तव गोष्टीशी जमवून घेऊन आपले सारे जीवन खोटे करण्याचे त्याने पसंत केले. आमच्या देशात जोपर्यंत असेल चालू राहणार आहे तोपर्यंत आमच्या वंशाच्या लोकाकडून कोणत्याही चांगल्याची आशा करणे व्यर्थ आहे. ज्या समाजाचे राज्य, समाजातील सत्ता, ही स्वभावतःच एक फसवणूक असते, त्या समाजात इतिहासातील स्वतःचे मानाचे स्थान टिकविण्याच्या कठीण कार्याकरिता आवश्यक असणाऱ्या चिवट जोमाचा अभाव असतो.

तेव्हा जगात राज्य कोण करतो याविषयी थोडासाही किंतु, साधा विकल्पही जरी मनात आला, तर तेवढी गोष्ट प्रत्येकाच्या सार्वजनिक तसेच खाजगी जीवनात नैतिक अधःपतन सुरू होण्याला पुरेशी आहे. यात चमत्कारिक असे काहीही नाही.

मानवी जीवन हे स्वभावतःच कशासाठी तरी, एखादे गौरवास्पद किंवा साधे साहस, एखादी दैदिप्यमान किंवा करंटी नियती, यासाठी समर्पण करण्यासाठी असते. आमच्यासमोर जी स्थिती उभी आहे ती विचित्र पण कठोर असून तिच्यात आमचे अस्तित्व गुंतले आहे. एका बाजूने, जगणे म्हणजे प्रत्येकजण स्वतः होऊन आणि स्वतःकरिता जे काही करतो, ते होय. दुसऱ्या बाजूने, केवळ माझ्याशीच संबंधित असणाऱ्या जीवनाला कोणत्यातरी उद्दिष्टाकडे मी नेले नाही, तर ते विस्कळीत होईल, त्यात जोम आणि उमदेपणा रहाणार नाही. स्वतःला वाहून घ्यावे असे उद्दिष्ट नसल्याने स्वतःच्या चक्रव्यूहात स्वतःला हरवून इतस्ततः भ्रमंती करणाऱ्या असंख्य मानवी जीवनांचा विराट देखावा हल्ली आम्ही पहात आहोत. सर्व आदेश, सर्व आज्ञा अधांतरी अवस्थेत आहेत. ही स्थिती आदर्श आहे असे वाटण्याचा संभव आहे. कारण प्रत्येक जीवन स्वतःला हवे ते करण्याला—स्वतःची स्वतःची देखभाल करण्याला—पूर्णपणे मोकाट सुटले आहे. प्रत्येक राष्ट्राची हीच गोष्ट आहे. युरोपने जगावरील आपले दडपण सैल केले आहे. पण याचा परिणाम अपेक्षेच्या उलट झाला आहे. प्रत्येक जीवन त्याच्या स्वतःवरच सोपविण्यात आल्यामुळे पोकळ बनले आहे. त्याला करावयाला काहीही राहिले नाही. कशाने तरी भरून काढावयाचे असल्याने ते स्वतःसाठी क्षुल्लक गोष्टी शोधून काढते, चुकीच्या उद्योगात स्वतःला गुंतवून घेते. या उद्योगात जिव्हाळ्याचे, प्रामाणिक असे काहीही नसते. आज एक, उद्या दुसरेच आणि तेही पहिल्याच्या उलट. जीवन सर्वस्वी एकाकी झाल्याने ते स्वतःलाच हरवून बसते. केवळ अहंवाद हा एक चक्रव्यूह आहे. हे अगदी समजण्यासारखे आहे. खरोखरीच जगणे म्हणजे कशाकडे तरी निर्देशित केले जाणे, एखाद्या उद्दिष्टाच्या दिशेने पुढे जाणे होय. उद्दिष्ट म्हणजे माझी हालचाल नव्हे; तर मी ज्यात माझे जीवन ओतावे असे काहीतरी. परिणामी ते जीवनाबाहेर, जीवनातीत असते. स्वार्थीपणाने माझ्या स्वतःच्या जीवनापुरतेच एकाकी मार्गक्रम करण्याचे मी ठरवेन, तर ती प्रगति होणार नाही, त्यामुळे मी कोठेही न नेणारा रस्ता, केवळ स्वतःमध्येच गिरक्या घेत राहून स्वतःलाच हरवून बसणारा मार्ग! गेल्या युद्धापासून युरोपीय मानवाने आपल्याला स्वतःमध्येच कोंडून घेतले आहे. स्वतःकरिता कोणत्याही योजनेचे संकल्प त्याच्यापाशी नाहीत. म्हणून दहा वर्षापूर्वी जसे आम्ही होतो, तसेच ऐतिहासिक दृष्ट्या यापुढेही रहाणार आहोत.

आदेश काही पोकळीत अमलात येत नाही. दुसऱ्यावर पडणारे दडपण त्यात गर्भित असते. पण त्यात केवळ एवढेच गर्भित नसते. केवळ तेवढेच असेल, तर तो केवळ अत्याचार होईल. आदेशाचा परिणाम दुहेरी असतो, हे आम्ही विसरता कामा नये. शेवटी, आदेश दिला जातो, तो एखाद्या साहसात, एखाद्या ऐतिहासिक नियतीत त्याने स्वतःचा वाटा उचलावा म्हणून. जीवनाचा कार्यक्रम असल्याशिवाय, अधिक नेमकेपणे सांगावयाचे तर, साम्राज्यशाही जीवनाचा कार्यक्रम असल्याशिवाय, साम्राज्य संभवत नाही. शिलर म्हणतो त्याप्रमाणे 'जेव्हा राजे वास्तु बांधतात, तेव्हा गाडीवानांना काम मिळते.' महान राष्ट्रांच्या तसेच महापुरुषांच्या कार्यात केवळ स्वार्थाची प्रेरणा शोधण्याची क्षुद्र कल्पना धारण करून चालणार नाही. तुम्ही कल्पना करता तितके निव्वळ अहंवादी होणे सोपे नाही; आणि अशी कोणीही अहंवादी माणसे यशस्वी झाली नाहीत. महान राष्ट्रांचा आणि पुरुषांचा वरवर दिसणारा अहंवाद हा करारीपणा असतो, आणि असा करारीपणा हाती घेतलेल्या कामात व्यग्र असणाऱ्या कोणाही माणसाला धारण करावा लागतो. जेव्हा खरोखरीच आम्हाला

अनुक्रमाणिका

काहीतरी करावयाचे असते आणि एखाद्या उद्दिष्टाला स्वतःला वाहून घ्यावयाचे असते, तेव्हा रस्त्यातून जाणाऱ्यायेणाऱ्या प्रत्येकाची चौकशी करावी आणि परार्थवादाचे प्रदर्शन करण्याची प्रत्येक संधी आम्ही साधावी अशी अपेक्षा कोणीही बाळगू नये. स्पेनमधील प्रवाशांना सर्वात आनंद देणारी गोष्ट म्हणजे रस्त्यात एखाद्याने अमुक इमारत वा चौक कोठे आहे असे विचारले, तर बहुधा तो आपला स्वतःचा मार्ग सोडून त्या परक्या माणसाकरता स्वतःचा वेळ उदारणे खर्ची घालून त्याला हव्या असणाऱ्या ठिकाणाकडे घेवून जाईल. त्या भल्या स्पॅनिश माणसाच्या या वृत्तीत औदार्याचा भाग असेल, हे मी नाकारीत नाही; आणि तो परदेशी माणूस त्याच्या वर्तनाचा अर्थ तसा लावतो यात मला आनंदच आहे. पण हे ऐकताना वा वाचताना एक शंका मात्र मी कधीही दडपून ठेवू शकलो नाही: ‘माझ्या देशबांधवाला विचारण्यात आले, त्यावेळी तो खरोखरोच कोठेतरी जात होता कां?’ कारण अनेक बाबतीत असेही घडले असेल की, त्या स्पॅनिश माणसाला कोठेही जावयाचे नसते, त्याच्यासमोर कोणतेही कार्य वा उद्देश नसतो, तर उलट दुसऱ्याच्या जीवनात स्वतःला सहभागी करून घ्यावे म्हणून तो बाहेर पडलेला असतो. मला अशी कित्येक उदाहरणे चांगलीच माहीत आहेत की, जेथे माझे देशबांधव रस्त्यात सोबत करण्याकरिता कोणी परका माणूस भेटतो का हे पहाण्यासाठी बाहेर रस्त्यावर येत असतात.

आतापर्यंत युरोपने जगावर राज्य केले; पण आता राज्य कोण करतो याविषयीच शंका वाटत असल्यामुळे इतर राष्ट्रांचे नैतिक अधःपतन ही फारच गंभीर गोष्ट आहे. त्याला अपवाद आहे, तो आपल्या तारुण्याच्या योगाने अद्यापही प्रागितिहासात वावरणाऱ्या राष्ट्रांचा होय. पण या मध्यंतरीच्या काळात युरोपीय मानव स्वतः पूर्णपणे नीतिभ्रष्ट होण्याच्या टोकापर्यंत पोचावा ही त्यापेक्षाही गंभीर बाब आहे. मी युरोपीय किंवा तत्सम कोणी आहे म्हणून हे म्हणत नाही. मी असे म्हणत नाही की, नजीकच्या भविष्यात युरोपियांना राज्य करावयाचे नसेल, जर जगाच्या संसारात मला रस वाटणार नाही. या पृथ्वीचे मार्गदर्शन करण्याला आणि आपले सत्तेचे स्थान घेण्याला लायक अशा दुसऱ्या देशांचा गट अस्तित्वात असता तर युरोपने वर्चस्व गमावले म्हणून मला चिंता वाटली नसती. मी इतकीही पृच्छा केली नसती. कोणीही राज्य करीत नाही, आणि त्याच्या अनुषंगाने युरोपीय मानवाचे सर्व गुण आणि त्याची वैशिष्ट्ये हवेत विरुन जाणार नसतील, तर तशातही मी समाधान मानेन.

ठीक. हे घडून येणे अटळ आहे. युरोपीय मानवाचा राज्य करण्याचा सराव नाहीसा होईल, तर या प्राचीन खंडावर आणि त्याबरोबर सर्व जगावर नैतिक जाड्य, बौद्धिक वांझोटेपणा आणि सार्वत्रिक रानटीपणा ही ओढवण्याला दीड पिढीचाही काळ पुरेसा होईल. आपण राज्य करीत आहो हा आभास आणि त्यापासून येणारी जबाबदारीची शिस्त हीच केवळ पाश्चात्य मनावर ताण राखू शकतात. सत्तेच्या जाणीवेतून निर्माण होणाऱ्या उत्साहवर्धक वातावरणात विज्ञान, कला, तंत्र इत्यादि जगत असतात. त्यांचा अभाव असेल, तर युरोपीय मानव हळूहळू अधोगतीला जाईल. मानवापाशी त्यांची स्वतःची मूलगामी श्रद्धा, त्याना कार्यप्रवण करणारी, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नवनव्या महान कल्पनाकडे झेप घेणारी जोमदार, धाडशी, चिवट अशी श्रद्धा राहणार नाही. युरोपीय हा अटळपणे रोजच्या पुरतेच पहाणारा मानव होईल. सर्जनशील आणि खास असे प्रयत्न करण्याला असमर्थ झाल्याने तो नेहमी गतकाळाचा, रुढीचा आणि नित्यक्रमाचा आधार घेईल. ऱ्हासकालीन ग्रीकांप्रमाणे किंवा बायझांटाइन युगातील लोकांप्रमाणे तो अगदी धोपटमार्गी, रुढीप्रिय, पोकळ प्राणी बनेल.

अनुक्रमाणिका

सर्जनशील जीवन हे कडक मानसिक आरोग्याचा, उच्च दर्जाच्या वर्तनाचा सतत उत्तेजन देणारा प्रपंच सूचित करते. ते मानवाच्या प्रतिष्ठेची जाणीव जागती ठेवते. सर्जनशील जीवन हे चैतन्यशील जीवन असते. ते पुढील दोन स्थितीपैकी एकीमध्येच केवळ शक्य असते; एक, स्वतः राज्य करण्याची किंवा दुसरी, दुसरा कोणी राज्य करीत असलेल्या जगात रहाण्याची आणि त्याच्या राज्य करण्याच्या हक्काला मान्यता देण्याची : मी राज्य तरी करतो किंवा आज्ञा तरी पाळतो. आज्ञापालनाचा अर्थ केवळ शरणागति असा मी करीत नाही-ती अधोगति होईल. पण उलट, त्याचा अर्थ राज्यकर्त्याविषयी आदर राखणे त्याचे नेतृत्व मान्य करणे, त्याच्याशी समभाव राखणे, आणि झेंड्याखाली उत्साहाने दाखल होणे, असा मी करतो.

(५)

या प्रकरणाच्या प्रारंभ बिंदूकडे परत जाणे, अलिकडे इतका बोलबाला झालेल्या युरोपच्या ऱ्हासाच्या चमत्कारिक घटनेकडे मागे वळणे, उचित होईल. आश्चर्यकारक गोष्ट अशी की, या ऱ्हासाकडे प्रथम लक्ष वेधले ते बाह्यजनांनी नव्हे, तर खुद्द युरोपीयानाच त्याचा शोध लागला आहे. या प्राचीन खंडाबाहेर जेव्हा कोणीही याचा विचार केला नव्हता, तेव्हा जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स येथील काही माणसांच्या मनात ही कल्पना सुचली. 'आमच्या ऱ्हासाला प्रारंभ तर होत नाही ना?' या कल्पनेला वर्तमानपत्रात चांगली प्रसिद्धी मिळाली. आज प्रत्येकजण युरोपीय ऱ्हासाविषयी बोलत आहे. जणू काही ते एक निर्विवाद तथ्य आहे.

पण हे जाहीर करण्यात गुंतलेल्या माणसाला खुणेने बोलावून घ्या आणि कोणत्या प्रत्यक्ष स्पष्ट आधारसामग्रीवर त्याचे निदान आधारलेले आहे हे विचार. लगेच तो तुम्हाला मोघम हावभाव करताना दिसून येईल; आणि बुडत्या जहाजातील माणसाप्रमाणे तो चोहोबाजूनी विशिष्ट हातवारे करील. खरे म्हणजे कशाचा आधार घ्यावा हे त्याला ठाऊक नसते. युरोपच्या प्रत्यक्ष ऱ्हासाची लक्षणे सांगण्याच्या प्रयत्नात दिसून येणारी एकच गोष्ट आहे आणि तीही मोठ्या तपशीलाची नाही. ती म्हणजे प्रत्येक युरोपीय राष्ट्राला आर्थिक अडचणीनी निर्माण केलेल्या गुंतागुंतीला आज तोंड द्यावे लागत आहे. पण या अडचणींच्या स्वरूपात थोडे खोल शिरले म्हणजे समजून येते की, त्यापैकी कोणतीही अडचण संपत्ति निर्माण करण्याच्या कार्याला फारशी बाधक ठरत नाही, आणि हा प्राचीन खंड यापेक्षा कितीतरी अधिक गंभीर अरिष्टातून पार पडला आहे.

कदाचित जर्मनाना किंवा इंग्रजांना पूर्वीपेक्षा अधिक वस्तु आणि त्याही अधिक चांगल्या निर्माण करण्याला आपण असमर्थ होत आहो असे तर वाटत नसेल? तसा काहीही प्रकार नाही. अर्थकारणाच्या क्षेत्रात जर्मनीची किंवा इंग्लंडची खरी मनःस्थिति तपासणे हे अधिक महत्त्वाचे आहे. यात चमत्कारिक हे की, त्यांना प्राप्त झालेली ही निरुत्साही अवस्था, त्यांच्यापाशी सामर्थ्य राहिले नाही असे त्याना वाटत असल्यामुळे प्राप्त झाली नाही, तर उलट पूर्वी कधी नव्हतो आपण समर्थ आहो असे त्यांना स्वतःला वाटत असूनही काही विशिष्ट घातक अडथळे आल्यामुळे त्यांच्या अगदी आवाक्यातील गोष्टीसुद्धा त्यांना करणे जमत नाही, त्यामुळे होय. जर्मनी, फ्रान्स यांच्या प्रत्यक्ष अर्थकारणाच्या मर्यादा आहेत. तेव्हा खऱ्या अडचणीचे मूळ आहे, ते मध्ये आड येणाऱ्या या वा त्या आर्थिक प्रश्नात नसून, ज्या सार्वजनिक जीवनाच्या स्वरूपात आर्थिक शक्ती विकसित होतात, ते स्वरूप त्या शक्तींच्या परिमाणाच्या मानाने सर्वस्वी तोकडे पडते, या गोष्टी आहे. माझ्या मते हल्ली युरोपच्या चैतन्यशक्तीवर मोठे दडपण येत आहे ते, ती संकोच पावत असल्याच्या, ती दुबळी झाली असल्याच्या,

भावनेचे होय. ही भावना युरोपच्या अंगच्या शक्ती आणि ज्या राजकीय संघटनांच्या चौकटीत युरोपीय कार्य करीत आहेत ती चौकट या दोहोतील व्यस्त प्रमाणावर पोसली जात आहे. अत्यंत निकडीच्या प्रश्नांना तोंड देण्याची प्रेरणा पूर्वी होती तितकीच जोमदार आहे; पण लहानशा पिंजऱ्यात बंदिस्त होऊन ती अडकून पडली आहे. आजपर्यंत युरोप सापेक्षत्वाने ज्या लहान लहान राष्ट्रात संघटित झाला आहे, त्यांच्या जाळ्यात ती सापडली आहे. युरोपीय मनाला आज भारावणारा निराशावाद, खिन्नता, हीं पिंजऱ्यात अडकलेल्या रुंद पंखाच्या पक्षाप्रमाणे आहे. तो पक्षी उड्डाणाकरिता आपले पंख पसरतो, पण पिंजऱ्याच्या सळ्यावर ते आदळले म्हणजे त्याची जी स्थिती होते, तशीच युरोपची स्थिती होत आहे. याचा पुरावा हा की, ज्या क्षेत्राचे घटक अर्थकारणापासून उघडच भिन्न आहेत, अशा इतर सर्व क्षेत्रात या स्थितीची पुनरावृत्ती होत आहे. उदाहरणार्थ बौद्धिक जीवन घ्या. जर्मनी, इंग्लंड किंवा फ्रान्स यातील प्रत्येक 'बुद्धिवंता'ला आज आपल्या देशाच्या मर्यादात आपण गुदमरत आहोत असे वाटते.  त्याला आपले राष्ट्रीयत्व म्हणजे सर्वथैव बंधन वाटते. जर्मन प्राध्यापक आपल्या वर्तुळातील मंडळींच्या दडपणाखाली जी निर्मिती करतो, त्यातील असंगतीची जाणीव त्याला होत आहे. फ्रेंच लेखकाच्या किंवा इंग्रज निबंधकाराच्या श्रेष्ठ दर्जाच्या स्वातंत्र्याला तो मुकत आहे. या उलट पॅरिसच्या साहित्यिकाना वाङ्मयीम तंत्राची, शाब्दिक औपचारिकतेची परंपरा संपुष्टात आली आहे, हे समजून येऊ लागले आहे; आणि त्या परंपरेचे काही चांगले गुण राखून तो जर्मन प्राध्यापकांच्या काही विशिष्ट चांगल्या गुणांची तिला जोड देत आहे.

हीच गोष्ट अंतर्गत राजकारणाच्या क्षेत्रात घडत आहे. सगळ्या मोठ्या राष्ट्रांच्या जीवनाला इतकी ओहोटी लागावी या आश्चर्यकारक प्रश्नाचे सूक्ष्म विश्लेषण अद्याप आमच्या पहाण्यात आले नाही. लोकशाही संस्थांनी प्रतिष्ठा गमावली आहे असे सांगण्यात येते. पण त्याचे नेमके स्पष्टीकरणच व्हायला हवे. कारण प्रतिष्ठा इतकी खालावणे हे फार विचित्र आहे. पार्लमेंटसंबंधी सर्वत्र वाईट बोलले जाते. पण कोणत्याही महत्त्वाच्या देशात ते बदलून त्याच्याजागी दुसरे काही आणण्याचा प्रयत्न होत नाही, हे लोकांच्या लक्षात येत नाही. किमान पक्षी आदर्श म्हणून अधिक चांगल्या काल्पनिक आदर्श राज्याच्या प्रकारांचे आराखडेही तयार नाहीत. प्रतिष्ठेची हानी झाली, या घटनेला फाजील महत्त्व द्यावयाचे नाही. युरोपमध्ये चुकीच्या मार्गाने जात आहेत त्या सार्वजनिक जीवनाला साधनभूत असणाऱ्या संस्था नव्हेत, तर ज्या कार्यासाठी त्या संस्थांचा उपयोग करून घ्यावयाचा, ती कार्ये होत. येथे अभाव आहे तो प्रत्येक युरोपीय व्यक्तीला जीवनात प्राप्त झालेल्या प्रभावी शक्तीना पुरेसा वाव देणाऱ्या कार्यक्रमांचा आहे. येथे आम्हाला दृष्टिभ्रम होत आहे आणि तो कायमचा दूर करणे महत्त्वाचे आहे. कारण घटकोघटकी निघणारे मूर्खपणाचे उद्‌गार, उदाहरणार्थ, पार्लमेंटसंबधी उद्‌गार, ऐकणे क्लेशकारक आहे. पार्लमेंटच्या व्यवहाराच्या पारंपरिक पद्धतीविरूद्ध सबळ आक्षेप कितीतरी सांगता येतात. पण त्यापैकी एकेक घेतला म्हणजे दिसून येते की, एकही आक्षेप पार्लमेंटे दडपून टाकली पाहिजेत या निष्कर्षाचे समर्थन करीत नाही. पण उलट आक्षेप पार्लमेंटांची सुधारणा करावी असे प्रत्यक्षपणे आणि स्पष्ट-पणे दर्शवतात. कोणत्याही घटनेविषयी मानवीदृष्ट्या सर्वात चांगले बोलता येते, ते म्हणजे ती सुधारण्याची गरज आहे असे सांगणे होय. कारण ती घटना अत्यावश्यक असून नवे जीवन जगण्याची समर्थता तिच्यामध्ये असते असे सूचित होते. सन १९१०च्या मोटारगाडीविरुद्ध जे आक्षेप घेण्यात आले, त्या सर्वांचा परिणाम म्हणजे आजची मोटार होय. पण पार्लमेंटची आज जी अप्रतिष्ठा होत आहे, ती अशा आक्षेपातून उद्‌भवली नाही. उदाहरणादाखल आम्हाला असे सांगण्यात येते की, पार्लमेंट परिणामकारक होत नाही. त्यावर आमचा प्रश्न असा की, परिणामकारक नाही ते कोणत्या बाबतीत? कारण परिणामकारकता हा साधनाचा गुण असून ते

साधन कोणत्यातरी उद्दिष्टाकडे नेत असते. याबाबतीत प्रत्येक राष्ट्राच्या सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करणे हे उद्दिष्ट होईल. म्हणून पार्लमेंटची निष्फळता जाहीर करणाऱ्या माणसाला आम्ही विचारू इच्छितो ते हे की, प्रत्यक्ष सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक कशात आहे याची स्पष्ट कल्पना त्याच्यापाशी असावयास हवी. कारण तशी स्पष्ट कल्पना नसेल, कोणत्याही देशात काय करावयाचे हे सैद्धांतिक दृष्ट्यादेखील स्पष्ट नसेल, तर संस्था अकार्यक्षम आहेत या आरोपातकाहीही तथ्य नाही. १९व्या शतकातील पार्लमेंटांपेक्षा इतिहासात दुसऱ्या कोणत्याही संस्थेने अधिक कार्यक्षम राष्ट्रे निर्माण केली नाहीत, याची आठवण ठेवणे अधिक योग्य होईल. ही गोष्ट इतकी निर्विवाद आहे की, तिचे विस्मरण होणे हा शुद्ध मूर्खपणा ठरेल. तेव्हा विधिमंडळे उपयुक्त नाहीत या विधानाशी ती 'यापेक्षाही अधिक' परिणामकारक करण्याकरिता त्यांची सुधारणा घडवून आणण्याची निकड आणि शक्यता आहे या गोष्टीची गल्लत करता कामा नये.

पार्लमेंटानी प्रतिष्ठा गमावली आहे या गोष्टीचा त्यांच्या गाजलेल्या दोषांशी काहीही संबंध नाही. राजकीय साधने म्हणून त्यांचा विचार करता त्याचे कारण दुसरे आहे आणि ते सर्वस्वी भिन्न आहे. ते हे की युरोपीयाला या साधनांचा उपयोग कशाकरिता करावयाचा याचे ज्ञान नाही. सार्वजनिक जीवनाच्या पारंपरिक उद्दिष्टांविषयीचा त्यांचा आदर नाहीसा झाला आहे. थोडक्यात ज्या राष्ट्रीय राज्यांत तो परिसीमित आणि बंदिस्त झाला आहे, त्यांच्यासंबंधी त्याला कोणताही भ्रम राहिला नाही. प्रतिष्ठा गमावल्याचा जो फार बोलबाला होत आहे, त्याकडे थोड्याशा बारकाईने पाहिले म्हणजे दिसून येते की, नागरिकाला आपल्या राज्याबद्दल कोणताही आदर राहिला नाही; मग ते इंग्लंड असो, फ्रान्स असो व जर्मनी असो. संस्थांच्या तपशीलात बदल करणे निरर्थक ठरेल. कारण आदराला अपात्र ठरत आहेत त्या या संस्था नव्हेत, तर खुद्द राज्यसंस्थाच खुजी ठरत आहे.

युरोपीय मानवाच्या आर्थिक, राजकीय, बौद्धिक, संकल्पना त्याच्या स्वतःच्या देशाच्या मर्यादानी अटकाव होत आहे. त्यामुळे अगदी प्रथमच त्याला अशी जाणीव होत आहे की, ते संकल्प—म्हणजेच युरोपच्या शक्तीशाली-संभाव्यता—त्याला बंदिस्त करणाऱ्या सार्वजनिक संस्थेच्या आकाराच्या मानाने प्रमाणाबाहेर आहेत. म्हणून इंग्रज, फ्रेंच, जर्मन माणूस हा प्रांतीय आहे असा शोध त्याने लावला. आपण पूर्वी होतो त्यापेक्षा आता 'उणे' आहोत असे त्याला आढळून आले आहे. कारण पूर्वी प्रत्येक इंग्रज, फ्रेंच आणि जर्मन माणसाची आपण स्वतःपुरतेच आहो अशी समजून होती. माझ्या मते युरोपीय मानवाला आज ऱ्हासाच्या भावनेची बाधा झाली आहे, तिचा खरा उगम या समजुतीत आहे. म्हणून ती निव्वळ मानसिक असून तीत विरोधाभासही आहे. कारण त्याच्या क्षमता वाढल्या आहेत आणि जुन्या संस्थेमुळे या मर्यादित होतात आणि म्हणून त्याना वाव मिळत नाही असे गृहीत धरल्याने नेमकी ऱ्हासाची कल्पना जन्माला आली आहे. मी जे म्हणत आहे, त्याला पुष्टी मिळण्यासाठी कोणतीही एक प्रत्यक्ष कृती घेऊ या. उदाहरणार्थ—मोटारगाड्या बनविणे. मोटारगाडी हा निव्वळ युरोपीय शोध आहे. असे असूनही आज उत्तर अमेरिकेचे उत्पादन श्रेष्ठ दर्जाचे आहे. निष्कर्ष : युरोपीय मोटारगाडीचा ऱ्हास झाला आहे. तथापि युरोपीय मोटारीचा निर्माता हे अगदी चांगले जाणतो की, अमेरिकेच्या उत्पादनाला श्रेष्ठत्व प्राप्त होते ते सागरापलिकडच्या त्या माणसांच्या अंगी असणाऱ्या कोणत्याही विशिष्ट गुणामुळे नव्हे, तर अमेरिकन माणूस आपले उत्पादन बारा कोटी लोकसंख्येला निर्बंधमुक्त देऊ शकतो यामुळेच केवळ होय. अशा एका युरोपीय कारखान्याची कल्पना करा की ज्याच्यासमोर युरोपीय राज्ये, त्यांच्या वसाहती आणि संरक्षित प्रदेश या सर्वांची बाजारपेठ आहे. ५० ते ६० कोटी ग्राहकाकरिता बनविलेली गाडी फोर्ड

गाडीपेक्षा खूपच चांगली आणि खूपच स्वस्त असेल, याविषयी कोणीही शंका घेत नाही. अमेरिकी तंत्राचे सर्व विशिष्ट गुण हे बव्हंशी निश्चितपणे बाजारपेठेची व्याप्ती आणि एकजिनसीपणा यांचे परिणाम आहेत, कारणे नव्हेत. उद्योगधंद्यांचे व्यवस्थित संयोजन हा बाजारपेठेच्या आकारमानाचा साहजिक परिणाम आहे.

तेव्हा युरोपातील खरी स्थिती अशी असल्याचे दिसून येते. त्याच्या दीर्घ आणि उज्ज्वल भूतकालाने त्याला जीवनाच्या ज्या एका नव्या अवस्थेत आणून सोडले आहे, तेथे सर्व गोष्टींची अभिवृद्धी झाली आहे, पण त्याबरोबरच त्या भूतकालातून टिकून राहिलेल्या संस्था आता खुज्या झाल्या असून विकासाच्या मार्गातील अडथळे बनल्या आहेत. युरोपची घडण लहान सहान राष्ट्रांच्या रूपाने झाली आहे. एका अर्थी राष्ट्रीयत्वाची कल्पना आणि भावना हे युरोपचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण नाविन्य आहे; आणि आता स्वतःला ओलांडून पुढे जाणे त्याला भाग आहे हे त्याच्या प्रत्ययास येत आहे. येत्या काही वर्षात रंगमंचावर खेळल्या जावयाच्या प्रचंड नाट्याची रूपरेषा ही अशी आहे. हे जुने अवशेष झुगारुन देण्याला युरोप समर्थ होईल का? का तो त्या अवशेषांचा कायमचा बंदिवान होऊन राहील? इतिहासात पूर्वी एकदा असे घडले आहे. एक महान संस्कृति नष्ट झाली. आणि तिच्या राज्यसंस्थेच्या पारंपरिक कल्पनेच्या जागी तिला दुसरी आणता आली नाही.

(६)

ग्रीकी–रोमन जगाच्या यातना आणि मृत्यु ही मी दुसऱ्या एके ठिकाणी विस्ताराने कथन केली आहेत आणि त्यात विशेष तपशीलाने जे मी सांगितले आहे, त्याकडे वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो. [El Espectador, Vol. VI.] पण या क्षणी त्या विषयाचा आम्हाला दुसऱ्या एका दृष्टिकोणातून विचार करावयाचा आहे.

इतिहासात ग्रीक आणि लॅटिन लोक मोहोळातील मधमाशाप्रमाणे आपल्या नगरात बद्ध झालेले दिसतात. ही घटना साधी असून तिचा उगम मात्र रहस्यमय आहे. अधिक अवडंबर न माजविता, प्राणीशास्त्रज्ञ ज्याप्रमाणे गांधीलमाशी एकाकी भटके जीवन जगते, तर मधमाशी मोहोळ रचणाऱ्या थव्यात रहाते, या उघड पण उलगडा न झालेल्या तथ्यापासून आरंभ करतो, त्या प्रमाणेच आम्हाला त्या रहस्यमय घटनेपेसून आरंभ केला पाहिजे. अथेन्स आणि रोम अस्तित्वात येण्यापूर्वी त्या भूमीत काय होते या विषयीची माहिती उत्खनने आणि पुरातत्त्वविद्या यांच्यायोगे आम्हाला मिळते. निव्वळ ग्रामीण आणि खास वैशिष्ट्य नसलेल्या या प्रागितिहासापासून नगराचा उदय होईपर्यंतची मधली संक्रमणावस्था हे एक गुपितच राहते. नगरांचा उदय म्हणजे दोन्ही द्वीपकल्पांच्या भूमीवर पैदा झालेले एक नव्या प्रकारचे फळ होते. प्रागितिहासिक लोकसमूह आणि मानवजातीच्या रंगमंचावर एक महान नाविन्य प्रथमच आणणारे हे विलक्षण समाज यांच्यातील वांशिक दुवादेखील स्पष्ट झालेला नाही. हे नाविन्य म्हणजे एक सार्वजनिक चौक निर्माण करून त्याभोवती शेतांनी वेढलेले नगर उभारणे होय. कारण खरोखरीच Urbs (नगर) किंवा Polis (पूर) यांची सर्वात अचूक व्याख्या ही फिरंगी (Cannon) या वस्तूच्या व्याख्येसारखी अगदी विनोदी आहे. एका वर्तुळाकार पोकळीभोवती थोडी पोलादी तार घट्ट आवळा; म्हणजे तुमची फिरंगी तयार होते. त्या प्रमाणेच नगर किंवा पूर यांची सुरवात पोकळ अवकाशातून होते. सभागार (Agora), न्यायसभा (Forum) आणि इतर सगळे केवळ तो पोकळ अवकाश स्थिर करण्याचे, त्याच्या मर्यादा ठरविण्याचे एक साधन होय. पूर हे प्राथम्याने रहाण्याच्या घरांचा समूह नव्हे. तर नागरिकांकरिता एक सभास्थान, सार्वजनिक समारंभाकरिता राखून ठेवलेली वेगळी जागा होय. झोपडी किंवा

घर ही हवापाण्यासून निवारा मिळावा आणि वंशवृद्धी व्हावी यासाठी बांधली जातात—या वैयक्तिक आणि कौटुंबिक बाबी आहेत. तसे नगराचे (urbs) नसते. ते सार्वजनिक कामकाजाची चर्चा करण्यासाठी बांधण्यात येते. यात एका नव्या प्रकारच्या अवकाशाचा, आयन्स्टायनच्या अवकाशापेक्षाही कितीतरी अधिक अभिनव अवकाशाचा, शोध सूचित होतो हे लक्षात घ्या. तोपर्यंत एकच अवकाश अस्तित्वात होता, तो म्हणजे उघडा भूप्रदेश. त्या भूप्रदेशाबरोबर मानवाच्या अस्तित्वाला लागणाऱ्या सर्व आनुषंगिक गोष्टी आल्याच. शेतावरचा माणूस हा अद्याप वनस्पतीजीवनाचाच एक प्रकार असतो. त्याचे अस्तित्व, त्याच्या भावना त्याचे विचार, त्याच्या इच्छा, या सर्वात वनस्पतीच्या जीवनातील निरुत्साही सुस्तपणा जतन करून ठेवलेला असतो. आशिया आणि आफ्रिका येतील महान संस्कृति या दृष्टीकोनातून पहाता मानवरूपी प्रचंड वनस्पति होत्या. ग्रीकी—रोमन मानवाने शेतापासून, 'निसर्गापासून', भूवानस विश्वापासून, स्वतःला वेगळे करण्याचे ठरविले.  हे कसे शक्य झाले? शेतातून मानव कशी माघार घेऊ लागला? पृथ्वीच एक अवाढव्य, असीम शेत असल्यामुळे त्याने कोठे जावे? अगदी सोपी गोष्ट. तो भिंतींच्या सहाय्याने या शेताचा एक भाग वेगळा काढतो. आकारहीन, असीम अवकाशाच्या जागी या भिंती, बंदिस्त, सीमित अवकाश स्थापन करतात. हाच तो चौक. तो सार्वजनिक चौक घराप्रमाणे, शेतात गुहा असतात त्याप्रमाणे, वरून झाकलेल्या 'अंतर्भागा'सारखा नसतो. त्यात निव्वळ केवळ शेताचा अभाव असतो. तो चौक त्याला बंदिस्त करणाऱ्या भिंतीमुळे उघड्या भूप्रदेशाचाच एक भाग असतो आणि बाकी राहिलेल्या भूप्रदेशाकडे तो पाठ फिरवितो, बाकीचे सगळे बाजूला काढतो, आणि त्या सर्वांविरुद्ध उभा ठाकतो. अमर्याद शेतापासून फुटून निघणारे आणि स्वतःपुरतेच असणारे हे बंडखोर लहानसे क्षेत्र म्हणजे सर्वात अभिनव प्रकारचा अनन्यसाधारण (sui generis) अवकाश होय. त्यात मानव स्वतःला वनस्पति आणि प्राणी यांच्या समूहापासून मुक्त करतो, त्यांना बाहेर सोडून देतो आणि निव्वळ मानवी, नागरी अवकाशाची बंदिस्त जागा निर्माण करतो. म्हणून तो महान पौरजन, नगराच्या चैतन्याचे सार असा सॉक्रोटिस म्हणतो : शेतावरच्या झाडाशी मला कर्तव्य नाही. मला कर्तव्य आहे, ते फक्त नगरातल्या मानवाशीच. हिंदु, पर्शियन, चिनी किंवा मिसरी मानवाला यापैकी कधी काय माहीत झाले होते?

ग्रीस आणि रोम यांच्या इतिहासात अलेक्झांडर आणि सीझर यांच्या काळापर्यंत या दोन अवकाशातील अखंड संघर्ष अंतर्भूत आहे. बुद्धियुक्त नगर विरुद्ध वानसभूप्रदेश; कायदेपंडित विरूद्ध शेतकरी, कायदा विरूद्ध जनपद.

नगराचा हा उगम हा माझा शोध आहे, केवळ प्रतीकात्मक सत्याचा शोध आहे अशी कल्पना करून घेऊ नका. ग्रीकी—लॅटिन नगरांचे रहिवासी विलक्षण चिकाटीने नगराच्या पूर्ण एकोप्याची (Synoikismos) ही आठवण आपल्या स्मृतीच्या अगदी खोल मूलस्तरात जतन करून ठेवतात. पाठ्यपुस्तके धुंडाळण्याची गरज नाही. साधे भाषांतर पुरेसे आहे Synoikismos म्हणजे एकत्र राहण्याचा निर्धार, परिणामेकरून प्राकृतिक आणि कायदेशीर या काटेकोर दुहेरी अर्थाने एकत्र आलेला समूह होय. उघड्या भूप्रदेशातील वनस्पतीच्या विखुरणाच्या मागोमाग नगरातील लोकांचे केंद्रीकरण येते. नगर हे गृहापेक्षा फार मोठे असते. त्यात अवमानवीय (infra-human) निवासस्थानाचे किंवा घरट्याचे उच्चाटण होते. नगर म्हणजे कुटुंबाच्या निवासापेक्षा (Oikos) अधिक उच्च आणि अधिक अमूर्त अशा अस्तित्वाची निर्मिती होय. नुसत्या स्त्रीपुरुषांचे नव्हे, तर नागरिकांचे बनलेले ते गणराज्य (republica) असते, राज्यशासन (Politeria) असते. प्राण्याशी संलग्न अशा आद्य परिमितीत बसू न शकणारी एक नवी परिमिती मानवी अस्तिवाला लाभते. त्या परिमितीत पूर्वी जे

केवळ मानव होते ते आता आपल्या सर्वोत्तम शक्ती उपयोगात आणतात. अशाप्रकारे नगर अस्तित्वात येते आणि आरंभापासूनच ते राज्य असते.

एकप्रकारे सबंध भूमध्यसागरी प्रदेशाने नेहमीच या नमुन्याच्या राज्यासंबंधी आपली स्वयंस्फूर्त प्रवृत्ति दर्शविली आहे. उत्तर आफ्रिकेत (कार्थेजनगर) कमी अधिक शुद्ध स्वरूपात याच घटनेची पुनरावृत्ति होते. १९ व्या शतकापर्यन्त इटलीने नगरराज्य झुगारून दिले नव्हते; आणि आमचा स्वतःचा (स्पेनचा) पूर्व किनारा तर सहजासहजी लहान सहान परगण्यात विभागला गेला आहे. युगानुयुगाच्या स्फूर्तीचा मागे रेंगाळत राहिलेला अवशेष आहे तो. [कातालोनिया मध्ये दोन विरोधी वृत्तींचे साहचर्य आहे हे दर्शविणे मनोरंजक होईल : एक, युरोपचा राष्ट्रवाद आणि दुसरी, बार्सिलोनाचे नागरिकत्व. बार्सिलोनात भूमध्यसागरी मानवाची प्रारंभीची वृत्ती टिकून राहिली आहे. आमच्या पूर्व किनाऱ्यावर या द्वीपकल्पातील प्राचीन मानवाचे अवशेष शिल्लक आहेत, हे मी दुसऱ्या ठिकाणी सांगितले आहे.]

नगरराज्याचा आशय सापेक्षतया लहान असल्याकारणाने राज्यतत्त्वाचे विशिष्ट स्वरूप आम्हास स्पष्टपणे पहाता येते. एका बाजूने ‘राज्य’ हा शब्द ऐतिहासिक शक्तींना समतोलनाची, स्थिरतेची अवस्था प्राप्त झाल्याचे ध्वनित करतो. या अर्थाने ह्याचा भावार्थ ऐतिहासिक गतिमत्तेच्या विरूद्ध आहे : राज्य हे खरोखरीच स्थिर, प्रस्थपित आणि स्थितिबद्ध जीवनाचे रूप आहे. पण त्यातील स्थिरतेचा हा सूर, अपरिवर्तनीय निश्चितपणाचा हा सूर, राज्य निर्माण करणारी आणि त्याचे रक्षण करणारी गतिमत्ता झाकून टाकतो. सर्व समतोलनात असेच घडते. थोडक्यात प्रस्थापित राज्य हा केवळ पूर्वीच्या घडामोडींचा, त्याच्या निर्मितीला कारणीभूत झालेल्या झगड्यांचा आणि प्रयत्नांचा परिणाम आहे हे आम्ही विसरून जातो. प्रस्थापित राज्याच्या आधी त्याला घडविणारे घटक राज्य येते. गतीचे तत्त्व ते हेच. माझ्या म्हणण्याचा अर्थ हा की, राज्य हे मानवाला आयते तयार सापडलेले समाजाचे रुप नव्हे, ती काही आयती मिळालेली देणगी नव्हे. मानवाला ते परिश्रमपूर्वक घडवावे लागते. भटकी जमात किंवा टोळी किंवा इतर समाज हे रक्तसंबंधावर आधारलेले असतात आणि मानवी यत्नांच्या सहयोगाशिवाय निसर्गातच ते निर्माण झालेले असतात. याच्या उलट मानव रक्तसंबंधाने ज्या नैसर्गिक समाजाचा घटक असतो, त्यातून सुटका करून घेण्यासाठी जेव्हा प्रयत्न करतो, तेव्हाच राज्याचा आरंभ होतो. रक्त याचा अर्थ दुसरे कोणतेही नैसर्गिक तत्त्व असाही होतो. उदाहणार्थ : भाषा; मुळात राज्य हे वंश आणि बोली यांचे मिश्रण असते. सर्व नैसर्गिक समाजाची ती सर्वोच्चता आहे. राज्य हे मिश्रवंशीय आणि बहुभाषी असते.

अशाप्रकारे विविध लोकांच्या संमीलनातून नगर जन्माला येते. बहुजिनसी जीवनाच्या पायावर ते अमूर्त एकजिनसी कायद्याचे मंदिर प्रस्थापित करते. [हा कायदेशीर एकजिनसीपणा अवश्यतया केंद्रीकरण सूचित करतोच असे नव्हे.] अर्थात ही कायद्याची एकता राज्याच्या सर्जनशील गतीला प्रेरणा देणारी आकांक्षा नव्हे. ही प्रेरणा केवळ कायदेशीरपणापेक्षा अधिक भरीव असते. रक्तसंबंधी लहान गटाच्या आवाक्यात येणाऱ्या उपक्रमाचा संकल्प त्यात असतो. प्रत्येक राज्याच्या उत्पत्तीत एक महान ‘संस्थाप्रवर्तक’ आम्हाला आढळतो किंवा तो ओळखता येतो.

एखादे राज्य जन्माला येण्यापूर्वीच्या तात्कालिक ऐतिहासिक परिस्थितीचा अभ्यास केला म्हणजे पुढे दिलेली विकासाची दिशा नेहमीच शोधून काढता येते. विविध लहान लहान गट अस्तित्वात असतात आणि त्यांची सामाजिक रचना प्रत्येक गटाने स्वतःपुरतेच जगावे अशी योजलेली असते. प्रत्येक गटाचे सामाजिक

अनुक्रमाणिका

स्वरूप केवळ अंतर्गत अस्तित्वाच्या सामायिक उपयोगाकरिता असते. यावरून दिसून येते की, भूतकालात हे गट एकाकी, स्वतःपुरतेच, स्वतःसाठीच आणि प्रसंगोपात्त आपल्या शेजाऱ्याशी केवळ संपर्क साधण्यापुरतेच प्रत्यक्षात जगत होते. पण या प्रत्यक्षातील एकाकीपणामागून एक 'बाह्य' सामायिक जीवन आले आणि तेही विशेषतः आर्थिक क्षेत्रात. प्रत्येक गटातील व्यक्ती ही केवळ आपल्या स्वतःच्या वर्तुळापुरतीच रहात नाही; दुसऱ्या गटातील व्यक्तीशी त्यांचे संबंध जोडले जातात, आणि त्यांच्याशी व्यापारी वा बौद्धिक संबंध प्रस्थापित होतात. यातून 'अंतर्गत' आणि 'बाह्य' अशा दोन सामायिक अस्तित्वात असमतोल निर्माण होतो. समाजाची प्रस्थापित अंगे-कायदे, रूढी, धर्म—अंतर्गताला अनुकूल असतात आणि त्यांच्यामुळे नवे विशाल बाह्य अस्तित्व कठीण होते. या परिस्थितीत राज्यतत्त्व हे गतिमान तत्त्व असते आणि ते अंतर्गत अस्तित्वाच्या सामाजिक अंगांचे उच्चाटन करून त्यांच्या जागी बाह्यात्कारी जगणाऱ्या नव्या जीवनाला योग्य अशी सामाजिक अंगे राज्यतत्व आणीत असते. युरोपमधील प्रत्यक्ष परिस्थितीला हे लागू करा. म्हणजे या अमूर्त लक्षणाना आकार आणि रंग प्राप्त होईल.

काही विशिष्ट लोकांची मने सामायिक जीवनाच्या एका स्वरूपाची पारंपरिक रचना टाकून देण्याला आणि त्याच्या जोडीला पूर्वी अस्तित्वात नसलेल्या दुसऱ्या एखाद्या स्वरूपाची योजना शोधून काढण्याला असमर्थ असतील, तर राज्याची निर्मिती होणे असंभाव्य होते. म्हणूनच राज्यनिर्मिति ही खरीखुरी निर्मिति असते. राज्याचा आरंभ निखालसपणे कल्पनाशक्तीतील कृति प्रत्यक्षात उतरली म्हणजे होतो. कल्पनाशक्ती ही मानवाच्या अंगी असणारी विमोचक शक्ती आहे. ज्या प्रमाणात लोकांची कल्पनाशक्ति समर्थ असते, त्या प्रमाणात ते राज्य स्थापण्याला समर्थ असतात. म्हणून सर्वच लोकांच्या बाबतीत राज्याच्या दिशेने उत्क्रांति होण्याला मर्यादा पडते. निसर्गाने त्यांच्या कल्पनाशक्तीला घातलेली मर्यादा नेमकी हीच.

ग्रीक आणि रोमन लोक हे ग्रामीण परिसराच्या विखुरलेपणावर विजय मिळविणाऱ्या नगराची कल्पना करण्याला समर्थ झाल्यामुळे ते नगराच्या तटापर्यंत येऊन थडकले. ग्रीकीरोमन मनाला त्याही पुढे नेण्याकरिता आणि नगरापासून त्यांना मुक्त करण्याकरिता प्रयत्न करणारी माणसे होऊन गेली. पण ते एक व्यर्थ साहस होते. ब्रूटस हा रोमन लोकांच्या कल्पकतेच्या मर्यादांचा प्रतिनिधी होता आणि त्याने सीझरची हत्या करण्याचे काम पत्करले. प्राचीन काळातील सर्वश्रेष्ठ कल्पकता म्हणजे सीझर होय. या इतिहासाचे पुनःस्मरण करणे आजच्या आम्हा युरोपियनांना अगत्याचे आहे. आम्ही आता त्याच प्रकरणापर्यंत येऊन पोहोचलो आहोत.

## (७)

प्राचीन जगात स्पष्ट डोक्याचे—ज्याला खरोखरीच स्पष्ट म्हणता येईल अशा डोक्याचे—संभवतः फक्त दोनच पुरुष होते : थेमिस्टोक्लिस आणि सीझर हे दोन मुत्सद्दी. अनेक गोष्टींवर स्पष्ट विचार असलेली इतर माणसे-तत्त्वज्ञ, गणिती, निसर्गवादी-होती यात शंका नाही. पण त्यांची स्पष्टता वैज्ञानिक धर्तीची होती. म्हणजे ती अमूर्त गोष्टीशी संबंधित होती. विज्ञान ज्या सर्व गोष्टी सांगते, मग ते विज्ञान कोणतेही असो, त्या सर्व अमूर्त असतात आणि अमूर्त गोष्टी नेहमीच स्पष्ट असतात. म्हणून विज्ञानाची स्पष्टता वैज्ञानिकांच्या डोक्यात असण्यापेक्षा ज्या विषयासंबंधी ते बोलतात, त्या विषयात असते. जे गोंधळाचे, गुंतागुंतीचे असते, तीच मूर्त, मूलभूत वास्तवता असते; ती सदेव अनन्य घटना असते. जो माणूस त्या वास्तवतेतून स्पष्ट मार्ग काढू शकतो,

जो प्रत्येक मूलभूत स्थितीत उत्पन्न झालेल्या गोंधळामागे दडलेल्या हालचालीचे व्यापार जाणू शकतो, थोडक्यात जो जीवनात स्वतःला हरवून बसत नाही, तोच खरोखर स्पष्ट डोक्याचा माणूस होय. तुमच्या भोवतालच्या माणसाकडे बारकाईने पहा. म्हणजे तुम्हाला दिसून येईल की, झोपेत चालणाऱ्या माणसाप्रमाणे ही माणसे स्वतःचे बरेवाईट संचित बरोबर घेऊन जीवनात स्वतःला हरवलेल्या स्थितीत भरकटत असतात; आणि स्वतःला काय घडत असते याची यत्किंचितही शंका त्यांना येत नाही. आपण स्वतः आणि आपला परिसर यांच्याविषयी नेमक्या शब्दात ते बोलत रहातील आणि त्यावरून त्यासंबंधी त्यांच्यापाशी कल्पना आहेत असे वाटेल. पण त्या कल्पनांचे विश्लेषण करायला सुरवात करा; म्हणजे तुम्हाला आढळून येईल की, ज्या वस्तुस्थितीबद्दल ते बोलतात, तीवर त्यांनी क्वचितच विचार केलेला असतो आणि अधिक खोलात गेलात तर दिसून येईल की त्या कल्पनात वस्तुस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्नसुद्धा नसतो. त्याच्या अगदी उलट : ती व्यक्ती त्या कल्पनांच्या द्वारे वस्तुस्थितीचे, खुद्द आपल्या जीवनाचे कोणतेही दर्शन घडू नये, म्हणून प्रयत्न करीत असते. कारण जीवन हा आरंभी एक गोंधळ असतो आणि त्यात माणूस स्वतःला हरवून बसतो. माणसाला त्याबद्दल शंका येते, पण ही भयानक वस्तुस्थिती स्वतःसमोर उभी राहिल्याचे पाहून तो घाबरून जातो, आणि कल्पनाजालाच्या पडद्याने ती झाकून टाकण्याचा प्रयत्न करतो. कल्पनाजालात सगळे स्पष्ट असते. त्या 'कल्पना' खऱ्या आहेत वा नाहीत याची पर्वा नसते. आपल्या अस्तित्वाच्या संरक्षणासाठी खंदक म्हणून तो त्यांचा उपयोग करतो. वस्तुस्थितीला पळवून लावणारी जणू ती बुजगावणीच!

स्पष्ट डोक्याचा पुरुष तोच की, जो अशा भरमसाट 'कल्पना'पासून स्वतः मुक्त असतो, जीवनाकडे धीटपणे पाहतो, जीवनातील प्रत्येक घटना प्रश्नात्मक आहे हे जाणतो आणि ज्याला स्वतः हरवल्याची जाणीव होते. हे अगदी साधे सत्य आहे. जगणे म्हणजे स्वतः हरवल्याचे जाणणे—आणि जो हे सत्य स्वीकारतो त्याने आधीच स्वतःचा शोध घेण्याला, पक्क्या भूमीवर पाय रोवायला सुरवात केलेली असते. बुडत्या जहाजातील माणूस सहजप्रवृत्तीने आसपास पाहून कशालातरी चिकटून रहातो; त्यावेळची त्याची नजर करुण, भेदक आणि अत्यंत प्रांजल असते. कारण तो त्याच्या सुटकेचा प्रश्न असतो. स्पष्ट डोक्याच्या माणसाची स्थिती अशीच असते आणि त्या धडपडीतून आपल्या जीवनाच्या अव्यवस्थेत तो व्यवस्था निर्माण करीत असतो. बुडत्या जहाजातील माणसाच्या कल्पनाच तेवढ्या खऱ्या असतात, बाकीचे सारे वाचाळपणा, केवळ बतावणी, केवळ फार्स! ज्याला खरोखरीच स्वतः हरवल्याचे जाणवत नाही, तो सुटका न होताच स्वतःला गमावून बसतो. म्हणजेच त्याला स्वतःचा शोध कधीच लागत नाही, तो स्वतःच्या वस्तुस्थितीला तोंड देऊ शकत नाही. प्रत्येक क्षेत्रात हे खरे आहे, विज्ञानाच्या क्षेत्रात देखील. विज्ञानाच्या क्षेत्रात विज्ञान ही स्वभावतः जीवनापासून पळवाट असली, तरी सुद्धा हे खरे आहे. (बहुसंख्य वैज्ञानिकांना जीवनाला तोंड द्यावे लागते, या भीतीने स्वतःला त्यांनी विज्ञानाला वाहून घेतलेले असते. ते स्पष्ट डोक्यांचे नसतात, म्हणून कोणतीही परिस्थिती प्रत्यक्ष दत्त म्हणून पुढे उभी राहते त्यावेळी त्यांची कुप्रसिद्ध नालायकी दिसून येते.) ज्या प्रमाणात एखाद्या प्रश्नात स्वतःला हरवून बसल्याची आम्हाला जाणीव होते, त्या प्रमाणात आमच्या शास्त्रीय कल्पनांना मोल असते, त्या प्रश्नाचे वादात्मक स्वरुप आम्हाला समजते आणि स्वीकृती कल्पना, प्रथा, शब्दजाल यांचा आधार घेता येत नाही, याची जाणीव होते. जो माणूस नवे वैज्ञानिक सत्य शोधून काढतो, त्याला आधी शिकलेल्या बहुतेक सर्व गोष्टींचा पूर्ण विध्वंस करावा लागतो आणि हजारो शिळी विधाने नष्ट करून रक्तलांछित हस्ताने तो नव्या सत्याप्रत पोहोचतो.

अनुक्रमाणिका

राजकारण विज्ञानापेक्षा खूपच अधिक प्रमाणात वस्तुस्थितीला धरून असते. कारण ते अनन्यसाधारण परिस्थितीचे बनलेले असते, आणि माणसाची इच्छा असो वा नसो, तीत तो बुडाल्याचे त्याला अकस्मात आढळून येते. म्हणून कोण स्पष्ट डोक्याचे आहेत आणि कोण धोपटमार्गी आहेत यातील भेद अधिक चांगला समजून घेण्याची ही एक कसोटी आहे. भयंकर गोंधळाच्या काळात मानवजातीला जाणे भाग पडलेल्या सर्वात मोठ्या अराजकाच्या कालखंडात वस्तुस्थितीच्या मुळाचा ठाव घेण्याची शक्ती असलेले ज्ञात असे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे सीझर होय. जणू काही दैवाच्या मनात हे उदाहरण यापेक्षाही अधिक उठावदार करावयाचे होते, म्हणूनच सीझरच्या जोडीला एक प्रचंड 'बुद्धिमान' डोके उभे केले. हे डोके म्हणजे सिसेरो. हा माणूस सारी हयातभर गोंधळ घालण्यात गुंतला होता. भाग्याचा अतिरेक झाल्याने रोमची राजकीय यंत्रणा निकामी झाली होती. टायबर नदीच्या काठची ही नगरी इटली, स्पेन, उत्तर आफ्रिका, प्राचीन तशीच हेलेनवादी पूर्व यांची ही स्वामिनी, उध्वस्त होण्याच्या बेतात होती. तिच्या सार्वजनिक संस्था नगरपालिकेच्या स्वरूपाच्या होत्या. ज्याप्रमाणे वनदेवता विनाशाच्या भीतीने आश्रयदात्या वृक्षाला चिकटून राहतात, त्याप्रमाणे या संस्था नगराला चिकटून अतूटच राहिल्या.

लोकशाह्यांचे स्वास्थ्य एका क्षुल्लक यांत्रिक तपशीलावर—निवडणुकीच्या कार्यपद्धतीवर—अवलंबून असते. मग त्यांचा प्रकार आणि कक्षा कोणतीही असो. बाकीचे सर्व गौण. जर निवडणुकांचे व्यवहार यशस्वी झाले, त्या वस्तुस्थितीला धरून झाल्या, तर सर्व ठीक चालते. नाहीतर इतर बाबतीत सर्वांग सुंदर प्रगति होऊनसुद्धा सारेच बिनसते. ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकाच्या आरंभी रोम सर्व शक्तिमान होते, संपन्न होते. त्याला कोणीही शत्रू नव्हता आणि तरीही ते मृत्युपंथाला लागले होते. कारण त्याने मूर्खपणाची निवडणूक पद्धती चालू ठेवण्याचा हेका धरला. खोटी निवडणूक पद्धति मूर्खपणाची असते. मतदान नगरातच घेणे भाग होते. ग्रामीण भागातील नागरिक निवडणुकीत भाग घेऊ शकत नसत. मग साऱ्या रोमन जगात पसरलेल्या लोकांचे तर नावच नको. खऱ्याखुऱ्या निवडणुका अशक्य झाल्यामुळे त्या खोट्या करणे अवश्य झाले. उमेदवारांनी कसलेल्या सैनिकांतून किंवा सर्कशीच्या मल्लातून धटिंगणाच्या टोळ्या संघटित केल्या. त्यांचे काम मतदारांना धाकदपटशा दाखवणे हे होते. खऱ्या मताधिकाराचा आधार नसेल, तर लोकशाही संस्था हवेत लोंबकळत रहातील. हवेतल्या गोष्टी शब्दासारख्या असतात, आणि 'गणराज्य म्हणजे निव्वळ शब्दच' हे सीझरचे वचन आहे. दंडाधिकारी वर्गाच्या हाती सत्ता नव्हती. डावे आणि उजवे सेनापति—मारियुस आणि सुल्ला यांच्यासारखे—यांनी पोकळ हुकूमशाही राजवटी स्थापून एकमेकांना हैराण केले. त्या हुकुम शाह्यातून काहीही निष्पन्न झाले नाही.

सीझर आपले धोरण कधीही प्रतिपादन करीत बसला नाही, तर ते अमलात आणण्याच्या कामी तो गढून गेला. ते धोरण म्हणजे स्वतः सीझरच. मागाहून प्रकट झालेली सीझरवादाची ती मार्गदर्शिका नव्हती. त्याकरिता दुसऱ्या कशाचीही गरज नव्हती. आम्हाला सीझरचे धोरण समजून घ्यावयाचे असेल, तर फक्त सीझरच्या कृती घेऊन त्यांना सीझरचे नाव दिले म्हणजे झाले. त्याचे रहस्य त्याच्या मुख्य पराक्रमात आहे : गॉल लोकांवर त्याने मिळविलेला विजय. हे कार्य हाती घेण्यासाठी स्वतः त्याला प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंड पुकारावे लागले. कारण सत्ता गणराज्यकर्त्यांच्या हाती होती. त्यांचे राजकारण सारांशाने दोन वाक्यात सांगता येईल. एक : रोमचा बेसुमार विस्तार आणि त्यामुळे सार्वजनिक जीवनात उसळलेला क्षोभ. ती नगरी इतक्या राष्ट्रांचे शासन करू शकत नव्हती. प्रत्येक नवा विजय हा गणराज्यद्रोहाचा गुन्हा होतो. दुसरे : राज्यप्रमुख

(Princeps). राज्यातील संस्थांचे विसर्जन थांबविता यावे यासाठी त्यांचे अस्तित्व होते. रोमन माणूस ‘राज्यप्रमुख’ या संज्ञेचा जो अर्थ समजत असे, त्याच्या बव्हंशी विरुद्ध अर्थ ‘राजा’ (Prince) या आमच्या संज्ञेत आहे. राज्यप्रमुख याचा अर्थ नेमका इतरासारखाच नागरिक, पण गणराज्य संस्थांच्या व्यवहाराचे नियमन करण्याकरिता उच्च अधिकार प्राप्त झालेला नागरिक. सिसेरो ‘गणराज्य’ या आपल्या ग्रंथात आणि सालुस्ट सीझरविषयीच्या आठवणीत राजकारणी लोकांच्या विचारांचे सार सांगताना ‘नगर प्रमुख’ ‘सार्वजनिक व्यवहाराचा पालक’ ‘नियामक’ यांची आवश्यकता प्रतिपादन करतात.

प्रश्न सोडविण्याची सीझरची पद्धति ही स्थितिवादी पद्धतीच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. पूर्वीच्या रोमन विजयांचे परिणाम सावरून घ्यावयाचे तर ते तसेच पुढे चालू ठेवून कठोर नियतीचा पूर्णतः स्वीकार करण्याशिवाय गत्यंतर नाही याची जाणीव तो ठेवतो. पश्चिमेच्या नव्या लोकसमूहांना जिंकणे हे विशेषतः आवश्यक होते. हे समूह नजीकच्या भविष्यकाळात पूर्वेच्या निःसत्व लोकापेक्षा अधिक धोकादायक झाले असते. सीझर पश्चिमेकडच्या रानटी राष्ट्रांचे पूर्णतः रोमनीकरण करण्याचा पाठपुरावा करतो.

स्पेंगलरने सांगितले आहे की, काळाची कल्पना समजण्याला, आपले अस्तित्व काळात विस्तारलेले असते हे समजून घेण्याला, ग्रीकीरोमन लोक असमर्थ होते. त्यांचे अस्तित्व प्रत्यक्ष त्या त्या क्षणापरते असे. हे निदान चुकीचे मानण्याकडे माझा कल झुकतो; किंवा त्यात दोन गोष्टींची तरी गल्लत असावी. ग्रीकीरोमन मानवाला भविष्याविषयीच्या असाधारण आंधळेपणाची बाधाच झाली होती. रंगांधळ्याला जसे तांबडे दिसत नाही, तसेच त्याला भविष्य दिसत नाही. उलटपक्षी, तो भूतकालात बद्धमूल होऊन राहिला आहे. लागार्जितो [हा उल्लेख बैलाशी झुंज खेळणाऱ्या प्रसिद्ध मल्लासंबंधी असून त्याला लोकांनी नेहमीप्रमाणे दिलेले हे टोपण नाव आहे. त्याचा अर्थ ‘सरडा’ असा आहे.] ज्याप्रमाणे झुंडीतल्या बैलाला ठार मारण्याच्या तयारीत असताना एक पाऊल मागे घेतो, तो भूतकालात वर्तमान परिस्थितीकरिता आदर्श शोधून काढतो, आणि या सज्जतेनिशी तो भूतकालाच्या पोहण्याच्या पोषाखाचे आवरण आणि संरक्षण घेऊन तो प्रत्यक्ष स्थितीच्या लाटेत बुडी मारतो. म्हणून त्याचा सगळाच मानवी जीवनक्रम, तसेच सांगावयाचे झाले तर, एक पुनरुज्जीवन असते, तो आर्ष साच्याचा मानव असतो. आणि प्राचीन मानव सदैव असेच होते. पण यावरून त्यांना काळाचे भान नव्हते असे ध्वनित होत नाही. ‘कालमानाची’ अपूर्णता, भविष्याचे क्षीणत्व, आणि भूतकालाची अतिवृद्धि, एवढाच त्याचा अर्थ. आम्ही युरोपीय नेहमीच भविष्याकडे खेचले गेलो आहो. आम्हाला असे वाटते की, बहुतेक सर्व घटनांची कालपरिमिती अशीच असते आणि त्यांचा आरंभ ‘पूर्वी’ ने न होता ‘पश्चात’ने होतो. म्हणून जेव्हा आम्ही ग्रीकीरोमन जीवनाकडे पहातो, तेव्हा ते ‘कालरहित’ वाटणे स्वाभाविक आहे.

भूतकालाच्या आदर्शाच्या चिमट्यात वर्तमानातील प्रत्येक गोष्ट पडकण्याचे वेड प्राचीन काळच्या मानवापासून आधुनिक भाषाशास्त्रज्ञापर्यंत पिढ्यानपिढ्या चालत आले आहे. भाषाशास्त्रज्ञ हासुद्धा भविष्यासंबंधी आंधळा असतो. तोही मागे पहातो. हरएक प्रत्यक्ष गोष्टीसाठी तो पूर्वीचे दाखले शोधतो आणि त्याला आपल्या सुंदर काव्यमय भाषेत ‘साधन’ हे नाव देतो. मी असे म्हणतो याचे कारण सीझरचे अगदी आरंभीचे चरित्रकार देखील तो अलेक्झांडरचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करीत होता अशी कल्पना करून या महाप्रचंड पुरुषाला समजून घेण्याचा मार्ग बंद करून टाकतात. त्यांच्या बाबतीत असे समाकरण अटळ होते. अलेक्झांडरची झोप मिल्टिआडिसला मिळालेल्या सन्मानाच्या विचाराने जशी उडून जात असे, तशीच सीझरलाही अलेक्झांडरच्या

अनुक्रमाणिका

सन्मानामुळे निद्रानाशाची बाधा जडली होती. हाच अनुक्रम  पुढे चालू राहातो. सदैव पाऊल मागेच. आजचे पाऊल कालच्या पावलाच्या ठशावर. आधुनिक भाषाशास्त्रज्ञ म्हणजे अशा प्राचीन चरित्रकाराचा प्रतिध्वनीच होय.

अलेक्झांडरने ज्या पद्धतीने कार्य केले, तसेच काहीतरी करण्याची सीझरचीसुद्धा आकांक्षा होती अशी कल्पना करणे—आणि बहुतेक सर्व इतिहासकारांचा यावर विश्वास आहे—म्हणजे त्याला समजून घेण्याचा नाद निश्चितपणे सोडून देणे होय. सीझर हा बहुतांशी अलेक्झांडरच्या विरुद्ध आहे. त्यांना एकत्र आणणारी एकच गोष्ट म्हणजे सार्वभौम राज्याची कल्पना. पण ही कल्पना अलेक्झांडरची नव्हती. ती पर्शियामधून आली. अलेक्झांडरची प्रतिमा सीझरसमोर असती, तर तो प्रतिष्ठित भूतकाल असलेल्या पूर्वेकडे जाण्याला प्रवृत्त झाला असता. उलट पश्चिमेकडे जाणे पसंत करण्याच्या त्याच्या निर्णयावरून त्या मॅसिडोनिअन पुरुषाच्या विरुद्ध दिशेने जाण्याचा त्याचा निर्धार उघड दिसतो. शिवाय सीझरच्या दृष्टीसमोर केवळ सार्वभौम राज्यच नव्हते. त्याचा उद्देश अधिक खोल आहे. त्याला जे रोमनचे साम्राज्य हवे आहे, ते रोमवर जगणारे नव्हे; तर त्याच्या परिधीवर, त्याच्या सुभ्यांवर जगणारे साम्राज्य होय. त्यात नगरराज्यांचे संपूर्ण उल्लंघन गर्भित आहे. त्यात अतिशय विविध लोकसमूहांचा सहयोग असणारे राज्य आहे आणि त्या राज्यासंबंधी सर्वामध्ये ऐक्यभाव नांदत असतो. आज्ञा देणारे केंद्र आणि त्या पाळणारा परिधी नव्हे; तर अशी एक विराट समाजसंस्था की ज्यातील प्रत्येक घटक एकाच वेळी क्रियाशील आणि निष्क्रिय असा प्रजाजन असतो. आधुनिक राज्य हे असेच आहे. आणि सीझरच्या भविष्यदर्शी प्रतिभेचे अचाट पूर्वसूचनही तसेच होते. पण त्यात रोमबाह्य, अभिजनशाही विरोधी सत्ता,  पूर्वगृहीत होती आणि ती गणराज्यीय स्वल्पतंत्रापेक्षा (oligarchy) फारच वरच्या दर्जाची आणि समाजात सर्वप्रथम अशा राज्यप्रमुखापेक्षाही वरची होती. ही कार्यकारी सत्ता सार्वत्रिक लोकशाहीची प्रतिनिधी होती आणि ती राजेशाहीच असणे शक्य होते व तिचे अधिष्ठान रोमच्या बाहेर असावयास हवे होते. गणराज्य, राजसत्ता! इतिहासात सतत आपला अधिकृत अर्थ बदलणारे हे दोन शब्द. याच कारणास्तव त्यांचे प्रत्यक्ष सार निश्चितपणे सांगण्याकरिता हरघडी त्यांचे पृथक्करण करणे अवश्य आहे.

सीझरचे विश्वासू अनुयायी, त्यांची अतिनिकटची साधने, नगरातील आर्षमनाची थोर माणसे नव्हती. ती माणसे नवीन होती; बाह्य प्रांतातील जोमदार, कार्यक्षम अशा त्या व्यक्ति होत्या. सीझरचा खरा मंत्री कॉर्नेलियस बाल्बस होता. तो कॅडिझचा एक व्यापारी असून अटलांटिक प्रदेशातून आला होता. पण नव्या राज्याचे हे पूर्वचिन्ह फारच पुढच्या काळाचे होते. लॅटियम प्रदेशाच्या मंदगती माणसाना इतकी मोठी उडी घेणे शक्य नव्हते. त्यांच्यासमोर असलेली नगराची प्रतिमा आणि नगराची प्रत्यक्ष भौतिकवादी वृत्ती यामुळे रोमन लोकांना राज्यसंस्थेच्या या नव्या संघटेनेचे ‘दर्शन’ घडू शकत नव्हते. नगरात न रहाणारे लोक राज्य कसे बनवू शकतील? कोणत्या नव्या प्रकारचे हे ऐक्य होते? इतके सूक्ष्म, जणू इतके गूढ! पूनः मी सांगतो : ज्या वस्तूला आम्ही राज्य म्हणून संबोधतो, ती रक्ताच्या लाग्याबांध्यानी जोडल्या गेलेल्या मानवांचे उत्स्फूर्त एकत्रीकरण नव्हे. जेव्हा नैसर्गिकरीत्या विभागलेल्या समूहाना सामायिकरीत्या राहणे भाग पडते, तेव्हा राज्यसंस्थेचा आरंभ होतो. हे बंधन पाशवी शक्तीचे नसते, तर त्यात विखुरलेल्या लोक समूहासमोर ठेवावयाचे समान कार्य, त्याना प्रेरणा देणारा उद्देश गर्भित असतो. सर्वाआधी राज्य म्हणजे कृति करण्याची योजना आणि सर्वांनी मिळून कार्य करण्याचा कार्यक्रम होय. लोकांनी एकत्र येऊन काहीतरी करावे यासाठी त्यांना ते आवाहन असते. राज्यसंस्था म्हणजे रक्तसंबंध नव्हे, किंवा भाषिक ऐक्य नव्हे, प्रादेशिक एकता नव्हे किंवा वस्तीचे सान्निध्यही नव्हे. जी जड,

अनुक्रमाणिका

सुस्त, स्थिर, मर्यादित अशापैकी काहीही नसते. ती निव्वळ गतिमत्ता—सामायिकपणे काहीतरी करण्याची इच्छा—असते आणि त्यामुळेच राज्यसंस्थेची कल्पना कोणत्याच भौतिक मर्यादांनी सीमित होत नाही.

सावेद्रा फाजार्दो याच्या प्रसिद्ध राजचिन्हात कितीतरी कल्पकता होती : एक बाण आणि त्याखाली 'तो वर तरी जातो किंवा खाली तरी पडतो; ही अक्षरे. राज्य ते हेच, जडवस्तू नव्हे तर गतिमत्ता. राज्य म्हणजे असे काहीतरी की जे प्रत्येक क्षणी भूतकालातून येत असते आणि भविष्याकडे जात असते. प्रत्येक हालचालीप्रमाणे त्याला 'आरंभबिंदू' आणि 'अंतिमबिंदू' असतो. ज्या राज्याचे जीवन खरोखरीच असे असते, त्याचे कोणत्याही क्षणी विच्छेदन केले, तर त्यात सामायिक जीवनाचा असा एकादा दुवा आढळून येईल की जो कोणत्या ना भौतिक गुणावर-रक्त, भाषा 'नैसर्गिक सरहद्दी' यावर—आधारलेला असतो. त्या जीवनाचे ठोकळेबाज स्पष्टीकरण केल्यानंतर आम्ही म्हणू की राज्य ते हेच. पण लगेच आमच्या लक्षात येते की, हा मानवसमूह सामायिकपणे काहीतरी करीत असतो—अन्य लोकांना जिंकणे, वसाहती स्थापणे, दुसऱ्या राज्याशी ऐक्य साधणे, म्हणजे त्याच्या ऐक्याचे महत्त्वाचे तत्त्व म्हणून जे काही भासते त्यापलीकडे प्रत्येकक्षणी ते जात असते. हाच तो 'अंतिमबिंदु'. हेच ते खरे राज्य आणि पूर्वीचे कोणतेही ऐक्य ओलांडून पुढे जाण्यात नेमके त्याचे ऐक्य सामावलेले असते. कोठेतरी पुढे जाण्याची प्रेरणा ज्यावेळी खंडित होते, त्यावेळी राज्य आपोआप नष्ट होते आणि पूर्वी अस्तित्वात असलेल्या ऐक्याला वंश, भाषा, नैसर्गिक सरहद्दी यांचा भौतिक पाया आहे असे भासते, ते ऐक्य निरुपयोगी ठरते. राज्य मोडते, विलयाला जाते, त्याचे पृथक पृथक तुकडे पडतात.

राज्याच्या प्रत्येक क्षणाचे हे दुहेरी स्वरूपच—विद्यमान ऐक्य आणि संकल्पित ऐक्य-केवळ राष्ट्रीय राज्याचे रहस्य समजून घेण्याला सहाय्यभूत होते. 'राष्ट्र' या शब्दाची त्याच्या आधुनिक रुढार्थाने यथायोग्य व्याख्या अद्याप झाली नाही हे आम्ही जाणतो. नगरराज्य ही स्पष्ट व उघड दिसणारी कल्पना होती. पण जर्मन आणि गॉल लोकांमध्ये जन्माला आलेला सार्वजनिक ऐक्याचा नवीन नमुना, पश्चिमेची ही नवी राजकीय स्फूर्ति, फार संदिग्ध आणि चंचल अशी वस्तु आहे. आजच्या भाषाशास्त्रज्ञ इतिहासकार हा स्वभावतःच आर्षवादी असल्याने तो या भयानक घटनेपुढे गोंधळून जातो. सीझर किंवा टॅसिटस हे आल्प्स पर्वताच्या पलीकडच्या ऱ्हाईन नदीच्याही पुढच्या प्रदेशातील किंवा स्पेनमधील प्रारंभावस्थेतील राज्याचे स्वरूप रोमन परिभाषेत सांगण्याचा प्रयत्न करीत असताना जसे गोंधळून गेले, तसेच जवळ जवळ या भयानक घटनेमुळे भाषाशास्त्रज्ञ गोंधळून गेले आहेत. त्यांनी त्या राज्याना नगर (civitas), गण (Gens), राष्ट्र (nation) अशी नावेही दिली होती; पण यापैकी एकही नाव योग्य नाही याची त्याना जाणीव होती. [See Dopsch, Economic and Social Foundations of European Civizatilion, 2nd Ed. 1914, Vol II, PP. 3, 4.] ती civitas नव्हती, याचे साधे कारण ती नगरे नव्हती. पण ही संज्ञा संदिग्ध आणि मर्यादित प्रदेशांच्या संदर्भात वापरूनही चालणार नाही. नवे लोकसमूह आपली भूमी अत्यंत सहजतेने बदलतात किंवा निदान जी जागा ते व्यापतात, तिचा विस्तार किंवा संकोच करतात. त्यांच्यात वांशिक ऐक्य—गण किंवा राष्ट्र—नसते. आम्ही कितीही मागे गेलो, तरी नवी राज्ये जन्मसंबंध नसलेल्या समूहांची बनलेली दिसून येतात. त्यात निरनिराळ्या रक्तवंशांचा संकर झालेला असतो. तेव्हा राष्ट्र हे जर रक्तसंबंधाचा समाज नसेल किंवा त्यात प्रादेशिक संलग्नता नसेल किंवा अशाच स्वरूपाचे आणखी काहीही नसेल, तर मग ते आहे तरी काय ?

अनुक्रमाणिका

तथ्ये सरळ स्वीकारली म्हणजे मूळ सापडते हा नित्याचा नियम येथेही लागू पडतो. फ्रान्स, स्पेन, जर्मनी अशा कोणत्याही 'आधुनिक राष्ट्रा'च्या उत्क्रांतीचा जेव्हा आम्ही अभ्यास करतो, तेव्हा स्पष्टपणे काय दिसून येते? फक्त हेच : ज्या घटनेने एकेकाळी राष्ट्रीयत्व घडविले असे वाटले, तीच पुढील काळात लोप पावलेली दिसून येते. प्रथम राष्ट्र हे टोळी असल्याचे दिसून येते आणि टोळीच्या बाहेर अ-राष्ट्र असते. मागाहून राष्ट्र दोन टोळ्यांचे बनते. पुढे ते प्रदेश, त्याच्याही नंतर परगणा, सुभा किंवा राज्य बनत जाते. लिआँ हे राष्ट्र असते; पण कास्ताईल नसते. नंतर लिआँ आणि कास्ताईल या दोहोचे मिळून राष्ट्र बनते; पण आरागाँ राष्ट्र नसते. यात दोन तत्वांचे अस्तित्व स्पष्ट आहे, एक बदलणारे आणि सतत ओलांडले जाणारे—टोळी, प्रदेश, सुभा, राज्य यांच्या बोली वा भाषा यासह—दुसरे, चिरस्थायी. हे दुसरे तत्त्व त्या सर्व सरहद्दीना मुक्तपणे ओलांडून पुढे जाते आणि पहिल्या तत्त्वाच्या मूलतः विरुद्ध असणाऱ्या गोष्टीशीच नेमका संयोग करते.

भाषाशास्त्रज्ञ—हे नाव मी इतिहासकार या पदवीचा दावा सांगणाऱ्या लोकांना दिले आहे—हे जेव्हा गेल्या दोन तीन शतकांच्या आमच्या धावत्या युगात पाश्चात्य राष्ट्रे काय होती येथपासून सुरवात करतात आणि वेरसिंगे तोरी किंवा किद कांपिदोर हे फ्रान्सचा विस्तार सेंमालोपासून स्ट्रासबुर्गपर्यंत करण्यासाठी किंवा स्पेन फिनिस्तेर ते जिब्राल्तर ही मजल गाठण्यासाठी धडपडत होते, अशी समजूत करून घेत असतात, तेव्हा ते मूर्खपणाची एक अतिशय मनोरम चणूक दाखवितात. हे भाषाशास्त्रज्ञ एखाद्या धोपटमार्गी नाटककाराप्रमाणे बहुधा नेहमी आपले नायक त्रिदशवार्षिक युद्धाच्या मोहिमेवर निघताना दाखवीत असतात. फ्रान्स आणि स्पेन हे कसे घडले हे आम्हाला स्पष्ट करून दाखविण्याकरिता फ्रेंच आणि स्पॅनिश लोकांच्या आत्म्यात खोलवर फ्रान्स आणि स्पेन ही पूर्वीच एकत्रित स्वरूपात अस्तित्वात होती असे ते समजून चालतात. जणू काही फ्रान्स आणि स्पेन ही जन्माला येण्यापूर्वी तेथे फ्रेंच वा स्पानिआर्द असे कोणी अस्तित्वात होते! जणु काही फ्रेंच आणि स्पानिआर्द या वस्तू तयार होण्यासाठी दोन हजारवर्षांच्या दीर्घ श्रमांची आवश्यकता नव्हती!

यात उघड सत्य हे की आधुनिक राष्ट्र ही केवळ एका बदलत जाणाऱ्या तत्वाचा वर्तमान आविष्कार असून त्या तत्त्वाचे सतत उल्लंघन होत असते. हे तत्त्व आता रक्ताचे किंवा भाषेचे रहात नाही. कारण फ्रान्स किंवा स्पेन यामधील रक्ताचा व भाषेचा समूह हा राज्याच्या एकीकरणाचे कारण नसून परिणाम आहे. सध्याच्या काळी हे तत्त्व 'नैसर्गिक सरहद्द' हे आहे. एखाद्या मुत्सद्याने वादाच्या प्रसंगी नैसर्गिक सरहद्दीची संकल्पना ही 'अंतिम युक्तिवाद' म्हणून आपल्या कौशल्यपूर्ण बचावात वापरणे ठीक आहे. पण एखाद्या इतिहासकाराला जणू काही एक कायमची ढाल म्हणून तिच्या मागे दडता येणार नाही. ती संकल्पना कायमची नाही आणि पुरेशी निश्चित तर नाहीच नाही.

काटेकोरपणे सांगायाचे झाले, तर प्रश्न काय आहे हे आम्हाला विसरुन चालणार नाही. राष्ट्रीय राज्य—आज ज्याला आम्ही राष्ट्र म्हणतो ते—काय आहे हे शोधून काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. नगरराज्यासारख्या किंवा अगदी दुसऱ्या टोकाला जावयाचे तर ऑगस्टसने स्थापन केलेल्या साम्राज्यासारख्या

[ऑगस्टसचे साम्राज्य हे त्याचा मानीव पिता सीझर याने जे साम्राज्य निर्माण करण्याची आकांक्षा धरली होती, त्याच्या विरुद्ध होते हे प्रसिद्ध आहे. ऑगस्टस हा पांपीच्या म्हणजे सीझरच्या शत्रूंच्या पद्धतीनुसार कार्य करतो. या विषयावरचे आतापर्यंतचे सर्वोत्तम पुस्तक अि. मायरचे 'The Monarchy of Ceaser & Principate of Pompey, (1918)' हे आहे. ते उत्कृष्ट असले, तरी मला अपुरेच वाटते यात आश्चर्य नाही. कारण विशाल दृष्टीचे इतिहासकार आज कोठेही आढळत नाहीत. मायरचे पुस्तक हे मॉम्सेनविरूद्ध लिहिले आहे. मॉम्सेन हा अचाट इतिहासकार आहे. तो सीझरला आदर्शरूप बनवितो, त्याचे अतिमानवात रूपांतर करतो, असे जे मायरने म्हटले आहे त्याला थोडेबहुत कारणही होते. तरीपण मला वाटते की, खुद्द मायरपेक्षा मॉम्सेनला सीझरच्या धोरणाचे रहस्य अधिक चांगले समजले आहे. यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण मॉम्सेन हा दांडगा भाषाशास्त्रज्ञ

अनुक्रमाणिका

होताच; शिवाय तो मोठ्या प्रमाणात भविष्यवादी होता. भूताचा भेद घेणारी अंतर्दृष्टि ही बव्हंशी भविष्याच्या दृष्टीशी जुळणारी असते.] इतर राज्याच्या नमुन्याहून ते भिन्न आहे. हा प्रश्न अधिक स्पष्टपणे आणि संक्षेपाने मांडावयाचा झाला तर तो अशारीतीने मांडता येईल : फ्रान्स, इंग्लंड, स्पेन, इटली वा जर्मनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सार्वजनिक सत्तांच्या सार्वभौमत्वाखाली लक्षावधी मानवांच्या सामायिक जीवनाला जन्म देणारी खरी शक्ती कोणती? ती शक्ती म्हणजे पूर्वीचा रक्तसंबंधाचा समूह नव्हे. कारण या समुदायांपैकी प्रत्येक समुदायात अत्यंत विजातीय रक्तांचे प्रवाह अंतर्भूत होत आले आहेत. ते भाषिक ऐक्यही नव्हे. कारण आज एका राज्यात एकत्रित झालेले जनसमूह पूर्वी निरनिराळ्या भाषा बोलत होते आणि अद्यापही बोलतात. ते आज वंशाचा आणि भाषेचा जो सापेक्ष एकजिनसीपणा उपभोगत आहेत—जर ती उपभोग्य वस्तु असेल तर-तो आधीच्या राजकीय एकीकरणाचा परिणाम आहे. परिणामी रक्त किंवा भाषा राष्ट्रीय राज्याला जन्म देत नाहीत. उलट रक्त आणि बोली यामुळे उद्‌भवणाऱ्या भेदाना समपातळीत आणणारे काय असेल तर ते राष्ट्रीय राज्यच. सदैव हेच घडत आले आहे. रक्त आणि भाषा यांचे आधीचे झालेले ऐक्य क्वचितच राज्यसंस्थेशी एकाच वेळी जुळून आले आहे. स्पॅनिश भाषा सबंध देशात बोलली जाते, याच कारणास्तव स्पेन हे राष्ट्रीय राज्य होते असे नव्हे.[ सगळेच स्पानिआर्द हे स्पॅनिश किंवा सगळेच इंग्रज हे इंग्लिश बोलतात अथवा सगळेच जर्मन हे प्रौढ जर्मनभाषा वापरतात हे खरे नाही.] किंवा स्वेच्छरीत्या निवडलेल्या कोणत्याही कालखंडात सार्वभौमत्वाच्या प्रादेशिक सीमा आरागाँनी आणि कातालोनी या भाषांच्या सीमाशी जुळून आल्या या कारणाने आरागाँ आणि कातालोनिया ही राज्ये राष्ट्रीय होत नाहीत. आम्हाला सत्य शोधावयाचे असेल, तर वास्तवतेत व्यवहाराला जो वाव असतो, त्याला अनुसरून पुढील गृहीतक स्वीकारणे योग्य होईल : कोणताही प्रादेशिक विस्तार व्यापणारे प्रत्येक भाषिक ऐक्य हे बव्हंशी निश्चितपणे कोणत्यातरी आधी झालेल्या राजकीय ऐक्याचे सांकळण असते. [अर्थात येथे कोईनॉन किंवा लिंग्वा फ्रान्का यासारखी उदाहरणे लक्षात घेतली नाहीत. त्या राष्ट्रीय भाषा नसून विशेषकरून आंतरराष्ट्रीय भाषा आहेत.] राज्य नेहमीच महान बहुभाषी राहिले आहे.

दीर्घ भूतकालात हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे रक्त आणि भाषा यांना राष्ट्रीयत्वाचा पाया समजण्याचा दुराग्रही हेका फार विचित्र वाटतो. या कल्पनेत जितकी अकृतज्ञता तितकीच विसंगतीही आहे. कारण फ्रेंच माणसाला प्रत्यक्ष फ्रान्स आणि स्पानिआर्दाला प्रत्यक्ष स्पेन ही एका 'क्ष' तत्त्वामुळे प्राप्त होतात. या 'क्ष' तत्त्वाच्या प्रेरणेच्या योगाने रक्त आणि भाषा यावर आधारलेल्या संकुचित समाजाचे नेमके उल्लंघन होते. म्हणून या दृष्टीने पहाता फ्रान्स आणि स्पेन ही ज्या घटनेमुळे शक्य कोटीत आली, त्याच्या अगदी विरुद्ध घटना त्यात आज समाविष्ट आहेत.

रक्त आणि भाषा यांच्यापासून एकतेचे तत्व प्राप्त होत नाही असे आढळून आल्यानंतर जेव्हा राष्ट्र ही कल्पना 'नैसर्गिक सरहद्दी'च्या गूढ भौगोलिकतेच्या द्वारे प्रादेशिक आकारावर आधारण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा अशीच चुकीची कल्पना उद्‌भवते. आज अशाच दृष्टिभ्रमाला आम्ही तोंड देत आहो. प्रत्यक्ष परिस्थितीची जोखीम पत्करुन युरोपीय भूखंडावरील व्यापक प्रदेशात किंवा लगतच्या बेटात तथाकथित राष्ट्रे प्रस्थापित झालेली दिसून येतात. त्या प्रत्यक्ष सीमातून शाश्वत आणि आध्यात्मिक असे काहीतरी निर्माण करण्याचा विचार चालू होतो. त्या सीमा नैसर्गिक आहेत असे आम्हाला सांगण्यात येते. त्यांच्या 'नैसर्गिकते'त इतिहासाची कोणत्यातरी प्रकारची जादूची पूर्वनियती गर्भित असते. ज्या युक्तिवादाने राष्ट्राचे जनक या नात्याने रक्त आणि भाषा यांचा समाज आग्राह्य ठरतो; त्याच युक्तिवादावर घासून पाहिले म्हणजे ही मिथ्याकथा तात्काळ विराम पावते. येथेही पुनः काही शतके मागे गेले म्हणजे फ्रान्स आणि स्पेन ही आपल्या अटळ 'नैसर्गिक सरहद्दी'च्या

अनुक्रमाणिका

योगाने लहान लहान राष्ट्रात विभागलेली दिसतात. पर्वतांच्या सरहद्दी पिरनीज किंवा आल्प्स यांच्या इतक्या भव्य नसतील; जलमर्यादा या ऱ्हाईन, इंग्लिश खाडी किंवा जिब्राल्टरची सामुद्रधुनी यांच्या इतक्या महत्वाच्या नसतील; पण त्यावरून एवढेच सिद्ध होते की, सरहद्दींची 'नैसर्गिकता' केवळ सापेक्ष असते. ती त्या काळाच्या आर्थिक आणि युद्धसदृश साधन सामग्रीवर अवलंबून असते.

ही प्रसिद्ध 'नैसर्गिक सरहद्द' 'क्ष' लोकांचे 'ज्ञ' लोकांवर आक्रमण होण्याला अडथळा करते, हे ऐतिहासिक सत्य आहे. तो अडथळा—सामायिक जीवनाच्या किंवा युद्धसदृश कारवायांच्या मार्गातील अडथळा—'क्ष'च्या मार्गातील असल्याकारणाने 'ज्ञ'चे संरक्षण करतो. तेव्हा 'नैसर्गिक हद्दी'च्या कल्पनेत कधी कधी सरहद्दीपेक्षासुद्धा अधिक नैसर्गिक असे काहीतरी म्हणजे सरहद्द-विस्ताराची संभाव्यता आणि लोकसमूहाचे अनिर्बंध मीलन ही पूर्वगृहीत असतात. त्याला आळा बसतो, तो केवळ भौतिक अडथळ्यामुळेच. काल परवाच्या सरहद्दी फ्रेंच किंवा स्पॅनिश राष्ट्राचा पाया आहेत असे आज आम्हाला दिसून येत नाही. प्रकार उलट आहे. एकीकरणाच्या प्रक्रियेत राष्ट्रकल्पनेच्या मार्गात येणारे अडथळे हे पायाभूत वाटतात. असे असूनही दळणवळणाच्या आणि युद्धकलेच्या नव्या पद्धतीमुळे अडथळा या दृष्टीने आजच्या सरहद्दींची परिणामकारकता नष्ट झाली असूनसुद्धा त्या सरहद्दींना निश्चित आणि मूलभूत स्वरूप देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.

तेव्हा राष्ट्रीयत्वाचा निश्चित पाया म्हणून सरहद्दी उपयोगी पडत नाहीत; तर मग राष्ट्रीयत्वाचा निर्मितीत सरहद्दीचा भाग कोणता? याचे उत्तर स्वच्छ आहे आणि ते नगर राज्याला विरोधी अशा राष्ट्रीय राज्याच्या मागची प्रमाणभूत कल्पना समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. सरहद्दी या आधीच साध्य झालेले राजकीय एकीकरण प्रत्येक अवस्थेत दृढ करण्याच्या कामी उपयोगी पडलेल्या आहेत. म्हणून त्या कधीही राष्ट्रांचा प्रारंभबिंदू नव्हत्या. उलट, प्रारंभी यांनी अडथळाच केला आणि पुढे त्या अडथळातून पार पडल्यानंतर सरहद्दी या ऐक्य दृढ करण्याची वास्तविक साधने ठरल्या. अगदी बरोबर हेच कार्य रक्त आणि भाषा यांनी केले. राष्ट्र बनले ते या दोहोपैकी एकाच्याही नैसर्गिक समाजामुळे नव्हे; उलट राष्ट्रीय राज्यांच्या त्यांच्या एकीकरणाच्या प्रयत्नात इतर कित्येक अडथळ्याप्रमाणेच वंश आणि भाषा यांच्या अनेकत्वाचा विरोध झाल्याचे आढळून येते. त्या अडथळ्यावर जोरदारपणे मात केल्यानंतर वंशाचे आणि भाषांचे सापेक्ष एकत्रीकरण प्रत्यक्षात आले; आणि पुढे त्या ऐक्याचे दृष्टीकरण होण्याच्या कामी त्याचा उपयोग झाला.

तेव्हा राष्ट्रीय राज्याच्या कल्पनेला चिकटलेली चुकीची पारंपरिक कल्पना सोडून देणे आणि ज्या नेमक्या तीन गोष्टीत राष्ट्रीयत्व सामावलेले असते असे समजण्यात येत असे, त्याच त्याच्या मार्गातील मूलभूत अडथळे होते हे लक्षात ठेवणे, याशिवाय दुसरा मार्ग नाही. (अर्थात ही चुकीची कल्पना खोडून टाकीत असतानाच मलाच एका चुकीच्या कल्पनेची बाधा झाल्याचे दिसून येईल.) राष्ट्रीय राज्याचे रहस्य जैविक आणि भौगोतिक स्वरूपाच्या बाह्य तत्वामध्ये न शोधता राज्य या नात्याने त्याच्यापासून मिळणाऱ्या खास स्फूर्तीत, त्याच्या स्वतःच्या विशिष्ट अशा धोरणात शोधण्याचे ठरविले पाहिजे.

आधुनिक राष्ट्रीयत्वाची अद्‌भुत घटना समजून घेण्याकरिता शेवटी वंश, भाषा आणि प्रदेश यांचा अवलंब करण्याची आवश्यकता का वाटली? याचे एकमेव कारण म्हणजे त्यांच्यामध्ये व्यक्ति आणि सार्वजनिक सत्ता यांच्यातील ऐक्यभाव आणि मूळातील जवळीक प्रत्ययात येते हे होय. प्राचीन राज्याला हे अज्ञात होते.

अनुक्रमाणिका

अथेन्स आणि रोम येथील राज्य म्हणजे केवळ काही थोड्या व्यक्ती होत्या. बाकीचे सगळे-गुलाम, दोस्त, बाहेरच्या प्रांतातील लोक आणि वसाहतीतील जनता-केवळ प्रजाजन होते. इंग्लंड फ्रान्स, स्पेन, येथे कोणीही कधीही राज्याचे केवळ प्रजाजन असे नव्हते; तर ते सदैव त्यात सहभाग घेणारे त्याच्याशी एकरूप झालेले होते. राज्यात आणि राज्याशी होणाऱ्या या ऐक्याचे स्वरूप, विशेषतः लाभदायक स्वरूप, निरनिराळ्या काळी फार निरनिराळे होते. दर्जा, वैयक्तिक स्थान, सापेक्षतया विशेषाधिकारी आणि विशेषाधिकारहीन वर्ग, असे ठळक भेद होते. पण आम्ही जर प्रत्येक कालखंडातील राजकीय स्थितीच्या परिणामकारी वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करण्याचा आणि त्याची चेतना पुन्हा जगण्याचा प्रयत्न करू, तर प्रत्येक व्यक्तीला स्वतः राज्याचे क्रियाशील प्रजाजन, भागीदार आणि सहयोगी आहोत असे जाणवत होते हे स्पष्ट होईल.

राज्य, मग त्याचे रूप काहीही असो—आदिम, प्राचीन, मध्ययुगीन आधुनिक—सदैव एका मानव-समूहाने दुसऱ्या मानव समूहाना काहीतरीं साहसकार्य सामायिकपणे पार पाडण्याकरिता दिलेले आमंत्रण असते. हे साहसकार्य, त्याच्या मध्यंतरीच्या प्रक्रिया काहीही असोत, शेवटी सामायिक जीवनाच्या एका विशिष्ट नमुन्याच्या रचनेत सामावलेले असते. राज्य आणि अस्तित्वाची योजना, मानवी कृतींचा किंवा वागणुकीचा कार्यक्रम, या अतूट संज्ञा आहेत. राज्याला चालना देणारा गट अन्य गटांशी ज्या विविध प्रकारे सहकार्य करतो, त्यानुसार राज्याचे निरनिराळे प्रकार उदयाला येतात. म्हणून प्राचीन राज्य परकीय गटाशी एकजीव होण्यात कधीही यशस्वी झाले नाही. रोम इतालियनावर आणि बाहेरच्या प्रांतातील लोकावर राज्य करते आणि त्यांना वळण लावते; पण त्यांनी स्वतःशी ऐक्य साधावे इतके त्यांना उंचावत नाही. नगरातसुद्धा त्याने नागरिकांची राजकीय एकी घडवून आणली नाही. काटेकोर सांगावयाचे तर रोमच्या गणराज्याच्या काळी दोन रोम अस्तित्वात होते, हे विसरता कामा नये, अधिसभा (सीनेट) आणि जनता. राज्याचे एकीकरण हे एकमेकांना परकीय असणाऱ्या समूहामध्ये केवळ दळणवळण स्थापन करण्यापलिकडे कधीही गेले नाही. हे समूह एकमेकांना परकेच राहिले. म्हणून साम्राज्य धोक्यात आल्यावेळी ते इतरेजनांच्या स्वदेशाभिमानावर विसंबून राहू शकले नाही, आणि युद्धाच्या व प्रशासनाच्या नोकरशाही उपायांनीच त्याला केवळ स्वतःचे रक्षण करण्याची पाळी आली.

अन्य समूहांशी एकजीव होण्याच्या बाबतीत ग्रीक आणि रोमन लोकसमूहाची असमर्थता ज्या सखोल कारणामुळे उद्‌भवली, त्याची तपासणी करण्याचे हे स्थळ नव्हे. पण त्याचे सार एका कारणात निश्चितपणे सांगता येईल : राज्यात जे सहकार्य एटळपणे अंतर्भूत असते, त्याचे स्पष्टीकरण प्राचीन जगाचा मानव साध्या, स्वाभाविक, ढोबळरीतीने, म्हणजे शास्ते आणि शासित यांच्यातील द्वैत म्हणून करीत होता. [साम्राज्यातील सर्व रहिवाशांना नागरिकत्व बहाल करण्यात येते, त्यामुळे या विधानाला पुष्टी मिळते. प्रथमदर्शनी हे विरूद्ध वाटते. पण शेवटी असे दिसून येते की, ही सवलत अशावेळी देण्यात आली की, ज्यावेळी त्याच्या राजकीय दर्जाचे स्वरूप नष्ट होत चालले होते; आणि केवळ एक ओझे आणि राज्याची चाकरी म्हणून किंवा नागरी फायद्यातील नुसता एक अधिकार म्हणून तिचे रूपांतर होत होते. गुलामगिरी ही एक तत्त्व म्हणून स्वीकारणाऱ्या राज्याकडून दुसऱ्या कशाचीही अपेक्षा करता येणार नाही. दुसऱ्या पक्षी, आमच्या राष्ट्रांच्या बाबतीत गुलामगिरी ही केवळ एक अवशेष म्हणून राहिलेली गोष्ट होती.] रोमचे काम आज्ञा देण्याचे, पाळण्याचे नव्हे; इतरांचे काम आज्ञा पाळण्याचे, देण्याचे नव्हे. अशाप्रकारे तटांनी वेढलेल्या खुल्या पटांगणात (Pomoeriem) वस्तुतः भिंतींनी मर्यादित अशा नागर समाजात राज्य मूर्तत्वाला येते. पण नवे जनसमूह आपल्याबरोबर राज्याचे जे नवे स्पष्टीकरण आणतात ते आशयात कमी पडते. राज्य हे समान साहस कर्त्याची योजना असते. त्यामुळे त्याचे अस्तित्व निव्वळ गतिमान असते. राज्य म्हणजे काहीतरी करीत रहाणे होय. वंश, रक्त, भौगोलिक स्थिती, सामाजिक वर्ग या सर्वाचे स्थान दुय्यम असते. त्यांच्या

सहवासाला राजकीय मानाचे पद प्राप्त होते, ते पारंपरिक आणि पुरातन अशा भूतकालीन समाजामुळे नव्हे— थोडक्यात दैवनियत, अपरिवर्तनीय समाजामुळे नव्हे—तर कार्याची निश्चित योजना असलेल्या भविष्याकालीन समाजामुळे होय. काल आम्ही जे होतो त्यामुळे नव्हे, तर उद्या आम्ही जे होणार आहो त्यामुळे राज्यात आम्ही एकत्र सांधले जातो. म्हणून पश्चिमेचे राजकीय ऐक्य प्राचीन राज्याला बंदिस्त करणाऱ्या मर्यादा सहजासहजी ओलांडून पुढे जाते. आजचा युरोपीय हा तुलनेने प्राचीन मानवाहून भिन्न असून तो भविष्याला तोंड देणाऱ्या माणसासारखा वागतो. असा माणूस जाणीवपूर्वक भविष्यात जगत असतो आणि भविष्याच्या दृष्टीकोनातून आपले सध्याचे वर्तन ठरवीत असतो.

अशा प्रकारच्या राजकीय प्रवृत्ती अडखळा करणारे तत्वतः काहीही नसल्यामुळे ती प्रवृत्ती यापेक्षाही अधिक विस्तृत एकत्रीकरणाच्या दिशेने अटळपणे प्रगत होत जाईल. एकीकरणाची क्षमता अमर्याद असते. केवळ एका जनांचे दुसऱ्या जनांशी होणारे हे एकीकरण नव्हे; तर ते राष्ट्रीय राज्याचे यापेक्षाही मोठे असे एक वैशिष्ट्य आहे : सर्व सामाजिक वर्गांचे एका राजकीय समाजात होणारे एकीकरण. ज्या प्रमाणात प्रादेशिक दृष्ट्या आणि वंशदृष्ट्या राज्याचा विस्तार होतो, त्या प्रमाणात अंतर्गत सहकार्य अधिकाधिक सांधले जाते. राष्ट्रीय राज्य हे त्याच्या अगदी मुळातच लोकसत्तावादी असते आणि शासनाच्या प्रकारातील सगळ्या भेदापेक्षा कितीतरी अधिक निर्णायक असते, या अर्थाने ते लोकसत्ताक असते.

भूतकाळात जेव्हा राष्ट्राची व्याख्या समाजावरून करण्यात येत असे, तेव्हा शेवटी लोक नेहमी रेनांचे सूत्र सर्वोत्तम म्हणून स्वीकारीत असत, हे सांगणे चमत्कारिक वाटेल. याचे कारण एवढेच की, त्या सूत्रात रक्त, भाषा आणि समान परंपरा यांच्या जोडीला 'दैनंदिन सार्वमत' या नावाच्या नव्या उपाधीची भर पडते. पण या शब्द प्रयोगाचा अर्थ स्पष्टपणे समजून घेण्यात येतो कां ? रेनांने सूचित केलेल्या लक्षणाच्या विरुद्ध आणि तरीही त्यापेक्षा कितीतरी अधिक खरा भावार्थ आम्ही त्याला देऊ शकणार नाही कां?

(८)

"भूतकाळात समान वैभव आणि वर्तमानात समान एकता असणे, महान कार्ये एकत्र पार पाडणे आणि त्यापेक्षाही मोठी कार्ये पार पाडण्याची आकांक्षा धरणे, लोकांना घडविणारे हे आवश्यक कारणघटक असतात...भूतकालात वैभव आणि खंत यांचा वारसा, भविष्यात अंमलात आणावयाचा एकच एक कार्यक्रम...राष्ट्राचे अस्तित्व म्हणजे 'दैनंदिन सार्वमत होय'". रेनांची सुप्रसिद्ध व्याख्या अशी आहे. तिला असाधारण मान्यता मिळाली याचा उलगडा कसा करायचा? निःसंशय शेवटच्या वाक्याला डौलदार वळण देऊनच. 'दैनंदिन सार्वमता'त राज्य सामावलेले असते, या कल्पनेचा आमच्यावर विमोचक परिणाम होतो. रक्त, भाषा आणि समान भूतकाल ही तत्वे स्थितिशील असून ती दैवनियत, सांचेबंद आणि निष्क्रिय आहेत. ही तत्वे म्हणजे तुरुंगच होत. राष्ट्र जर यातच सामावलेले असेल आणि दुसरे काहीही नसेल, तर ते मागे पडेल आणि त्याची आम्ही पर्वा करू नये. व्यक्ती जशी असते तसेच काहीसे राष्ट्र असते, ती जे करते त्यासारखे काहीतरी नव्हे. मग परचक्र आल्यावर त्याचे संरक्षण करण्यात देखील अर्थ राहणार नाही.

आम्हाला आवडो वा नावडो, मानवी जीवन म्हणजे भविष्यात सतत व्यग्र असणे होय. या प्रत्यक्ष क्षणी आमचा संबंध लागोपाठ येणाऱ्या क्षणाशी असतो. म्हणून जगणे म्हणजे सदैव, अखंडपणे, अविश्रांतपणे, काहीतरी 'करीत रहाणे' होय. सगळ्या 'करीत रहाण्यात' भविष्याचा काहीतरी अंश प्रत्यक्षात आणणे गर्भित असते याची जाणीव का बरे होत नाही? यातच आम्ही स्मरणावर सर्व सोपवितो. त्याचाही समावेश आहे. या क्षणी आम्ही एखादी आठवण करतो, ती लागोपाठ येणाऱ्या क्षणात काहीतरी घडून यावे यासाठी होय. मग त्यात केवळ भूतकाळ पुनः जगण्याचे सुख का असेना? हे माफक छुपे सुख एका क्षणापूर्वी एक भावी इष्ट घटना म्हणून आमच्यासमोर उभे होते. म्हणून आम्ही 'गतगोष्टींचे करितो स्मरण.' यावरून हे स्पष्ट व्हावे की, जर एखादी गोष्ट भविष्याकडे बोट दाखवीत नसेल, तर मानवाच्या लेखी तिला काहीही अर्थ नसतो. [या दृष्टिकोणाप्रमाणे मानवी प्राण्याची प्रकृति अटळपणे भविष्यवादी असते. म्हणजेच तो प्रामुख्याने भविष्यात किंवा भविष्याकरिता जगत असतो. तथापि प्राचीन मानव सापेक्षत्वाने भविष्याचे दरवाजे बंद ठेवतो आणि युरोपीय मानव सापेक्षत्वाने ते उघडे ठेवतो, असे सांगून त्या दोहोंमधील फरक मी दर्शविला आहे. या दोन प्रमेयात वरवरचा विरोध आहे. मानव प्राण्याला दोन बाजू असतात हे आम्ही विसरतो, म्हणूनच केवळ असा भास होतो. या दोन बाजू म्हणजे, एका बाजूने तो खरोखरीच दिसतो तसाच असतो; दुसऱ्या बाजूने त्याच्या स्वतःविषयीच्या कल्पना असतात आणि त्या त्याच्या खऱ्याखुऱ्या अस्तित्वाशी कमीअधिक जुळणाऱ्या असतात. उघडच आमचे विचार, पसंत्या, कामना या आमचे खरे अस्तित्व नष्ट करू शकत नाहीत. परंतु त्या ती गुंतागुंतीचे करू शकतात आणि बदलू शकतात. प्राचीन मानव आणि आधुनिक मानव या दोघानाही भविष्याविषयी चिंता वाटते. पण प्राचीन मानव भविष्याला भूतकालाच्या स्वाधीन करतो, तर आम्ही भविष्याला तो नवीन असल्यामुळे अधिक स्वायत्तता बहाल करतो, हा विरोध अस्तित्वातील नसून पसंतीतील असतो आणि त्यामुळे आधुनिकाला भविष्यवादी आणि प्राचीनाला आर्षवादी म्हणून विशेषण लावणे समर्थनीय ठरते. युरोपीय ज्यावेळी आपल्या अस्तित्वाला 'आधुनिक काल' म्हणून संबोधण्याला सुरवात करतो, त्यावेळी नुकताच कोठे जागा होऊन तो स्वतःचा ताबा घेऊ लागलेला असतो, ही गोष्ट खूपच बोलकी आहे. 'आधुनिक' याचा अर्थ नवे, जे प्राचीन रूढी अमान्य करते ते, हे सर्वांना माहीत आहे. १४ व्या शतकाच्या अखेरीसच 'आधुनिकते' वर भर देण्याला सुरवात झाली आणि ती नेमकी त्या काळाचे लक्ष सर्वात तीव्रतेने वेधून घेणाऱ्या प्रश्नाच्या बाबतीत होय. याचे उदाहरण म्हणजे उपासनेचे आधुनिक स्वरूप, 'गूढवादी देवविज्ञाना'ची आघाडी म्हणून जे आम्ही ऐकतो ते होय.]

राष्ट्र हे केवळ भूत आणि वर्तमान या पुरतेच जर असते, तर परचक्रापासून त्याचे रक्षण करण्याची चिंता कोणीही वाहिली नसती. हे खरे नाही असे जे प्रतिपादन करतात, ते दांभिक तरी असले पाहिजेत किंवा वेडे तरी असले पाहिजेत. पण घडते ते असे की, राष्ट्राचा भूतकाळ आपली आकर्षणे—खरी वा काल्पनिक— भविष्यात प्रक्षेपित करीत असतो. आमच्या राष्ट्राचे अस्तित्व चालू ठेवणारा भविष्यकाळ इष्ट वाटतो. म्हणूनच त्याच्या रक्षणार्थ आम्ही सिद्ध रहातो. रक्त, भाषा किंवा समान भूतकाल यांच्यामुळे नव्हे. राष्ट्राचे रक्षण करीत असताना आम्ही आमच्या भावी काळाचे रक्षण करतो, गतकालाचे नव्हे.

हाच प्रतिध्वनि रेनांच्या वचनातून उमटतो; उद्याचा भव्य कार्यक्रम या नात्याने राष्ट्राचे अस्तित्व, सार्वमत भविष्याचा निर्णय देते. याबाबतीत भूताच्या सातत्यात भविष्य सामावलेले असते, या तथ्यामुळे प्रश्नात यत्किंचितही बदल होत नाही. ते एवढेच दर्शविते की, रेनांची व्याख्यासुद्धा स्वभावतः आर्ष आहे. परिणामतः राष्ट्रीय राज्यात रक्तसंबंधाने मर्यादित असे प्राचीन 'पुर' किंवा अरबांची 'टोळी' यापेक्षाही राज्याच्या शुद्ध कल्पनेला अधिक जवळ असणारे तत्व प्रतीत झाले पाहिजे. प्रत्यक्षात राष्ट्राच्या कल्पनेत भूतकाळ, भूमि, वंश यांच्या निष्ठेचा जतन करून ठेवलेला काही थोडथोडका भाग नसतो. परंतु यात आश्चर्यकारक हे की मानवजातीच्या एकतेचे आध्यात्मिक तत्व त्या कल्पनेत सदैव कसे यशस्वी ठरते हे दिसून येते. हे तत्व जीवनाच्या आकर्षक कार्यक्रमावर आधारलेले असते. यापेक्षाही अधिक म्हणजे, मी असे म्हणेन की, वरील गोष्टी भूतकालाचे अवजड ओझे होत्या, भौतिक तत्वामध्ये वसत असणाऱ्या त्या सापेक्ष मर्यादा होत्या आणि पाश्चात्यांच्या आत्म्यात त्या कधीही उत्स्फूर्तपणे उद्‌भवल्या नव्हत्या आणि आजही उद्‌भवत नाहीत. अद्‌भुतरम्यावादाने राष्ट्रकल्पनेचे जे पांडित्यपूर्ण भाष्य केले, त्यातून ती तत्वे जन्माला येतात. १९ व्या शतकाची राष्ट्रीयत्वाची संकल्पना मध्ययुगात अस्तित्वात आली असती, तर इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी ही कधीही

जन्माला आली नसती. [राष्ट्रीयत्वाचे तत्व हे कालक्रमानुसार १८ व्या शतकाच्या अखेरीस दिसून येणाऱ्या अद्‌भुतरम्यवादाच्या पहिल्या लक्षणापैकी एक आहे.] कारण ते भाष्य राष्ट्राला प्रेरणा देणाऱ्या आणि घडविणाऱ्या तत्वाची केवळ त्याचे ऐक्य आणि संवर्धन करणाऱ्या तत्वाशी गल्लत करते. राष्ट्रे निर्माण होतात ती स्वदेशाभिमानामुळे नव्हे हे कायमचेच एकदा सांगून टाकले पाहिजे. याउलट समजूत असणे म्हणजे पूर्वी मी उल्लेखिलेल्या आणि स्वतः रेनाने आपल्या प्रसिद्ध व्याख्येत मान्य केलेल्या भाबडेपणाचा एक पुरावाच होय. राष्ट्र अस्तित्वात यावे यासाठी एखाद्या गटाने समान भूतकाळाचे स्मरण ठेवणे आवश्यक असेल, तर मग मी स्वतःलाच असे विचारतो की, तो गट प्रत्यक्षात ज्या वर्तमानात राहातो, तो आजच्या दृष्टीकोनातून भूतकाळ ठरत असेल, तर त्या गटाला काय नाव द्यावे? 'आम्ही एक राष्ट्र आहो' असे त्या गटाला सांगता यावे याकरिता त्याचे ते समान अस्तित्व नष्ट होणे आवश्यक आहे हे स्पष्ट आहे. भाषाशास्त्रज्ञाच्या सबंध जमातीचा, जुनी दप्तरे धुंडाळणाऱ्यांचा, दुर्गुण येथेही आढळून येत नाही काय ? तो दुर्गुण म्हणजे भूतकालीन अस्तित्वाशिवाय दुसरे कोणतेही अस्तित्व मानावयाचे नाही हा धंदेवाईक दृष्टिदोष होय. भाषाशास्त्रज्ञ तोच की ज्याला भाषास्त्रज्ञ होण्यासाठी भूतकालाचे अस्तित्व आवश्यक असते. पण राष्ट्राचे तसे नसते. उलट, राष्ट्राला समान भूतकाल असण्यापूर्वी त्याला समान अस्तित्व निर्माण करावे लागते आणि ते निर्माण करण्यापूर्वी त्याचे स्वप्न त्याला पहावे लागते. ते इच्छावे लागते त्याची योजना आखावी लागते. राष्ट्र अस्तित्वात येण्यासाठी त्याच्यापाशी प्रथम भविष्याकरिता एक उद्दिष्ट असणे पुरेसे आहे; मग अनेकवेळा घडते त्याप्रमाणे के उद्दिष्ट असाध्य राहिले, वैफल्यात त्याचा शेवट झाला, तरी चालेल. अशा बाबतीत त्या राष्ट्राचा शेवट अवेळी झाला असे फार तर म्हणता येईल. याचे उदाहरण म्हणजे बर्गंडी होय.

स्पेनचा भूतकाल मध्य आणि दक्षिण अमेरिकेच्या लोकांशी समान आहे. त्यांची भाषा समान आहे. त्यांचा वंश समान आहे; तथापि त्यांचे एक राष्ट्र बनत नाही. का नाही? येथे एका गोष्टीची उणीव आहे आणि ती मूलभूत आहे हे आम्ही जाणतो, ती म्हणजे समान भविष्यकाळ. रक्तसंबंधाने निगडित असलेल्या लोकांना आकर्षित करण्याकरिता भविष्यात पुरेसे हितसंबंध गुंतलेला कार्यक्रम कसा शोधून काढावा हे स्पेनला उमगले नाही. भविष्यलक्षी सार्वमत स्पेनला प्रतिकूल होते आणि म्हणून पुराभिलेख, जुन्या स्मृति, पूर्वज, 'मातृदेश', ही उपयोगी पडली नाहीत. जेथे भविष्यलक्षी सार्वमत अस्तिंत्वात असते तेथे एकत्रीकरणाच्या शक्ति म्हणून ही सर्व उपयोगी पडतात, पण यापेक्षा त्यात अधिक काहीही नसते. [आम्ही सध्या एखाद्या प्रयोगशाळेतल्या प्रमाणे एका प्रचंड निर्णायक प्रयोगाला हातभार लावू पहात आहोत : इंग्लंड आपल्या साम्राज्यातील विविध भागांना अस्तित्वाचा एक आकर्षक कार्यक्रम देऊन समान जीवनाच्या सार्वभौम एकतेत त्याना ठेवण्यात यशस्वी होते की नाही हे आम्हाला पहावयाचे आहे.]

म्हणून मला राष्ट्रीय राज्यात सार्वमताच्या स्वरूपाची एक ऐतिहासिक रचना दिसते. त्याहून जे वेगळे दिसते, त्या सर्वाला क्षणिक, बदलते मूल्य असून ते हरघडी सार्वमताला आवश्यक असणारा आशय किंवा एकत्रीकरण दर्शविते. रेनाने शोधून काढलेला जादूचा शब्द प्रकाशमय होता आणि त्यायोगाने ऋणाग्र किरणांनी (cathode rays) तपासावे, त्याप्रमाणे राष्ट्राच्या अगदी आतल्या गाभ्याची तपासणी करता येते. तो गाभा या दोन घटकांचा बनलेला असतो. पहिला, एका समान साहसकार्यासह सामाजिक जीवनाची योजना; दुसरा त्या आकर्षक साहसकार्याला चिकटून रहाण्याची लोकाची वृत्ति. या सर्वसाधारण वृत्तीतून निर्माण होणारे अंतर्गत ऐक्य प्राचीन काळच्या राज्यापासून राष्ट्रीय राज्याचे वेगळेपण दर्शविते. प्राचीन राज्यात भिन्नभिन्न समूहांचे ऐक्य राज्याच्या बाह्य दडपणाने घडविले राखले जाते, तर राष्ट्रीय राज्याचा जोम 'प्रजाजना'मधील उत्स्फूर्त आणि गाढ मिलाफातून उद्‌भवतो. खरोखरीच प्रजाजन हेच आता 'राज्य' असतात, आणि त्याना ते राज्य म्हणजे स्वतःच्या बाहेरचे काहीतरी आहे असे जाणवत नाही. हीच तर राष्ट्रीयत्वातील नवी, अद्‌भुत गोष्ट आहे. आणि

अनुक्रमाणिका

तरीही रेना सार्वमताला भूतलक्षी घटक बनवून आपल्या व्याख्येची सफलता जवळजवळ रद्दबातल करतो. रेनांप्रणीत सार्वमत आधीच तयार झालेल्या राष्ट्राच्या संदर्भात असून ते त्याला चिरस्थायित्व देते. हे लक्षण बदलून जन्माला येऊ घातलेल्या अवस्थेतील राष्ट्रासाठी ते प्रमाणभूत ठरविणे मी पसंत करीन. हा दृष्टिकोण निर्णायक आहे. कारण खरे म्हणजे राष्ट्र हे कधीही आयते तयार बनलेले नसते. याबाबतीत अन्य प्रकारच्या राज्याहून ते भिन्न आहे. राष्ट्र हे सदैव घडण्याच्या किंवा मोडण्याच्या अवस्थेत असते. तेथे तृतीय पंथ नाही. राज्य एखाद्या विशिष्ट काळी एखादा जोमदार उपक्रम समोर ठेवते की नाही यावर अनुयायी मिळणे वा गमावणे अवलंबून असते.

म्हणून पाश्चात्य मानव—समूहांनी मोठ्या उत्साहाने लागोपाठ केलेल्या एकीकरणाच्या उपक्रमांचे स्मरण ठेवणे अत्यंत उद्‌बोधक ठरेल. त्यावरून दिसून येईल की, युरोपीय लोक अशा उपक्रमावरच जगले आहेत. हे केवळ त्यांच्या जीवनातच नव्हे, तर त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या संबंधातही. तसेच असे दिसून येते की, एखादा उपक्रम त्यांच्या नजरेसमोर असो वा नसो, ते त्यानुसार तयारीत रहातात किंवा ढिले पडतात.

अशा अभ्यासावरून दुसरा एक मुद्दा स्पष्टपणे निदर्शनास येतो. प्राचीन लोक राज्याच्या उपक्रमाचा आरंभ ज्या मानव—समूहात करीत असत, त्यांची गाढ निष्ठा त्या उपक्रमात अंतर्भूत नसे. तसेच राज्य म्हणून जे खास संबोधले जात असे, त्याच्या आवश्यक मर्यादेत—गण किंवा नगर यात—ते सदैव परिसीमित असे, या गोष्टीमुळे खुद्द असे उपक्रम व्यवहारतः मर्यादारहित असत. एखादा जनसमूह-पर्शिया, मॅसिडोनिया, रोम येथील-पृथ्वीच्या कोणत्याही भागाला आपल्या सार्वभौमत्वाखाली आणून त्याला आपला एक घटक बनवू शकत असे. त्यांचे ऐक्य अस्सल, आंतरिक आणि पक्के होत नसे; त्यामुळे विजेत्याच्या लष्करी वा शासकीय कार्यक्षमतेशिवाय दुसऱ्या कोणत्याही शर्तींना ते जुमानीत नसत. परंतु पश्चिमेला राष्ट्रांच्या रुपाने एकत्रित होत असताना कठोर अवस्थांतून जावे लागले. युरोपला पर्शिया, ऑगस्टस किंवा अलेक्झांडर यांच्या इतके विस्तृत साम्राज्य स्थापन करणे शक्य झाले नाही, या गोष्टीमुळे आम्ही सध्यापेक्षाही अधिक आश्चर्यचकित व्हावयास पाहिजे.

युरोपमधील राष्ट्रांची सर्जन—प्रक्रिया पुढील तालबद्धतेतून गेली आहे :

**पहिले आवर्तन :-** पाश्चात्यांच्या विशिष्ट सहजवृत्तीमुळे राज्य हे राजकीय आणि नैतिक जीवनाच्या द्वारे विविध लोकसमूहांचे मीलन घडवून आणते अशी जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण होते. या सहजप्रवृत्तीचा परिणाम भौगोलिक, वांशिक आणि भाषिकदृष्ट्या परस्परांना निकट असणाऱ्या समूहावर होऊ लागतो. ही जवळीक राष्ट्राचा पाया असते असे नव्हे, पण तीमुळे शेजाऱ्यामधील विविधतेवर मात करणे अधिक सुलभ होते.

**दुसरे आवर्तन :-** हा काळ दृढीकरणाचा असून नव्या राज्याच्या बाहेरचे इतर लोक हे परके आणि कमीअधिक शत्रु मानले जातात. हा कालखंड असा असतो की, ज्यावेळी राष्ट्रीकरणाची प्रक्रिया इतरांना वगळण्याचा, स्वतःला राज्यात बंदिस्त करून घेण्याचा दिमाख दर्शविते. थोडक्यात ज्याला आज आम्ही ‘राष्ट्रवाद’ म्हणतो त्याचा हा कालखंड असतो. यात तथ्य असते ते हे की, अन्य लोक हे राजकीयदृष्ट्या परकीय आणि शत्रु वाटत असले, तरी त्यांच्याशी आर्थिक, बौद्धिक आणि नैतिक दळणवळण चालू असते.

अनुक्रमाणिका

राष्ट्रवादी युद्धे तांत्रिक व मानसिक प्रक्रियामधील भेद निपटून काढण्याच्या कामी उपयोगी पडतात. नित्याचे शत्रु हळूहळू इतिहासक्रमात एकजिनसी होऊ लागतात. हे शत्रुजन आपल्या स्वतःच्या राज्याप्रमाणे एकाच मानवी वर्तुळाचे आहेत, ही जाणीव हळुहळू क्षितीजावर उदयाला येऊ लागते. तरीसुद्धा अद्यापही ते परके आणि वैरी समजले जातात.

**तिसरे आवर्तन :-** यात राज्याचे एकत्रीकरण पूर्णतेला जाते. मग हे नवे साहसकार्य काल जे शत्रु होते, त्यांच्यात ऐक्य घडवून आणण्याकरिता पुढे सरसावते. नैतिक वर्तन आणि हितसंबंध याबाबतीत ते आपले स्वकीय आहेत आणि एकत्र रहाण्याने अधिक दूरच्या परक्या गटाविरुद्ध आपला स्वतःचा एक राष्ट्रीय गट तयार होतो, ही निष्ठा उत्पन्न होते. हीच ती पक्वावस्थेला पोचलेली आमची नवी राष्ट्र-कल्पना.

मी जे सांगतो आहे, ते एका उदाहरणाने स्पष्ट होईल. 'सिद्'च्या काळाचा स्पेन (स्पानिआ) ही आधीच राष्ट्रीय कल्पना झाली होती असे ठासून सांगण्याची रूढी पडली आहे; आणि या सिद्धांताला अधिक वजन आणण्यासाठी कित्येक शतके आधी से इसिदोर हा 'स्पेन माते' विषयी बोलत होता, अशी भर त्यात घालण्यात येते. माझ्यामते ही एक ऐतिहासिक दृष्टीकोणाची घोडचूक आहे. सिद्च्या काळी लिऑंकास्ताइलचे राज्य घडण्याच्या प्रक्रियेत होते आणि या दोहोंचे ऐक्य ही तत्कालीन राष्ट्रीय कल्पना होती. आणि ती राजकीयदृष्ट्या परिणामकारक होती. दुसऱ्या पक्षी स्पानिआ ही प्रामुख्याने पंडिती कल्पना होती. ते कसेही असो, रोमन साम्राज्याने पश्चिमेत पेरलेल्या अनेक फलदायी कल्पनांपैकी ती एक होती. रोमच्या द्वारे एका शासकीय एकतेत पूर्वीच्या साम्राज्याचा एक सुभा म्हणून एकत्र जोडले जाण्याचा 'स्पानिआर्दां'ना सराव झाला होता. परंतु ही भौगोलिक-शासकीय कल्पना केवळ वरवर स्वीकारण्यात आली होती. आतून स्फुरलेली ती स्फूर्ति नव्हती आणि तीत कोणत्याही प्रकारची भविष्याविषयीची आकांक्षा नव्हती. [Rodrigo de Biuar, ca. 1040—1099.]

अकराव्या शतकात या कल्पनेला वास्तवता म्हणून मान्यता देण्याची कोणी कितीही इच्छा धरली तरी पण ४ थ्या शतकात ग्रीकांच्या लेखी 'हेलास' या कल्पनेत जितका जोम आणि रेखीवपणा होता, तितकीसुद्धा या कल्पनेची झेप जाऊ शकत नव्हती हे मान्य करावे लागेल आणि तरीही हेलास ही कधीही खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कल्पना नव्हती. याला साजेशी ऐतिहासिक तुलना पुढीलप्रमाणे करता येईल : १९व्या शतकातील युरोपीयाना जसा युरोप तसाच ४ थ्या शतकात ग्रीकांना 'हेलास' आणि ११ व्या आणि १४ व्याही शतकात स्पानिआर्दांना 'स्पानिआ' होता.

यावरून सुरेल संगीतातील सूरांप्रमाणे राष्ट्रीय ऐक्य घडवून आणण्यचे प्रयत्न उद्दिष्टांच्या रोखाने कसे चढत जातात हे आम्हाला दिसून आले, काल जी केवळ एक प्रवृत्ती होती तीच उद्या राष्ट्रीय स्फुरण्याच्या अंतिम उद्रेकात साकार होते. पण दुसऱ्या पक्षी, तिचा काळ येणार हे जवळजवळ ठरून गेले होते. साऱ्या युरोपचे एका राष्ट्रीय कल्पनेत रूपांतर होऊ शकेल. असा समय युरोपीयांच्या बाबतीत आता येत आहे. स्पेनच्या ऐक्याचे भाकित ११ व्या शतकात वर्तविणे जितके कपोलकल्पित ठरले असते, तितके आज ते ठरणार नाही. पश्चिमेचे राष्ट्रीय राज्य आपल्या खऱ्या प्रेरणेशी जितके अधिक इमानी राहील, तितके अधिक निश्चितपणे ते एका प्रचंड युरोपीय राज्यात पूर्णपणे साकार होईल.

पश्चिमेची राष्ट्रे प्रत्यक्ष आकार घेऊ लागतात न लागतात तोच त्यांच्या भोवती एक प्रकारची पार्श्वभूमी-युरोप-उदयाला येऊ लागते. एकत्रीकरणाचा नयनरम्य देखावा तो हाच. त्यातूनच प्रबोधनाच्या काळापासून पुढे त्यांची वाटचाल व्हावयाची आहे. ही युरोपीय पार्श्वभूमी खुद्द त्या राष्ट्रांचीच बनलेली आहे आणि त्यांना जरी याची जाणीव नसली, तरी आपल्या भांडखोर विविधतेतून माघार घेण्याला त्यांनी सुरवातही केलेली असते. फ्रान्स, स्पेन, इंग्लंड, इटली, जर्मनी हे आपापसात लढतात, विरोधी संघ तयार करतात आणि ते मोडून पुनः नव्याने बनवितात. पण या सर्व घडामोडीत युद्धकाळात तसेच शांतताकाळात समान म्हणून एकत्र नांदणे अनुस्यूत असते. असे एकत्र नांदणे रोमला युद्धात किंवा शांततेत केल्टीबेरियन, गॉल, ब्रिटॉन, किंवा जर्मन यांच्याबाबतीत कधीही शक्य झाले नाही. इतिहासक्रमात संघर्ष आणि राजकारण ही ठळकपणे आघाडीवर आली आहेत. साधारणपणे राजकारण ही ऐक्याची बीजे अंकुरणारी नेहमी अखेरची भूमि असते. परंतु ज्यावेळी एका क्षेत्रात युद्ध चालू होते, त्याचवेळी शत्रुबरोबर व्यापार, विचार, कलाप्रकार, श्रद्धातत्त्वे अशा शेकडो क्षेत्रात देवाणघेवाण चालू होती. कोणी असेही म्हणू शकेल की युद्धाचा खणखणाट हा केवळ एक पडदा असून त्याच्यामागे शत्रुराष्ट्रांची जीविते एकत्र विणली जात असत, आणि शांततेप्रीत्यर्थ जोराचे प्रयत्नही चालू असत. प्रत्येक नव्या पिढीत माणसांचे आत्मे अधिकाधिक सारखे होत चालले होते. अधिक अचूकपणे आणि सावधपणे सांगावयाचे तर असे म्हणता येईल : फ्रेंच, इंग्लिश, स्पॅनिश लोकांचे आत्मे तुम्ही समजता तितके भिन्न असतीलही; पण त्याचे मानसिक शिल्प एकच आहे आणि विशेषतः आशयातही त्यांच्यात हळूहळू सारखेपणाच येत आहे. धर्म, विज्ञान, कायदा, कला, सामाजिक आणि भावनिक मूल्ये यात ते सारखेच सहभागी आहेत. माणूस जगतो तो या आध्यात्मिक गोष्टीवरच. म्हणून त्यांचे आत्मे एकाच साच्यात ओतले गेल्याने त्यांचा एकजिनसीपणा अधिकाधिक वाढत जातो. आम्हाला जर आमच्या मानसिक सामग्रीची-मते, मानके, कामना, गृहीतके यांची—आज मोजदाद करावयाची झाली, तर असे आढळून येईल की, त्याचा अधिकांश भाग फ्रेंच माणसांच्या बाबतीत फ्रान्सकडून किंवा स्पानिआर्दाच्या बाबतीत स्पेनकडून आलेला नसतो; तर तो युरोपच्या सामग्रीतून आलेला असतो. खरोखरीच आज आमच्यावर जो प्रभाव पडला आहे, तो आमच्यामध्ये फ्रेंच माणूस किंवा स्पॅनिश माणूस किंवा स्पॅनिश माणूस म्हणून जे आहे, त्याचा अधिक पडला आहे. आमच्यामध्ये जे 'राष्ट्रीय' आहे, त्याच्या मर्यादेतच जगण्याचा जर आम्ही काल्पनिक प्रयोग केला आणि त्यात सर्वसामान्य फ्रेंच मानव या खंडातील इतर प्रदेशांच्या प्रभावामुळे जे जे उपभोगितो, विचार करतो, भावतो ते ते सर्व त्याच्याकडून आम्हाला कल्पनेने हिरावून घेता आले, तर त्याचा परिणाम पाहून तो स्वतःच भयचकित होईल. मग स्वतःवरच विसंबून रहाणे आपल्याला शक्य नाही आणि आपल्या आध्यात्मिक संपदेचा चारपंचमांश भाग युरोपची सामायिक मत्ता असते हे त्याला दिसून येईल.

पृथ्वीच्या या भागात राहाणाऱ्या आम्हा लोकांना गेल्या चार शतकात युरोप या शब्दात गर्भित असलेले आश्वासन पूर्ण करणे याशिवाय पार पाडण्याजोगे आणखीन काय करावयाचे आहे, याचे ज्ञान होणे अशक्य आहे. त्याला विरोधी अशी एकच गोष्ट म्हणजे जुनी 'राष्ट्रे' हा पूर्वग्रह, भूतकालावर आधारलेली राष्ट्राची कल्पना, ही होय. आपली पाठ फिरवून पुढचा इतिहास घडविण्याचा आग्रह धरणाऱ्या लॉट पत्नीच्या संततीप्रमाणे युरोपीय लोक काय आहेत हे थोड्याच अवधीत आम्हाला दिसून यावयाचे आहे. रोमचा आणि सामान्यतः प्राचीन जगातील मानवाचा आम्ही केलेला उल्लेख धोक्याची सूचना म्हणून उपयुक्त ठरतो. विशिष्ट नमुन्याच्या मानवाला त्याच्या डोक्यात एकदा शिरलेली राज्याची कल्पना टाकून देणे फार जड जाते. सुदैवाने युरोपीयांनी राष्ट्रीय

राज्याची जी कल्पना या जगात, जाणीवपूर्वक असो वा नसो, आणली ती काही भाषाशास्त्रज्ञांची पांडित्यपूर्ण कल्पना नव्हे.

या निबंधाच्या प्रतिपाद्य विषयाचा मी आता समारोप करू शकतो. जगाला आज एका तीव्र नैतिक अधःपतनाने ग्रासले आहे. या अधःपतनाचा अगम युरोपच्याच नैतिक अधःपतनात आहे. तिची कारणे बहुविध आहेत. त्यापैकी एक म्हणजे यापूर्वी स्वतःवर आणि इतर जगावर सत्ता गाजवली; पण आता त्या सत्तेचे विस्थापन झाले आहे. युरोपला आपण राज्य करतो, तसेच इतर जगाला आपण करून घेत आहो, याची यापुढे खात्री वाटत नाही. इतिहासकालातील सार्वभौमत्वच मुळी विसर्जनाच्या अवस्थेत आहे. आता 'कालाची परिपूर्ती' राहिली नाही; कारण तीत १९ व्या शतकाप्रमाणे स्पष्ट, पूर्वनिश्चित, निसंदिग्ध असा भविष्यकाळ गृहीत धरलेला होता. त्या शतकातल्या लोकांना उद्या काय घडणार आहे हे आपल्याला माहित आहे असे वाटत असे; पण आता पुनः नव्या अज्ञात दिशेचे क्षितिज खुले होत आहे. कारण 'कोण' राज्य करणार आहे, जगावर अधिसत्ता कशी संघटित होणार आहे, हे माहित नाही. 'कोण'म्हणजे कोणते लोक अथवा कोणत्या लोकांचा गट, परिणामतः कोणती वांशिक जात, कोणती विचारप्रणाली, कोणती पसंत्यांची, मानकांची, जोरदार हालचालींची पद्धति, याची कल्पना नाही.

नजीकच्या भविष्य काळात कोणत्या केंद्राकडे मानवी घटना खेचल्या जाणार आहेत, हे कोणालाही माहीत नाही. म्हणून जगाचे जीवन लज्जास्पदरीतीने हंगामी बनले आहे. आज जे जे सार्वजनिक आणि खाजगीरीत्या केले जाते—स्वतःच्या आंतरिक सदसद्विवेक बुद्धीने केलेले देखील—ते ते हंगामी असते. त्याला अपवाद केवळ विशिष्ट विज्ञानाचे विशिष्ट विभाग आहेत. आज जे जे घोषित केले जाते, उचलून धरले जाते, प्रयोगिले आणि प्रशंसले जाते, त्यावर विश्वास न ठेवणाराच माणूस शहाणा ठरेल. हे सगळे जितक्या त्वरेने आले तितक्याच त्वरेने निघून जाईल. शारीरिक खेळांच्या वेडापासून (वेडापासून, खुद्द खेळापासून नव्हे) ते राजकीय हिंसाचारापर्यंत, नवकलेपासून ते चित्रविचित्र टुमदार जलस्थानावरील सूर्यस्नानापर्यंत सगळ्यांची हीच गत. त्यापैकी कशालाही स्वतःची अशी मुळे नाहीत. या सर्व गोष्टी निराळ्या अर्थाने निव्वळ नवे शोध आहेत आणि त्या अर्थाने त्या चंचल लहरीसारख्या आहेत. जीवनाच्या भक्कम अंतःस्तरावर आधारलेली ती निर्मिति नव्हे. ती खरीखुरी प्रेरणा किंवा गरज नव्हे. थोडक्यात जीवनाच्या दृष्टीने हे सर्व मिथ्या आहे. आमच्यासमोर अशा एका जीवन पद्धतीतील परस्परविरोध उभा आहे की, प्रामाणिकपणाची जोपासना करणारी पद्धती ही एक प्रकारची फसवणूकच ठरते. ज्या अस्तित्वाला स्वतःची कृत्ये अपरिहार्यपणे आवश्यक वाटतात, तेच अस्तित्व केवळ सत्य असते. ज्याला आपल्या धोरणातील अटळपणा जाणवतो, असा एकही राजकारणी पुरुष आज सापडणार नाही अशा पुरुषाच्या प्रवृत्ती जितक्या अधिक आत्यंतिक, तितक्या त्या अधिक उच्छृंखल; तितकी नियतीकडून त्याला लाभणाऱ्या स्फूर्तीचे प्रमाणही कमीच. अटळ कारणानी जे बनलेले असते, तेच तेवढे या भूमीवर बद्धमूल होते; तेच केवळ मूलवासी (autichthonous) जीवन होय. बाकीचे सगळे म्हणजे जे जे स्वीकारणे, टाकून देणे, दुसऱ्या कशाच्या तरी ऐवजी घेणे आमच्या कुवतीत असते, ते ते सगळे केवळ जीवनाला खोटे बनविते. आजचे जीवन मध्यंतरीच्या कालखंडाचे, इतिहाससिद्ध राज्याच्या दोन संघटनामधील-जे होते आणि जे होणार आहे त्यांच्यामधील-पोकळ अवकाशाचे फळ आहे. याच कारणास्तव ते मूलतः हंगामी आहे. खरोखरीच कोणत्या संस्थांत कार्य करावे हे पुरुषांना माहित नसते आणि कोणत्या नमुन्याचे पुरुष पसंत करावेत हे स्त्रियांना माहीत नसते.

अनुक्रमाणिका

युरोपीय माणूस हा एकीकरणाचा कोणता तरी उपक्रम सुरू करण्याला उद्युक्त झाल्याशिवाय जगू शकत नाही. त्याच्या अभावी त्याची अवनति होते, तो ढिला पडतो, त्याचा आत्मा बधिर होतो. याची सुरुवात झालेली आज आम्ही स्वतःच्या डोळ्यांनी पहात आहोत. आजपर्यंत जे समूह राष्ट्र म्हणून समजले गेले आहेत, त्यानी एका शतकापूर्वी विस्ताराचा अत्युच्च बिंदू गाठला होता. याहीपेक्षा त्याना विकासाच्या वरच्या अवस्थेकडे नेण्याखेरीज त्यांच्याबाबतीत अधिक काहीही करता येणे शक्य नाही. आता ती राष्ट्रे म्हणजे सगळ्या युरोपभोवती साचलेला केवळ भूतकाल होत. हा भूतकाल युरोपला आपल्या भाराखाली दडपून टाकीत आहे; त्याने त्याला बंदिस्त केले आहे. पूर्वी केव्हाहीपेक्षा अधिक स्फूर्तिप्रद स्वातंत्र्य असून देखील आमच्या राष्ट्राच्या वातावरणात आम्ही श्वासोश्वास करू शकत नाही, हे आम्हाला जाणवते; कारण ती कोंडलेली हवा आहे. जे राष्ट्र पूर्वी सर्वांना मुक्तद्वार होते, त्याचेच रूपांतर आता काहीतरी प्रांतीय, बंदिस्त अशा जागेत संकुचित झाले आहे.

प्रत्येकाला एका नव्या जीवन तत्त्वाची गरज भासत आहे. पण अशासारख्या संकटावस्थेत सदैव घडते त्याप्रमाणेच याबाबतीतही घडत आहे. ज्या तत्त्वाने अवनतीकडे नेले, तेच तत्त्व कृत्रिमतीरीने फुगवून परिस्थिती सावरण्याचा काही लोक प्रयत्न करीत आहेत. अलिकडच्या काळातील 'राष्ट्रवादी' उद्रेकांचा हाच अर्थ आहे. मी पुनः सांगतो, गोष्टी नेहमी याचरीतीने घडत आल्या आहेत. शेवटची ज्योत सर्वात दीर्घकालीन, शेवटचा निःश्वास आतून अगदी खोलवरून येतो. भौगोलिक सरहद्दींचा ज्या वेळी लोप होतो, त्यावेळी लष्करी आणि आर्थिक सरहद्दींची वाढ होते.

परंतु हे सगळे राष्ट्रवाद म्हणजे एका बाजूने बंद असलेले रस्तेच होत. त्यापैकी एखाद्याचे भविष्यात प्रक्षेपण करण्याचा प्रयत्न करा आणि काय होते ते पहा. त्या मार्गाने बाहेर जाण्याची वाट नाही. राष्ट्रवाद हा नेहमीच राष्ट्रे निर्माण करणाऱ्या तत्वाच्या विरुद्ध दिशेने होणारा प्रयत्न होय. राष्ट्रवादाची प्रवृत्ति दुसऱ्याना वगळण्याची असते; पण राष्ट्रतत्व सर्वांना सामावून घेणारे असते. एकत्रीकरणाच्या काळात राष्ट्रवादाला निश्चित मूल्य आहे आणि तो उदात्त मानदंड आहे. पण युरोपमध्ये सर्व गोष्टींचे एकत्रीकरण होऊन चुकले आहे आणि राष्ट्रवाद म्हणजे एक वेड, काहीतरी नवे, काहीतरी महान साहसकार्य शोधून काढण्याच्या आवश्यकतेतून निसटण्याची एक सबब, याशिवाय काहीही राहिले नाही. राष्ट्रवादाच्या प्राथमिक कार्यपद्धति आणि त्याने उच्चपदास चढविलेल्या माणसांचा नमुना ही राष्ट्रवाद हा ऐतिहासिक निर्मितीच्या विरुद्ध आहे हे विपुल प्रमाणात दाखवून देतात.

युरोप खंडातील लोकसमूहातून एक महान राष्ट्राची उभारणी करण्याचा निर्धारच केवळ त्याच्या रक्तवाहिन्यात नवे जीवन ओतील. तो पुनः स्वतःवर विश्वास ठेवू लागेल आणि आपोआप तो आपल्या स्वतकडेच मागण्या करू लागेल आणि स्वतःला शिस्त लावून घेऊल. पण सामान्यपणे जाणवते, त्यापेक्षा परिस्थिति कितीतरी अधिक बिकट आहे. वर्षे निघून जात आहेत आणि धोका आहे तो हा की, युरोपीय मानव सध्या जीवनाच्या खालच्या पट्टीवर जगत आहे. त्याची त्याला सवय जडेल. दुसऱ्यावर तसेच स्वतःवरही राज्य करावयाचे नाही याला तो सरावेल. असे झाले तर मात्र त्याच्या अंगचे खरे गुण आणि त्याची वरच्या दर्जाची कार्यक्षमता हवेत विरून जातील.

अनुक्रमाणिका

परंतु राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत नेहमीच घडत आले आहे, त्याप्रमाणे युरोपच्या ऐक्याला स्थितिवादी वर्गाचा विरोध आहे. त्यांच्या बाबतीत याचा अर्थ विनाश असा होतो. कारण युरोप निश्चितपणे नीतीभ्रष्ट होण्याचा आणि त्याचे सर्व ऐतिहासिक सामर्थ्य हरवून बसण्याचा सर्वसामान्य धोका निर्माण झाला आहे, त्याच्या जोडीला दुसऱ्या अधिक प्रत्यक्ष आणि अधिक निकटच्या धोक्याची भर पडली आहे. रशियामध्ये जेव्हा साम्यवादाचा विजय झाला, तेव्हा त्या लाल लोंढ्यात सगळी पश्चिम बुडून जाईल असे कित्येकाना वाटले. मी मात्र त्यांच्याशी सहमत नव्हतो. उलट त्यावेळी मी असे लिहिले की, रशियन साम्यवाद ही चीज अशी आहे की, ती युरोपीयाकडून आत्मसात होण्याजोगी नाही. युरोपीयांचा नमुनाच असा आहे की त्याने आपल्या इतिहासात सारे प्रयत्न आणि शक्ती युक्तीवादाच्या पारड्यात टाकली आहेत. काळ निघून गेला आहे आणि मध्यंतरी भीतिग्रस्त झालेल्यांची मनःशांति पुनः त्याना परत लाभली आहे. तीही अशावेळी की, पुनः ते ती सकारण गमावूनही बसतील. कारण विजयी झालेला, भारावून टाकणारा, साम्यवाद युरोपभर फैलावण्याचा काळ खरोखरीच आला आहे.

मला दिसते ते हे असे आहे. पूर्वीप्रमाणे आताही रशियन साम्यवादाची मतप्रमाणाली युरोपीयांचे लक्ष वेधून घेत नाही किंवा त्यांना आकर्षित करीत नाही. ती त्यांच्यापुढे मोहक भविष्यकाळ उभा करीत नाही आणि तेही ज्या कारणांचा आरोप करण्याची खोड साम्यवादाच्या प्रचारकाना—हट्टी, बेपर्वा, वस्तुस्थितीला पारखे अशा प्रचारकाना—जडली आहे, त्या क्षुल्लक कारणाकरता नव्हे. निव्वळ नफ्यावर जगणाऱ्या आणि आपल्या मुलाबाळांसाठी मागे त्याचा वारसा ठेवणाऱ्या माणसाचे दिवस, साम्यवादावाचूनही आता भरले आहेत, हे पाश्चात्य भांडवलदार चांगले जाणून आहेत. रशियाच्या श्रद्धातत्वापासून युरोप जो मुक्त राहिला आहे, तो यामुळे नव्हे; भीतिमुळे तर नव्हेच नव्हे. वीस वर्षापूर्वी सोरेलने हिंसाचाराचे डावपेच ज्या स्वेच्छ पायावर प्रस्थापित केले, तो आज आम्हाला पूर्ण वेडेपणाचा वाटतो. भांडवलदार वर्ग हा सोरेलला वाटला तितका भ्याड नाही आणि प्रत्यक्ष वेळ येताच कामगारांपेक्षाही तो हिंसाचाराकडे अधिक झुकतो. रशियात बोल्शेविकवादाचा विजय झाला, याचे कारण रशियामध्ये भांडवलदार वर्ग नव्हता [मार्क्सप्रणीत समाजावाद आणि बोल्शेविकवाद या दोन वेगळ्या ऐतिहासिक घटना असून त्यांच्यात एकही लघुत्तम साधारण नाही याची कायमची खात्री पटण्याला हे पुरेसे व्हावे.] हे सर्वांना माहीत आहे. फासीवाद ही मध्यमवर्गीय चळवळ असून सगळ्या एकत्रित मजूर चळवळीपेक्षाही तो अधिक हिंसाचारी असतो, हे त्याने दाखवून दिले आहे. तेव्हा युरोपीय माणसाने स्वतःला साम्यवादात भिरकावून देण्यापासून परावृत्त व्हावे असे त्यात काहीही नाही. पण त्याचे कारण खूपच साधे आहे. ते हे की, युरोपियांना साम्यवादी संघटनेत मानवी सुखाची वृद्धी झाल्याचे प्रत्ययास येत नाही.

आणि तरीही येत्या काही वर्षात बोल्शेविकवादाविषयीचा युरोपचा उत्साह वाढेल, हे मला अगदी शक्य दिसते, याचा मी पुनरुच्चार करतो. खास बोल्शेविकवादाकरता म्हणून नव्हे, तर उलट त्याच्यात जे काय आहे त्याला बाजूला सारून. अशी कल्पना करा की, सोविएत सरकारने भगीरथ प्रयत्नांनी चालविलेली 'पंचवार्षिक योजना' अपेक्षेप्रमाणे सफल झाली आणि रशियाची आर्थिक परिस्थिती पूर्वस्थितीवर आली, इतकेच नव्हे, तर ती खूपच सुधारली. बोल्शेविकवादाचा आशय काहीही असो, त्यात एक प्रचंड मानवी साहस दिग्दर्शित होते. त्यात माणसानी सुधारणेचे उद्दिष्ट निर्धाराने कवटाळले आहे आणि त्या श्रद्धेमुळे त्याच्या अंगी भिनलेल्या शिस्तीने ते तंग अवस्थेत जगत आहेत. मानवाच्या उत्साहाला प्रतिसाद न देणाऱ्या निसर्गशक्ती जर या प्रयत्नाना अपयशी करणार नसतील, त्या शक्ती जर त्याला नुसते कार्य करण्याला पूर्ण अवसर देतील, तर आश्चर्यकारक

स्वरूपाचे हे प्रचंड साहस एका नव्या आणि दैदिप्यमान तारकापुंजाप्रमाणे युरोपीय क्षितिज उजळून टाकील. मध्यंतरी गेल्या काही वर्षाप्रमाणे युरोप जर आपल्या हीन वानस अस्तित्वाला चिकटून रहाणार असेल, यत्नांच्या अभावी तो कमकुवत होणार असेल, आणि नव्या जीवनाची कोणतीही योजना त्याच्यापाशी नसेल, तर अशा आश्चर्यकारक साहसाच्या संसर्गजन्य प्रभावाचा प्रतिकार करण्यास युरोप कसा बरे समर्थ होईल ? युरोपीयाना त्या साहसकार्याविरुद्ध तितक्याच मोठ्या कार्याचे निशाण उभे करता येणार नसेल, तर त्या नव्या 'कार्या'चे आवाहन तो विचलित न होता ऐकू शकेल, अशी अपेक्षा करणे ही समजूत निव्वळ चुकीची आहे. आपल्या अस्तित्वाला काहीतरी अर्थ प्राप्त करून देणाऱ्या कार्यासाठी उपयोगी पडावे म्हणून युरोपीय मानव साम्यवादावरील आपले आक्षेप गिळून टाकील आणि त्यावरील गाढ श्रद्धेच्या योगाने नव्हे, तर तिने उद्दीपित केलेल्या वर्तणुकीच्या उत्कटतेने भारावून गेल्याचे त्याला स्वतःला जाणवू लागेल हे अशक्य नाही.

माझ्या मते 'पंचवार्षिक योजने'च्या यशाला तोडीस तोड होऊ शकणारे एकच साहस आहे आणि ते म्हणजे युरोपचे एक महान राष्ट्रीय राज्य निर्माण करणे. अर्थशास्त्रातील तज्ञ असा निर्वाळा देतात की, अशा कामी विजय मिळण्याचा फारच थोडा संभव आहे. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या मार्गात येणाऱ्या महत्त्वाच्या अडचणीमुळे थोडा संभव आहे. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या मार्गात येणाऱ्या महत्वाच्या अडचणीमुळे सर्व काही घडून येईल, अशी आशा जर साम्यवादविरोधी शक्ती करीत असेल, तर खचित ती अधोगतीला जाईल. तिचे अपयश प्रत्यक्ष मानवाच्या सर्वकष पराभवाच्या तोडीचे ठरेल. साम्यवाद ही एक अतिरेकी नीतिसंहिता आहे, आणि नीति–संहिता म्हणून तो यत्किंचितही उणा पडत नाही. या स्लाव वंशीयांच्या संहितेला विरोधी आणि जीवनाच्या एका नव्या कार्यक्रमाला प्रेरणा देणारी नवी युरोपीय संहिता तयार करणे अधिक उचित आणि फलदायी होणार नाही काय?

* *

अनुक्रमाणिका

# प्रकरण १५ वे

## प्रश्नाचे खरे स्वरूप

प्रश्न आहे तो हा : युरोप नीतिसंहितेविना रहात आहे. समुदाय-मानवाने जुनी नीतिसंहिता झुगारून दिली असून तिच्याऐवजी नवी स्वीकारली आहे असे नव्हे. तर त्याच्या जीवनपद्धतीच्या गाभाऱ्यात कोणत्याही नीतिसंहितेशी जुळवून न घेता नेमके जीवन जगण्याची आकांक्षाच तेवढी आहे. तरुण माणसांना जेव्हा 'नव्या नीती' विषयी बोलताना तुम्ही ऐकता, तेव्हा त्यांच्या एकाही शब्दावर विश्वास ठेवू नका. युरोप खंडाच्या कोणत्याही एका कोपऱ्यात नीतिसंहिता अस्तित्वात असल्याच्या खुणा दर्शविणाऱ्या नव्या 'समष्टीभावाने (Ethos) प्रेरित झालेला एखादा गट अस्तित्वात आहे, हे मी एकजात नाकबूल करतो. जेव्हा लोक 'नवनीती' विषयी बोलतात, तेव्हा ते केवळ नवी अनिती आचरत असतात आणि निषिद्ध वस्तूना वाट मोकळी करण्याचा मार्ग शोधीत असतात.[ एखाद्या दिवशी नवनीतिसंहिता म्हणून जी जन्माला येईल, ती जाणणारे साऱ्या जगात १०/२० पेक्षा जास्ती लोक असतील, असे मला वाटत नाही. याच कारणास्तव अशी माणसे आजच्या प्रत्यक्ष काळाचे कमीत कमी प्रतिनिधी ठरतात.] म्हणून आजच्या मानवाकडे नीतिसंहिता नाही असा आरोप करणे हा भाबडेपणा ठरेल. आजच्या मानवावर या आरोपाचा काहीही परिणाम तर होणार नाहीच; उलट त्याला ती खुशामत वाटेल. अनीतिवाद ही आता सामान्य गोष्ट झाली असून सगळेच तो आचरीत असल्याची बढाई मारत आहेत.

ज्या समूहात भूतकाळाचे अवशेष—ख्रिस्ती, चित्वादी, जुने उदारमतवादी, यासारखे अवशेष—टिकून राहिल्याचे प्रत्ययास येते, त्या सर्वांचा विचार या निबंधातल्याप्रमाणे बाजूला ठेवला, तर आजच्या प्रत्यक्ष काळाच्या सर्व प्रतिनिधीमध्ये असा एकही गट आढळणार नाही की, ज्याची जीवनविषयक प्रवृत्ति स्वतःला सगळे हक्क आहेत, पण जबाबदारी मात्र कोणतीही नाही, यावर श्रद्धा ठेवण्यापुरतीच मर्यादित नाही. तो प्रतिगामी किंवा क्रांतिवादी वेषात वावरतो याला महत्त्व नाही. सक्रियतेने वा निष्क्रियतेने एखादा दुसरा पीळ पडल्यानंतर सर्व गोष्टीकडे दुर्लक्ष करावे आणि तसे का याची यत्किंचितही पर्वा न करता स्वतःला अमर्याद हक्क असावेत असे वाटावे अशी त्याची मनःस्थिति निर्णायकपणे होते. असा आत्मा धारण कारणारे द्रव्य कोणतेही असो, त्याची फलनिष्पत्ति एकच असेल आणि कोणत्याही प्रत्यक्ष उद्देशाशी जुळवून न घेण्यासाठी एक सबब असेच त्याचे रूप राहील. तो प्रतिगामी किंवा उदारमतविरोधी आहे असे जर दिसले, तर ते राज्याचा बचाव करण्याकरिता. अन्य सगळे दंडक एकाच मापाने मोजण्याचा आणि शेजाऱ्याशी, विशेषतः तो शेजारी एखादी ठळक व्यक्ति असेल तर, त्याच्याशी आडदांडपणे वागण्याचा हक्क प्राप्त होतो, हे ठामपणे सांगता यावे यासाठीच असते. परंतु जेव्हा तो क्रांतिकारकाची भूमिका वठवितो, तेव्हाही हेच घडते. शारीरिक श्रम करणाऱ्याविषयीचा, रंजल्यागांजलेल्या विषयीचा आणि सामाजिक न्यायाविषयीचा त्याचा वरकरणी उत्साह हा सौजन्य, सत्यनिष्ठ आणि विशेषतः श्रेष्ठ जनाविषयी आदर किंवा पूज्यभाव अशासारखी सारी बंधने सहज नाकारता यावीत यासाठी मुखवटा म्हणून उपयोगी पडतो. मला अशी काही माणसे माहीत आहेत की, जे बुद्धीचा तिरस्कार करण्याचा आणि तिची प्रशस्ति टाळण्याचा हक्क प्राप्त करून घेण्याकरिताच केवळ कोणत्यातरी मजूर वा इतर संघटनांच्या अनुयायी वर्गात शिरली आहेत. हुकूमशाहीच्या इतर प्रकाराविषयी म्हणाल, तर ते सामान्य पातळीच्यावर जे जे दिसते, ते ते सर्व पायदळी तुडवून समुदाय—मानवाची कशी खुशामत करतात हे आम्हाला फार चांगले दिसून आले आहे.

अनुक्रमाणिका

अशाप्रकारे प्रत्येक जबाबदारी टाळली जाते, याचे अंशतः स्पष्टीकरण सध्या युवक या नात्याने 'युवकां'चे व्यासपीठ स्थापन करण्याच्या निमहास्यास्पद आणि निमलांछनास्पद घटनेत सापडते. आजच्या काळाचे यापेक्षा अधिक विद्रूप असे दृश्य कदाचित दुसरे सापडणार नाही. थट्टेने लोक स्वतःला तरुण म्हणवून घेतात; कारण तारुण्याजवळ जबाबदारीपेक्षा हक्कच अधिक असतात, असे त्यांच्या ऐकिवात असते. त्यामुळे जबाबदाऱ्या पार पाडण्याचे कार्य ते ग्रीक पंचागाप्रमाणे कधीही अस्तित्वात न येणारी पक्वावस्था प्राप्त होईपर्यंत लांबणीवर टाकू शकतात. युवक हा युवक या नात्याने महत्वाची कार्ये करीत राहणे आणि ती पुरी करणे यापासून मुक्त असतो, असे नेहमीच समजण्यात येते. तो नेहमीच उधारीवर जगत आला आहे. हा एक प्रकारचा खोटा हक्क असून तो अर्धवट उपरोधिक, अर्धवट प्रेमाचा असून जे तरुण राहिले नाहीत त्यानी आपल्यापेक्षा वयाने लहान असणाऱ्यांना प्रदान केलेला तो हक्क आहे, पण सध्या चकित करणारी गोष्ट म्हणजे ही माणसे तो हक्क प्रभावी आहे असे धरून चालतात, आणि ते नेमके या कारणाकरिता की, ज्याने पूर्वी काहीतरी कार्य केले आहे अशा माणसाचे जे अन्य हक्क असतात, त्या सर्वावर स्वतःचा हक्क सांगता यावा यासाठी

हे अविश्वासार्ह भासले तरीही 'तारुण्य' हा धाकदपटशा दाखवून लुबाडण्याचा एक चाळा (chantage) झाला आहे. आम्ही खरोखरीच अशा काळात वावरत आहोत की, जो पूरक प्रवृत्ति धारण करतो : हिंसा आणि विडंबन. यापैकी कोणतेही घेतले तरी उद्देश मात्र नेहमी एकच असतो. तो म्हणजे कनिष्ठ प्रतिच्या माणसाला, झुंडीतल्या माणसाला, श्रेष्ठापुढे नमण्यापासून आपण मुक्त आहो असे वाटावे हा होय.

तेव्हा प्रत्यक्ष संकटावस्था ही एक ऱ्हासमान आणि एक उदयोन्मुख अशा दोन नीतीमधील, दोन संस्कृतीमधील, संघर्ष आहे असे दर्शवून तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याने भागणार नाही. समुदाय-मानव हा केवळ नीतिमत्तेविना आहे आणि नीतिमत्ता म्हणजे मूलतः कोणाला तरी शरण जाण्याची भावना सेवा आणि जबाबदारी यांची जाणीव होय. कदाचित 'केवळ' म्हणणे चुकीचे आहे. कारण हा प्रश्न नुसता नीतिमत्तेविना चालणाऱ्या प्राण्यांच्या नमुन्याचा नाही. छेः, त्याचे काम फार सोपे करता कामा नये. अधिक गाजावाजा केल्याशिवाय नीतिमत्ता टाळता येत नाही. व्याकरणात देखील शब्दांची उणीव भासणारी निर्नैतिकता (amorality) या नावाने संबोधली जाणारी वस्तु अस्तित्वात नाही. कोणत्याही दंडकापुढे नमण्याला तुम्ही नाखुष असाल, तर तुम्हाला गरज असो वा नसो, सर्वच नैतिकता अमान्य करणारा दंडक तुम्हाला पत्करावा लागेल, आणि हे त्रिनैतिकच नव्हे, तर अनैतिक आहे. निर्नैतिकतेचे पोकळ रुप राखून ठेवणारा नैतिकतेचा अभावच आहे. जीवनाच्या निर्नैतिकेवर श्रद्धा ठेवणे हे कसे बरे शक्य होते? निःसंशय याचे कारण हे की, सगळी आधुनिक संस्कृति आणि सुधारणा त्याच श्रद्धेकडे झुकत आहेत. युरोप आपल्या आध्यात्मिक वर्तनाची दुःखदायक फळे भोगत आहे. त्याने आंधळेपणाने जी संस्कृति स्वीकारली आहे, ती भव्य आहे, पण तिला मुळे नाहीत.

या निबंधात युरोपीय मानवाच्या एका विशिष्ट नमुन्याचे चित्र रेखाटले आहे. त्यात मुख्यतः तो ज्या मूळ संस्कृतीत जन्मला, तिच्या संबंधीच्या त्याच्या वागणुकीचे विश्लेषण केले आहे. असे करणे भागच होते. कारण हा मानव पूर्वीच्या संस्कृतीशी झगडणाऱ्या नव्या संस्कृतीचा प्रतिनिधी नाही; तर तो नकारात्मकच आहे. म्हणून त्याच्या मानस-चित्रणाशी पुढील महान प्रश्नाची गल्लत केल्याने आमचा हेतु सफल झाला नसता : आधुनिक

अनुक्रमाणिका

युरोपीय संस्कृतीला भोवणारे मूलगामी दोष कोणते? कारण अखेरीस सध्या प्रबळ असलेल्या मानवजातीच्या प्रकाराचा उमग त्या दोषात आहे हे उघड आहे.

हा महान प्रश्न या निबंधाच्या कक्षेबाहेरच राहिला पाहिजे. त्याच्या विवेचनासाठी : मानवी अस्तित्वाचा सिद्धान्त विस्ताराने उलगडून सांगावा लागेल. हा सिद्धान्त या पानातून एखाद्या अंतःसूत्राप्रमाणे गोवला गेला आहे, व्यंजनेने सूचित केला आहे, गुणगुणत सांगितला आहे. कदाचित थोड्याच अवधित तो मोठ्याने ओरडून सांगावा लागेल.

* * *

अनुक्रमाणिका

# शब्दसूची

| | |
|---|---|
| अंकुरित होणे; अंकुरणे | pullulation |
| अग्राह्य असणे–धरणे | invalidate |
| अनाग्रहवादी | non-conformist |
| अपसामान्य | abnormal |
| अपक्षय | hypertrophy |
| अमीर, ख्यातनाम, क्रियाशील | noble, |
| अमीरी, क्रियाशीलता | nobility |
| अवमानवीय | Infra-human |
| असाधारण | abnormal |
| उच्चकुलीन | patrician |
| उपायातीत | irremediable |
| उलटा ओघ, ओहोटी | refluence |
| ऋणाग्र किरण | cathod ray |
| एकाग्र, एकात्म | integral |
| एकमेव युक्तिवाद | unica ratio |
| औपचारिक, आकारिक | formal |
| औपचारिकता, आकारिकता | formalism |
| कल्पना-प्रक्रियण | ideations |
| कवाडेबंदी | hermetism |
| कार्यपद्धती | modus aperandus |
| कालक्रमता | chronism |
| कालरहित, कालविसंगत | achronic |

अनुक्रमाणिका

| | |
|---|---|
| किंकर्तव्य मीमांसा, व्यवहारशास्त्र | casuistry |
| खुले पटांगण | pomerium |
| चिद्‌वादी | idealist |
| चैतन्ययुक्त, प्राणभूत, जीवनावश्यक, जोमदार | vital |
| छद्‌मावरण | camouflage |
| जमाव, झुंड | agglomeration |
| जोम, चैतन्यशक्ती | vitality |
| ढोबळ मानाने, ढोबळपणे | grasso mondo |
| दुर्विहित वध | lynch |
| देवविज्ञान | thelogy |
| द्रष्टेपणाचा | apocalyptic |
| धोपटमार्गी | routineers |
| नकारात्मक इच्छा | noluntas |
| निरपेक्ष आदेश | categorical imperative |
| निर्नैतिकता | amorality |
| परमाधिकार | prerogative |
| परिपूर्ती, परिपूर्णता, समृद्धी | plentitude |
| पुनःसंघटन, सुसूत्रीकरण | rationalisation |
| पुराभिलेख | archives |
| प्रतिक्रांती, अंतर्गत क्रांती | involution |
| प्रथम युक्तिवाद | prima ratio |
| बहुभाषी | dragoman |
| भविष्यवादी, भविष्यलक्षी | futurist |

अनुक्रमाणिका

| | |
|---|---|
| भाबडा, धोपटमार्गी, अकृत्रिम | ingenuous |
| भूतलक्षी | retrospective |
| मर्मस्थान | vitals |
| मिथ्यकथा, थोतांड | myth |
| मुळे उपटलेली | deracines |
| मूलनिवासी | autoehthonous |
| राज्यवाद | statism |
| लक्षणार्थ, भावार्थ | connotation |
| लाडावलेले मूल | fils de famille |
| वनदेवता | hamdryard |
| विनाशवादी, शून्यवादी | nihilist |
| विश्वज्ञ | encyclopedic |
| विशेषतावाद | specialism |
| विशेषज्ञ | specialist |
| विशेषज्ञता | specialization |
| विशेषीकृत | specialized |
| विहितक | prescription |
| शेवटचा युक्तिवाद | ultima ratio |
| संगीताची लकेर | romanzas |
| सरदार, ख्यातनाम, क्रियाशील, अमीर | noble |
| सरदारशाही, क्रियाशीलता, अमीरशाही | nobility |
| सर्वतुच्छतावादी | cynic |
| सर्वव्यापकता | ubiquity |

अनुक्रमाणिका

| | |
|---|---|
| सांकळण | precipitate |
| साज | trappings |
| सामाजिक भावनिष्ठा | ethos |
| सामान्यजन, ग्राम्य, अशिष्ट | vulgar |
| सामान्यतत्व, ग्राम्यता | vulgarity |
| स्थितिवादी | conservative |
| स्वर्गीय | paradisiacal |